माहेश्वरी समाजातील स्त्रीजीवन

# कठपुतळी



REFBK-0026974

- प्रा. चंद्रकला भार्गव

संदर्भ
निबंध
3५४२
२६९८४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

31 JUL 1993

15 SEP 1993

(कृ. मा. पहा)
१००००-११-८९

# कठपुतळी

## माहेश्वरी समाजातील स्त्री-जीवन

प्रा. चंद्रकला भार्गव

REFBK-0026974

ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ

© प्रा. चंद्रकला भार्गव
' केशर ', सूत मिल रोड,
सिग्नल कॅंप, लातूर ४१३ ५३१

प्रकाशक
अर्थबोध
सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६

वितरक
ग्रंथाली
इंडियन एज्यु. सोसायटीची
म. फुले कन्याशाळा,
वावरेकर मार्ग, ऑफ गोखले रोड (उ)
दादर, मुंबई ४०० ०२८

मुद्रक
आनंद लाटकर
कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि.
४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रोड,
पुणे ४११ ०३०

मूल्य : ४० रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
ग्रा. क्र. 3547
२६८८७४
२२।६।९३
संदर्भ
निबंध
3547
२६८८७४
२२।६।९३

*चिकित्सकपणे*
*प्रत्येक प्रश्नाचा अभ्यास करून*
*आयुष्याला सामोरे जाण्यास*
*ज्यांनी मला शिकविले*
*ते माझे वडील*

कै. पन्नालालजी डागा

---

यांच्या स्मृतीस

# लेखिकेचे मनोगत

प्रत्येक कार्यामागे कुठल्यातरी प्रेरणा असतात. त्याला कोणाचे तरी प्रोत्साहन असते. प्रकल्प पूर्ण करण्यामागे विविध घटक काम करत असतात. रंगभूमीवर काम करणाऱ्या मंडळींच्या पाठीमागे कार्यकर्त्यांचा जो मोठा संच झटत असतो, त्यांच्या कामाचे मोल रंगभूमीवरील नटांइतकेच महत्त्वाचे असते. त्या पडद्याआडच्या प्रेरणास्रोतांचा, औपचारिकरीत्या नव्हे तर हार्दिक असे आभार मानण्याचा हा दिवस उजाडला आहे. हे पुस्तक लिहून पूर्ण करण्यापाठीमागे अनेकांचे हात आहेत. पहिले प्रेरणास्रोत आहेत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे शिल्पकार डॉ. वि. म. दांडेकर.

अर्थविज्ञानवर्धिनीतर्फे १९८२ साली लोणावळ्यात स्त्रियांचे एक शिबिर घेण्यात आले. लातूरहून मी एक निबंध पाठविला होता "मी, मुलगा व मुलगी यात फरक करते का?" त्या निबंधास बक्षिस मिळून मला त्या शिबिराचे निमंत्रण पाठविण्यात आले. त्या शिबिरात सहभागी झाल्याचा मला खूप आनंद झाला. तेथे माझ्या स्त्री-मुक्तीच्या विचारांना परिपक्वता आली. विद्युत भागवत, शैला कोनलाडे, नीलम गोऱ्हे इत्यादी सामाजिक कार्यकर्त्यांनी आयोजित केलेले हे शिबिर मला फार मोलाचे वाटले. या शिबिरात सर्वांना मिळालेले मार्गदर्शन, विचारांची झालेली देवाण-घेवाण, खेड्यातून आलेल्या स्त्रियांचे प्रश्न व त्यांचे अनुभव... हे सर्व ऐकायला व पाहायला मिळाले. तीन दिवसांच्या या शिबिरातील वास्तव्यात स्त्रियांच्या प्रश्नावर शिबिरार्थी जागृत होत होत्या, हे निश्चितपणे जाणवले. माझ्याही पुढे विचारांचे एक नवे दालन उभे राहिले. त्यामुळेच ते शिबिर माझ्या कर्तृत्वाला एक नवीन वळण देणारे ठरले.

तेव्हा गाजत असलेल्या माहेश्वरी समाजातील मंजुश्री सारडा हिच्या खूनखटल्यामुळे डॉ. वि. म. दांडेकरांनी लातूर येथील माहेश्वरी समाजातील स्त्रियांचे जीवन व प्रश्न जाणून घेण्याची इच्छा प्रकट केली. त्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी लातूर येथील माहेश्वरी महिलांच्या अभ्यासाचा प्रकल्प माझ्यावर सोपविण्यात आला. त्या स्त्रियांचे जीवन, त्यांची जीवनपद्धती, त्यांचे संस्कार व त्यांची संस्कृती, हे सारे जाणून घेण्यासाठी मी, विद्युत भागवत ह्यांच्या सहकार्याने, प्रश्नावली तयार केली. एकत्र कुटुंबात राहणाऱ्या स्त्रियांची जीवनपद्धती वेगळी व त्यांच्या जीवनातले प्रश्नही वेगळे. विभक्त कुटुंबात राहणाऱ्या महिलांचे सवाल वेगळे, विधवांचे

आयुष्य वेगळे. नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची जगण्याची पद्धती भिन्न. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे बारीकसारीक कंगोरे जाणण्यासाठी वेगवेगळी प्रश्नावली तयार केली. त्यातून माहेश्वरी समाजातील स्त्रीच्या वास्तव जीवनाचे दर्शन मला घडले. तिच्या समाजातील स्थानाचे, स्थितीचे आकलन झाले. त्या वास्तवावरून मी जे निष्कर्ष काढले, त्यांचेच चित्रण मी ह्या पुस्तकात शब्दबद्ध केले आहे.

ह्या प्रकल्पासाठी माहेश्वरी समाजातील स्त्रीच्या स्थितीचा सर्व बाजूंनी विचार करून, तिच्यासंबंधी मी माहिती गोळा केली. त्या प्रश्नावलीत विचारलेले निरनिराळे प्रश्न तिचे वय, शिक्षण, लग्नातील हुंडा, लग्नाची पद्धत, घरातील मोकळेपणा, तिला मिळणारे आर्थिक स्वातंत्र्य, तिचे छंद, इत्यादी विविध बाबींसंबंधी माहिती देणारे होते. मी सर्व स्त्रियांच्या घरोघर जाऊन त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलण्याचा प्रयत्न केला. मीही त्यांच्यातलीच होते. त्याच गावात राहणारी होते. म्हणून कोठे फार चांगला प्रतिसाद मिळाला, स्त्रियांनी आपले ठसठसते दुःख व्यक्त केले. पण काही ठिकाणी ह्या गोष्टींमुळे स्त्रिया आपले आंतरिक दुःख सांगण्यास भीतही होत्या. मला त्यांना वेगळ्या तऱ्हेने प्रश्न विचारून बोलते करावे लागले. कुठे माझे स्वागत खूप चांगल्या तऱ्हेने होई, तर कुठे आठ्या पाडून; "हिला कशाला ह्या पंचायती?" हा भाव मौन रूपाने प्रकट करून मुलाखती दिल्या जात. काही घरांतून तर मला परतच पाठवून दिले. कारण काय तर, "अहो, आमच्या घरी काही प्रश्नच नाहीत, मग मुलाखत कशाला द्यायची? त्याची काहीही गरज नाही." स्त्रियांची सारी जीवनगाथा मला ऐकायची आहे हे त्यांना समजावूनही पटले नाही. काही ठिकाणी आपली वैयक्तिक माहिती सांगताना स्त्रियांना भीती वाटे की, ही माहिती गुप्त ठेवण्यात येणार की नाही? मला त्यांना पटवून द्यावे लागे. त्यांना समजावून सांगावे लागे की, "तुमचे नाव व तुमची मुलाखत कुठेही प्रकट करण्यात येणार नाही." तेव्हाच स्त्रियांनी आपले काही प्रश्न सांगितले; आपल्या कर्मकहाण्या सांगण्याचे साहस त्यांना लाभले. पण तरीही वाटत होते की, व्यक्त शब्दापेक्षा कितीतरी जास्त पटींनी अव्यक्त अशा जखमा आहेत, ठसठसणाऱ्या वेदना आहेत. पण सारे काही झाकून ठेवलेले. बुरखा संस्कृतीच्या वारसदार असलेल्या ह्या स्त्रिया सारे काही आपल्या बंद मुठीत ठेवण्यासाठी धडपडणाऱ्या. आपल्या घरातील उणिवा झाकून ठेवण्याचे तिचे कर्तव्य ती वर्षानुवर्षे करत आहे. त्या उणिवांवर ती पांघरूण घालणार नाही तर कोण घालणार? त्यागाची व सेवेची मूर्ती असलेली स्त्री आपल्या माणसांची, विशेषतः नवऱ्याची निंदा कशी करेल? तिच्या जीवनातील संघर्ष उघडे करून कसे दाखवेल? हे सारे मला जाणवत होते. म्हणूनच त्या व्यक्त व अव्यक्त शब्दांतून बाहेर पडलेल्या वास्तवाची जी पाहणी मी केली व त्यातून जे निष्कर्ष काढले ते मला लाख मोलाचे वाटले.

जीवनातल्या वास्तवाशी माझी फार जवळून गाठ पडली. त्यामुळे माझ्या जीवनात एक नवा क्रांतिकारक बदल घडून आला व मला स्वतःला जीवनासंबंधी एक नवी दृष्टी देऊन गेला.

डिसेंबर १९८२ पासून मुलाखतींचे काम मी सुरू केले. दोन-अडीच वर्षात ते पूर्ण झाले. माहेश्वरी समाजातील पाचशे महिलांच्या व्यक्तिगत मुलाखती घेऊन भरलेल्या प्रश्नावलींच्या आधारे त्यांचे जीवन शब्दबद्ध करण्याचा मी प्रयत्न केला तो ह्या पुस्तकातून. माझ्या ज्या सामाजिक जाणिवा होत्या, ज्या प्रगत सामाजिक वातावरणातून मी वाढले होते, या साऱ्यांचा

स्त्रियांना बोलते करून कुटुंब, विवाह, संतती, संस्कार, शिक्षण, धार्मिक सणवार, आर्थिक व्यवहार अशा अनेक घटकांचा येथे जो विचार केला गेला आहे, तो महत्त्वाचा आहे. साधारणतः समाजशास्त्रीय चौकटीत आजवर विविध समाजांचे जे अभ्यास झाले त्यात स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा विचार व्हावा तसा झाला नाही. उलट, प्रत्येक समाजात एकतर्फी पद्धतीने, स्त्रियांना पवित्र देवता, माता, शक्ती असे मानले गेले आहे ह्याचे दावे केले जातात, पण बालविवाह, कुटुंबात होणारी स्त्रीची दडपणूक, स्त्रियांचे घरकाम हे अदृश्यच ठेवले जाते. ह्या दृष्टीने ही त्रुटी दूर करण्यासाठी ह्या पुस्तकाच्या शेवटी दिलेले प्रश्नावलीचे नमुने महत्त्वाचे वाटतात. एखाद्या समाजातील स्त्रीजीवन जाणून घेण्यासाठी किती दिशांनी ही गुंतागुंत जाणून घ्यावी लागते ह्याचे त्यातून थोडे दर्शन होईल अशी आशा वाटते.

पुस्तकाच्या शेवटी प्रा. भार्गव ह्यांनी अशी आशा व्यक्त केली आहे की, स्त्री-शिक्षणाचा प्रसार झाला, स्त्रीचे स्वावलंबन वाढले की कुटुंबे सुधारतील आणि रूढीप्रिय समाजास नवे वळण लागेल. मला ह्या आशेच्या जोडीला ज्या तऱ्हेचे एकारलेले स्वार्थी आयुष्य आजच्या स्त्री-पुरुषांना आपले मानावे लागते आहे त्यातून कुटुंब, समाज ह्या सामूहिकतेपासून माणसे झपाट्याने दूर जात आहेत, एकटी एकटी माणसे सुटे आयुष्य जगणे पत्करत आहेत, त्यातील दुःखदायकताही लक्षात घेतली पाहिजे असे वाटते. आता शिक्षण, विज्ञान, विकास, प्रगती ह्या शब्दांचे अर्थ नीट पारखूनच घ्यावे लागतील. म्हणूनच आकडेवारी आणि प्रश्नावलीच्या साह्याने माहिती जमा करण्याइतकाच त्या माहितीचा अर्थ लावू शकणारा दृष्टिकोन विकसित करणे महत्त्वाचे वाटते.

मी प्रस्तावनेच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे भारतातील वेगवेगळे जातिसमूह सामाजिक विकासाच्या संदर्भात वेगवेगळ्या टप्प्यांवर उभे आहेत. अशा वेळी विकासाच्या एका टप्प्यापासून त्या पलिकडच्या टप्प्याकडे जाणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, घरापलिकडील सांस्कृतिक विश्वातला सक्रीय वावर आणि स्वतःचे आयुष्य जाणीवपूर्वक हवे तसे घडविण्याची क्षमता, ह्या बाबतीत माहेश्वरी समाजासारख्या ह्या संदर्भातील विकासाला खूपच महत्त्व आहे. अर्थात असे म्हणताना पुढचा टप्पा हा जणू काहीच प्रश्न नसलेल्या रामराज्यासारखा असणार आहे अशा भाबडेपणातून वरील सुधारणांचा पुरस्कार व समर्थन करणे चुकीचे ठरेल. भारतीय समाजातील स्त्रियांच्या संदर्भातील अत्यंत प्रगत जाती स्तरातील स्त्रियांनाही पुरुषप्रधान संस्कृतीचे जे चटके अनुभवावे लागतात ते लक्षात घेतले म्हणजे वरील सुधारणा करताना कोणता विवेक बाळगावा लागेल ह्याचेही आपल्याला भान येईल. म्हणजे एखाद्या समाजातील आजच्या मागसपणाविषयी अभ्यास करताना आमची भूमिका आंधळ्या आधुनिकतावादाच्या आहारी न जाता खऱ्या अर्थाने डोळस, सावध व समंजस बनेल.

— विद्युत भागवत

# अनुक्रमणिका

१. लातूर येथील माहेश्वरी समाजाची पूर्वपीठिका / १
२. स्त्रीशिक्षण व स्वावलंबन / १५
३. विवाह आणि विवाह पद्धती / ३८
४. जीवन : दांपत्याचे आणि वैयक्तिक / ६२
५. वैधव्य-एक शाप / ८१
६. काही शब्दचित्रे / ९०
परिशिष्ट / १२४

•

उपयोग मला या स्त्रियांच्या वेदना जाणून घेताना झाला. या स्त्रियांत मिसळून मला काम करायचे आहे, त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करावयाचे आहेत, हे मनोमनी जाणून मी माझा दृष्टिकोण ठरविला. मूक कठपुतळ्यांच्या जीवनात चैतन्याचा स्पर्श घडवायचा आहे हे मी जाणले. ह्या साऱ्या प्रयत्नांमुळेच स्त्री-मुक्ती चळवळीतील विचार व समाजातील स्त्रीचे वास्तव, ह्यात असणारी प्रचंड दरी मला तीव्रतेने जाणवली.

माझ्या विचारांना एक नवी दिशा मिळाली. दबल्या मनाने भयग्रस्त जीवन जगणाऱ्या माझ्या मनालाही आत्मविश्वासाचा दरवाजा त्या प्रकल्पाने उघडला गेला. म्हणूनच प्रा. वि. म. दांडेकर ह्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यापासून सर्व मार्गदर्शन लाभले विद्युत भागवतचे. तिचेही ऋण शब्दात व्यक्त होणे अशक्य आहे. १९८०-८१ मध्ये लातूर येथील राजस्थानी समाजाची जनगणना होऊन एक पुस्तक प्रसिद्ध झाले होते. दयानंद कॉलेजमधील प्राध्यापक श्री. भंडारी यांनी मला हे पुस्तक दिले व मुलाखती घेण्याअगोदर सर्व समाजाची रूपरेषाच माझ्यासमोर मांडली. त्यामुळे लातूर शहरात माहेश्वरी समाजाच्या स्त्रिया किती आहेत व त्या कोठे राहतात ह्याचे संपूर्ण चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. त्यामुळेच मुलाखती घेताना कुणाच्याही घरी पोचणे मला फार सोपे गेले. प्रा. भंडारींचेही मनःपूर्वक आभार.

काही मुलाखतींसाठी मला सहकार्य केले बसवेश्वर कॉलेजची विद्यार्थिनी कु. शामा धूत हिने. समाजशास्त्राचा अभ्यास व प्रकल्प सादरीकरणाची पद्धत ह्यासंबंधी मला मदत केली बसवेश्वर कॉलेजचे प्रा. अनभुले व प्रा. पळसकर ह्यांनी. प्रा. रेखा गळेगावकर ह्यांनीही मला बहुमूल्य मदत केली. माझ्या एकत्र कुटुंबातील सर्व कुटुंबीय मंडळींनी वेळोवेळी माझ्या अनुपस्थितीत जी गैरसोय सोसली व मुलाखती घेण्यासाठी मला मोकळा वेळ दिला त्या साऱ्यांचे आभार मानणे मी कर्तव्यच समजते. माझे पती, मुले, भाऊ, भावजय, आई ह्या साऱ्यांचे आभार मानणे औपचारिक होईल. पण त्यांचे बहुमोल सहकार्य दुर्लक्षिणे मला रास्त वाटत नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या माहेश्वरी भगिनींनी मला आपली जीवनगाथा उलगडून दाखविली, ज्यांच्या सहकार्याशिवाय ह्या पुस्तकाचे एक पानही लिहिणे अशक्य होते, त्या सर्वांची मी शतशः आभारी आहे. माझ्या निष्कर्षामागे त्यांना कुठेही दुखविण्याचा हेतू नाही. फक्त वास्तव सर्वांच्या समोर यावें व सामाजिक प्रगती होण्यासाठी काही चांगल्या दिशेने बदल व्हावेत ह्यासाठी हा सारा खटाटोप. याशिवाय ज्या इतर ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी मला ह्या प्रकल्पास ह्या ना त्या प्रकारे हातभार लावला त्यांचेही शतशः आभार. या मांडणीत त्रुटी असतील तर त्या माझ्या आहेत.

— चंद्रकला भार्गव

# दोन शब्द

सन १९८१, १९८२ व १९८३ ह्या तीन वर्षांच्या काळात भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीने ग्रामीण महिलांच्या प्रबोधनाकरिता एक उपक्रम हाती घेतला होता. त्या निमित्ताने महिलांची एकूण ६१ महिला शिबिरे आणि चार निबंधस्पर्धा आयोजित केल्या होत्या. आलेल्या निबंधांपैकी काही निवडक निबंध **'मी बाई आहे म्हणून'** या नावाने सन १९८४ साली संस्थेने प्रकाशित केले होते.

महिला शिबिरात एकूण सुमारे २००० ग्रामीण व शहरी महिला सहभागी झाल्या होत्या. त्यात लातूरच्या प्रा. चंद्रकला भार्गव यांचा विशेष उल्लेख करावयास हवा. प्रा. भार्गव माहेश्वरी समाजातून आलेल्या आहेत. आणि या समाजाची बरीच कुटुंबे लातूर शहरात आहेत. त्यातील महिलांच्या परिस्थितीची एखादी पाहणी करण्याची इच्छा प्रा. भार्गव यांनी व्यक्त केली. या पाहणीतून प्रा. भार्गव यांनी सुमारे ५०० कुटुंबांतील महिलांच्या परिस्थितीचे निरीक्षण केले. ते या प्रकाशनाच्या रूपाने आम्ही जनतेसमोर आणि विशेष करून माहेश्वरी समाजासमोर ठेवीत आहोत.

देशातील सर्वच माहेश्वरी समाजातील परिस्थिती लातूरमधील माहेश्वरी समाजासारखी आहे असे मानण्याचे कारण नाही. भारतातील स्त्रियांची परिस्थिती विविध समाजांत आणि विविध प्रदेशांत विविध आहे. त्यांच्या परिस्थितीचा असा अभ्यास व्हावयास हवा. तो त्या त्या समाजातील कोणी ना कोणी करील, अशी आशा आणि अपेक्षा आहे.

**— वि. म. दांडेकर**

# प्रास्ताविक

भारतात भिन्न भाषा, संस्कृती, धर्म असलेले समाज हजारो वर्षे नांदत आहेत. आपण "भारतीय स्त्री-जीवन" असा शब्दप्रयोग वापरतो तेव्हा नेमक्या कोणत्या स्त्रीजीवनाचा निर्देश करतो असा प्रश्न मनात येतो. भिन्न जाती-धर्मातील स्त्रिया व पुरुष त्या त्या जातिधर्माच्या संस्कारात वाढविले जातात आणि त्यानुसार अशा तपशिलांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. कारण अशा अभ्यासातून भारतासारख्या देशातील स्त्री-पुरुषांचे आयुष्य किती वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे, किती गुंतागुंतीच्या धाग्यादोऱ्यांनी घडविले गेले आहे ह्याचे भान येते. प्रस्तुत पुस्तकातील अभ्यास हा असाच एक प्रयत्न आहे.

**कठपुतळी : माहेश्वरी समाजातील स्त्री-जीवन** हे पुस्तक, जवळ जवळ दहा वर्षांपूर्वी लातूर शहरात केलेल्या, घराघरातील पाहणीवर आधारित आहे. १९८० साली भारतीय अर्थविज्ञान वर्धिनीने एक प्रकल्प हाती घेतला होता. स्त्रियांमध्ये नेतृत्व गुण निर्माण व्हावेत, त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त क्षमतांचा विकास व्हावा, त्यांचा समाजातील कर्ता सहभाग वाढावा आणि त्यायोगे स्त्रीला घरात आणि घराबाहेर प्रतिष्ठा प्राप्त व्हावी असा ह्या प्रकल्पामागील हेतू होता. ह्या प्रकल्पांतर्गत सर्वसामान्य स्त्रियांना बोलते करण्यासाठी त्यांना जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या विषयांवर निबंधस्पर्धा घेतल्या, शिबिरे आयोजित केली, आणि काही अभ्यास हाती घेतले. लातूर शहरातील माहेश्वरी समाजातील स्त्री-जीवनाची पाहणी हा त्यातीलच एक अभ्यास आहे.

ही पाहणी करण्याचे ठरले तेव्हा स्त्रियांवर होणाऱ्या कुटुंबांतर्गत अत्याचारांची चर्चा जोरात चालू होती. स्त्री-चळवळीने हुंडाबळी नावाने होणाऱ्या स्त्री-हत्यांची प्रकरणे उघडकीस आणली होती. महाराष्ट्रातील पुणे शहरात मंजुश्री सारडा प्रकरण गाजत होते. शिक्षित, सधन घरातील तरुण स्त्रीचा छळ होतो, बळी पडतो, आणि पुराव्याअभावी नवरा, सासरची मंडळी निर्दोष सुटतात. इतकेच नाही तर नवऱ्याचे दुसरे लग्नही होते. ह्या वास्तवाने स्त्री-चळवळीतील अनेक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य स्त्री-पुरुषही हादरले, अंतर्मुख झाले. व्यापारात अग्रभागी असलेल्या, सधन आणि अनेक बाबतीत आधुनिक असणाऱ्या कुटुंबात स्त्री-जीवनाची दडपणूक का होते ह्या प्रश्नांचा मागोवा घ्यावा असे आम्हाला वाटले. प्रा. चंद्रकला भार्गव आमच्या

एका शिबिरात आल्या होत्या. त्यांच्या बोलण्यात बऱ्याच मारवाडी कुटुंबात छळापायी मुली माहेरी येतात आणि सुना आपल्या माहेरी परततात, तसेच अडत-व्यापार करणाऱ्याच्या घरातील सर्व स्त्रिया निव्वळ धान्ये, डाळी साफ करण्याची कामे दिवस न् दिवस करतात- हे आणि असे अनेक तपशील आले. तेव्हा व्यापारानिमित्त भाऊ, वडील ह्यांचे एकमेकांशी अतूट आर्थिक संबंध असतात अशा एकत्र कुटुंबात नव्या सुनांना कसे वागविले जाते, शिकलेल्या स्त्रियांच्या नव्या आकांक्षांना वाव मिळतो का, व्यापारी कुटुंबातील स्त्रीचे घरकाम म्हणजे नेमके काय असते, अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी लातूर शहरातील माहेश्वरी कुटुंबाची पाहणी करण्याचे ठरविले. हा अभ्यास करण्यास पुढे आलेल्या प्रा. चंद्रकला भार्गव स्वत: एकत्र कुटुंबात राहून, अनेक तडजोडी स्वीकारून आपली वाट शोधीत होत्या. तरी त्यांना त्यांच्या आईवडिलांचा, सासूसासऱ्यांचा सक्रीय पाठिंबा आहे. त्यांचे वडील पन्नालाल डागा आणि आई पार्वतीबाई, दोघेही स्वातंत्र्य-चळवळीत सहभागी होते. इतकेच नाही तर लातूरमधील एका विधवा पुनर्विवाहाला त्या काळात त्यांनी पाठिंबा दिला, आणि पुन्हा त्याबद्दल पंचायतीची माफी मागण्यास नकार दिला म्हणून १८ वर्षे त्यांच्या समाजाने त्यांना बहिष्कृत केले होते. त्यांच्या सासूसासऱ्यांनी ४५ वर्षांपूर्वी आपल्या मुला-मुलींचे लग्न घुंघट व हुंड्याविना लावले आणि नवा पायंडा पाडला. त्यांच्या सासूबाई सौ. केशरबाई भार्गव, माहेश्वरी समाजातील पहिल्या नगरसेविकाही होत्या. ही पार्श्वभूमी असल्याने प्रा. भार्गव ह्यांना स्वत:ला आजच्या समाजाबद्दल अनेक प्रश्न पडले होते. आपल्या समाजाबद्दल आस्था असूनही त्याचा चिकित्सक विचार करावा असे त्यांना वाटले, हे प्रा. भार्गव ह्यांचे वैशिष्ट्य आहे. ज्या समाजात आपण वाढलो त्याच समाजातील विसंगती, गुंतागुंतीची परिस्थिती, अभ्यासक म्हणून तपासण्याची जबाबदारी त्यांनी घेतली. ह्या पुस्तकातून स्त्रीपुरुष विषमतेच्या प्रश्नातील गुंतागुंतीवर थोडा अधिक प्रकाश पडेल अशी आशा वाटते.

प्रा. चंद्रकला भार्गव ह्यांनी लातूर शहरामधील माहेश्वरी समाजातील पाचशे स्त्रियांची पाहणी केली आहे. लातूर शहर हे मराठवाड्यातील व्यापाराचे एक केंद्र मानले जाते. येथे व्यापारी संस्कृती नांदते. कारखानदारीचा अभाव असलेल्या ह्या शहरात पुण्या-मुंबईपेक्षा वेगळाच सुस्तपणा जाणवतो. लातूरमध्ये सुबत्ता, स्थैर्य, आणि एक तऱ्हेचे निवांत जीवन दिसते. माहेश्वरी समाज स्थलांतरीत होऊन लातूरमध्ये स्थिरावला आहे. आर्थिक दारिद्र्य वा दैन्य नाही, पण सांस्कृतिक साचलेपणा आहे असे काहीसे चित्र दिसते.

पं. महादेवशास्त्री जोशी ह्यांनी संपादित केलेल्या **भारतीय संस्कृती कोशाच्या** सातव्या खंडात माहेश्वरी समाजाची माहिती मिळते. ह्या माहितीनुसार माहेश्वरी ही मारवाडी बनियांची एक पोटजात होती, पण आता ती एक वेगळी जात बनली आहे. हे लोक मूळचे राजस्थानातील असले तरी सांप्रत भारताच्या सर्व भागात जाऊन स्थायिक झालेले आहेत. महेश ह्या शब्दावरून माहेश्वरी हे नाव आलेले आहे. माहेश्वरी लोक मुख्यत: महादेवाचे उपासक आहेत, तरीही ते विष्णूची उपासना करतात. या लोकांचे रीतिरिवाज आणि विविध संस्कार बनियांच्या सारखेच आहेत. मात्र त्यांच्या लग्नविधीत दोन वेगळे प्रघात आढळतात. (१) मामाफेरा-वधूचा मामा वधूला घेऊन वराभोवती चार फेऱ्या मारतो. (२) लग्नाच्या वेळी वधूने हस्तिदंताची काकणे घालणे आवश्यक असते. माहेश्वरी लोकांत बडी तीज, गोर्जा, रक्षाबंधन महेशनवमी इ. विशेष सण व व्रते असतात. बडी तीज हे व्रत भाद्रपद वद्य तृतीयेला विवाहित स्त्रिया

उपवास करून पतीला दीर्घायुष्य मिळावे म्हणून करतात, तर महेशनवमी म्हणजे जेष्ठ शुद्ध नवमीला त्या महेश्वराची पूजा करतात. माहेश्वरी जातीचा उदय त्या दिवशी झाला असे मानले जाते. पूर्वी यांच्यात बालविवाह, पडदा इत्यादी चाली रूढ होत्या. पण रायबहादूर शामसुंदरलाल ह्यांनी इ.स. १८९२ साली माहेश्वरी महंत सभा स्थापून समाजसुधारणेची प्रेरणा दिल्यानंतर आता त्या समाजाची बरीच सुधारणा झाली आहे. (पं. जोशी महादेवशास्त्री, **भारतीय संस्कृती कोश, खंड ७ वा** पृ. ३६१-३६२) प्रा. धनंजयराव गाडगिळांच्या **पुणे शहरातील महाजन व नगरशेठ** या पुस्तकात राजस्थान, गुजराथ आदी भागांमधून स्थलांतरित झालेले जैन आणि माहेश्वरी हे दोन स्वतंत्र समाज आहेत असा उल्लेख आढळतो.

माहेश्वरी समाजातील कुटुंबे मुळात राजस्थानातून व्यापारानिमित्त स्थलांतरित झाली असतील तर आजच्या राजस्थानातील स्त्रीजीवनाचे चित्र कसे आहे हे पाहणे महत्त्वाचे वाटते. युनिसेफच्या वतीने आणि सार्कच्या निमित्ताने बालिका दशकानिमित्त राजस्थान शासनामार्फत स्त्रिया आणि मुलींच्या विकास विभागाने दोन अभ्यास १९९१ साली प्रसिद्ध झाले आहेत. त्यातील माहिती येथे देत आहे. ही आकडेवारी आणि माहिती माहेश्वरी समाजातील स्त्री-जीवन समजून घेण्यास पूरक ठरेल असे वाटते. एखादा समाज कोणत्या परिस्थितीमुळे कोठे येतो हे पाहणे महत्त्वाचे वाटते.

राजस्थानातील स्त्रिया आणि मुले ह्यांचा दर्जा आणि त्यांची परिस्थिती यांची चिकित्सक पाहणी करताना ह्या अहवालात म्हटले आहे की, सर्वसामान्यत: स्वीकारलेल्या मोजमापाच्या पट्ट्यांनुसार राजस्थानातील स्त्रीचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. भारतातील सगळ्यात कमी स्त्री-शिक्षण ह्या राज्यात आहे. स्त्रियांच्या आणि मुलांच्या मृत्यूचे प्रमाण मात्र सगळ्यात अधिक आहे. स्त्रियांना रोजगाराची संधी मिळते. परंतु बालमजुरांचे प्रमाण मात्र ह्या राज्यात भरपूर आहे. बालविवाहांचे प्रमाण सर्वाधिक आहे आणि परिणामत: बाळंतपणात मरणाऱ्या स्त्रियांचे आणि अर्भकांचे प्रमाणही जास्त आहे. स्त्रियांचा कामगार म्हणून संघटित क्षेत्रातील सहभाग फक्त साडेतीन टक्के आहे. चौदा वर्षाखालील बरीच मुले विडी, कार्पेट, मौल्यवान खड्यांना पॉलिश करण्याच्या व्यवसायात काम करतात. येथे ती संपूर्ण आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक परिस्थितीत जगतात. देशातील आकडेवारी लक्षात घेता ह्या राज्यात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे. राजस्थानात बिहारप्रमाणेच १००० पुरुषांमागे ९१३ असे स्त्रियांचे प्रमाण आहे. भरतपूर मध्ये १००० : ८३५ तर जैसलमेरमध्ये १००० : ८१० इतके कमी आहे. काही भागात हे प्रमाण १००० : ७५० आहे. मुलींच्या गर्भाचा विनाश आणि गर्भपात यांचेही प्रमाण भरपूर आहे.

ह्या अहवालात राजस्थानातील स्त्रियांना कठोर नीतिनियमांनी आणि पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेने किती जखडून टाकले आहे त्याचेही विवरण केले आहे. जोहाराची परंपरा अजूनही खांद्यावर घेऊन ह्या स्त्रिया उपासतापास, त्याग आणि पावित्र्य या धाकाच्या चौकटीत जगतात. पौराणिक चित्रपटांना गर्दी करणाऱ्या ह्या स्त्रिया सरंजामी कुटुंबातील निष्ठांनी बांधल्या जातात. गर्भजलपरीक्षा आणि त्यायोगे होणारे मुलींचे गर्भपात, विवाहित स्त्रियांना होणारी मारहाण, बलात्काराचे प्रमाण, हुंडाबळी ह्या सर्व घटनांचे प्रमाण भरपूर आहे आणि सामाजिक दडपणामुळे हे प्रकार पोलीस, न्यायव्यवस्था येथपर्यंत येतही नाहीत.

नवजात मुलीला मारून टाकले तर नंतर खात्रीने पुत्रप्राप्ती होते असा सर्वत्र समज दिसतो

आणि हे कृत्य आई, आजी, अशा स्त्रीजन्माचा भोग भोगलेल्या स्त्रियांनीच करायचे अशीही प्रथा आहे असे ह्या अहवालात नमूद केले आहे. थोडक्यात, स्त्रीजन्माच्या ज्या रडकथा मागे टाकाव्या आणि स्त्रियांनी आत्माभिमानाने समर्थपणे उभे राहावे असे आपण मानतो, त्याच रडकथा राजस्थानातील बहुसंख्य स्त्रियांच्या रोजच्या जगण्याचा भाग आहेत. लहानपणी कुपोषण, छळ, लवकर लग्न, भाराभर बाळंतपणे ऊर फुटेतो घरकाम, गर्भाशयाचे आजार आणि अकाली मृत्यू, ह्या चक्रात राजस्थानातील सामान्य स्त्रिया आणि मुली (खरे तर सर्व बालके) अडकल्या आहेत.

वरील माहितीच्या पार्श्वभूमीवर प्रा. भार्गव ह्यांच्या पुस्तकातील दृष्टिकोन समजून घेणे महत्त्वाचे वाटते. लेखिकेला मारवाडातील आपल्या समाजाच्या पूर्वेतिहासाबद्दल आकर्षण व आत्मीयता आहे. मारवाडी स्त्रियांची मेहेंदी, लोकगीते, घुंघट आणि जगाकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी ह्याबद्दल लेखिकेच्या मनात कुतूहल आहे. हसत जोहार पत्करणाऱ्या रजपूत स्त्रिया आणि बुरख्याआड वावरणाऱ्या पण वेळ पडली तर रणांगण गाजविणाऱ्या स्त्रिया अशा प्रतिमा तिच्या मनात आहेत. आजच्या काळातल्या लातूर शहरातल्या कुटुंबाची पाहणी करताना मात्र स्त्रीजीवनाच्या ह्या सुंदर प्रतिमा विस्कटलेल्या रूपात लेखिकेला दिसतात.

एकीकडे एकत्र कुटुंबात गुदमरणारे, कुचंबलेले जीवन दिसत असतानाच लेखिकेला जाणवते की, स्त्रियांनाच एकत्र कुटुंबपद्धती हवी आहे, आवडते. पाचशे पैकी फक्त ८१ स्त्रियांनी विभक्त कुटुंब हवे असे बऱ्याचशा संदिग्ध पद्धतीने म्हटले आहे. ह्या विसंगतीचा अर्थ लावताना प्रा. चंद्रकला भार्गव म्हणतात, "महिलांना विभक्त राहण्याच्या वेळी स्वत:बद्दल विश्वास वाटत नाही. आपण एकटे घर चालवू शकू किंवा नाही, ती जबाबदारी पेलू शकू किंवा नाही हा प्रश्न पडतो. १५ ते १६ व्या वयातच होणाऱ्या लग्नामुळे ती स्वत:चे शिक्षण पूर्ण करू शकत नाही व जीवनानुभव कमी असल्यामुळे जीवनास सामोरे जाण्याचे धारिष्ट्यही तिच्यात आढळत नाही. त्यामुळे तिला जगताना आत्मविश्वास वाटत नाही. कणा नसलेल्या, दिशाहीन, चुकलेल्या, भयभीत वासरासारखी ती वाटते." येथे प्रा. भार्गव ह्यांना असा प्रश्न पडला आहे की, सगळेच थिजलेले, साचलेले आहे, पण स्त्रियाही ह्या परिस्थितीत अशाच का वागतात? मुक्या प्राण्याप्रमाणे सगळे निमूटपणे का स्वीकारतात? त्यांच्या मते, हे धास्तीपोटी होते. कोणत्याही समाजाला स्थितिशीलतेच्या चिखलातून बाहेर काढायचे तर त्या समाजाबद्दल आपली समज चौफेर असायला हवी. म्हणून ही निरीक्षणे महत्त्वाची आहेत.

मोठ्या कुटुंबाच्या रोजच्या खटल्यात अडकलेल्या स्त्रियांना आपण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे असे वाटत नाही. घरची आर्थिक परिस्थिती जर वाईट असेल तरच घरखर्चाला हातभार लावावा म्हणून ह्या स्त्रिया घरबसल्या, आपल्या आवाक्यातले काम करू इच्छितात. परंतु, बहुतांश स्त्रियांना स्वतंत्र उद्योग, अर्थार्जन, स्वावलंबी जगणे, ह्यापेक्षा "जे आहे ते खूप चांगले आहे. ....मग त्यात बदल तो कशाला करायचा?" असे वाटते. प्रा. भार्गव ह्यांची ही निरीक्षणे महत्त्वाची आहेत. त्यांनी ह्या समाजात पतिपत्नींचे साहचर्य किती कमी आहे, ह्याचीही नोंद केली आहे. दोघांची कार्यक्षेत्रे लिंगभेदावर आधारित आहेत. ह्यापेक्षा स्त्रियांच्या कामाला मोल नाही आणि समाजातही त्या कामाकडे आदराने पाहिले जात नाही ह्याबद्दल प्रा. भार्गव ह्यांनी खंत व्यक्त केली आहे. "स्त्रीने आजचे चाकोरीबद्ध जीवन जगावे, त्यात उगीच स्वातंत्र्याचे वारे शिरून आहे ती चौकट उद्ध्वस्त व्हावी, ही कल्पना स्त्री व पुरुष,

कुणालाच संमत नाही." प्रा. भार्गव, आपल्या समाजातील स्त्री-पुरुषांना "नव्या क्षितिजाचे स्वप्न" पाहण्याची क्षमता नाही ह्यामुळे, अस्वस्थ आहेत. माहेश्वरी समाजातील स्त्रियांचे जुजबी शिक्षण, परावलंबन, हुंड्याचा प्रश्न, व्यक्तिमत्त्वाची कुंठितता, शिक्षणाचा-लग्नाचा बाजार, गृहिणीचे अवमूल्यन आणि पत्नीचे दुय्यम स्थान ह्याबद्दलची मांडणी महत्त्वाची आहे. स्त्रियांच्या घरकामाचे तपशील त्यांनी बारकाव्याने दिले आहेत. आपल्या कुटुंबाच्या लहानशा जगात मग्न झालेल्या माहेश्वरी स्त्रीला काळाच्या बदलत्या पावलांची चाहूल लागली पाहिजे ही प्रा. भार्गव ह्यांची तळमळ आहे.

कुटुंबातच आपले विश्व पाहणाऱ्या सर्व स्त्रियांना, आणि आपल्या संदर्भात, माहेश्वरी समाजातील स्त्रीला, सार्थकतेचा प्रत्यय का येत नाही ह्या विषयाचा अभ्यास चालू ठेवला पाहिजे.

माहेश्वरी समाजातल्या स्त्रिया धार्मिक पोथ्या-पुराणे वाचतात. प्रा. भार्गव ह्यांच्या मते हे वाचन "संदर्भहीन व अर्थहीन" असते. त्यातून "आत्मिक बळ" मिळण्याऐवजी स्त्रियांचा अंधश्रद्धाळूपणा वाढतो. ह्या समाजात पूजा-अर्चेचा आणि नारळ फोडण्याचा मान कर्त्या पुरुषाचा असतो आणि स्त्रीला फक्त मम म्हणण्याचे काम असते. प्रा. भार्गव ह्यांना स्त्रियांनी अशी पोथ्या-पुराणे वाचणे चुकीचे वाटते आणि बुद्धीला चालना देणारे असे काही त्या वाचत नाहीत ह्याबद्दल काळजीही वाटते. ही स्थिती आपल्या सर्व समाजाचीच आहे. सुशिक्षित पुरुषसुद्धा मनोरंजनापलिकडे जाऊन काही वाचन करीत नाहीत. स्त्रियांसाठी खास चालविल्या गेलेल्या मासिकांनी त्यांना चिकित्सक विचार करायला आणि समाजपरिवर्तनासंदर्भात काही कृती करायला मदत केली पाहिजे ही प्रा. भार्गव ह्यांची अपेक्षा महत्त्वाची आहे. त्यामुळेच धार्मिक ग्रंथांच्या पारायणांमधून स्त्रियांना नेमके काय मिळते हे अधिक खोलवर जाऊन तपासून पाहिले पाहिजे. ह्या स्त्रियांची आयुष्याबद्दलची समज अंधश्रद्धेवर आधारित असते की त्यात काही वेगळे शहाणपणही असते हेही नीट पाहिले पाहिजे. आपल्या आयुष्यातले दुःख वा विसंगती पचविण्याचे सामर्थ्य अशा वाचनातून येते का? येत नसल्यास, मग इतक्या स्त्रिया हे साहित्य का वाचतात? ह्या प्रश्नांचा विचार गंभीरपणे केला पाहिजे. रामायण, महाभारतातील आख्याने न वाचता आधुनिक जगातील स्त्रीने विचार करायला, माणसासारखे जगायला शिकविणारे साहित्य वाचावे ही अपेक्षा महत्त्वाची आहे.

माहेश्वरी समाजातील स्त्रियांना आधुनिक शिक्षणाबद्दलची आस्था नाही. तसेच सधन कुटुंबातील स्त्रीच्याही हातात पैसे नसतात. प्रा. भार्गव ह्यांचे निरीक्षण असे की ह्या स्त्रिया फक्त चेकवर सह्या करतात आणि तेवढाच त्यांचा बँकेशी संबंध येतो. जुन्या जमान्यात घरामध्ये स्त्रियांच्या हातात कदाचित अधिक सत्ता असेल. कारण त्या काळात घरात केली जाणारी कामे कमी दर्जाची तरी मानली जात नसावीत. आधुनिक काळात एकीकडे घरकाम अत्यंत कष्टप्रद असते आणि दुसरीकडे त्याला प्रतिष्ठा नसते. घरातच रमणारी गृहिणी म्हणजे अनेक दृष्टींनी ओझ्याप्रमाणे मानली जाते. त्यामुळे घरकाम करणाऱ्या स्त्रीला बँका अथवा अन्य आर्थिक व्यवहारापासून दूर ठेवणे सहज शक्य होते.

ह्या पुस्तकातील विवाहाबद्दलची निरीक्षणे फार बोलकी आणि काही प्रमाणात वेगळी माहिती देणारी आहेत. अजूनही मुलीला पाहायला न जाता कुटुंबा-कुटुंबाच्या परस्परसंमतीने विवाह ठरविले जातात. तसेच पसंत पडलेल्या मुलीला नकार देण्याचे स्वातंत्र्य अजिबात

नसते. लग्न झालेल्या स्त्रीला अजूनही घुंघटमध्ये वावरण्याची सक्ती असते. इतकेच नाही तर हे सर्व रीतीरिवाज जुन्या काळापेक्षाही अधिकच विकृत होत आहेत. कारण देण्याघेण्याचे प्रमाण भरमसाठ वाढले आहे. प्रा. भार्गव ह्यांनी लग्नाला आलेले बाजारू स्वरूप अत्यंत स्पष्ट शब्दात मांडले आहे. देण्याघेण्याच्या प्रथा इतक्या टोकाला गेल्या आहेत की, प्रा. भार्गव ह्यांच्या शब्दात सांगायचे तर "एखादी स्त्री जर मृत्यू पावली तर तिला स्मशानात नेत असताना तिच्या अंगावर तिच्या माहेरच्या माणसांकडून आणलेली साडीच नेसवली जाते." "माहेरा" "बटवडा" अशा शब्दांचे अर्थ ह्या पुस्तकातून मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. लग्नाला उभ्या असलेल्या मुलींनाही ह्या देण्याघेण्याचे काही वाटत नाही, हे प्रा. भार्गव, ह्यांचे म्हणणे महत्त्वाचे आहे. ज्या समाजात पैसा आहे, सुबत्ता आहे, पण शिक्षण नोकरी, लहान कुटुंबे अशा मार्गाने जाण्याला प्रतिष्ठा नाही, अशा समाजात हुंड्याच्या प्रथेला विरोध करण्याची हिंमतच स्त्रियांच्या अंगी निर्माण होऊ शकत नाही.

माहेश्वरी समाजातील स्त्री-पुरुष पतिपत्नी ह्या नात्याने फारच बंदिस्त आयुष्य जगतात. एकमेकांशी बोलणे, फिरायला जाणे, इतकेच काय पण आपल्या मुलांचे लाड करणे हे सर्व सहजपणे या समाजात घडत नाही. प्रा. भार्गव लिहितात की, "..... बंधनामुळे पती-पत्नीचे नाते फक्त लैंगिक नात्यापुरते मर्यादित राहते. त्यांच्यात मित्रमैत्रिणींचे संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत." इतकेच नाही तर, "प्रत्येक बाळंतपणाच्या अगोदर गरोदरपणी स्त्रीची शारीरिक काळजी पती उघडपणे कधीच घेऊ शकत नाही." येथे लक्षात येते की, इच्छा असूनही, आर्थिक परिस्थिती चांगली असूनही, पती-पत्नी नात्यामध्ये मोकळीक निर्माण होऊ दिली जात नाही. भावाभावांचे, बाप-मुलांचे नाते घट्ट असते. पण परक्या घरातून येणाऱ्या स्त्रीला मात्र "वंशवेल" वाढविण्याचे कार्य निमूटपणे करायचे असते, एवढेच. म्हणजे पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचे आणि कुटुंबरचनेचे एक वेगळेच रूप येथे दिसते.. स्त्री-पुरुषांच्या सहजीवनातून येऊ शकणारे, धडपडणारे विभक्त कुटुंब अशा तऱ्हेने थोपविले जाते.

कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया स्त्रियांनीच करून घ्यावी असे मत ह्या समाजातील बहुतांशी स्त्रियांनी व्यक्त केले आहे. तसे का करावे ह्यासंबंधी अनेक कारणे त्या स्त्रियांच्या मुलाखतीतून प्रा. भार्गव ह्यांनी नोंदली आहेत. पण त्यातील एक कारण स्त्रियांच्या मनातील खरी भीती स्पष्टपणे दाखविणारे आहे.

"....जर पुरुषाची शस्त्रक्रिया केली तर पत्नीने काय जन्मभर रडत बसायचे?" कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रियेमुळे पुरुष अधिकच मोकाट सुटतील अशा भीतीपोटी स्त्रिया स्वतःवर अशी शस्त्रक्रिया करून घेतात हे निरीक्षण महत्त्वाचे आहे.

घरकामात फारसा हातभार न लावणारे पुरुष घरात लागणारे सामान मात्र स्वतः खरेदी करतात. "ह्या मागेसुद्धा स्त्रियांनी घराबाहेर पडू नये व मुख्य बाजारपेठेत जाऊ नये" असा विचार प्रा. भार्गव ह्यांना दिसतो. पैसे मिळविण्याचे आणि खर्च करण्याचे सर्व निर्णय आपल्या हातात ठेवणारी अशी ह्या समाजातील पुरुष मंडळी आहेत. परंतु ह्या व्यवस्थेला स्त्रियाही हातभार लावतात. आपल्या नवऱ्यांना व्यसने वा वाईट सवयी आहेत, ह्याबद्दल मुलाखती देणाऱ्या स्त्रियांनी शब्दही उच्चारला नाही.

**कळपुतळी : माहेश्वरी समाजातील स्त्री-जीवन** ह्या पुस्तकात बहुतांश सधन व्यापारी कुटुंबांचीच माहिती आली आहे. परंतु स्त्री-पुरुष नात्यातील विषमता हा केंद्रबिंदू मानून,

# प्रकरण पहिले

# लातूर येथील माहेश्वरी समाजाची पूर्वपीठिका

राजस्थान किंवा मारवाड म्हटले की, एक विशिष्ट दृश्य डोळ्यांसमोर येते : स्त्रियांचे रंगीबेरंगी, विशेषत: लाल-केशरी कपडे, त्यांचा भला मोठा घुंघट, व त्यातून जगाकडे पाहण्याची आगळीवेगळी पद्धत, मेहंदीच्या कलात्मक डिझाईननी रंगलेले हात, लोकगीतांच्या धुंद करणाऱ्या स्वरांनी भरलेले वातावरण - ह्या साऱ्या गोष्टींचे मला लहानपणापासूनच एक आकर्षण राहिले आहे. याच समाजात जन्म घेतल्यामुळे मला त्याविषयी आत्मीयता वाटते. बुरख्याआड वावरणाऱ्या, जनानखान्यात राहणाऱ्या, पण वेळ पडली तर रणांगणावर तलवार चालवणाऱ्या माझ्या पूर्वज स्त्रियांच्या कथा वाचताना माझे अंग रोमांचित होते. आपल्या शीलरक्षणासाठी केलेला पद्मिनीचा कडवा प्रतिकार मला आठवतो. शत्रूच्या हातात सापडून मानहानीची वागणूक मिळण्यापेक्षा, जोहार पत्करणाऱ्या राजपूत स्त्रियांच्या संस्कृतीचे एक वेगळेच वैशिष्ट्य जाणवते. आपल्या मूल्यांसाठी त्यांनी मृत्यूला हसत हसत कवटाळले. त्यांनी जपलेली ही मूल्ये आजही समाजात तशीच शिल्लक आहेत काय ? महाराष्ट्रातील माहेश्वरी स्त्रियांची संस्कृती अजूनही तशीच आहे काय ? माणूस म्हणून समाजात तिचे काय स्थान आहे ? हे सारे जाणून घ्यावयाची माझी फार दिवसांपासूनची इच्छा होती. आणि सुदैवाने, मला तशी संधी प्राप्त झाली.

रोज वर्तमानपत्र उघडले की, आपणास हुंडाबळींच्या केसेससंबंधी वाचण्यास मिळते. हुंड्याचे प्रस्थ व त्यासाठी स्त्रीला होणारा त्रास दिवसेंदिवस वाढत चालला आहे. गरीब असो की श्रीमंत, सुशिक्षित असो की निरक्षर, सर्वांना फुकटच्या, सोप्या पैशाचे आकर्षण वाटू लागले आहे व त्यामुळे स्त्रीवर होणारे अत्याचार वाढले आहेत. शिक्षित, श्रीमंत, सुंदर अशा मंजुश्री सारडाचा संशयास्पदरीत्या मृत्यू झाला. सामाजिक

कार्यकर्त्यांनी केलेल्या उठावाचा, निषेधाचा न्यायपद्धतीवर काहीही परिणाम झाला नाही. सर्वोच्च न्यायालयात शरद सारडा निर्दोष सुटला. इतकेच नव्हे, तर काही दिवसांनंतर त्याचे एका गरीब मुलीशी लग्न लागले व तो भारत सोडून अमेरिकेत स्थायिकही झाला. समाज, न्यायपद्धती त्याचे कांहीही वाकडे करू शकली नाही. श्रीमंत, सुंदर व सुशिक्षित असणाऱ्या मंजुश्रीच्या जीवनात जे प्रश्न निर्माण झाले, तसेच प्रश्न माहेश्वरी समाजातील इतर मुलींच्या जीवनात आहेत का? सर्वसाधारणपणे आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत असणाऱ्या माहेश्वरी समाजातील स्त्रियांना आपल्या जीवनात हुंड्यामुळे निरनिराळ्या अत्याचारांना सामोरे जावे लागते का? गरीब घरातून हा प्रश्न नाही का? ह्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे लातूर येथील पाचशे माहेश्वरी महिलांच्या मुलाखती घेऊन, त्यांचा अभ्यास करून मिळविण्याचा प्रयत्न मी केला.

राजस्थानातील, मुख्यत: "मारवाड" ह्या एकाच विभागातून आलेल्या व्यापारी जमातींना मारवाडी असे म्हणत. परंतु आता राजस्थानातून आलेल्या सर्वच जमातींना मारवाडी असे संबोधण्यात येऊ लागले आहे. जेम्स टॉड या अभ्यासकाने मारवाडी व्यापारी समाजाच्या १२८ जाती नोंदविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने माहेश्वरी, अग्रवाल, ओसवाल, खंडेलवाल, परवाल अशा उपजाती आढळून येतात. भारताच्या औद्योगिक विकासात या समाजाचा सिंहाचा वाटा जाणवतो. एकूण राष्ट्रीय गुंतवणुकीत मारवाडी समाजाचा प्रथम क्रमांक लागतो व त्याच्या खालोखाल पारशी व गुजराथी समाजाचा. (नवी दिल्ली येथे १९६४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या मोनोपोलीज इन्कायरी कमिशन रिपोर्टच्या माहितीनुसार). उत्तर व पूर्व भारतातील औद्योगिक विकासात मारवाडी समाजाचा प्रचंड प्रभाव आहे. लातूर शहराच्या विकासामध्येही या जमातीचा मोठा सहभाग आहे.

लातूर हे सोलापूरपासून पूर्वेस १३० कि.मी. अंतरावर व नांदेडपासून पश्चिमेस १३० कि.मी. अंतरावर वसलेले, एक प्राचीन शहर आहे. ह्या नगरीस सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक अशी थोर परंपरा असून आजही ती परंपरा योग्य रीतीने जोपासली जात आहे. लातूरसह मराठवाड्यातील सर्वच जिल्हे वर्षानुवर्षे हैदराबाद संस्थानच्या निजामी राजवटीखाली होते व त्यामुळे येथील लोकजीवनावर व संस्कृतीवर त्याचा खूप प्रभाव पडलेला आढळतो. हैदराबाद मुक्ती लढ्याच्या यशस्वी सांगतेनंतरच खऱ्या अर्थाने लातूरचा विकास व्हावयास सुरुवात झाली.

लातूर ही आंतरराष्ट्रीय कीर्तीची मोठी बाजारपेठ होती व आहे. इ.स. १८८१ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे लातूरला आले होते. त्यांच्या प्रेरणेने येथे कापसाची एक जिनिंग फॅक्टरी सुरू करण्यात आली. लातूरच्या बाजारपेठेस राष्ट्रीय

बाजारपेठेत मानाचे स्थान मिळाले. आजही लातूर ही महाराष्ट्रातील एक अग्रगण्य बाजारपेठ असून शेतीमालाच्या वार्षिक व्यवहाराची उलाढाल कोट्यवधी रुपयांची होते. देशाच्या विविध प्रांतांत व परदेशांतही येथून शेतीमालाची निर्यात होते.

लातूर शहराची लोकवस्ती संमिश्र आहे. येथे मराठी, हिंदी, गुजराथी, मारवाडी, तेलगू, कानडी, उर्दू असे विविधभाषी लोक राहतात. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे लातूर शहराची लोकसंख्या १,११,९८६ आहे. त्यात मारवाडी समाजाची लोकसंख्या ४७७५ असून त्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| माहेश्वरी | २५३७ |
| विप्र | १२०९ |
| अग्रवाल | ४३१ |
| जैन | ३२२ |
| सोनार | २१५ |
| इतर | ६१ |
| एकूण | ४७७५ |

मारवाडी समाजाची लोकसंख्या लातूर शहराच्या एकूण लोकसंख्येच्या ४.२६ टक्के आहे. तर माहेश्वरी समाजाची लोकसंख्या फक्त २.२६ टक्के आहे. पण बाजारपेठेच्या एकूण आर्थिक व्यवहारात या समाजाची फार मोठी गुंतवणूक झाल्याचे मला आढळून आले. लातूर शहराच्या एकूण आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासावर माहेश्वरी समाजाचा खूप मोठा प्रभाव पडलेला आहे हे दिसून येते. येथे माहेश्वरी कुटुंबे ३७४ असून त्यात ६३२ पुरुष व ६२५ स्त्रिया आहेत. ह्या ६२५ स्त्रियांपैकी पाचशे स्त्रियांची पाहणी मी केली व त्या अभ्यासाचे निष्कर्ष प्रातिनिधिक स्वरूपात मांडले.

ज्या ५०० माहेश्वरी स्त्रियांची मी पाहणी केली त्यांची सर्वप्रथम वयोगटाप्रमाणे विभागणी केली.

ज्या स्त्रियांच्या मी मुलाखती घेतल्या त्यात प्रामुख्याने तरुण, म्हणजेच १५ ते ४० वयोगटातील, स्त्रियांचा भरणा अधिक आहे. त्या ३२५ (६५%) स्त्रियांच्या खालोखाल प्रौढ, म्हणजे ४१ ते ६० वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण १३५ (२७%) इतके आहे. तर सर्वात कमी, म्हणजे ४० वृद्ध स्त्रिया ६१ ते ८५ वयोगटातील (८%) आहेत. माहेश्वरी समाजरचना दर्शविणारी ही आकडेवारी समाजाच्या यथार्थ व समावेशक

### तक्ता क्रमांक १ : स्त्रियांचा वयोगट

| एकूण स्त्रिया | १५-२५ | २६-३० | ३१-४० | ४१-५० | ५१-६० | ६१-७० | ७१-८० | ८१-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील २७० | ९२ | ४१ | ४८ | ५५ | २४ | ८ | २ | |
| विभक्त कुटुंबातील १६२ | २२ | ३३ | ७३ | २९ | ४ | १ | - | - |
| विधवा-५६ | - | - | ५ | ७ | १६ | १२ | ११ | ५ |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या-१० | - | ५ | ४ | - | - | १ | - | - |
| परित्यक्ता-२ | - | १ | १ | - | - | - | - | - |
| एकूण ५०० | ११४ | ८० | १३१ | ९१ | ४४ | २२ | १३ | ५ |
| टक्केवारी शेकडा | २२.८ | १६.०० | २६.२ | १८.२ | ८.८ | ४.४ | २.६ | १ |

निरीक्षणासाठी योग्य आहे असेच मला वाटते. सर्व समाजाची प्रातिनिधिक स्वरूपात असणारी ही आकडेवारी त्याचे अवलोकन करण्यास योग्य मार्गदर्शक ठरते. त्यामुळे त्यांच्या मुलाखतीमधून तरुण पिढीचे मनोगत व्यक्त होते, मध्यमवयीन स्त्रियांचे जीवनानुभव प्रकट होतात, तर वयोवृद्ध स्त्रियांची जीवनगाथाही उलगडते. तरुण पिढीचा वृद्ध पिढीकडे पाहण्याचा दृष्टिकोन व वृद्धांचे तरुणांच्याबद्दलचे मत मला कळाले. ह्यात कुणी सुना आहेत, कुणी सासू झालेल्या, आहेत तर कुणी आजेसासू झालेल्या आहेत. त्यामुळे तीन पिढ्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मला ह्या पाहणीद्वारे कळला. दोन पिढ्यांतील वर्षानुवर्षे चालत आलेला संघर्षही जाणवला. कालमानाप्रमाणे स्त्रियांच्या व्यक्तिविकासात काही फरक झाला आहे का, त्याचा शोधही मला घेता आला. लातूर येथील संपूर्ण समाजात जसजशी सामाजिक क्रांती होत गेली तसतसे त्याचे पडसाद माहेश्वरी स्त्रीच्या जीवनात कितपत उमटले त्याचे आकलनही झाले. विविध वयोगटांतील स्त्रियांच्या मनाची स्पंदने त्यांच्या जीवनानुभवावरून माझ्या मनाला स्पर्श करून गेली. त्या स्पंदनांचे पृथक्करण करण्याचा हा खटाटोप आहे. हे निरीक्षण संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करते हे मला प्रकर्षाने जाणवले.

राजस्थान म्हटले की, शिक्षणाचे प्रमाण सर्वात कमी असणारे राज्य व बहुसंख्येने दरवर्षी पार पडणारे बालविवाह, हे चित्र झटकन डोळ्यांसमोर येते. बालविवाह प्रतिबंधक

कायदा कागदोपत्री अस्तित्वात असला तरी राजस्थानातील कर्त्या मंडळींकडून, म्हणजे मंत्र्यांपासून ते सर्वसामान्य माणसापर्यंत सर्वांकडून त्याचे उल्लंघन सतत होत असते. आजही तेथे अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर पाळण्यातल्या मुलामुलींपासून ते सात-आठ वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींचे विवाह सामुहिकरीत्या राजरोस पार पाडले जातात. लहान मुलामुलींच्या लग्नात, त्यांच्या इच्छेचा तर प्रश्नच येत नाही. फक्त आईवडिलांची-पालकांची इच्छा व त्यांचीच सोय पाहिली जाते. त्याच प्रवृत्तीचे अवशेष लातूर येथे होणाऱ्या लग्नसमारंभात ठळकपणे आढळतात. लातूर येथील महिलांच्या लग्नाच्या वयाचा आलेख खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्रमांक २ : स्त्रियांच्या लग्नाचे वय**

| एकूण स्त्रिया वय | ७-१० | ११-१५ | १६-२० | २१-२५ | २६-३० | लक्षात नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील २७० | २ | ८३ | १६४ | १८ | २ | १ |
| विभक्त कुटुंबातील १६२ | २ | ५५ | ९५ | १० | - | - |
| विधवा ५६ | ३ | ४२ | १० | १ | - | - |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या १० | - | २ | २ | ५ | १ | - |
| परित्यक्ता-२ | | | १ | १ | - | - |
| ५०० | ७ | १८२ | २७२ | ३५ | ३ | १ |
| टक्केवारी शेकडा | १.४० | ३६.४० | ५४.४० | ७.०० | ०.६० | ०.२० |

लातूर येथील कुणाही मुलामुलींचे लग्न पाळण्यात लागले नाही. एक ते सात एवढ्या वयातही कुणाची लग्ने लागली नाहीत. राजस्थानच्या तुलनेत लातूर येथील माहेश्वरी समाजात अतिबालविवाह होत नाहीत. ज्या सात महिलांचा बालविवाह झालेला आहे त्यांचे वय १९८२ ते १९८४ ह्या काळात ६५ ते ८० वर्षे होते. म्हणजेच विसाव्या शतकाच्या सुरुवातीस त्यांची लग्ने लावण्यात आलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात संपूर्ण भारतातच सामाजिक सुधारणा कमी आढळतात. त्यावेळी लातूर येथे माहेश्वरी

समाजात बालविवाह पद्धती प्रचलीत होती असे दिसते. व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्याची कल्पनाही त्यावेळी उदयास आली नव्हती.

ज्या १८२ स्त्रिया ११ ते १५ वर्षे या वयोगटात लग्न होणाऱ्या आहेत त्यांचे सर्वसाधारणपणे लग्नाचे वय १३ किंवा १४ होते, असे आढळले. त्या स्त्रिया साधारणपणे प्रौढ वयाच्या म्हणजे ४० ते ४५ वर्षे वयाच्या आहेत. त्यांचे लग्न झाले, त्यावेळी मुलगी वयात यायच्या अगोदर लग्न करून टाकावे ही विचारसरणी समाजात प्रामुख्याने आढळते. म्हणजेच इ.स. १९३५ ते १९४५ च्या दरम्यानही समाजात फार सामाजिक सुधारणा झालेली नव्हती, व म्हणून लग्नाच्या बाबतीत मुली अज्ञानी व अपरिपक्व असतानाच त्यांची लग्ने लावली जात.

महाराष्ट्र हा महिलांच्या सामाजिक सुधारणांच्या बाबतीत महात्मा ज्योतिबा फुले, धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी समाजसुधारकांच्या प्रयत्नाने प्रगत असा प्रदेश आहे. त्या वातावरणाचा परिणाम माहेश्वरी समाजावरही थोड्या फार प्रमाणात झालेला आढळतो. म्हणूनच सर्वांत जास्त म्हणजे २७२(५४.४%) स्त्रियांची लग्ने १६ ते २० वयोगटात झालेली आढळतात. मुळात माहेश्वरी मुलींचे लग्न लवकर लावून देण्याकडे समाजाचा जरी कल असला तरी मुलगी वयात आल्यानंतर, म्हणजे ती १६-१७ वर्षांची झाल्यानंतर, तिचे लग्न लावून द्यावे असा बदल समाजात दिसून येतो. पण १६ ते १७ वर्षे वयापेक्षा मुलीचे लग्न लावण्यास उशीर करू नये असे प्रत्येक पालकास वाटते. मुलीचे शील म्हणजे काचेचे भांडे हे ठामपणे समजण्यात येते. म्हणून तिला खूप जपले पाहिजे, ही भावना प्रत्येकाच्या मनात आढळते. मुली जर वयाने ह्यापेक्षा मोठ्या झाल्या तर त्यांचे मन तारुण्यसुलभ भावनेमुळे स्थिर राहू शकणार नाही व त्या कुठल्याही मुलाकडे आकृष्ट होतील. त्यामुळे तिचा " पाय घसरेल " अशी भीती पालकांच्या मनात असते. म्हणून तिचे लग्न १६-१७ वर्षांची असताना केले की, मग तिच्या अध:पतनाचा प्रश्नच निर्माण होणार नाही हे सरळसोट गणित पालकांनी आखलेले आढळते. म्हणजे स्त्रीच्या चारित्र्याला ह्या समाजात, इतर समाजाप्रमाणेच, खूप महत्व दिले जाते. त्यामुळेच मुलींचे उशिरा लग्न करणे समाजात प्रचलित नाही व संमतही नाही. कायद्याची १८ वर्ष वयापर्यंतची अटही बहुतांशी तोडण्यात येते. ह्याचे वैषम्य कुणालाच वाटत नाही, काहीतरी करून, कसे तरी एकदा मुलीचे लग्न, त्यांच्या दृष्टिकोणातून ' वेळच्या वेळी ' व्हावे असे सर्व पालकांना वाटते. म्हणूनच २१ ते ३० वर्षे वयोगटात लग्न लावणाऱ्या मुलींचे प्रमाण खूप कमी आहे. त्यातल्या त्यात २६ ते ३० वयात लग्न लागलेल्या, सर्वात कमी म्हणजे फक्त तीन मुली आहेत. ज्या मुलींची लग्ने उशिरा लागली त्यास गरिबी हे प्रमुख कारण आहे. त्याचबरोबर ती दिसायला अतिसाधारण असणे हे दुसरे कारण आहे. बाकी गौण

कारणांपैकी तिचे शिक्षण चालू असणे हेही एक कारण आहे. पण ते अपवादात्मक.

वरील निरीक्षणावरून खालील निष्कर्ष निघतात :

(१) अतिबालविवाह ह्या समाजात झालेले नाहीत. अपवादात्मक काही बालविवाह झालेले आहेत. ते विसाव्या शतकाच्या सुरुवातीस झालेले आहेत.

(२) लग्नाचे सर्वसाधारण वय १६-१७ आढळते.

(३) नवीन लग्न झालेल्या सुना ११ ते १५ वयोगटातील नाहीत. त्या १६ ते २० ह्या वयोगटातील आहेत.

(४) महाराष्ट्रातील माहेश्वरी समाजावर येथील सामाजिक परिवर्तनाचा थोडाफार परिणाम झालेला आढळतो. म्हणूनच लग्नाचे वय १८ जरी पाळले नाही तरी १०-११ वर्षे आहे असेही आढळत नाही. बालविवाह सध्या जरी होत नसले तरी स्त्री-पुरुष शारीरिक व मानसिकदृष्ट्या परिपक्व झाल्यावरच त्यांचे विवाह होतात असेही सर्रास आढळत नाही. आजही मुलामुलींची लग्ने ही त्यांची वैयक्तिक बाब न ठरता पालकांची इच्छा व कुटुंबाची सोय असेच स्वरूप त्याला आहे. त्यामुळेच आपल्या स्वत:चे मारवाडमधील संस्कार व आजुबाजूची सामाजिक परिस्थिती ह्याचे एक वेगळेच स्वरूप मुलींच्या लग्नाच्या वयाचा विचार करताना दिसून येते.

स्त्रीचे लग्न कोणत्या वयात व्हावे ह्यासंबंधीची माहेश्वरी समाजातील रीत आपण पाहिली. पण तिचा नवरा कोणत्या वयाचा असावा? नवरा-बायकोच्या वयात किती अंतर असावे? तिचे लग्न समवयस्काशीच व्हावे असे पालकांना वाटायचे की कुठल्याही

**तक्ता क्रमांक ३ : लग्नाच्या वेळी नवरा-बायकोच्या वयातील फरक**

| एकूण स्त्रिया | वयातील फरक नाही | १-२ | ३-५ | ६-१० | ११-१५ | १६-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील २७० | १ | ४१ | १३१ | ८३ | ५ | ९ |
| विभक्त कुटुंबातील १६२ | १ | १५ | ७८ | ५८ | ७ | ३ |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या १० | - | ४ | ५ | १ | - | - |
| ४४२ | २ | ६० | २१४ | १४२ | १२ | १२ |
| टक्केवारी शेकडा | | १३.५७ | ४८.४१ | ३२.१२ | २.७ | २.७ |

मुलाला मुलगी देऊन मोकळे व्हावयाचे ह्या प्रश्नासंबंधी मी जेव्हा निरीक्षण केले तेव्हा पती-पत्नीच्या वयात १ ते ५ वर्षांचा फरक असणाऱ्या सर्वात जास्त- निम्म्याहून जास्त, २७४ (६१.९९%)- स्त्रिया आहेत असे दिसले. त्या खालोखाल, दोघांमध्ये ६ ते १० वर्षांचा फरक असणाऱ्या स्त्रिया आहेत. तर वयात काहीच फरक नसणाऱ्या फक्त दोन स्त्रिया आहेत. आढळून असे येते की,

(१) लग्नाच्या वेळी स्त्रीचा पती हा स्त्रीपेक्षा वयाने मोठा आहे. तिच्यापेक्षा वयाने लहान असलेला एकही पती आढळला नाही.

(२) वयात सर्वसाधारण १ ते १० वर्षाचे अंतर असणारी जोडपी समाजात मोठ्या प्रमाणात (८७.३३%) आहेत. म्हणजेच सर्वसाधारण समवयस्काशी स्त्रीचे लग्न करून देणे ह्या समाजात रूढ आहे.

(३) ज्या नवरा-बायकोच्या वयातील अंतर ११ ते २५ वर्ष आहे, अशा स्त्रियांचे निरीक्षण केले तेव्हा मला असे आढळले की, त्या स्त्रियांची लग्ने एकतर बिजवरांशी झालेली आहेत किंवा तिच्या वडिलांनी गरीबीमुळे थोड्या जास्त वयाचा नवरा मुलीला करून दिला आहे. एकत्र कुटुंबातील नऊ स्त्रियांपैकी एकाच स्त्रीच्या व तिच्या पतीच्या वयातील फरक २० वर्षे आहे. बाकी सर्वांच्या बाबतीत हा फरक सर्वसाधारणपणे ११ किंवा १५ किंवा १७ वर्षे आहे. कुठल्याही स्त्रीची "शारदा" झालेली नाही. थोडक्यात, गरिबीमुळे वडिलांनी मुलीचे लग्न समवयस्काशी जरी लावून दिले नाही तरी "अवघे पाऊणशे वयोमान" असणाऱ्या बरोबरही तिचे लग्न लागलेले दिसत नाही.

(४) ज्या स्त्रियांचे लग्न समवयस्काशी न होता ११ किंवा अधिक वर्षांनी मोठ्या असणाऱ्या वराशी लागले त्या संबंधी कुणीही कसलाही विरोध कोणाकडेही नोंदविला नाही. तसा विरोध दर्शविण्याची, करण्याची त्यावेळी प्रथा नव्हती व स्त्रीमध्ये तेवढी हिंमतही नव्हती. ज्या व्यक्तीशी आई-वडिलांनी लग्न ठरविले त्याच्याशीच निमूटपणे लग्न करणे हेच मुलीचे कर्तव्य आहे अशी त्या मागील विचारसरणी आहे. आपले आईवडील जे करतील किंवा ठरवतील ते आपल्या भल्यासाठीच आहे, असा विचार मुलींमध्ये आढळतो. मग त्या मुलीचे आईवडील आर्थिकदृष्ट्या गरीब असतील तर काहीच न बोलणे हेच केवळ तिचे कर्तव्य असते.

(५) त्याचबरोबर लग्नाच्या बाबतीत त्या मुलीचे स्वतःचे काही मत असू शकते व त्या मतांची अंमलबजावणी झाली असे कोठेच आढळत नाही. तेवढे विचारस्वातंत्र्य आईवडीलही मुलींना देत नाहीत.

(६) माहेश्वरी समाजातील मुलींच्या लग्नावर पालकांचाच अधिकार आहे. विवाहसंस्थाही पूर्णपणे पालकांच्या आधीन आहे. ते जे ठरवतील ते मान्य करणे हे

त्यांच्या मुलामुलींचे कर्तव्य असते. त्याला सहसा कुठेही विरोध होत नाही.

भारतीय संस्कृतीचे व भारतीय कुटुंबपद्धतीचे एक वैशिष्ट्य आहे की, सर्वसाधारणपणे सगळीकडे एकत्र कुटुंबपद्धती पाळण्यात येते. पूर्वी मोठा चौसोपी वाडा, शेती व्यवसाय व त्या निमित्ताने एकत्र राहणाऱ्या चार चार पिढ्या हे दृश्य सर्रास दिसे. पण औद्योगिकीकरणानंतर नोकरीनिमित्त व इतर व्यवसायानिमित्त वेगवेगळी छोटी-छोटी कुटुंबे निर्माण झाली व एकत्र कुटुंबाची पद्धत हळूहळू कमी होऊ लागली. माहेश्वरी समाजातही असेच दृश्य दिसते.

ज्या ५०० माहेश्वरी स्त्रियांच्या मुलाखती मी घरोघर जाऊन घेतल्या त्यापैकी २७० महिला एकत्र कुटुंबात राहणाऱ्या आहेत तर १६२ स्त्रिया विभक्त कुटुंबात रहातात. ज्या दहा स्त्रिया नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या आहेत त्यापैकी पाच स्त्रिया एकत्र कुटुंबात राहातात तर पाच स्त्रिया विभक्त कुटुंबात राहतात. ज्या दोन स्त्रिया परित्यक्ता आहेत त्या माहेरी येऊन आपले आईवडील व भाऊ-भावजय ह्यांच्याबरोबर रहातात. ज्या ५६ जणी विधवा आहेत त्या सर्वसाधारणपणे एकत्र कुटुंबात राहतात. म्हणजे माहेश्वरी समाजात अजूनही एकत्र कुटुंबपद्धतीचे वर्चस्व दिसते. शिकलेल्या वा अशिक्षित, विधवा व टाकलेल्या सर्वच स्त्रिया अशा कुटुंबाच्या आश्रयाने रहातात असे दिसते.

एकत्र कुटुंबात त्या जरी राहात असल्या तरी त्यांना एकत्र कुटुंबपद्धती आवडते

**तक्ता क्रमांक - ४ : एकत्र की विभक्त कुटुंब पद्धती आवडते**

| सध्या रहातात | एकत्र कुटुंब पद्धती आवडते | विभक्त कुटुंब पद्धती आवडते | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबात - २७० | २५९ | १० | १ |
| विभक्त कुटुंबात - १६२ | ८९ | ६६ | ७ |
| विधवा - ५६ | ५६ | — | — |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या | | | |
| एकत्र कुटुंबात - ५ | ५ | — | — |
| विभक्त कुटुंबात - ५ | २ | ३ | — |
| परित्यक्ता - २ | — | २ | — |
| ५०० | ४११ | ८१ | ८ |
| टक्केवारी शेकडा | ८२.२० | १६.२ | १.६ |

की विभक्त कुटुंब पद्धती आवडते असा प्रश्न विचारल्यानंतर मला माहिती मिळाली ती अशी :

यावरून बहुतांश स्त्रियांना एकत्र कुटुंबपद्धती आवडते असे आढळते. एकत्र कुटुंब म्हणजे एका घरात सासू, सासरे, त्यांची मुले, सुना, नातवंडे ही राहतात. त्यांचा आर्थिक व्यवहार एके ठिकाणी होतो. कुटुंबप्रमुखाच्या, जो नेहमी पुरुषच असतो, मर्जीनुसार व सल्ल्यानुसारच सारे आर्थिक व्यवहार होतात. सर्वांचा स्वयंपाक एका ठिकाणी होतो व जेवणही एकत्रच होते. घरातील स्त्रियांच्या कामाची विभागणी कुटुंबातील प्रमुख स्त्रीच्या आदेशानुसार होते. एकत्र कुटुंबातील सदस्यांची संख्या ७ ते १० माणसांपासून १५ ते २० माणसांपर्यंत असते. कधी कधी ती ह्याहीपेक्षा जास्त असते. पण असे एखाद्या घरीच असते. अशा घरी २५-३० माणसेही दिसतात.

एकत्र कुटुंबपद्धती आवडते ह्याचे कारण सांगताना निरनिराळ्या महिलांनी वेगवेगळी कारणे सांगितली. कोणाला वाटते की, सर्वांनी एकत्र राहिले की प्रेम वाढीला लागते, प्रेमाने राहता येते व घराचा खर्चही कमी करता येतो. वेगवेगळ्या कुटुंबांना वेगवेगळी घरे, घरातील भांडीकुंडी, सामान सारे काही वेगळे लागते. एकत्र कुटुंबात हा अनावश्यक खर्च वाचतो. अडीअडचणीच्या वेळी, मग ती आर्थिक असो की आणखी कुठलीही असो, घरात एकमेकांचा आधार असतो. आजारपणात एकटेपणाची जाणीव होत नाही. साऱ्यांची एकदुसऱ्याला मदत होते. रोजच्या कामातही, कामासंबंधी जबाबदारी विभागली जाते. काही महिलांनी सांगितले की, आम्ही लहानपणापासून तेच पाहिले आहे व त्यामुळे आम्हाला तेच आवडते. एकटे राहायला आवडत नाही. खूप माणसांत राहायला आवडते. त्यामुळे सगळ्यांशी मिळून-मिसळून राहण्यास सर्वजण शिकतात. प्रेमाने सर्वजण एकत्र रहात असले म्हणजे त्यांचे संस्कारही मुलांवर चांगले होतात. मुलेही मग फक्त आत्मकेंद्रित न राहता सर्वांशी मिळून-मिसळून राहाण्यास शिकतात. घरात माणसे असल्याकारणाने वेळही चांगला जातो. कामाची विभागणी झाल्यामुळे आरामही मिळतो. प्रत्येकाच्या वाट्याला फार मोठी व सर्वच जबाबदारी येत नाही. एका स्त्रीने उत्तर दिले की समाजात तेच योग्य दिसते.

नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या दहा स्त्रियांपैकी ज्या पाच स्त्रिया एकत्र कुटुंबात राहातात त्यांना एकत्र कुटुंबपद्धतीच आवडते. ज्या पाच स्त्रिया विभक्त कुटुंबात राहातात त्यांच्यापैकीही दोन स्त्रियांना एकत्र कुटुंबात राहणे आवडते; बाकीच्या तिघींना विभक्त कुटुंबात. एकत्र कुटुंबात राहणे पसंत करणाऱ्या सात स्त्रियांनी सांगितले की, त्या जेव्हा कामानिमित्त घराबाहेर असतात, तेव्हा त्यांना मुलांचा प्रश्न भेडसावत नाही. घरातील माणसे मुलांना प्रेमाने सांभाळतात व त्यामुळे त्यांचा प्रश्न सोडविला जातो. दुसरे, घरातील सर्व कामाची जबाबदारी पूर्णपणे तिच्यावर येऊन पडत नाही. त्या

कमावलेला पैसा घरातच देतात व त्यामुळे घरातील माणसांशी तिचे सामंजस्य रहाते आणि तिचे आयुष्य सुरळीत व सुखकरपणे व्यतीत होते.

एकत्र कुटुंबातील एकाच स्त्रीने स्पष्टपणे सांगितले की, काही दिवस एकत्र कुटुंबात राहावे, थोडा फार कामाचा, जीवनाचा अनुभव घ्यावा व मग मात्र वेगळे व्हावे. कारण घरात वडिलधाऱ्या माणसांची प्रत्येक गोष्टीत ताबेदारी असते. स्वतःच्या जीवनासंबंधीचे निर्णय त्या स्वतः तर घेऊ शकतच नाहीत पण त्यांचे स्वतःचे पतीही घेऊ शकत नाहीत. स्वतःच्या लहान मुलासंबंधीचे निर्णयही आईवडील ह्या नात्याने ते स्वतः घेऊ शकत नाहीत. घरातील वडिलधारी मंडळीच नेहमी निर्णय घेतात व मग पटो अथवा न पटो, ते सर्व निर्णय त्यांना मानावेच लागतात. परंतु अशी वेळ जेव्हा वेळोवेळी येऊ लागते तेव्हा ते सारे असह्य होऊन जाते. एका स्त्रीने ह्यासंबंधी विचारच केला नाही असे सांगितले, तर एकीने सांगितले की, काही दिवस एकत्र राहावे व मग वेगळे राहावे.

ज्या ५६ विधवा आहेत त्या सर्वांनाच एकत्र कुटुंबात राहायला आवडते. नवऱ्याच्या मृत्यूनंतर विधवेचे आयुष्य परावलंबी बनते. त्या असहाय्य बनतात. एकत्र कुटुंबात त्यांना आधार मिळतो व त्यांचा वेळही चांगला जातो. घरातल्या कामात व मुले, नातवंडे ह्यांच्याबरोबर खेळण्यात त्यांचे मन आनंदाने रमते. एकटेपणाचे दुःख ह्या वातावरणामुळे विसरले जाते. एकत्र कुटुंबात त्यांना मानसिक आधार तर मिळतोच पण आर्थिक सहाय्यसुद्धा मिळते. स्वतःच्या लहान मुलाबाळांची जबाबदारी घरातील दीर अथवा सासरे उचलतात. त्यामुळे त्यांचे जीवन त्या सुसह्यपणे जगू शकतात.

दोन परित्यक्ता स्त्रियांनी मात्र विभक्त कुटुंबपद्धतीचा ठामपणे पुरस्कार केला. त्यामागील पार्श्वभूमी म्हणजे त्यांना सासरी होणारा त्रास. सासू, सासरे, नवरा ह्यांच्याकडून झालेल्या जाचामुळे त्यांना सासरी जगणेही असह्य होऊन गेले होते. त्यांचे नवरे हे सारे मूकपणे पाहात होते. पण त्याविरुद्ध बोलण्याची त्यांची इच्छा नव्हती व हिम्मतही नव्हती. विभक्त कुटुंबात पती-पत्नीचा संवाद सहजपणे होत असल्या कारणाने अशा प्रकारचा छळ टळला असता व नवऱ्याबरोबर व्यवस्थितपणे रहाता आले असते असे त्यांना वाटते.

पाचशे महिलांपैकी ८१ जणी विभक्त कुटुंबात राहाणे पसंत करतात. त्या विभक्त कुटुंबात रहात असल्या तरी ह्या स्त्रियांचे म्हणणे असे आहे की, जर प्रेमाने एकत्र रहाता आले तर एकत्र रहावे अन्यथा रोज भांडणे करण्यापेक्षा वेगळे राहिलेले बरे. त्यांच्या वेगळे रहाण्याच्या कारणांमध्ये पुढील कारणे मुख्यतः आढळली. घरात भांडणे होऊ लागली, प्रेमाने एकत्र रहाता येईना म्हणून मग विभक्त राहू लागले. काही ठिकाणी आर्थिक प्रश्न निर्माण झाले. तर कोणी नोकरीच्या निमित्ताने वेगळे राहू लागले. काही

व्यक्तींना मुलेबाळेच नव्हती, तर काहींना सासू-सासरे दीर-जावा, कुठलेच नातेवाईक नव्हते. त्यामुळे ते आपोआपच विभक्त राहू लागले. विभक्त राहण्यामागची कारणमीमांसा खालीलप्रमाणे आहे :

| | | |
|---|---|---|
| सोय म्हणून | १७ | स्त्रिया |
| नोकरी व स्वतंत्र व्यवसायाच्या निमित्ताने | ५४ | स्त्रिया |
| घरातील भांडणामुळे | ५३ | स्त्रिया |
| नवऱ्यास नोकरीच नाही म्हणून | १ | स्त्री |
| नवऱ्यास जबाबदारी कळते म्हणून | ९ | स्त्रिया |
| आर्थिक वाटणीमुळे | २५ | स्त्रिया |
| मुलांकडे अधिक लक्ष देता यावे म्हणून | ३ | स्त्रिया |
| | १६२ | स्त्रिया |

नोकरी किंवा स्वतंत्र व्यवसाय (३३.३३%) आणि घरातील भांडणतंटे (३२.७१%) ही दोन प्रमुख कारणे स्त्रियांच्या विभक्त राहण्याच्या पसंतीमागे आढळली. दोन्ही बाबतीत हे प्रमाण विभक्त राहणाऱ्या स्त्रियांच्या एक तृतीयांशाइतके येते.

लग्नानंतर स्त्रिया किती वर्षांनी वेगळे झाल्या हे जाणण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला खालील निरीक्षणे आढळली :

| | |
|---|---|
| लग्नानंतर लगेच वेगळे राहणाऱ्या स्त्रिया | ३५ |
| लग्नानंतर १ ते १० वर्षात वेगळे राहणाऱ्या स्त्रिया | ८५ |
| लग्नानंतर १० ते २० वर्षात विभक्त राहणाऱ्या स्त्रिया | २७ |
| लग्नानंतर २० ते ३० वर्षांनी वेगळे राहणाऱ्या स्त्रिया | ४ |
| लग्नानंतर ३४ वर्षांनी वेगळी राहणारी स्त्री फक्त | १ |
| ह्यासंबंधी काहीही सांगण्यास नकार | १० |

याचा अर्थ लग्नानंतर लगेच वेगळे राहणाऱ्या स्त्रिया २१.६० टक्के आहेत व त्याचे कारण नोकरी-व्यवसाय हेच प्रामुख्याने आहे. लग्नानंतर १ ते १० वर्षांनी वेगळे राहणाऱ्या स्त्रिया सर्वात जास्त म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त [५२.४६%] आहेत. २० ते ३० वर्षांनी वेगळ्या होणाऱ्या स्त्रिया फक्त चार आहेत व ३४ वर्षांनी वेगळी होणारी स्त्री फक्त एक आहे. ह्याचा अर्थ असा की, एकदा का स्त्रीने एकत्र कुटुंबात राहण्याची तडजोड केली व ती काही वर्षे निभावून नेली तर तडजोड टिकविण्याकडेच तिचा कल असतो. त्यासाठी तिला कुठलेही बलिदान करावे लागले तरी ती करते.

**निष्कर्ष :**

१. एकत्र कुटुंबात राहायचे की विभक्त कुटुंबात राहायचे हा निर्णय स्त्री घेत नाही, हा निर्णय तिचा नवराच स्वतःच्या सोयीनुसार घेतो.

२. एकत्र कुटुंबपद्धतीचा ह्या समाजमनावर फार मोठा पगडा आहे. त्या पाठीमागे मोठ्यांचा आदर, सन्मान व आईवडिलांविषयी प्रेम व कर्तव्य या भावना जाणवतात. त्यामुळे वृद्धांचा प्रश्न ह्या समाजात सर्वसाधारणपणे आढळत नाही. वृद्धांनाही संभाळून घेण्याची वृत्ती समाजात दिसते.

३. घरातील कुटुंबप्रमुख आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक व शैक्षणिक बाबतीतील सर्व निर्णय घेत असतो. एकत्र कुटुंबात राहणारी त्यांची मुले सर्वसाधारणपणे विनातक्रार ते निर्णय पाळतात. कुटुंबप्रमुखाची अशा घरात एकाधिकारशाही चालते.

४. एकत्र कुटुंबपद्धती म्हणजेच चांगली कुटुंबपद्धती आहे, अशी मनोधारणा ह्या समाजाची आहे. त्या विचारास एक सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे काही ठिकाणी संघर्षाच्या ठिणग्या पेटत असल्या तरी त्या झाकण्याचा प्रयत्न होतो व सारे काही व्यवस्थित चालले आहे असे भासविले जाते. इतकेच नाही तर सर्व व्यवस्थित चालावे म्हणून प्रयत्नही केले जातात.

५. एकत्र कुटुंबपद्धतीत वृद्ध पिढी व तरुण पिढी, म्हणजे पुरुष बऱ्याच अंशी सामंजस्याने एकमेकांच्या पाठीशी राहत असल्याकारणाने दोन पिढ्यांतील संघर्ष फार मोठ्या प्रमाणावर प्रकटपणे समाजात जाणवत नाहीत.

६. तरुण पिढीला एकत्र कुटुंबात फार स्वातंत्र्य दिले जात नाही. वृद्ध पिढीच्या काळापासून चालत आलेले रुढी-परंपरावादी आयुष्य पुष्कळशा कुटुंबांत आढळते. त्यामुळे सामाजिक बदल फार मोठ्या प्रमाणावर झालेले आढळत नाहीत. कुठल्याही निर्णयाची जबाबदारी तरुण पिढीवर पडत नाही. त्यामुळे त्याच्या परिणामातूनही तरुण पिढी सुटते.

७. एकूण महिलांच्या ८२ टक्के स्त्रियांना एकत्र कुटुंबपद्धती आवडते व त्याकडेच त्यांचा कल व ओढा आहे. लहानपणापासून या समाजातील स्त्रीच्या मनावर एकत्र कुटुंबपद्धतीतील गुणांचे संस्कार अशा तऱ्हेने झालेले आहेत की ते ती कदापि विसरू शकत नाही. म्हणून मग कितीही अडचणी आल्या तरी सगळ्यांबरोबर प्रेमाने एकत्र राहावे असे तिला वाटते.आयुष्यात पुष्कळ गोष्टींबद्दल तडजोड करावीच लागते, हे धोरण सगळ्या स्त्रियांमध्ये आढळते. प्रत्येक वेळी ती स्त्री आपल्या नवऱ्यावर संपूर्णपणे अवलंबून रहाते. तो जो निर्णय घेईल तोच निर्णय योग्य,

तो निर्णय म्हणजे काळ्या दगडावरील रेघ; ह्या परिस्थितीमुळे आपल्या आशा-आकांक्षाचा चुराडा करणारा निर्णयही ती मान्य करते. म्हणूनच स्त्रियांनी व्यक्त केलेल्या घरातील असमाधानापेक्षा कितीतरी पटींनी अधिक असंतोष घरात धुमसत आहे हे मला जाणवले. पण स्त्रियांच्या असंतोषाकडे सोयीस्करपणे कानाडोळा करून पुरुष आपले निर्णय राबवीत असतात. या स्वभावविशेषामागे या समाजातील स्त्रीची वर्षानुवर्षाची असहाय्यपणाची, गुलामगिरीची भावना आहे हे स्पष्ट होते.

८. महिलांना विभक्त राहण्याच्या वेळी स्वतःबद्दल विश्वास वाटत नाही. आपण एकटे घर चालवू शकू किंवा नाही, ती जबाबदारी पेलू शकू किंवा नाही हा प्रश्न तिला पडतो. १५ ते १६ वयात तिचे लग्न होते. ती तिचे शिक्षण पूर्ण करू शकत नाही. जीवनानुभव कमी असल्यामुळे जीवनास सामोरे जाण्याचे धारिष्ट्यही तिच्यात आढळत नाही. त्यामुळे तिला जगताना आत्मविश्वास वाटत नाही. कुणा नसलेल्या दिशाहीन भयभीत वासरासारखी ती वाटते.

निबंध

## प्रकरण दुसरे

# स्त्री-शिक्षण व स्वावलंबन

प्राचीन काळापासून शिक्षणाचे व ज्ञानाचे महत्त्व सर्वांना वाटत आलेले आहे. संस्कृतीचा उत्कर्ष त्या त्या वेळच्या ज्ञानाच्या खोलीवरून मोजला जातो. पशुतेला नष्ट करून मानवाला सुसंस्कृत बनविण्याचे कार्य शिक्षण-विद्या करीत असते. संत रहीम म्हणतात त्याप्रमाणे जर मानवाकडे विद्या, बुद्धी नसेल तर शेपूट व शिंगे नसलेला तोही एक पशू बनतो. मानवी मनावर सुसंस्कृतपणाचे संस्कार केले जातात ते शिक्षणाने. उच्च आदर्श, उच्च नीतिमूल्ये व मानवतावादी दृष्टिकोण वाढीला लागतो ते शिक्षणामुळे. पण स्त्रीला माणूस म्हणून न मानणाऱ्या समाजाने हा दिव्य प्रकाश तिच्यापर्यंत कित्येक वर्षे पोहोचू दिला नाही. वैदिक काळातील मैत्रेयी व गार्गी यांसारख्या अपवादात्मक स्त्रिया सोडल्या तर ज्ञानामृताने पुनीत झालेल्या स्त्रिया नंतरच्या काळात तर आढळत नाहीत. ज्ञानांधकार-कोठडीतील स्त्रियांना बाहेर काढून त्यांना ज्ञानाचा प्रकाश दाखवून त्यांच्यात जिज्ञासेची ज्ञानज्योत पेटविण्याचे कार्य केले महात्मा ज्योतिबा फुल्यांनी. सावित्रीबाई फुल्यांनी स्वतः शेण-दगडांचा मारा सहन करून शिक्षणाची ही अवघड कावड मुली व स्त्रियांच्यामध्ये प्रयत्नपूर्वक पोहोचवली. त्या पतीपत्नींच्या प्रयत्नाने इंग्रजांच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या राष्ट्राला मुली व स्त्रियांसाठीही ज्ञान म्हणजे सर्वांगीण सुधारणेचे व विकासाचे महत्त्वाचे साधन आहे हे पटू लागले. ज्ञान ही एक शक्ती आहे. ती स्त्रियांमध्येही चेतविली तर राष्ट्राचे स्वरूप बदलून जाईल व एक प्रगत संस्कृती निर्माण होईल असा विश्वास त्यांना वाटला. म्हणूनच ज्योतिबा म्हणतात-

"विद्येविना मती गेली। मती विना नीती गेली॥
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले॥
वित्तविना शूद्र खचले। एवढे अनर्थ एका अविद्येने केले॥

स्त्रियांसाठी ही ज्ञानज्योत सतत तेवत ठेवण्याचा महत्प्रयास गोपाळ गणेश आगरकर, महर्षी कर्वे, अण्णाभाऊ पाटील, शाहूमहाराज, बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी समाजाचा रोष ओढवूनही चालूच ठेवला. ही स्त्री-शिक्षणाची लाट संपूर्ण महाराष्ट्रात हळुहळू पसरत गेली व त्यासंबंधी जनमत जागृत होऊ लागले.

राजस्थान मात्र ह्यामध्ये कितीतरी मागे आहे असे सतत निदर्शनास आलेले आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार राजस्थानमध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण भारतात सर्वात कमी आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत लातूरमधील माहेश्वरी स्त्रियांच्या शिक्षणाच्या प्रगतीचा निर्देशांक फार उत्साहवर्धक जरी नसला तरी राजस्थानच्या तुलनेत त्यात खूप प्रगती आढळते. मात्र काळाच्या गरजेनुसार लातूर येथील माहेश्वरी स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण खूप कमी आहे. सततच्या दुष्काळामुळे आपले गाव, आपली माणसे सोडून द्यावा लागलेला माहेश्वरी समाज भारतभर विखुरला आहे. पण तो जेथे जेथे गेला तेथे तेथे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य कायम टिकवून परिस्थितीनुरूप बदललाही आहे. त्या त्या समाजाशी एकरूप होण्याची प्रवृत्ती त्यांच्यात सतत आढळत आलेली आहे. म्हणूनच महाराष्ट्रात स्त्री-शिक्षणाच्या फोफावत चाललेल्या वटवृक्षाखाली हळुहळू का होईना हा समाज न आला तरच नवल होते, आणि म्हणूनच महाराष्ट्रातील स्त्री-साक्षरतेविषयी चालणारी सामाजिक चळवळ माहेश्वरी स्त्री-पुरुषांनाही जागृत करून गेली.

तसा मराठवाडा हा सर्वदृष्ट्या मागासलेला भाग. पण तरीही लातूर शहराने सर्वच बाबतीत खूप प्रगती केलेली आहे. त्यात शैक्षणिक क्षेत्रात तर उल्लेखनीय प्रगती आढळते. १९८७-८८ च्या लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचनाच्या वृत्तांतावरून जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ३४.६१% आहे. त्यात पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ४८.१३% आहे तर स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण २०.५०% आहे. पण त्यामानाने लातूर शहरातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण तितके कमी नाही.

ह्या शहरात विविध शैक्षणिक संस्थांनी शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर केला आहे. येथील मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था, दयानंद शिक्षण संस्था, बसवेश्वर शिक्षण संस्था, राजर्षी शाहू शिक्षण संस्था, इत्यादी संस्थांनी चालविलेल्या मुलांच्या व मुलींच्या शाळा व मुलामुलींसाठी चालणाऱ्या महाविद्यालयाच्या विविध शाखा, आज समर्थपणे शैक्षणिक वातावरण वाढविण्याचा प्रयत्न करतात. ह्या सर्व संस्था समाजातील दानशूर व्यक्तींच्या औदार्यावर व मदतीवर उभ्या राहिल्या. त्यातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे स्व. पूरणमलजी लाहोटी हे होत. माहेश्वरी समाजातील ह्या दानशूर व्यक्तीच्या तळमळीमुळे व प्रेरणेमुळेच इ.स. १९४६ साली लातूर येथे मुलींची पहिली शाळा-गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय सुरू झाली. त्यांनी राजस्थान शिक्षण

संस्थेद्वारे चालणाऱ्या विविध विद्यालयांना व महाविद्यालयांना जमिनी दान करून ह्या कार्याला चालना मिळण्यास फार मोठे सहकार्य केलेले आहे. आजही समाजातील दानशूर व्यक्तींच्या देणग्यांमुळे व प्रयत्नांमुळे ह्या संस्था व्यवस्थितपणे चालून त्यांचा महाराष्ट्रात एक उच्च दर्जा राखला गेला आहे.

राजस्थानमधून स्थलांतर करून आलेल्या माहेश्वरी समाजास निरक्षरतेमुळे समाजात खूप अडचणींना तोंड द्यावे लागले. शिक्षण नसल्यामुळे समाजात आर्थिक व्यवहार सांभाळताना, व्यावहारिक जगात संपूर्ण समाजाशी संबंध ठेवताना ज्या अडचणी व त्रास माहेश्वरी पिढीने भोगला तोच परत आपल्या मुलाबाळांना भोगावा लागू नये ह्याची तीव्र जाणीव त्यांच्या मनात निर्माण झाली. व्यवहारात यशस्वी होण्यासाठी, व्यापारात कर्तृत्व गाजविण्यासाठी, शिक्षण नसल्यास दुसऱ्यांच्या तोंडाकडे लाचारीने पहावे लागते हे त्यांना कळून चुकले. म्हणून स्त्री-शिक्षणाविषयी त्यांचे धोरण थोडे सुधारलेले दिसते. लातूर शहरातील माहेश्वरी स्त्रियांच्या शिक्षणाचा आढावा घेत असताना असे दिसते

**तक्ता क्रमांक ५ : लातूर शहरातील माहेश्वरी स्त्रियांचे शिक्षण**

| एकूण स्त्रिया | निरक्षर | १-४ थी | ५-९वी | मॅट्रिक | अंडर ग्रॅज्यु. | पदवीधर | उच्च पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबात राहणाऱ्या-२७० | ४३ | ४९ | ६८ | ८० | २० | ९ | १ |
| विभक्त कुटुंबात राहणाऱ्या-१६२ | १९ | ४२ | ५१ | ३७ | ८ | २ | ३ |
| विधवा-५६ | ४४ | ९ | ३ | — | — | — | — |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या-१० | — | १ | १ | — | १ | ३ | ४ |
| परित्यक्त्या-२ | — | १ | — | — | — | १ | — |
| ५०० | १०६ | १०२ | १२३ | ११७ | २९ | १५ | ८ |
| टक्केवारी शेकडा | २१.२० | २०.४ | २४.६ | २३.४ | ५.८ | ३.०० | १.६ |

की माहेश्वरी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण हे बऱ्याच प्रमाणात सुधारलेले आहे. पाचशे स्त्रियांतील ७८.८% स्त्रिया साक्षर आहेत व निरक्षर फक्त २१.२% आहेत. मुलींनी

"अंगठा छाप" राहू नये ही जाणीव समाजात वाढीला लागलेली दिसून येते. ज्या निरक्षर स्त्रिया आहेत त्यातील जवळ जवळ निम्म्या म्हणजे ४४ स्त्रिया ह्या विधवा आहेत. एकूण ५६ विधवा स्त्रियांपैकी ज्या बारा शिकलेल्या आहेत त्या फार थोडे शिकलेल्या आहेत. नऊ विधवा १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षित आहेत व फक्त तिघीजणी ५ वी ते ९ वी पर्यंत शिक्षित आहेत. त्यांच्या अशा शैक्षणिक मागसलेपणामुळे त्यांना असंख्य यातना भोगाव्या लागल्या आहेत. पती-निधनानंतर अज्ञान व आर्थिक अस्थैर्य ह्यामुळे त्यांचे जीवन शोचनीय बनलेले आहे. पारंपारिक सामाजिक रुढी-बंधनात त्या गुरफटून राहिल्या व शिक्षण न मिळाल्यामुळे ती बंधने तोडण्यास असमर्थ ठरून त्यांना लाचारीने जीवन जगावे लागले. अज्ञानी राहिल्यामुळे आपल्या पतीच्या मालमत्तेविषयी कुठलीच माहिती त्यांना व्यवस्थितरीत्या कळू शकलेली नाही. पतीची मालमत्ता किती होती व त्यातून त्यांना किती मिळाली ह्याचे गणित त्या समजू शकल्या नाहीत. त्यामुळे त्या अज्ञानाचा त्यांच्या नातलगांनी व समाजातील काही इतर माणसांनी पुष्कळ वेळेला गैरफायदा घेतला व त्यांना फसविण्यात आले. जर त्यांचा स्वतःचा मुलगा कर्ता असेल तर त्यांचे आयुष्य थोडेफार सुसह्य झालेले आहे. मुलगा कर्ता होईपर्यंत विधवांचे अतोनात हाल झालेले आहेत. कर्त्या मुलामुळे त्यांना थोडेफार आर्थिक अधिकार व हातात पैसाही मिळाला आहे.

लातूर माहेश्वरी समाजातील जवळजवळ निम्म्या स्त्रिया म्हणजे २४० स्त्रिया ५ वी ते मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेतलेल्या आहेत. तर त्या खालोखाल १ ली ते ४ थी पर्यंत शिकलेल्या १०२ स्त्रियांचा नंबर लागतो. ह्याचा अर्थ असा की माहेश्वरी स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक असून मुलींना लिहिता-वाचता येईल इथपर्यंत शिक्षण द्यावे असे बहुतांशी सर्वांना वाटते. मुलींना शिकविण्यामागची कारणे जाणण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा मला असे आढळून आले की, मुलींना शिक्षण द्यावे हे प्रत्येकाला वाटते. पण ते इतकेच द्यावे की त्यायोगे त्यांना लिहिता-वाचता येईल, पत्र लिहिता येईल, धार्मिक पुस्तके वाचता येतील, रोजच्या व्यवहारात थोडा हिशोब समजेल व दैनंदिन जीवनातील, घरातील आर्थिक व्यवहार त्या सांभाळू शकतील. त्यांना ह्यापेक्षा जास्त शिकवू नये असे बहुतांशी स्त्रियांचे मत होते. कारण त्यांच्या मते,

१. स्त्रीचे क्षेत्र हे चूल व मूलच आहे.
२. तिला जन्मभर चुलीसमोर बसून भाकऱ्या भाजायच्या आहेत, तर मग काय करायचे तिला जास्त शिकवून? तिला कुठे नोकरी करायची आहे का? मग कशाला हवे तिला जास्त शिक्षण?
३. मॅट्रिकपर्यंत मुलींची वेगळी शाळा आहे, पण त्यापुढे मुलामुलींचे एकत्र कॉलेज आहे. मग मुलींना त्या कॉलेजमध्ये घातले तर त्या 'बिघडतील'. मुलामुलींच्या

एकत्र शिकण्याने मुली ' चारित्र्यहीन ' बनतील.

४. मुलींना जर जास्त शिकवले तर मग तिला नवराही जास्त शिकलेला शोधावा लागेल. जास्त शिकलेला मुलगा जास्त हुंडा मागणार. त्यामुळे मुलींच्या लग्नासाठी जास्त खर्च करावा लागणार. मुलीपेक्षा मुलगा जास्त शिकलेला पाहिजे. लग्नासाठी येणारा जादा खर्च टाळण्यासाठी तिला जास्त शिकवूच नये हा सोपा मार्ग.

५. मुलगी हे परक्याचे धन. मग प्रथम तिच्या शिक्षणावर व नंतर हुंड्यावर जास्त खर्च करून काय उपयोग? त्यापेक्षा ' पराया ' घरी जाणाऱ्या मुलीला जास्त न शिकविलेलेच बरे. तिला थोडेफार शिकवून खूप हुंडा देऊन चांगल्या शिक्षित, श्रीमंत मुलाशी तिचे लग्न लावून द्यावे हे बरे.

माहेश्वरी समाजातील स्त्रीला शिक्षण दिले जाते, पण ते दिले जाते मर्यादित स्वरूपातच. पुस्तकी ज्ञान व जुजबी व्यवहारीज्ञानच मिळाल्यामुळे मोकळा श्वास घेऊन आपले स्वतंत्र व्यक्तिमत्व फुलविण्याचे स्वप्न ती शिक्षणाद्वारे क्वचितच पाहू शकते. शिक्षणाचा खरा अर्थ आहे की एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक असा विकास घडवून आणायचा व त्याला आपल्या पायावर स्वतंत्रपणे, स्वाभिमानाने उभे करायचे. शिक्षणाच्या या खऱ्या अर्थाकडे, उद्देशाकडे अनुलक्षून माहेश्वरी स्त्रियांचे शिक्षण कदापि होत नाही. ज्या थोड्या मुली मॅट्रिक पास होऊन कॉलेजमध्ये गेल्या, पण पदवीशिक्षण पूर्ण करू शकल्या नाहीत, त्या मुलींच्या पालकांनी त्यांचे शिक्षण म्हणजे चांगला नवरा मिळण्याचे एक ' साधन ' ह्याच दृष्टिकोनातून त्याकडे पाहिलेले आहे.

ह्या सामाजिक प्रवृत्तीचा परिणाम मुलींवरही फार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. प्रचलित सिनेमातील नटनट्यांप्रमाणे नटावे, सौंदर्य ह्या एकाच शस्त्रावर पती मिळविण्याची शर्यत जिंकावी ह्या पलीकडे त्याही जास्त विचार करताना दिसत नाहीत. पत्नी म्हणून मुलीची निवड करत असताना एखाद्या मुलीचे शिक्षण जरी झालेले असले तरी नवरा मुलगा त्यास दुय्यम स्थान देतो. त्यामुळे बाहुलीप्रमाणे नटून राहणेच स्त्रीला महत्त्वाचे वाटू लागते. जीवनात दागदागिने, पोषाख, इतर चैनीच्या वस्तू यांना महत्त्वाचे प्रथम स्थान मिळते.

स्वतःचे करिअर बनवून आपण आपले शिक्षणाचे ध्येय पूर्ण करावे ही ईर्षा मुलींमध्ये क्वचितच आढळली व पालकांना तर ते मुळीच जरूरीचे वाटत नाही. उलट करिअर वगैरे गोष्टी ह्या मुलींसाठी नाहीत, हे सर्वसाधारण मत सगळ्या महिलांमध्ये आढळले. मुलीला पूर्ण शिक्षण देऊन तिला तिच्या पायावर उभे करून स्वावलंबी व सन्मानाने जगायला शिकवावे ही मनोभूमिका पालकांमध्ये क्वचितच आढळली. पदवीच्या पहिल्या, दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या महिलांचे शिक्षण त्यांच्या पालकांनी कधीच गांभीर्याने घेतलेले

नाही. आईवडिलांच्या सुरक्षित चौकटीत राहणाऱ्या मुलींनाही आईवडिलांसारखेच, लग्न म्हणजे आपले अंतिम ध्येय असेच वाटते. त्यातच त्यांना आपल्या जीवनाचे इतिकर्तव्य वाटते. म्हणूनच शिक्षण चालू असताना लग्न जमले की त्या लग्न करून मोकळ्या होतात. मग लग्नानंतर 'शिक्षण पूर्ण कशाला करा? काय करायचे शिकून?' हा विचार बहुतांशी सगळ्या मुलींमध्ये व पालकांमध्येही आढळतो. गृहिणीच्या पारंपारिक भूमिकेला अनुसरून घर सांभाळणे, घरातील सर्व कामे करणे, मुलेबाळे सांभाळणे ह्यातच तिचा पूर्ण वेळ जातो. ह्यापेक्षा आपण काही वेगळे करावे किंवा करू शकतो हे तिला मनापासून कधी वाटतच नाही.

पदवीधर झालेल्या पंधरा स्त्रिया पदवी घेऊन घरकामातच गुंग झालेल्या आहेत. त्या व्यतिरिक्त अर्थार्जनाचे काही काम किंवा व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रयत्न त्या करताना दिसत नाहीत. शिक्षणाने चिकित्सक बुद्धी जागी होते असे म्हणतात. पण स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी जाणीव व ज्या जगात त्या राहतात त्यासंबंधीची जागृती माहेश्वरी स्त्रीच्या जीवनात आढळली नाही. स्वतःचे असे वेगळे अस्तित्वच तिला जाणवत नाही. कठपुतळीतील बाहुलीप्रमाणे सजून-धजून ती आपल्या पतीच्या, सासू-सासऱ्यांच्या तालावर नाचत असते. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा होम लग्नाच्या होमाबरोबर करण्याची शिकवण तिला लहानपणापासूनच मिळालेली आहे. सासरच्या सर्व माणसांना त्यांच्या मर्जीप्रमाणे खूष ठेवून ती एक चांगली, आदर्श, आज्ञाधारक सून म्हणून जगण्याचा प्रयत्न करते. मग त्या त्यागामध्ये तिच्या इच्छा-आकांक्षांचा बळी दिला जातो. लग्नानंतर काही वर्षांनी पूर्वी तिला काय आवडत होते, काय आवडत असे, आपण जीवनात काय करावे असे कधी काळी तिच्या स्वप्नाळू मनाने ठरवलेले होते, हे सारे ती विसरून जाते. 'रांधा, वाढा आणि उष्टी काढा' हीच तिच्या कार्यक्षेत्राची सीमित चौकट होते. तिला तिच्या ह्या परिस्थितीची जाणीवही नसते आणि काही प्रमाणात, कुणा स्त्रीमध्ये ती असलीच तर ती परिस्थितीमुळे बोथट झालेली आढळते.

बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले आहे की 'गुलामांना एकदा त्यांच्या गुलामीची जाणीव करून द्या, म्हणजे ते आपोआप गुलामगिरीविरुद्ध संघर्षाला उभे रहातील.'' पण हेच स्त्रियांच्या चळवळीत सर्वात कठीण काम! त्यांच्या मनातील गुलामगिरीची भावना निपटून काढणे हे अतिकठीण कार्य. माहेश्वरी समाजातील स्त्रियाही अशाच धर्मांधतेच्या, अंधश्रद्धेच्या, रूढी व परंपरेच्या आणि अज्ञानाच्या-गुलामगिरीच्या जोखडात अडकलेल्या आहेत. त्यांनी घेतलेले शिक्षण त्यांना स्वातंत्र्याचा, व्यक्तिमत्त्वविकासाचा मार्ग दाखवत नाही. जे ज्ञान तिला स्वतंत्रपणे विचार करण्यास शिकवत नाही, जे सारासार विवेकबुद्धीला चालना देत नाही, ते मग तिच्या सुप्त गुणांना वाव तो काय देणार? आर्थिक व सामाजिक गुलामगिरीत ती वर्षानुवर्षे खितपत

पडली आहे ह्याची खंतही तिला अपवादानेच वाटते.

ज्या आठ स्त्रिया उच्च पदवीधर झालेल्या आहेत त्यातील चौघींनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. त्यातील तीन डॉक्टर आहेत, तर एक शिक्षिका आहे. एकीने प्राध्यापिकेची नोकरी काही वर्षे करून सोडून दिलेली आहे. बाकीच्या तिघी घरकामा-व्यतिरिक्त काहीच करत नाहीत. आठातील चौघीजणी स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या आहेत. पण बाकीच्यांनी त्याचा विचारही केलेला नाही. काहींना त्यांच्या घरच्या मंडळींचा विरोध आहे तर काहींची स्वत:चीच इच्छा नाही. कुटुंबाच्या सुखासाठी त्यांनी आपल्या इच्छेचा विचारच केलेला नाही. कोणतीही किंमत देऊन कुटुंब टिकवणे हे तिच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते, व बाकीच्या सर्व गोष्टी गौण ठरतात. जीवनात तडजोडीचे हे व्रत तिने स्वीकारलेले आहे. मग त्या तडजोडीला कुठल्याच मर्यादा नसतात.

अशा रीतीने व्यक्तिमत्त्वविकासाच्या फंदात न पडता घरकामातच व्यग्र असणाऱ्या माहेश्वरी स्त्रिया घरकाम सोडून आणखी काही व्यवसाय करतात का? अर्थात

**तक्ता क्रमांक ६ : माहेश्वरी स्त्रीचा व्यवसाय**

| एकूण स्त्रिया | | घरकाम | घरकाम + व्यवसाय |
|---|---|---|---|
| एकूत्र कुटुंबातील- | २७० | २६५ | ५ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | १४८ | १४ |
| विधवा- | ५६ | ५१ | ५ |
| नोकरी-व्यवसाय | | | |
| करणाऱ्या- | १० | — | १० |
| परित्यक्ता- | २ | १ | १ |
| | ५०० | ४६५ | ३५ |
| टक्केवारी शेकडा | | ९३.०० | ७.०० |

माहेश्वरी समाजातील बहुतांशी सर्व स्त्रिया ह्या घरकामात मग्न आहेत व त्यातच गुंतलेल्या असल्यामुळे त्यातून बाहेर पडणे त्यांना दुरापास्त झालेले आहे. घरकाम हे आपले प्रमुख कर्तव्य समजून घराच्या बंदिस्त चौकटीत आपले अस्तित्व त्या जोपासतात.

घराची पारंपारिक चौकट सांभाळून आर्थिकदृष्ट्या काही प्रमाणात स्वावलंबी होणाऱ्या स्त्रिया, ह्या पाचशेपैकी फक्त ३५ (७.००%) आहेत.

ह्याचा अर्थ असा की, परंपरागत विचारसरणीचा फार मोठा पगडा माहेश्वरी पुरुषांवर व समाजावर आहे. घरातील परिस्थिती बेताची असो की चांगली, घरातील स्त्रीने कुठल्याही प्रकारचे अर्थार्जन करणे पुरुषांना अपमानास्पद वाटते, पुरुषप्रधान संस्कृतीत मुरलेल्या या समाजाचा अहंकार दुखावला जातो. सर्वसाधारणपणे आर्थिक स्थैर्य असणाऱ्या स्त्रीने तर असा विचार चुकूनही मनात आणू नये, ही अपेक्षा प्रत्येक पुरुष ठेवतो. आपण पत्नीचे पालनपोषण करतो, तिला लागेल ते देतो ही भावना पुरुषाला सुखकारक वाटते. स्त्रीने घराबाहेर पडून अर्थार्जन करणे म्हणजे आपल्या घराला काळिमा फासणे आहे किंवा घराण्याला कमीपणा आणणारे आहे, असेच बव्हंशी पुरुषांना वाटते. कित्येक कुटुंबे गरिबीच्या परिस्थितीत जगत आहेत. नवऱ्याच्या तुटपुंज्या कमाईवर घरप्रपंच चालवणे स्त्रीला कठीण जाते. पण तरीही तिने घराला पैशाच्या स्वरूपात हातभार लावावा ही अपेक्षा सहसा कुठे आढळत नाही. स्त्री-पुरुषांच्या साहचर्याने, सामंजस्याने व आर्थिक बाजू दोघांनी सावरून धरल्याने घर चांगल्या प्रकारे चालते हा विचार अपवादात्मकच आढळतो. मग खर्चाचा व मिळणाऱ्या मिळकतीचा मेळ जमविता जमविता स्त्रीला व पुरुषाला कितीही त्रास झाला तरी चालेल, अशी प्रवृत्ती सर्वसाधारणपणे आढळते. ह्यासाठी, सर्व समाजाकडून हलक्या प्रतीची समजली जाणारी घरातील कामे स्त्रीने हाताने करून आपला खर्च वाचवायचा हे अपेक्षित असते. घरातील भांडी, धुणी, कपड्यांना इस्त्री करणे, स्वयंपाक करणे, हे सारे काम स्त्रीने करून पैसे वाचवायचे, हे दृश्य सर्रास दिसते.

सर्वसाधारणपणे घरकामात घरातील चहापाणी व स्वयंपाक करणे, सर्वांना जेवायला वाढणे, केरकचरा काढणे, घराची साफसफाई करणे, पाणी भरणे, मुलांची काळजीपूर्वक निगा ठेवणे, आजाऱ्यांची शुश्रूषा करणे, धान्य निवडणे, घरातील माणसांच्या खाण्यापिण्याच्या फर्माईशी पुऱ्या करणे, ही कामे मोडतात. ह्यामध्ये मग घरात आर्थिक स्थिती बेताची असेल तर घरातील भांडी घासणे व कपडे धुणे ही दोन्ही कामे स्त्रीलाच करावी लागतात. ह्या कामाच्या जोडीला पुष्कळ वेळेला घरासाठी लागणाऱ्या छोट्या-मोठ्या वस्तूही त्यांना बाजारातून आणाव्या लागतात. फक्त, वर्षभरासाठी लागणारे धान्य आणण्याचे काम सहसा त्या करत नाहीत. स्त्री थोडीफार शिकलेली असेल तर तिलाच मुलांचा अभ्यासही घ्यावा लागतो. आतिथ्यप्रिय माहेश्वरी समाजात पाहुण्यांची चोख व्यवस्थाही तिलाच ठेवावी लागते.

ज्या स्त्रिया नोकरी किंवा व्यवसाय करतात त्यांनाही घरातील, वर उल्लेखिलेली कामे चुकत नाहीत. त्या जोडीला त्यांना पुष्कळ वेळेला कपड्यांना इस्त्री करण्याचे

कामही घरीच करावे लागते. ही सर्व कामे करण्यात त्यांचा जवळ जवळ संपूर्ण दिवस जातो. अशा रीतीने माहेश्वरी स्त्रियांमध्ये विशेष शिक्षण घेऊन, अर्थार्जन करून स्वाभिमानाने जगणाऱ्या स्त्रिया खूप कमी आहेत. पण त्याचबरोबर कुटुंबासाठी अहोरात्र मेहनत घेऊन त्यासाठी खस्ता खाणाऱ्या बहुतांशी महिला आहेत. कर्तव्यदक्ष असणारी माहेश्वरी स्त्री आपले स्वतंत्र मन, विचार सारे सोडून कुटुंबाच्या कल्याणासाठी राबत असल्याचे दृश्य सर्रास सगळीकडे दिसते. ही सर्व अनुत्पादक कामे करण्यात तिला स्वत:कडे पाहायला वेळच मिळत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर माहेश्वरी स्त्रियांच्या शिक्षणाच्या तुलनेत त्यांच्या पतीच्या शिक्षणाची परिस्थिती काय आहे ते पाहिले तर असेच दिसते की माहेश्वरी पुरुषांच्या

**तक्ता क्रमांक ७ : माहेश्वरी स्त्रियांच्या पतीची शैक्षणिक स्थिती**

| एकूण पुरुष | निरक्षर | १-४ | ५-९ | मॅट्रिक | ११ ते पदवी. | उच्च पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- २७० | १ | २५ | ३६ | ७८ | ९९ | ३१ |
| विभक्त कुटुंबातील-१६२ | २ | ११ | २१ | ६१ | ५१ | १६ |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे पति- १० | - | १ | - | १ | ३ | ५ |
| ४४२ | ३ | ३७ | ५७ | १४० | १५३ | ५२ |
| टक्केवारी शेकडा | ०.६८ | ८.३७ | १२.९० | ३१.६७ | ३४.६२ | ११.७६ |

साक्षरतेचे प्रमाण उत्तम म्हणजे ९९.३२% आहे. तरुण व मध्यमवयीन पिढीतील एकही पुरुष निरक्षर नाही. जे आहेत ते म्हातारे आहेत. स्त्रियांच्या पाचवी ते पदवीपर्यंतच्या शिक्षणाच्या प्रमाणाच्या (५६.८०%) तुलनेत पुरुषांच्या या शिक्षणाचे प्रमाण खूप जास्त (७९.१९%) आहे.

शिक्षणामुळे जीवनात उत्कर्षाची सर्व दालने खुली केली जातात हे जरी सर्वांना पटलेले असले तरी बऱ्याच पुरुषांनी आपले शिक्षण पूर्ण केलेले नाही. पदवी पूर्ण होण्यापूर्वीच बऱ्याच पुरुषांनी आपले शिक्षण अर्धवट सोडलेले आहे. त्याचे कारण म्हणजे, घरात चालत आलेला जो परंपरागत व्यवसाय आहे त्या व्यवसायाला कुटुंबाने दिलेले अधिक महत्त्व, हे होय. साधारणपणे व्यवसायाकडे माहेश्वरी पुरुषांचा कल

असल्यामुळे वाणिज्य शाखेची पदवी घेऊन किंवा ते शिक्षण अर्धवट सोडून ते आपल्या रोजीरोटीच्या व्यवसायास लागतात. त्या व्यवसायांत प्रामुख्याने आडतव्यापार, शेती, व कापडव्यापार हे व्यवसाय अंतर्भूत असतात. हे पुरुष उपजीविकेसाठी काय करतात ?

**तक्ता क्रमांक ८ : माहेश्वरी स्त्रियांच्या पतींचे उपजीविकेचे साधन**

| एकूण पुरुष | | नोकरी | स्वतंत्र व्यवसाय | निवृत्त | बेकार |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | ५० | १९२ | २६ | २ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ५० | १०९ | ३ | - |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे- | १० | ४ | ६ | - | - |
| | ४४२ | १०४ | ३०७ | २९ | २ |
| टक्केवारी शेकडा | | २३.५३ | ६९.४६ | ६.५६ | ०.४५ |

बहुतांशी माहेश्वरी पुरुष (६९.४६%) हे नोकरी न करता स्वतंत्र व्यवसायाद्वारे अर्थार्जन करतात, व तसे करणे पसंतही करतात. ह्या व्यवसायात आडतव्यापारी, शेतकरी, वकील, डॉक्टर, कापड व्यापारी, छोटे उद्योगधंदे चालविणारे कारखानदार, किराणा मालाचे व्यापारी इत्यादींचा समावेश आहे. राजस्थानमध्ये बिकट व भीषण अशा दुष्काळांना तोंड दिल्यामुळे कुठल्याही संकटांना साहसाने सामोरे जाण्याची वृत्ती माहेश्वरी समाजात पूर्णपणे भिनलेली आहे. म्हणूनच नोकरीच्या शोधार्थ न फिरता कुठलाही छोटामोठा व्यवसाय सुरू करून त्यात आपल्या हुशारीने, मेहनतीने व चिकाटीने यश मिळविणे हे माहेश्वरी पुरुषांचे खास वैशिष्ट्य आहे. तो व्यवसाय उभा करण्यात तसेच येणाऱ्या संकटांना साहसाने सामोरे जाण्याची क्षमताही त्यांच्या अंगी खूप जास्त असते. चोवीस तासांतील १८ ते २० तास काम करून आपला व्यवसाय उभा करण्यात व तो यशस्वी करण्यात त्याला अतिशय आनंद वाटतो. म्हणूनच नोकरी करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण ह्या समाजात अल्प आहे व बेकार पुरुष फक्त दोन आहेत. म्हणजे लातूर शहरातील माहेश्वरी समाजात बेकारीचे प्रमाण फक्त ०.४५% असून, ते नाहीच्या बरोबर आहे.

ह्याचे मुख्य कारण म्हणजे समाजातील पुरुषांची काही ना काही धडपड करून

व्यवसाय प्रस्थापित करून उपजीविका करण्याची वृत्ती होय. ह्या स्थलांतरित समाजास तग धरून टिकण्यास चिकाटीने, हिमतीने परिस्थितीशी सामना करावा लागलेला आहे. त्यांच्या धडपडीमुळे माहेश्वरी समाजास सर्वसाधारणपणे आर्थिकदृष्ट्या स्थैर्य प्राप्त झालेले आहे. ह्या स्थैर्यात स्त्रीचा प्रत्यक्ष जरी वाटा नसला तरी तिचा अप्रत्यक्षपणे हातभार लागतोच. घरातील सर्व कामांचा तिला पैशाच्या स्वरूपात मोबदला जरी मिळत नसला तरी तिच्या कामाचे मूल्य हे महत्त्वाचे आहे. अर्थार्जनासाठी ती प्रत्यक्षपणे घराबाहेर पडत नाही. पण घरात दिवसभर काम करून ती आपल्या जबाबदारीचा वाटा उचलते. घरात शेती असेल तर तेथून येणाऱ्या मालाबरोबर जे मातेरे (कचरा-खडेमिश्रित धान्य) येते ते तीच साफ करते. घरी किराणा मालाचे दुकान असेल तर तेथील सामानाची व्यवस्थित विभागणी करून देणे व पुष्कळ वेळेला ते साफही करून देणे, हे काम तीच करत असते. कापडाच्या व्यापारात, वकिली किंवा डॉक्टरी ह्या क्षेत्रात त्या विशेष मदत करू शकत नाहीत. तरीही एखाद्या हॉस्पिटलची देखरेख ती करतेच. घराबाहेरची सन्माननीय समजली जाणारी कामे पुरुष करतो व स्त्री हे घरातील दुय्यम दर्जाचे, हीन प्रकारचे काम करते. त्याचे मूल्य पैशाच्या रूपात तर होत नाही व समाजातही त्याकडे फार आदराने पाहिले जात नाही. घराच्या आर्थिक स्थैर्यात, त्याचा समतोल सांभाळण्यात तिचा असा महत्त्वाचा वाटा जरी असला तरी त्याचे मोल सहसा कुणाला वाटत नाही. घराबाहेर पडून पैसा कमावणारा पुरुष हा महत्त्वाचा मानला जातो व त्यास घरात विशेष हक्क प्राप्त होतात. खाण्यापिण्यापासून सर्वच बाबतीत त्याच्याकडे विशेष लक्ष पुरविले जाते. पण घरी राहून घरात दिवसभर काम करणाऱ्या स्त्रीला "दिवसभर घरातच तर असतेस एवढे काय काम असते तुला ?" असे शब्द पदोपदी ऐकावे लागतात. समाजातील ह्या प्रवृत्तीमुळे तिला घरातील सुविधांचा विशेष हक्क कधीच प्राप्त होत नाही. खाण्यापिण्यापासून तिच्याकडे पुष्कळ बाबतीत सर्वांचे दुर्लक्ष होतेच, पण ह्या परिस्थितीच्या परिणामामुळे तीही स्वत:कडे पुरेसे लक्ष देत नाही. मग विशेष अधिकार मागण्याचा तर प्रश्नच उद्‌भवत नाही.

जे परंपरागत संस्कार माहेश्वरी स्त्रीवर झालेले आहेत त्यामुळे तिला स्वत:लाही एखादा स्वतंत्र व्यवसाय करावा असे कधी वाटत नाही. स्वतंत्रपणे आपण काही करू शकतो ह्याचा तिला आत्मविश्वास राहात नाही. स्त्रीने घराबाहेर पडणे म्हणजे काहीतरी मोठा अनर्थ झाला असेच सर्वसाधारणपणे समजले जाते. घुंघटमध्ये आपला चेहरा लपवून परपुरुषांना तो न दाखविता राहणाऱ्या स्त्रियांची जी एक परंपरा ह्या समाजात आहे त्यामुळे स्त्री घराबाहेर पडायला धजत नाही व तिला तशी परवानगीही दिली जात नाही. म्हणून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्रपणे काही करावे असे तिला वाटत नाही. त्याचबरोबर तिच्या नवऱ्याला किंवा सासऱ्यांना ते पसंत नसते. तिला घरात

राहायचे असेल तर तिला ते नियम सहसा पाळावेच लागतात. त्यास पर्याय क्वचितच आढळतात. घरातील इतर स्त्रियाही तिला स्वतंत्रपणे अर्थार्जन करण्यास क्वचितच संमती देतात. त्यामुळेच तिच्या वाट्याला आलेले परंपरागत अपमानाचे जीवन ती विनातक्रार कंठत असते. म्हणूनच जेव्हा मी त्यांना प्रश्न विचारला की, "तुम्हाला स्वतंत्र व्यवसाय किंवा उद्योग करण्याची इच्छा आहे काय?" तेव्हा त्यांची उत्तरे त्यांच्या वरील प्रवृत्तीवरच प्रकाश टाकती झाली.

**तक्ता क्रमांक ९ : माहेश्वरी स्त्रीला स्वतंत्र उद्योग करण्याची इच्छा**

| एकूण स्त्रिया | | आहे | नाही | उद्योग करते | नवऱ्याला उद्योगात मदत करते | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | ५५ | २०६ | ५ | ४ | - |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ३८ | ९४ | १७ | १२ | १ |
| विधवा- | ५६ | १ | ४६ | ९ | - | - |
| नोकरी करणाऱ्या- | १० | - | १० | - | - | - |
| परित्यक्ता- | २ | १ | - | १ | - | - |
| | ५०० | ९५ | ३४६ | ४२ | १६ | १ |
| टक्केवारी शेकडा | | १९.०० | ६९.२ | ८.४ | ३.२ | ०.२ |

एकूण पाचशे माहेश्वरी स्त्रियांपैकी ९५ स्त्रियांना (१९.००%) स्वतंत्र उद्योग करण्याची इच्छा आहे. कारण त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नाही. घरखर्चाला हातभार लावावा म्हणून शिलाईकाम, पापड करणे किंवा तत्सम, त्यांच्या आवाक्यातील व्यवसाय त्या करू इच्छितात. पण तरीही ते जमलेले नाही. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :

१. सासर जुन्या विचारांचे व परंपरावादी आहे. म्हणून घरातील स्त्रीने काम करून पैसा कमवावा हे घरच्या माणसांना पसंत नाही. घरात नवऱ्याची किंवा सासऱ्याची सत्ता चालते. तेव्हा त्यांना पसंत नसलेले काही त्या करू शकत नाहीत. त्यांच्या बुद्धीला जरी ते पटले तरी घरच्यांच्या विरोधात जाणे त्यांना योग्य वाटत नाही व त्यासाठी त्यांच्यात तसे साहसही नाही.

२. घरकामाच्या जबाबदारीमुळे स्त्रीला रिकामा वेळच मिळत नाही. मग ती उद्योगासाठी वेळ कसा काढणार ?

३. स्त्रीला लहान लहान मुले आहेत म्हणून काम करणे जमले नाही. मुले मोठी झाल्यावर पुढे काही करण्याचा त्यांचा विचार आहे.

४. तब्येत खराब, म्हणून गरज असूनही काही स्त्रिया काही करू शकत नाहीत.

माहेश्वरी समाज रूढीवादी आहे. बदललेल्या परिस्थितीत बदलण्याचे स्वातंत्र्य तो स्त्रीला देत नाही. ज्या जमिनीत तिची मुळे रुजलेली आहेत तेथेच तिने आहे त्या स्थितीत घट्ट उभे राहावे ही प्रत्येकाची अपेक्षा आहे. सामाजिक क्रांतीचा मंत्र सांगणाऱ्या ज्योतिराव फुल्यांनी स्त्रीला केंद्रस्थानी मानून शिक्षणाचा व उन्नतीचा विचार केलेला होता. पण त्या विचारांचा झरा अजून माहेश्वरी स्त्रीच्या घरात पोहोचलेला नाही. त्यामुळे आर्थिक स्वावलंबनाने येणाऱ्या आत्मविश्वासास ती मुकली आहे. निम्म्यापेक्षा जास्त स्त्रियांना (६९.२%) काही व्यवसाय किंवा उद्योग करून स्वत:च्या पायावर उभे राहण्याची इच्छाच नाही. जोपर्यंत स्वत:च्या परिस्थितीची तिला योग्य जाणीव होत नाही, त्यासंबंधी तिच्या चेतना जागृत होत नाहीत तोपर्यंत परंपरागत गुलामीचे जोखड फेकून देण्याची जागृती तिच्यामध्ये येणार नाही. जोपर्यंत ती स्वत: आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन स्वाभिमानाने जगणार नाही तोपर्यंत तिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळणार नाही. हे ह्या समाजाचे विदारक चित्र आहे. स्त्रीने आपले चाकोरीबद्ध जीवन जगावे, त्यात उगीच स्वतंत्र व्यवसायाचे वारे शिरून आहे ती चौकट उद्ध्वस्त व्हावी ही कल्पना स्त्री व पुरुष यांपैकी कुणालाच संमत नाही. तिने आज्ञाधारक पत्नी, बहीण, भावजय, सासू व आई ह्या भूमिका पार पाडत 'घर एके घर' करावे हे तिच्याकडून अपेक्षित आहे. ही सारी नाती सांभाळताना तिला त्यागाची मूर्ती बनवून तिचा आणखीनच कोंडमारा केला जातो व त्या वलयातून ती बाहेर पडणे शक्य होत नाही.

इतर समाजाप्रमाणे माहेश्वरी समाजातही स्त्रीच्या घरकामाला आर्थिक मूल्य नाहीच, पण ते काम कमी प्रतीचे, दुय्यम दर्जाचे आहे, अशीच धारणा पूर्ण समाजाची आहे. शिवाय "जे आहे ते खूप चांगले आहे, आपला दर्जा आहे तोच योग्य आहे हे असेच वर्षानुवर्षे चालत आलेले आहे, मग त्यात बदल तो कशाला करायचा ?" हा विचार बहुतांशी स्त्रियांच्या मनात आढळतो. पुरुषप्रधान संस्कृतीतील "पती हाच परमेश्वर" हे ब्रीदवाक्य प्रमाण मानून चालणाऱ्या स्त्रीला स्वत:च्या दुय्यम दर्जाचे दु:ख वाटत नाही. कुठल्याही परिस्थितीत पतीची आज्ञा न मोडण्याचा आदर्श घालून देणाऱ्या संस्कृतीत माहेश्वरी स्त्री जन्मली आहे व वाढली आहे. त्यामुळे स्वतंत्र विचाराने काही करण्याचे, योग्य विचाराने काही मिळविण्याचे, योग्य असेल तर पतीच्या मर्जीविरुद्ध कृतीचे साहस व विचार स्त्रियांमध्ये नाही. नवऱ्याच्या हुकूमानुसार मान डोलावणारी

ही स्त्री नव्या क्षितिजाचे स्वप्न तरी कसे पाहणार ? तिच्या पायात आहेत परंपरावादी वृत्तीच्या आणि खऱ्याखुऱ्या चांदीच्या साखळ्या व डोळ्यावर आहेत धर्म व अंधश्रद्धेचे बुरखे. म्हणूनच समाजाचा गाडा व्यवस्थितपणे हाकण्यासाठी समाजातील परंपरेने चालत आलेली कामाची वाटणी-विभागणी ती स्वीकारते व आपल्या आयुष्याची इतिश्री त्यातच आहे असे समजून समाजगाडा चालविण्याचा प्रयत्न करते.

सामान्यत: माहेश्वरी स्त्री स्वत:च्या जीवनात एखादे करीअर निवडून ते मिळविण्यासाठी काही प्रयत्न करताना दिसत नाही. तिला स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्व वाटत नाही व म्हणून ती त्या दिशेने प्रयत्नदेखील करत नाही. पालकांनी आखून दिलेल्या चौकटीतच ती जीवन जगताना दिसते.

लातूरमधील ज्या ४२ माहेश्वरी स्त्रिया (८.४%) काही उद्योग करतात त्यात डॉक्टर व शिक्षिका असणाऱ्या चार आहेत. बाकी साऱ्या जणी घरातील आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे म्हणून काही घरगुती व्यवसाय करतात. आपल्याला आवडते म्हणून एखादे क्षेत्र निवडणाऱ्या स्त्रिया ह्या समाजात जवळजवळ नाहीत असे म्हटले तरी चालेल. ह्या विपरीत परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात कमी असते.

ज्या स्त्रिया काही घरगुती व्यवसाय करतात त्यात मुगाच्या डाळीचे पापड लाटून देणे व विकणे हा व्यवसाय प्रामुख्याने आढळतो. मुगाचे पापड म्हणजे त्या समाजातील एक उल्लेखनीय असा खाण्याचा पदार्थ आहे. तशा प्रकारचे पापड साधारणपणे दुसऱ्या समाजातील स्त्रिया बनवू शकत नाहीत. म्हणून गरीब माहेश्वरी स्त्रिया हा कमी भांडवलाचा उद्योग स्वत:च्या दिवसभराच्या मेहनतीने उभा करतात. पण ह्या उद्योगात त्यांना जी मजुरी मिळते ती फारच कमी असते. शंभर पापड लाटायला त्यांना मजुरी मिळते तीन रुपयांपासून पाच रुपयांपर्यंत. दिवसभर जर ती स्त्री पापड लाटत बसली तर तिची कमाई होते ५ ते ७ रुपये. त्यामुळे ह्या व्यवसायातून फार कमाई होत नसली तरी हे काम आर्थिक गरजेपोटी केले जाते. सर्वसाधारणपणे माहेश्वरीस्त्रिया देखील स्वत:च्या घरात लागणारे आठ ते दहा किलो डाळीचे पापड १५ ते २० दिवस खूप मेहनत घेऊन घरीच करतात.

ह्याशिवाय भडंग तयार करून विकणे, गरम मसाला करून विकणे, साड्या विकणे, साड्यांना फॉल लावून देणे, पोस्टल सेव्हिंग करणे इत्यादी उद्योग स्त्रिया करतात. मी अभ्यास केलेल्या गटातील फक्त १६ स्त्रिया (३.२%) पतीच्या कामात मदत करतात. त्यामध्ये कोणी शेतीमध्ये, तर कोणी नवऱ्याच्या दूधडेअरीच्या व्यवसायात दूध विकून मदत करतात. काही पतीच्या फोटो स्टुडिओतही जातात. असे अपवाद सोडले तर सर्व स्त्रिया घरकामात आपला सर्व वेळ घालवतात. पती-पत्नीचे सर्व क्षेत्रातील साहचर्य सहसा या समाजात अपेक्षित नाही. दोघांची कार्यक्षेत्रे ही त्यांच्या लिंगभेदावर आधारित

आहेत.

**निष्कर्ष :**

१. माहेश्वरी स्त्रियांना शिक्षण दिले जाते पण ते जुजबी असते.

२. त्या शिक्षणामुळे ती स्वावलंबी बनत नाही. स्वतःच्या पायावर उभी राहून ती स्वाभिमानाने जीवन जगू शकत नाही.

३. मुलींना कमी शिकवून, तो पैसा हुंड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी वापरायचा प्रयत्न केलेला आढळतो.

४. शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोण निकोप नाही. तिच्या व्यक्तिमत्त्वविकासाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जात नाही.

५. लग्नाच्या बाजारात चांगला नवरा मिळविण्याचा तो एक चांगला मार्ग म्हणून त्याकडे पाहिले जाते.

६. परंपरागत गृहिणीच्या चौकटीत स्त्रीला बसवून तिच्या कामाकडे व घरातील तिच्या स्थानाकडे दुय्यम दर्जाचे म्हणूनच पाहिले जाते.

७. नवऱ्यापेक्षा बायको जास्त शिकलेली आहे असे कुठेच आढळत नाही. शिक्षण, वय, उंची ह्या सर्व बाबतीत स्त्री ही पतीपेक्षा कमीच असावी ही रूढ कल्पना सगळीकडे आढळली.

माहेश्वरी स्त्रीच्या शिक्षणाची व स्वावलंबनाची परिस्थिती समाजात परिवर्तन आणणारी नाही. स्त्रियांच्या मनावरही त्याच वातावरणाचा परिणाम झालेला आहे. म्हणून घरकामातून तिला जो काही थोडाफार मोकळा वेळ मिळतो तो ती कसा घालवते हे जेव्हा मी पाहिले तेव्हा मनात आणखी प्रश्न उभे राहिले. आपल्या छोट्याशा जगात ती मग्न झालेली असते. बाकीच्या जगाशी जणू तिचा काहीच संबंध नसतो व म्हणून काळाची बदलती पावले ती ओळखू शकत नाही. त्यानुसार ती चालू शकत नाही. जीवनाकडे, शिक्षणाकडे पाहण्याचा ह्या स्त्रियांचा एक उदासीन दृष्टिकोण मला सर्वसाधारणपणे आढळून आला.

बहुतांशी माहेश्वरी स्त्रियांना (७०%) घरकामाव्यतिरिक्त थोडाफार रिकामा वेळ मिळतो. हा रिकामा वेळ साधारणपणे दुपारी दोन ते चार तास असा असतो. हा वेळ त्यांना रोजच मिळतो असे नाही. जर घरात पाहुणे आले, वर्षभराचे धान्य निवडायचे असेल किंवा वर्षभराचे पापड, लोणची, सांडगे इत्यादी जास्तीची कामे करावयाची असली तर तिला अर्धा तासही रिकामा वेळ मिळत नाही.

ज्या स्त्रिया खूप म्हाताऱ्या म्हणजे ७० वर्षांच्यावर झालेल्या आहेत त्या वयानुसार काही काम करू शकत नाहीत. पण तरीही बसल्या बसल्या कापसाच्या वाती करणे,

भाजी निवडणे इत्यादी, त्यांच्या आवाक्यातील कामे त्या करतच असतात.

ज्या ५८ स्त्रियांना (११.६०%) अजिबात रिकामा वेळ मिळत नाही, त्यांचा संपूर्ण वेळ घरकामातच जातो. महिन्यातील फक्त चारच दिवस त्यांना हक्काने स्त्री-जात म्हणूनच थोडी फार विश्रांती मिळू शकते. परंतु त्यावेळीही एकीकडे बाजूला बसून धान्य निवडण्याचे काम त्या करीतच असतात. ज्या ७८ स्त्रियांना फक्त अर्धा तास रिकामा वेळ मिळतो, त्या वेळात त्या विश्रांती घेणे जास्त पसंत करतात. ज्या स्त्रियांना रिकामा वेळ मिळतो त्या आपला वेळ कसा घालवितात हे पाहणेही उद्‌बोधक आहे.

एकूण पाचशे माहेश्वरी स्त्रियांपैकी ४३७ स्त्रियांना जो रिकामा वेळ मिळतो त्यातील २११ स्त्रिया (४८.२८%) " आराम किंवा झोप " ह्यात तो घालवतात. सततच घरकाम करून थकल्यामुळे त्यांना विश्रांतीची गरज वाटते. म्हणून विश्रांतीला आपल्या जीवनात त्या महत्त्वाचे स्थान देतात. ९७ स्त्रिया आपला रिकामा वेळ वाचनात, १८२ जणी भरतकामात व विणकामात, ६६ जणी गप्पा मारण्यात, तर ६४ जणी देवपूजेत, भजनात घालवितात. दोनच स्त्रियांनी आपला रिकामा वेळ समाजकार्य करण्यात घालवितो असे सांगितले. बाकी काही स्त्रिया पेंटिंग्ज करणे, फिरायला जाणे, रेडिओ ऐकणे इत्यादी गोष्टीत आपला मोकळा वेळ व्यतीत करतात.

घरकामाच्या चाकोरीबद्ध आयुष्यातून विश्रांती घेणे तिला जरुरीचे वाटते व तशी ती हक्काने घेते. त्या खालोखाल स्त्रियांची पारंपारिक कामे म्हणजे भरतकाम, विणकाम करण्याकडे स्त्रियांचा जास्त ओढा आहे. वाचनात, देवाचे नामस्मरण करण्यातही बऱ्याच स्त्रिया आनंद अनुभवतात. वाचनातही धार्मिक पुस्तकांचे वाचन जास्त प्रमाणात होते. काही स्त्रिया शिलाईकामही करताना दिसतात. ह्यावरून हेच तीव्रतेने जाणवते की, स्त्रीच्या कामाच्या व दैनंदिन जीवनाच्या चाकोरीमध्येही " स्त्री " जातीची पारंपारिक कामेच केली जातात.

समाजसेवा करणाऱ्या दोन स्त्रिया सोडल्या तर बाकी साऱ्या आपण व आपले कुटुंब ह्या एवढ्याच वर्तुळात, आहे त्या स्थितीत, समाधानाने जगण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

ज्या ९७ स्त्रिया आपला रिकामा वेळ काही ना काही वाचनात घालवितात त्यांची पाहणी केली तर असे आढळले की, त्या फार गंभीर असे वाङ्मय वाचत नाहीत, त्यांच्या वाचनापाठीमागे मनोरंजनाचा प्रमुख हेतू दिसून येतो व ज्ञानलालसा अपवादानेच आढळते.

पण स्त्रियांना काही वाचावेसे वाटले, तर त्या काय वाचतात ह्याचा जेव्हा मी आढावा घेतला तेव्हा मला आढळले की, ३९४ साक्षर स्त्रियांपैकी ३५५ स्त्रिया काही ना काही वाचन करतात. त्यात प्रामुख्याने धार्मिक पुस्तके वाचणाऱ्या स्त्रिया जास्त

आढळतात. माहेश्वरी स्त्रिया ह्या सर्वसाधारणपणे धार्मिक प्रवृत्तीच्या आहेत. म्हणून संत तुलसीदासाचे रामायण, महाभारत (डोंगरे महाराजांचे सुखसागर), गीता, सुंदरकांड, शिवलीलामृत, दत्ताची पोथी इत्यादी धार्मिक पुस्तके त्या सतत वाचत असतात. काही धार्मिक पुस्तके वाचण्याचा त्यांना स्त्री म्हणून अधिकार नाही. "गुरुचरित्र" स्त्रियांनी वाचू नये, कारण धर्माने ते वाचण्यास मनाई केलेली आहे. म्हणून ते पुस्तक स्त्रिया वाचत नाहीत. ही सारी पुस्तके अर्थ न समजताही कितीतरी वेळा वाचली जातात. रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांची अर्थ न समजता वर्षातून कितीतरी वेळा पारायणे केली जातात. ह्या साऱ्या पोथ्या-पुराणातील चमत्कारपूर्ण सर्व कथांवर त्या पूर्ण विश्वास ठेवतात व त्यानुसार व्रतवैकल्ये करून सुख मिळविण्याचा प्रयत्न करतात. ज्या स्त्रिया निरक्षर आहेत त्या देखील ही पुस्तके दुसऱ्यांकडून वाचून घेतात, पुराणातील एकादशी व चातुर्मासातील पोथीतील संदर्भ व अर्थहीन कथा भक्तिभावाने ऐकल्या व वाचल्या जातात. त्यामुळे त्यांना काही आत्मिक बळ मिळते असे नाही, उलट त्या जास्त जास्त अंधश्रद्धाळू बनत जातात.

पुरुषांनी लिहिलेल्या ह्या पोथ्यापुराणांतून वर्णन केलेल्या स्त्रीच्या चित्रणाचा फार मोठा प्रभाव माहेश्वरी स्त्रीवर झालेला आढळतो. धर्माने सांगितलेल्या मानवतेच्या संदेशास महत्त्व न देता देवीदेवतांच्या अमानवी शक्तीवर विश्वास ठेवून त्यांची कृपादृष्टी मिळविण्याचा प्रयत्न ह्या स्त्रिया करताना आढळतात. म्हणूनच माहेश्वरी संस्कृतीतील स्त्रियांचे प्रमुख सण - तीज व गौर - साजरे करताना स्त्रियांचे यातील स्थान काय हे स्पष्ट होते. शंकराला प्रसन्न करण्यासाठी पार्वतीने केलेली ही व्रते माहेश्वरी स्त्री मनोभावे करते. त्यामुळे कुमारिकेला चांगला नवरा मिळतो व विवाहितेच्या पतीला संरक्षण मिळते असा समज आहे. महाराष्ट्रीयन संस्कृतीतील हरतालिका व वटसावित्री हे व्रतही त्या तितक्याच मनोभावे करतात. पण कुठल्याही पुरुषाने आपणास 'पार्वती' सारखी बायको मिळावी म्हणून व्रत केलेले दिसत नाही. तसे व्रत त्यास पोथी-पुराणाने करण्याचे सांगितलेले नाही. स्त्री म्हणून स्त्रीलाच असे व्रत करण्याची गरज समाजाला वाटते व स्त्रियांना ह्या व्यतिरिक्त विचार करण्याचे धारिष्ट्यही नसते.

प्रत्येक धार्मिक विधी व सणवार करत असताना परंपरेने घरात जी पूजाअर्चा चालते ती घरातील कर्त्या पुरुषानेच करायची असते. एवढेच कशाला देवी-देवतांच्या समोर नारळ फोडण्याचा अधिकार माहेश्वरी स्त्रीला नाही. घरातील एखाद्या लहान मुलाने जरी नारळ फोडला तरी चालतो, पण घरातील स्त्रीने तो फोडू नये हा अलिखित नियम आहे. म्हणून धार्मिक विधी आचरणात आणताना त्यातील कर्मकांडाचे बाह्य स्वरूप पाळले जाते व त्यातला सारा गाभाच हरवला जातो. सोवळ्या-ओवळ्याच्या अवास्तव कल्पनांना जीवनात थारा देऊन स्त्री ही मोक्षमार्गातील अडसर आहे हे मूळ-

सूत्र पकडलेले दिसते. ती मूलतःच अशुद्ध व अपवित्र आहे हे समाजात घट्ट भिनलेले आढळते. मग महिन्यातील चार दिवस तर ती अत्यंत अशुद्ध समजली जाते. तिला त्यावेळी कुठलेही धार्मिक कार्य करण्याचा अधिकार तर नाहीच पण घरातही तिला अस्पृश्यासारखे वागवून तिचा अपमान करण्यात येतो.

कुठल्याही धार्मिक विधीत माहेश्वरी स्त्री ही पुरुषाची अनुसारिणीच असते. त्याच्या हाताला हात लावून ' मम ' म्हणणे एवढेच तिचे काम आहे, हे तिच्या मनावर वर्षानुवर्षे बिंबले आहे. म्हणूनच त्याचे वैषम्य तिला वाटत नाही. स्त्रीच्या अनुपस्थितीत पुरुष कुठलेही धार्मिक कार्य तिच्या जागी सुपारी ठेवून करतो, पण पुरुषाच्या अनुपस्थितीत स्त्रीला असे करण्याचा अधिकार धर्माने व समाजाने दिला नाही.

माहेश्वरी समाजातील प्रत्येक सणवार साजरा करताना त्यासंबंधी असलेली कथा सांगण्यात येते व ती कथा सांगितल्याशिवाय कुठल्याही धार्मिक विधीची किंवा पूजेची किंवा व्रताची सांगता होत नाही. पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या ह्या अवास्तव कथांचा फार मोठा परिणाम माहेश्वरी स्त्रियांवर झालेला आढळतो. ह्या कथांतूनही स्त्रीची असहाय्य, अबला व परावलंबी अशी प्रतिमाच प्रकट होते. नागपंचमी, तीज, गौर, पौष महिन्यातील रविवार, चातुर्मास इत्यादी व्रतांच्या कथेद्वारे स्त्रीचे दुय्यम दर्जाचे स्थान स्पष्ट होते. प्रामुख्याने स्त्रीचे काम वंशवेल वाढवणे व त्यातल्या त्यात मुलास जन्म देऊन सन्मानित जीवन जगणे हे आहे. मुलगा होण्यासाठी नाना प्रकारची व्रतवैकल्ये करण्याचा सल्ला कथापुराणातून तिलाच दिला जातो व ते ती सामाजिक दबावामुळे करतेही. मुलगा होणे- न होणे ह्यास तिलाच जबाबदार धरण्यात येते.

कित्येक वर्षाची अशा प्रकारची परंपरा समाजात पाळली जाते व आहे ते योग्यच आहे असे स्त्रीला वाटते. हिंदू धर्माने दर्शविलेली व रुढी-परंपरेने बद्ध अशा ह्या वाटेवर माहेश्वरी स्त्री वर्षानुवर्षे विनातक्रार चालत आलेली आहे व नजिकच्या काळात त्यात काही उल्लेखनीय बदल होईल असे आज तरी दिसत नाही.

मराठी वर्तमानपत्र वाचणाऱ्या स्त्रिया २१० आहेत. त्याही अगदी नेमाने वर्तमानपत्र वाचतात असे नाही. त्यातील ठळक बातम्या त्या साधारणपणे रोज वाचतात. पण एखादे वेळी वेळ मिळाला नाही तर त्या पेपरही वाचत नाहीत. धर्मयुग, हिंदी पॉकेट बुक्स, गृहशोभा, मराठी व हिंदी कादंबऱ्या, चित्ररंग, मनोहर, डिटेक्टिव्ह कादंबऱ्या असे वाचायला १९८ स्त्रियांना आवडते. ज्या वेळेला थोडा फार वेळ मिळेल किंवा कधी रात्री किंवा महिन्यातून चार दिवस त्या ही पुस्तके वाचतात. ' स्त्री ' मासिक वाचणाऱ्या फक्त पाच स्त्रिया आहेत व छोट्या मुलांच्या गोष्टींची पुस्तके वाचणाऱ्या चौतीस स्त्रिया आहेत.

वरील आकडेवारीवरून हेच स्पष्टपणे दिसते की धार्मिक पुस्तकांच्या खालोखाल,

स्त्रिया मनोरंजनासाठी म्हणून मासिके, कांदबऱ्या वाचतात. हिंदीतील गृहशोभा, सरिता, मनोरमा सारख्या मासिकांतील खाण्याचे विविध प्रकार तयार करून घरच्या माणसांना खाऊ घालण्यात त्यांना आनंद मिळतो. त्या मासिकातून वाचून निनिराळ्या विविध वस्तूही तयार करतात. स्त्री-मुक्तीसंबंधीचे विचार किंवा स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायासंबंधीचे विचार वाचणाऱ्या स्त्रिया नगण्यच. अगदी बोटावर मोजण्याइतके अपवाद आढळतात. स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व अपवादानेच कुणाला पटलेले आढळते. फार गंभीर व बुद्धीला चालना देणारे वाचन स्त्रिया करताना आढळत नाहीत. फावल्या वेळात वाचन करून आपण पुढे शिकावे किंवा आपले अपूर्ण शिक्षण पूर्ण करावे असे तिला वाटत नाही. मासिके वाचून स्त्रिया भरतकाम-विणकामाचे जे नवनवीन नमुने तयार करतात त्यासाठी घरातील वडीलधाऱ्या मंडळींचे कौतुक त्यांना ऐकायला मिळते व त्यात त्यांना आनंदही मिळतो. म्हणूनच जास्त शिकण्यासंबंधीची उर्मी स्त्रियांमध्ये अभावानेच आढळते.

म्हणूनच 'शिक्षणाचे महत्व तुम्हाला वाटते का?' ह्या प्रश्नाचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केला. शिक्षणाचे महत्त्व वाटते व शिक्षणामुळे स्त्रीची परिस्थिती सुधारली

**तक्ता क्रमांक- १० : माहेश्वरी स्त्रीला शिक्षणाचे महत्त्व**

| एकूण स्त्रिया | | वाटते | वाटत नाही | थोडेफार वाटते | उत्तर नाही |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | २१० | ३५ | २४ | १ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ११९ | २९ | १३ | १ |
| विधवा- | ५६ | ३३ | २२ | — | १ |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | ९ | १ | — | — |
| परित्यक्ता | | २ | — | — | — |
| | ५०० | ३७३ | ८७ | ३७ | ३ |
| टक्केवारी शेकडा | | ७४.६ | १७.४ | ७.४ | ०.६ |

असे मत असणाऱ्या स्त्रिया एकूण स्त्रियांच्या जवळजवळ तीनचतुर्थांश आहेत. शिक्षणाचे महत्त्व वाटत नाही असे मांडणाऱ्या स्त्रिया त्या तुलनेत फार कमी आहेत. पण तरीही प्रत्यक्ष व्यवहारात त्याची अंमलबजावणी होताना कुठे दिसत नाही. मॅट्रिकनंतर शिकण्याची खूप इच्छा असणाऱ्या मुलींना घरातील वडिलधाऱ्या पुरुष मंडळींच्या

परवानगीशिवाय शिकता येत नाही व विविध सामाजिक व आर्थिक कारणांमुळे वडिलधारी मंडळी त्यांना पुढे शिकण्यास मनाई करतात. स्त्रीला मनापासून खूप वाटते की तिने शिकून स्वतःच्या पायावर उभे राहावे. त्यामुळे तिला जीवनात चांगला शिकलेला जोडीदारही मिळू शकतो. पण त्या बाबतीत ती काहीच करू शकत नाही. वडिलधाऱ्या मंडळींच्या फक्त आज्ञा पाळण्यावाचून तिच्यासमोर दुसरा कुठला इलाज नसतो. अशा रीतीने शिक्षणाचे महत्त्व जरी वाटत असले तरी कुठलीच गोष्ट ठरविण्याचे स्वातंत्र्य स्त्रीच्या हातात नसते. म्हणून आपले लक्ष शिक्षणाकडे केंद्रित न करता निरुत्साही बनून कुठल्याही उर्मीशिवाय ती आपला पती, सासरा इत्यादींचा मान ठेवून घरची प्रतिष्ठा जपत असते.

ज्या स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व अजिबात वाटत नाही त्यांना वाटते की शिक्षणाने स्त्रीच्या परिस्थितीत काहीच फरक पडलेला नाही, स्त्रीच्या लग्नात द्यावा लागणारा हुंडा तशाच पद्धतीने अजूनही द्यावा लागतो. तिच्या मागचे चूल-मूल सुटलेले नाही. तिला स्वतंत्रपणे विचार करून जगता येत नाही. मग असे शिक्षण काय कामाचे हा प्रश्न त्या विचारतात. त्यांना वाटते की शिक्षणामुळे स्त्रीच्या जीवनात घरातील दुय्यम दर्जाच्या तिच्या स्थानात काही फरक होत नसेल तर कशाला उगीच कटकट विकत घ्यायची ? प्राप्त परिस्थितीत फार विचार न करता, आरामात, आनंदात, टेन्शनरहित जीवन जगावे असे त्यांना पदोपदी वाटते.

अशा रीतीने कुटुंबाच्या चौकटीत जीवन जगणाऱ्या स्त्रियांना आर्थिक व वैचारिक स्वातंत्र्य अनुभवायला मिळत नाही. स्वतंत्र विचाराने काही करण्याचे तिने ठरविले तर तिला घरचा पाठिंबा मिळेलच अशी खात्री नाही. म्हणून स्वतःसाठी व घरखर्चाकरिता तिला नवऱ्याकडून किंवा कुटुंबप्रमुखाकडून पैसे मागून घ्यावे लागतात. काही वैयक्तिक खर्च त्या पैशातून त्या भागवतात, तर काही वैयक्तिक खर्च त्या माहेरून आलेल्या पैशातून भागवतात. वैयक्तिक खर्चाकरिता त्यांना पैसे दिले जातात किंवा नाही हे पाहिल्यास असे दिसते की, बहुतांशी स्त्रियांना खर्चायला पैसे दिले जातात. पण त्यांना ते पतीकडून अथवा कुटुंबप्रमुखाकडून मागून घ्यावे लागतात. घरातील जी पूर्ण मिळकत असते त्याचे ज्ञान त्यांना असत नाही व त्यावर त्यांचाही हक्क आहे असे समजले जात नाही. " तुला आर्थिक व्यवहारातले काय कळते ? " असा उपरोधिक प्रश्न तिला विचारण्यात येतो. त्यामुळे आपापल्या ऐपतीप्रमाणे मिळालेल्या पैशाव्यतिरिक्त तिच्या वैयक्तिक खर्चासाठी पुष्कळ वेळेला तिला माहेरच्या पैशांवर अवलंबून राहावे लागते. त्यात ३४ स्त्रियांना तर खर्चायला पैसेच मिळत नाहीत. त्यांचा जवळ जवळ सर्व वैयक्तिक खर्च त्यांच्याजवळ निरनिराळ्या सणानिमित्त माहेरून आलेल्या पैशातून चालतो. त्यात सासरच्या मंडळींना व त्यांना स्वतःलाही, कांही वावगे आहे असे वाटत नाही.

तक्ता क्रमांक ११ : माहेश्वरी स्त्रीला वैयक्तिक खर्चाकरिता पैसे दिले

| एकूण स्त्रिया | | जातात | जात नाही | उत्तर नाही |
|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | २४७ | २३ | — |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | १५१ | १० | १ |
| विधवा- | ५६ | ५५ | १ | — |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | १० | — | — |
| परित्यक्ता- | २ | २ | — | — |
| | ५०० | ४६५ | ३४ | १ |
| टक्केवारी शेकडा | | ९३.०० | ६.८ | ०.२ |

कित्येक वेळेला स्त्रियांच्या साबण, तेलाचा खर्चही माहेरची माणसे लग्नानंतर बरीच वर्षे करतात किंवा त्यांच्या माहेरून त्या वस्तू सासरी पाठविल्या जातात. ह्याचाच अर्थ असा की सासरी पैसा असूनही त्यावर त्यांचा अधिकार नसतो. तिचे काम करण्याचे कर्तव्य करण्यात तिने कसूर करू नये हे अपेक्षित असते. पण सासर हे स्वतःचे हक्काचे घर आहे ही भावना कुठे जोपासली जात नाही.

ज्या स्त्रियांना सासरकडून काही पैसे खर्चायला मिळतात त्यातील बऱ्याचशा स्त्रियांना त्याचा हिशोब पतीला किंवा कुटुंबप्रमुखाला द्यावा लागतो. तसे पाहिले तर माहेश्वरी समाजच खूप हिशोबी. त्यामुळे प्रत्येक खर्च विचारपूर्वक व्हावा ही विचारसरणी प्रचलित आहे. त्यातल्या त्यात घरातील स्त्रीच्या खर्चावर पुरुषांचा अंकुश सर्वसाधारणपणे असतो. एवढेच कशाला, स्त्री अर्थार्जन जर करत असली तरीसुद्धा सर्व पैसा तिला घरात तर द्यावा लागतोच, पण आपण खर्च करत असलेल्या पैशांचा हिशोबही तिला घरात द्यावा लागतो. पण हा हिशोबीपणा सुनेबाबत अधिक काटेकोरपणे पाळला जातो. त्यामुळे स्त्रीवर असलेले बंधन हे पुष्कळ वेळेला असह्य होते.घरातील पैशावर तिचा हक्क आहे असे मानले जात नाही.

ज्या २८५ स्त्रियांना पैशाचा हिशोब कुणाला द्यावा लागत नाही त्यांना खर्चायला फार मोजके पैसे मिळतात. किंवा एक ठराविक रक्कम त्यांच्या हातात ठराविक दिवसांनी दिली जाते. मग त्यात त्यांनी आपला खर्च भागवावा ही कुटुंबाची अपेक्षा असते.

ते कुटुंब गरीब असो की श्रीमंत, सर्वसाधारणपणे अशीच पद्धती पाळली जाते. म्हणूनच त्याचा उपयोग तिला आर्थिक स्थैर्य व स्वातंत्र्य मिळविण्यासाठी होत नाही. त्यांच्या नावे बँकेत खाते असून त्यात पैसे जमा आहेत असे सहसा कधीच आढळत नाही. पाचशे स्त्रियांपैकी ३२२ (६४.४०%) स्त्रियांचे बँकेत खातेच नाही. त्यांना कधी काळी अडचणीच्या वेळी पैसे लागले तर स्वतःचे हक्काचे असे पैसे नसतात. जे आहेत ते कुटुंबाच्या- पतीच्या मालकीचे. त्यातून तिला काही पैसे हवे असतील तर ते पतीला अथवा कुटुंबप्रमुखाला मागावे लागतात व त्यांची इच्छा असेल तरच तिला पैसा मिळतो, अन्यथा मिळत नाही.

ज्या १७४ स्त्रियांचे (३४.८%) बँकेत खाते आहे ते देखील नावापुरतेच आहे. कारण त्यांच्या नावावर जी रक्कम जमा असते ती खर्च करण्याची परवानगी त्यांना कधीच नसते. कारण व्यवसायात फक्त नावापुरते भागीदार बनवून त्यांच्याकडून सह्या घेतल्या जातात. बँकेत किती पैसे आहेत व त्याचा खर्च कसा होत आहे त्याची त्यांना माहितीही नसते. बँकेचा, पैशाचा सारा व्यवहार घरातील कर्ती पुरुषमंडळीच पाहतात. माहेश्वरी पुरुष मुख्यत: व्यवसायात गुंतलेले असल्यामुळे स्त्रियांना त्या व्यवहारात ते भागीदार बनवतात, पण भागीदारीचे व्यवहार स्त्रियांना अज्ञात असतात. ते काही जाणण्याचा अधिकार त्यांना नसतो. पुरुषांच्या व्यावसायिक क्षेत्रात क्वचितच कुठल्या स्त्रीला स्थान असते. आर्थिक व्यवहारात पतीच्या व्यवसायात ती त्याची भागीदार जरी असली तरी ती फक्त कागदोपत्रीच असते. त्यासंबंधी काही निर्णय घेण्याचा किंवा काही मत मांडण्याचा तिला अधिकार नसतो. त्या साऱ्या व्यवहारासंबंधी काही माहिती देण्याची गरजच कुटुंबात कुणाला वाटत नाही. कारण अशा व्यवहारातले तिला काही कळत नाही व कळू शकणार नाही अशीच सर्वांची ठाम समजूत असते.

त्यामुळेच माहेश्वरी कुटुंबे आर्थिकदृष्ट्या स्थिर असली तरी स्त्रीला कुठल्याही प्रकारचे आर्थिक स्थैर्य नसते. म्हणूनच ज्या १७४ स्त्रियांचे बँकेत खाते आहे त्यातील फक्त २७ स्त्रिया बँकेचा व्यवहार स्वत: पाहतात. बाकीच्या १४६ स्त्रिया बँकेत कधी जातही नाहीत व तेथला व्यवहारही कधी पाहात नाहीत. तो सारा व्यवहार त्यांचे पती, दीर, सासरे किंवा कर्ता मुलगा पाहतो. म्हणजेच बहुतांशी माहेश्वरी स्त्रियांचा फक्त चेकवर सही करण्यापुरताच बँकेशी संबंध येतो.

विचारवंत व समाजसुधारकांनी असे दाखवून दिले आहे की समाजाची उन्नती ही स्त्री व पुरुष दोघेही "कष्टकरी" होऊन कुटुंबास पोसू लागले तरच होऊ शकेल. महात्मा ज्योतिराव फुल्यांनीही हा सुखाचा मार्ग दाखवून दिला आहे. परंतु माहेश्वरी स्त्रीला हा सुखाचा मार्ग चोखाळता येत नाही. तिच्या साऱ्या शैक्षणिक व आर्थिक निर्णयाचे सूत्रधार घरातील पुरुषमंडळीच असतात. म्हणूनच त्यांच्या अंकुशाखाली,

दबावाखाली जगणाऱ्या माहेश्वरी स्त्रीला कुटुंबातील आपल्या गौण स्थानाशी समझौता करून जगावे लागते, त्यातच सुख मानावे लागते. त्यामुळेच ह्या समाजात समाजसुधारणेच्या मूल्यांचा शिरकाव फार संथ गतीने होतो. गतानुगतिक सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक मूल्यांवरच हा समाज अजूनही स्थिर उभा आहे व म्हणून स्त्रीच्या प्रगतीचे मार्ग रोखले जात आहेत.

●

प्रकरण तिसरे

# विवाह आणि विवाहपद्धती

*स्त्री नाही देवी,*
*स्त्री नाही दासी,*
*स्त्री नाही वस्तू उपभोगाची,*
*स्त्री आहे माणूस,*
*स्त्री आहे माणूस,*
*स्त्री आहे माणूस*

**(" मुलगी झाली हो " - ज्योती म्हापसेकर)**

प्रत्येक समाजातील विवाह ठरविण्याची, तो साजरा करण्याची पद्धती वेगवेगळी असते. तरीही साधारणपणे भारतात हिंदू धर्माप्रमाणे लागल्या जाणाऱ्या लग्नाची पद्धत जवळजवळ एकसारखीच आहे. वैदिक पद्धतीनुसार कन्यादान, लाजाहोम, सप्तपदी इत्यादी धार्मिक विधींसह हिंदू लग्नसोहळा पार पाडला जातो. हिंदू धर्मातील जन्म, लग्न, मृत्यू ह्या तिन्ही घटनांकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा पाश्चात्त्य संस्कृतीपेक्षा अत्यंत वेगळा असल्यामुळे हे संस्कार समारंभपूर्वक पार पाडले जातात व त्याला व्यक्तीच्या जीवनात एक अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते.

हिंदू धर्माचे आपण जर निरीक्षण केले तर आपणास हेच दिसते की, हा धर्म अनेक जाती-पोटजातींनी विभाजित झाला आहे. ह्याच हिंदू धर्माचे पालन करणाऱ्या मारवाडी समाजातही अग्रवाल, खंडेलवाल, ओसवाल, माहेश्वरी, सोनार इत्यादी अनेक पोटजाती आहेत हे आपण पाहिले. त्याचबरोबर ह्या समाजातही चातुर्वर्ण्य व्यवस्था पाळली जाते. मारवाडी समाजात ब्राह्मण, शूद्र ह्या पोटजाती जरी आढळत असल्या

तरी माहेश्वरी समाज हा मुख्यत: वैश्य आहे. हिंदू धर्माप्रमाणेच सर्व जाती-पोटजातींमध्ये बेटी व्यवहार होत नाही. विवाहाच्या बाबतीत जातिव्यवस्था सर्वसाधारणपणे काटेकोरपणे पाळली जाते. आपल्या जातीबाहेर दुसऱ्या जातीत विवाह लावणे सहसा कुणालाही पसंत नसते व संमतही नसते. इतर सर्व भारतीय समाजाप्रमाणेच माहेश्वरी समाजातही सगोत्र विवाह मान्य नव्हते व नाहीत.

संतांची समता व बंधुत्वाची शिकवण संतांच्या पावनभूमीतील मराठवाड्यातील माहेश्वरी समाजही बव्हंशी आत्मसात करू शकलेला नाही. म. ज्योतिबा फुलेंनी ज्या "सार्वजनिक सत्यधर्माचा" प्रसार केला तो बंधुभावाचा संदेश देणारा व नवमानवतावादाचा पुरस्कार करणारा होता. महात्मा ज्योतिबा फुले लिहितात :

**"निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक**
**भांडणे अनेक कशासाठी ।**
**धर्म जातिभेद मानवा नसावे**
**सत्याने वर्तावे ईशासाठी ।**
**ख्रिस्त महंमद मातंग ब्राह्मणासी**
**धरावे पोटासी बंधुपरी ।"**

पण हा मानवतेचा संदेश धर्म, जात ह्यांच्या बंदिस्त कोठडीत स्वत:ला बंदिस्त करून टाकलेल्या समाजास ऐकू येत नाही. म्हणूनच माझी जात व माझा धर्म हाच निकष लग्नाच्या वेळी वधू-वर निवडीसाठी लावला जातो. जातीची काळी पट्टी माहेश्वरी समाजातील प्रत्येक माणसाच्या डोळ्यावर अधिकाधिक घट्टपणे बांधली जात आहे हे विसाव्या शतकातील एक कटू सत्य आहे. म्हणूनच पाचशे माहेश्वरी स्त्रियांतील फक्त दोन स्त्रियांचा आंतरजातीय विवाह झालेला आहे. त्यातील एक स्त्री आहे लग्नापूर्वीची महाराष्ट्रीयन ब्राह्मण व दुसरी आहे ओ.बी.सी. बाकी सर्व विवाह मारवाडी समाजातील इतर पोटजातींमध्ये सुद्धा न होता फक्त माहेश्वरी ह्या पोटजातीतच झालेले आहेत. विवाहाच्या वेळी जातीचा पगडा आजही ह्या समाजावर फार मोठ्या प्रमाणात आहे असे आढळते. आपल्याच जातीतील वधू निवडताना ती एक माणूस आहे व आपणास एका सहधर्मचारिणीची आवश्यकता आहे असा विचार केलेले पुरुष ह्या समाजात क्वचितच आढळतात. वधूची निवड करताना मुलगी दाखवणे व पाहणे ह्या कार्यक्रमाचे आपण जर निरीक्षण केले तर आपणास असेच आढळून येईल की, स्त्रीला एका उपभोग्य वस्तूपेक्षा जास्त किंमत नाही. ती एक निर्जीव बाहुली समजून तिला सजवून-नटवून दाखविण्यासाठी "महफिल"मध्ये आणले जाते. तिच्या सौंदर्यावर, तिच्या शालीनतेवर व तिच्या जन्मपत्रिकेतील ग्रहबळांच्या जोरावर तिची निवड केली जाते. म्हणूनच

लग्न ठरत असताना तिच्या पसंतीचा विचार केला गेला का हे मी जाणण्याचा जेव्हा प्रयत्न केला तेव्हा मला वरील सत्यावर प्रकाश टाकणारी उत्तरे मिळाली. लग्नाच्या

**तक्ता क्रमांक १२ : मुलीची लग्नासंबंधी पसंती**

| एकूण स्त्रिया | | मुलीची पसंती आईवडिलांनी विचारली होती | नवऱ्याने विचारली होती | कुणीच विचारली नाही | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | ६० | १३ | १९६ | १ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ३७ | - | १२५ | — |
| विधवा- | ५६ | - | - | ५६ | - |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | ४ | २ | ४ | - |
| परित्यक्ता- | २ | - | - | २ | - |
| | ५०० | १०१ | १५ | ३८३ | १ |
| टक्केवारी शेकडा | | २०.२ | ३.०० | ७६.६ | ०.२० |

अगोदर फक्त १०१ स्त्रियांना त्यांच्या आईवडिलांनी त्यांची पसंती विचारली होती. अर्थात ही पसंती नवऱ्या मुलाकडून होकार आल्यानंतर जुजबी पद्धतीनेच विचारण्यात आली होती हे मला स्पष्ट करावेसे वाटते. त्या होकार मागण्यामागे मुलीचा नकार अपेक्षित नसे. जर मुलीने यदाकदाचित नकार दिला तर त्यावर फार गंभीरपणे विचार केला गेलेला नाही. मुलीचे आईवडीलच सारासार विचार करून तो मुलगा आपल्या मुलीसाठी कसा योग्य आहे ह्यासंबंधी निर्णय घेतात. त्यामुळे एखाद्या सजविलेल्या बाहुलीच्या होकाराला जेवढी किंमत तेवढीच किंमत त्या मुलीच्या होकाराला असते. त्याचबरोबर फक्त १५ नवऱ्यांनी आपल्या भावी वधूंना स्वत:च्या पसंतीसंबंधी प्रश्न विचारला. म्हणजेच लग्नापूर्वी दोघांनी एकमेकांशी चर्चा करून, एकमेकांना समजून घेऊन, एकमेकांच्या भावभावना, ध्येय, जीवनपद्धती इत्यादी जाणून लग्नाचा निर्णय घेतला जात नाही. तर मुलीने मुलाला पहायचे, मुलाने मुलीला पहायचे. मग मुलाने काही जुजबी प्रश्न विचारून आपली वधू निवडायची. त्यांना एकांतात सोडून एकमेकांना प्रश्न विचारण्याची, एकमेकांशी बोलण्याची संधीच मोठी माणसे देत नाहीत. मुलीचे आईवडील आपल्या सामाजिक प्रतिष्ठेला जपतात. मुलामुलींना एकांतात विचारविनिमय

करण्यास सोडले तर मुलीची कदाचित बदनामी होईल ह्या शंकेनेही ते ग्रस्त असतात. म्हणूनच जीवनात मोकळेपणी श्वास न घेणारी स्त्री मुलाचे देखणेपण, त्याचे शिक्षण, त्याची नोकरी व श्रीमंती ह्यावर आपली पसंती कळविते. तर मुलगाही आपली भावी वधू मुख्यत: तिचे सौंदर्य व तिच्या घरची आर्थिक परिस्थिती, आणि नंतर तिचे खानदान ह्या बाबींवर निवडतो.

ज्या तरुणांनी आपल्या भावी वधूंना पसंतीचा प्रश्न विचारला, त्यांनाही तास-दोन तासापेक्षा जास्त वेळ विचार करण्यास मिळालेला आढळत नाही. बहुतांशी स्त्रियांना तेवढाही वेळ दिलेला दिसत नाही. त्यामुळे काही विशिष्ट भूमिका घेऊन मुलगी आपला होकार कळवते असे क्वचितच आढळते. प्रश्न विचारणाऱ्या तरुणांच्याही मनात मुलीने गांभीर्याने विचार करून नकार कळवावा असे क्वचितच अपेक्षित असते.

"गृहिणी, सचिव, सखी" अशी पत्नीची रूपे सांगणारा आपला हिंदू धर्म ही तत्त्वे फक्त पुस्तकात मार्गदर्शन म्हणून सांगतो. पण प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रीचे स्थान हे किती खालच्या दर्जाचे आहे हे प्रकर्षाने जाणवते. माहेश्वरी समाजातील ५०० स्त्रियांपैकी ३८३ स्त्रियांना लग्नासंबंधी त्यांची पसंती कुणीच विचारली नव्हती. घरातील साऱ्या पुरुष मंडळींनी जसे सांगितले तसे तिने नाचावे, त्यांनी ज्या अपेक्षा ठेवल्या त्या तिने पूर्ण कराव्यात, एवढीच अपेक्षा तिच्याकडून ठेवली जाते. तिला स्वतंत्र व्यक्ती म्हणून किंवा माणूस म्हणून स्वत:च्या जीवनासंबंधी महत्त्वाचा निर्णय घेण्याचा अधिकारच नसतो. तिच्यावर सत्ता चालते ती घरातील वडिलधाऱ्या मंडळींची. त्यातल्या त्यात विशेष सत्ता असते ती वडिलधाऱ्या पुरुष मंडळींच्या हातात.

ज्या स्त्रियांना त्यांची पसंती कुणीच विचारली नाही त्या स्त्रियांची लग्ने ठरत असतानाही नेहमीचीच पारंपारिक पद्धत अवलंबिली जाते. लग्नाची पूर्ण जबाबदारी मुख्यत: आईवडीलच पाहतात. आईवडील नसतील तर मग घरातील मोठी माणसे ही जबाबदारी उचलतात. लग्न ठरवत असताना एखाद्या त्रयस्थ किंवा ओळखीच्या माणसाकडून लग्नायोग्य मुलाचे नाव सुचविले जाते. त्या नावाच्या योग्यतेसंबंधी घरात चर्चा होते. त्याचे सौंदर्य, गोत्र, खानदान, जन्मपत्रिका, फोटो, शिक्षण, त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती इत्यादी संबंधी विचार करून मुलीचा फोटो, मुलीची जन्मपत्रिका, शिक्षण, वय, उंची, रंगरूप इत्यादी गोष्टींसंबंधी मुलाकडे माहिती पाठविली जाते. जर मुलामुलीची जन्मपत्रिका जमली तर मग मुलीला दाखविण्याचा कार्यक्रम होतो. मुलगा व त्याचे इतर नातेवाईक मुलीची वधूपरीक्षा घेतात. ती परीक्षेत उत्तीर्ण झाली तर मुलगी पसंत असल्याचे जाहीर होते. मग देण्याघेण्यासंबंधी दोन्हीकडची मंडळी बैठक बोलावतात. त्या बैठकीत लग्नात किती पैसा द्यायचा, वरमंडळीकडील सर्व नातेवाईकांना काय आहेर द्यायचा, लग्नाचा खर्च कशा पद्धतीने करायचा, इत्यादी सर्व गोष्टींवरून चर्चा

होते. सर्व गोष्टी पसंत पडल्या तर मग मुलगी पसंत असल्याचे जाहीर करून लग्न ठरवले जाते. जर देण्याघेण्याची बोलणी फिसकटली तर मुलीचे लग्न मोडते.

मुलींना दाखवण्याच्या प्रकारामध्ये दोन प्रकार आढळतात. एका प्रकारात इतर नातेवाईकांसोबत नवरा मुलगाही मुलीला पाहायला येतो व दुसऱ्या प्रकारात नवरा मुलगा मुलीला पाहायलाही येत नाही. जे लग्न ठरते ते मुलामुलींचे आईवडील व इतर नातेवाईक मंडळी ह्यांच्या पसंतीनुसार. अशा लग्नपद्धतीत मुलामुलींना काय अक्कल असते, त्यांना ह्यातले काय कळते, हीच विचारसरणी आढळते. त्यांच्या मताला व भावनेला काहीच किंमत नसते. आईवडिलांना जो मुलगा व जी मुलगी योग्य वाटेल त्याच्याशी त्यांचे लग्न लावले जाते. जो मुलगा मुलीला पाहायलाही जात नाही त्याच्याही अपेक्षांना काहीच किंमत नसते. त्यालाही त्यासंबंधी बोलण्याचा काहीच अधिकार नसतो. समाजातील तरुण पिढीवर लग्नाच्या बाबतीत वडिलधाऱ्या मंडळींचे अशा प्रकारे संपूर्ण वर्चस्व असते. साधारणपणे ६०-७० वर्षे वयाच्या स्त्रियांची लग्ने ज्या काळात झाली त्यावेळी हीच पद्धत रूढ होती. सन १९२० ते १९४० च्या दरम्यान मुलीचे लग्न वयाच्या १२ ते १५ वर्षांपर्यंत होई. त्यांना कुठल्याच प्रकारचे स्वातंत्र्य नसे. शिक्षणाविना अज्ञानी असलेल्या त्या मुलींच्या काळी, सामाजिक प्रगतीचे कुठलेच पाऊल उचलले गेले नव्हते. म्हणूनच लहान मुलामुलींचे लग्न म्हणजे वडिलधाऱ्या मंडळींनी त्यांच्यावर लादलेला एक विधी होता. आपण आपल्या मुलाला जन्म दिला आहे तेव्हा त्याच्या वैयक्तिक, खाजगी जीवनासंबंधीचा निर्णय घेण्याचा अधिकारही आपलाच आहे, असा विचार सर्व पालक मंडळींच्या मनात आजही येताना दिसतो. म्हणूनच इंजिनीयर किंवा एफ्.आर्.सी.एस्. झालेला तरुण आपल्या पत्नीची निवड करताना जेव्हा तिला न पाहता, तिच्याशी न बोलता करतो, तेव्हा माहेश्वरी समाजावर, त्याच्या जडणघडणीवर जुन्या रितीरिवाजांचा किती पगडा आहे हे स्पष्टपणे जाणवते. व्यक्ति स्वातंत्र्याच्या कल्पना ह्या समाजात अजून रुजल्या नाहीत. मुलाचे लग्न करून सून घरात आणायची ती सासू-सासऱ्याच्या सेवेसाठी व घराचा वंश वाढविण्यासाठीच ही विचारसरणी सार्वत्रिक आढळते.

हिंदू धर्मातील वैदिक पद्धतीप्रमाणे माहेश्वरी समाजातील लग्नात सप्तपदी, लाजाहोम, कन्यादान इत्यादी विधी पारंपारिक रीतीने पार पाडली जातात. कन्यादानासारखे दुसरे कुठलेच पुण्य नाही ही रूढ कल्पना आजही सर्व समाजात आढळते. मग त्यातल्या त्यात मुलीला "न्हाण" यायच्या अगोदर तिचे दान केले तर आणखीन जास्त पुण्य लागते हा प्राचीन विचार समाजात रूढ होता. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळी या समाजात बालविवाहाचे प्रमाण अधिक होते. ह्या कन्यादानाच्या कल्पनेमागे "स्त्री" ही फक्त एक वस्तूच आहे, तिला आपण हवे तसे, हवे तेव्हा कुणालाही देवू शकतो, मग

त्या "वस्तू"च्या मनाचा व मताचा विचार करणे जरूरीचे नाही, हा विचार आजही समाजात बऱ्याच प्रमाणात आढळतो. तो बदलला आहे असे ह्या पाहणीवरून वाटत नाही.

अग्नीला साक्षी ठेवून जेव्हा "कन्ये"चे दान होते, तेव्हा त्यासाठी वरदक्षिणाही द्यावी लागते. त्याशिवाय ते दान कधीही पूर्ण होऊ शकत नाही. हा विचार फार प्राचीन काळापासून समाजात रूढ झालेला आढळतो. त्यामुळेच वैदिक काळापासून कन्येचे दान करत असताना आपापल्या ऐपतीप्रमाणे कन्येचे मातापिता गायी, घोडे, बैल, सोने, चांदी इत्यादी वस्तू वरदक्षिणा म्हणून देत. त्यावेळी वस्तूंच्या संख्येविषयी जबरदस्ती नसे. पण पुढे हळूहळू ह्याचेच रूप हुंड्याने घेतले. आज हुंडा देणे-घेणे हा कायद्याने जरी गुन्हा असला तरीही सर्रास सगळीकडे हुंडा घेतला व दिला जातो. पूर्वी हुंड्याचे स्वरूपही ऐच्छिक होते. पण आता त्याचे स्वरूप सक्तीचे झालेले आहे. त्यामुळे प्रत्येक मुलीचा जन्म म्हणजेच एक पाप आहे असे प्रत्येक पालकाला वाटू लागले आहे. भारतात हुंडा दिला व घेतला ह्या कारणावरून न्यायालयात कोठेही खटला भरला गेलेला नाही ही गोष्ट भारतीय कायदा व खरा समाज यातील खोल दरी स्पष्ट करते. जेव्हा भारतातील संपूर्ण समाजाची ही स्थिती आहे तर मग माहेश्वरी समाजाची याहून दुसरी काय गत ?

राजस्थानातील "घाटी"सारखी खेडीच्या खेडी मुलीचा जन्म न पाहिलेली आहेत. मुलगी जन्माला आली की तिला दुधात बुडवून किंवा तिच्या नरडीला नख लावून मारून टाकले जात असे. पण महाराष्ट्रातील सामाजिक प्रगतीमुळे अशा प्रकारची क्रूर वागणूक मुलींच्या जन्माच्या वेळी तरी मिळत नाही. पण ज्यांच्या घरी जास्त मुली जन्माला येतात त्या पालकांना मुली म्हणजे एक संकटच वाटते व त्यामुळेच त्यांचे हाल कुत्रा विचारत नाही. मग आता तर गर्भजल परीक्षेमुळे मुलीचा गर्भ तिच्या जन्माअगोदरच पाडून टाकून मुलींची संख्या कमी करण्याचा मार्ग बहुतांशी हाताळला जातो. ह्या सर्व कृतीमागे हुंडा हेच कारण आहे व त्याला कारणीभूत आपली ही विवाहपद्धतीच आहे.

माहेश्वरी समाजातील आणखी एक निंद्य पद्धती म्हणजे घुंघट पद्धती. ज्या स्त्रियांचे लग्न घुंघटमध्ये होत असे त्यांचा पूर्ण चेहरा लग्नाच्या वेळी झाकून घेतला जाई. मध्ययुगीन काळात स्मृतीकार मनुच्या "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति"च्या शिकवणुकीनेच स्त्रीचे जीवन मर्यादित केले. पुरुषांनी लिहिलेल्या प्राचीन नियमामुळे, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पती हाच परमेश्वर ही शिकवण स्त्रीला दिली गेली. म्हणून नवऱ्याची जी इच्छा तीच बायकोची इच्छा हे कटाक्षाने सगळीकडे पाळले जाई. धर्मग्रंथांनी सांगितल्याप्रमाणे पतिव्रता धर्माचे पालन स्त्रीने केलेच पाहिजे हा समाजातील नियम प्रत्येक स्त्रीला लागू होई. आपल्या

चेहऱ्याचे दर्शनही परपुरुषाला होऊ द्यायचे नाही हा पतिव्रता धर्म स्त्रीने पाळलाच पाहिजे हा समाजाचा दंडक होता. मध्ययुगीन काळात सुरू झालेली ही प्रथा माहेश्वरी स्त्रियांच्या बाबतीत बऱ्याच प्रमाणात पुढेही चालू राहिली. इतर पुरुषांनी स्त्रीचा चेहरा पाहणे म्हणजे स्त्री ही शीलभ्रष्ट, धर्मभ्रष्ट झाली असे समजण्यात येई. परपुरुषदर्शन म्हणजे महापाप असे समजले जाई. म्हणूनच माहेश्वरी समाजातील स्त्रिया घुंघट घेऊन आपला चेहरा लपवून टाकत. राजस्थानात मुस्लिम लोक सुंदर स्त्रियांना पळवून नेत. ह्या संकटापासून वाचण्यासाठी मुस्लिमांप्रमाणे घुंघट पद्धती माहेश्वरी समाजातही सुरू झाली. पण ह्या रूढीचे अंधानुकरण आजही समाजात आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रियांच्या लग्नात पूर्ण चेहरा झाकेपर्यंत घुंघट घेतला जाई व जर तो घुंघट थोडा जरी वर गेला तरी सुनेला सासूची बोलणी खावी लागत किंवा सासू तिच्या सुनेच्या हनुवटीला चिमटे घेई. स्त्रीचे शील हे काचेप्रमाणे आहे, ते तिने जपावलाच हवे, तिच्या सौंदर्यावर कुणाची वाईट नजर पडू नये म्हणून ही प्रथा रूढ झाली. त्याचबरोबर घुंघट घेणे म्हणजे मोठ्यांचा आदर राखणे हा विचारही रूढ होऊ लागला. स्त्रीच्या शारीरिक सौंदर्याला अवास्तव महत्त्व दिले गेल्या कारणाने तिची व्यक्ती म्हणून समाजात मान्यता नव्हती व नाही. माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच तिला नव्हता. ह्या सर्व कारणांनी घुंघट सारख्या प्रथा माहेश्वरी समाजात स्वातंत्र्यानंतरही बरीच वर्षे पाळण्यात आल्या.

मुलगी दाखवण्याचा दुसरा प्रकार आहे स्वातंत्र्योत्तर काळातला. ह्या काळातील स्त्रियांचे लग्न ठरत असतानाही वरील पद्धतीनेच लग्न ठरविण्याची प्रक्रिया सुरू होते. फरक एवढाच की दाखवण्या-पाहण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी नवरा मुलगाही मुलगी पसंत करण्यासाठी हजर असतो. नवऱ्या मुलासोबत त्याची मित्रमंडळी व नातेवाईक मंडळीही हजर असतात. चार ते पाच किंवा सात ते आठ माणसांच्या बैठकीत आलेली सर्व मंडळी तिला निरनिराळे प्रश्न विचारतात. तिला खालीलप्रमाणे जुजबी प्रश्न विचारून तिची परीक्षा घेतली जाते. " तुझे नाव काय ? ", " तुला किती बहिणभावंडे आहेत ? ", " तुला स्वयंपाक करता येतो का ? ", " घरात पाहुणे आले तर कुठला झटपट स्वयंपाक करशील ? " इत्यादी इत्यादी. तिच्याकडून वाचून घेतले जाते. सुईदोरा ओवून घेतला जातो. तिने केलेल्या निरनिराळ्या भरतकाम-विणकामाचे नमुने पाहिले जातात. तिच्या सुगृहिणीपणाबद्दल माहिती मिळविली जाते. अशा प्रकारे तिला गृहिणी बनवण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्या सर्व बाबींसंबंधी चौकशी करण्यात येते. पण तिचे व्यक्तिमत्त्व जाणण्यासाठी काही प्रश्न विचारले जात नाहीत.

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे ती खालच्या मानेने देत असते. कारण तिच्या अंगी शालीनता हा गुण असेल तरच ती पसंत होण्याचा संभव अधिक असतो. मुलीने कसे नम्रतेने राहावे, लाजून बसावे, अत्यंत हळुवार आवाजात बोलावे, मोठ्याने हसू नये व बोलू

नये व असे वागून मोठ्यांचा आदर राखावा ही विचारसरणी समाजात पक्की रुजलेली आहे. अशा संस्कारांच्या बंधनात वेढलेल्या मुलीला नवरा मुलगा काही जुजबीच प्रश्न विचारतो. आपल्या भावी जीवनास उपयुक्त ठरतील असे प्रश्न एकांतात बसून विचारण्याची सोय त्याला नसते. तिच्या आशा-आकांक्षा, तिचा स्वभाव ह्या सर्व गोष्टी १०-१५ मिनिटांच्या वधू परीक्षेत जाणणे कठीण असते व तसा प्रयत्नही मुलगा सहसा करत नाही. दोघांनाही विचारांचे आदानप्रदान करण्याची संधी अपवादानेच मिळते. म्हणूनच वधूने वरास प्रश्न विचारण्याची अपेक्षा कधीच कुणी ठेवत नाही. त्यामुळे आपला नवरा कसा असावा ह्यासंबंधी मुलींनेही फार गंभीरपणे विचार केलेला आढळत नाही. तिलाही आपल्या भावी नवऱ्याला काही प्रश्न विचारून त्याच्यासंबंधी सविस्तर जाणून घ्यावेसे वाटत नाही. मुलाला मुलगी पसंत पडली म्हणजे बस्स! मग बाकीचे सारे आपोआप जुळून येईल ही अपेक्षा ठेवली जाते. त्यामुळे मुलीच्या पसंतीचा प्रश्न सहसा कधी उपस्थितच होत नाही. नवरा मुलगासुद्धा ह्यासंबंधी कधी विचारत नाही. म्हणूनच '५०० माहेश्वरी स्त्रियांपैकी फक्त १५ स्त्रियांच्या नवऱ्यांनी त्यांना "मी तुला पसंत आहे का?" हा प्रश्न विचारला. तो प्रश्न ती मुलगी त्यांना पसंत आल्यानंतरच विचारला. अर्थात ह्यावेळी कौटुंबिक व सामाजिक दबावाने धास्तावलेली मुलगी होकारार्थीच उत्तर देते. त्याप्रसंगी एकाही मुलीने मुलाला प्रश्न विचारलेले नाहीत. पुष्कळ वेळेला मुलीच्या होकाराची वाट पाहिली जात नाही. त्याची गरज कुणालाच वाटत नाही. अशा रीतीने लग्न ठरवत असताना ते मोकळ्या वातावरणात ठरविले जात नाही. मुलामुलींना लग्नासंबंधी चर्चा करण्याची संधीही दिली जात नाही. पुष्कळ वेळेला नवरा मुलगा शिकलेला असूनही मुलगी पाहायला जात नाही. त्याचे कारण त्याला ह्या "पाहण्या" प्रकारासंबंधी चीड आहे म्हणून नव्हे तर त्यानी लग्नासंबंधी फार गंभीरपणे विचारच केलेला नसतो. म्हणूनच सर्व जबाबदारी ते मोठ्या माणसावर टाकून मोकळे होतात. जे काही बरेवाईट होईल ते आईवडीलच करतील हा विचार त्या पाठीमागे असतो. आईवडील आपले भलेच करतील हा भरवसा ते मनात बाळगतात. नवरा मुलगा लग्नाआधी मुलीला पाहायला आला होता किंवा नाही हे जाणण्याचा मी प्रयत्न केला तेव्हा मला दिसले की २३० स्त्रियांना लग्नाअगोदर नवरा पाहायला आला होता. अर्थात निम्म्याहून अधिक मुलींना (२६९) नवरा मुलगा लग्नाअगोदर पाहायलाच आला नव्हता. जी मुले मुलीला पाहायला आली होती त्यांनीही मुलीस प्रदर्शनातील एखादी वस्तू समजून पाहिले होते. म्हणूनच सहसा कुणीच त्यांना त्यांची पसंती विचारली नव्हती. अशा वेळी लग्न ठरविले गेले ते दोन्हीकडच्या नातेवाईक मंडळींच्या बोलण्यावरच. मॅट्रिक ते पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत शिक्षण झालेली एकूण मुले

### तक्ता क्रमांक १३ : नवरा मुलगा मुलीला पाह्यला आला

| एकूण स्त्रिया | | होता | आला नव्हता | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील | २७० | १३४ | १३५ | १ |
| विभक्त कुटुंबातील | १६२ | ८७ | ७५ | - |
| विधवा | ५६ | - | ५६ | - |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या | १० | ९ | १ | - |
| परित्यक्ता | २ | - | २ | - |
| | ५०० | २३० | २६९ | १ |
| टक्केवारी शेकडा | | ४६.०० | ५३.८० | ०.२० |

आहेत ३५३. त्यातील १३४ (३७.९६%) मुले आपले लग्न ठरवत असताना मुलीला पाहयला गेले नव्हते. त्यात ५३ मुले ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, डबल ग्रॅज्युएट व डिप्लोमा झालेली आहेत. ग्रॅज्युएट झालेल्या मुलात इंजिनियर, बी.कॉम., सी.ए., बी.ए. एलएल.बी., बी.कॉम. एलएल.बी., एम.एससी., एफ.आर.सी.एस. असेही पदवीधर आहेत. ही आकडेवारी हेच दर्शविते की, शिकलेल्या मुलांच्या बाबतीतही लग्न ही त्यांची वैयक्तिक बाब राहिलेली नाही. आईवडिलांचा निरनिराळ्या कारणासाठी हस्तक्षेप फार मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यावेळी मुलीकडून जास्त मिळणारा हुंडा हेही एक प्रमुख कारण, लग्न ठरविण्यात दिसून येते. त्यातल्या त्यात मुलींचे भावी जीवन हे आईवडीलच ठरवितात. मुलींना स्वतंत्र मत नसते असे गृहीत धरूनच लग्न ठरविले जाते. लग्न म्हणजे डोळे बंद करून खेळलेला एक जुगारच असतो. तुम्ही जिंकलात तर आनंदीआनंद, न जिंकलात तर आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची प्रवृत्ती स्त्रियांमध्ये आढळते. तेथे मुलीने घटस्फोट दिल्याचे किंवा सासरच्या किंवा नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून त्यांना सोडून दिल्याचे दृश्य कोठेच आढळत नाही. ह्या तडजोडी वृत्तीमुळेच तिला सासरी शारीरिक व मानसिक त्रास होत असला, त्या वातावरणात व चुलीच्या धुरात ती गुदमरत जरी असली तरी त्याविरुद्ध काही तक्रार करण्याची सोय तिला नाही. खरे तर तिच्याच मनाची तशी तयारी नाही. तिच्याकडून समाज तशी अपेक्षाही ठेवत नाही. घुंघट पद्धतीत मोठ्यांचा मान ठेवताना, तिचा श्वास जरी कोंडत असला

तरी घरच्या रितीरिवाजाप्रमाणे तिला ती पद्धत पाळावी लागते. जर अशा पद्धतीने ती वागली नाही तर सासरकडची मंडळी तिला घरातून हाकलून देतील ही भीती असते. अशा वेळी तिला माहेरच्या माणसांचा आधारही मिळू शकत नाही. कारण माहेरच्या मंडळींचीही हीच अपेक्षा असते की तिने आपल्या घरी म्हणजे सासरी त्यांना खुश करण्यासाठी ते जसे ठेवतील तसे राहावे. त्याविरुद्ध बंड करून उठू नये, त्यातच तिचे भले आहे. तिचे घर हे आता माहेर नसून सासरच आहे हे तिला सांगण्यात येते. तिने सासरी उभे जायचे व आडवेच बाहेर यायचे हे संस्कार तिच्या मनावर बिंबवण्यात येतात. ह्यामुळेच दोन्ही घराण्यांची प्रतिष्ठा सांभाळली जाते. अन्यथा घराची बदनामी होईल ही शंका त्यांच्या मनात असते. म्हणूनच निम्म्यापेक्षा अधिक स्त्रियांची

**तक्ता क्रमांक १४ : स्त्रीचे लग्न घुंघटमध्ये**

| एकूण स्त्रिया | | झाले | नाही | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील | २७० | १३१ | १३८ | १ |
| विभक्त कुटुंबातील | १६२ | ८३ | ७९ | - |
| विधवा | ५६ | ५६ | — | - |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या | १० | १ | ९ | - |
| परित्यक्ता | २ | १ | १ | - |
| | ५०० | २७२ | २२७ | १ |
| टक्केवारी शेकडा | | ५४.४ | ४५.४ | ०.२ |

लग्ने घुंघट घेऊन झालेली आहेत. त्यातल्या त्यात सर्व ५६ विधवांची लग्ने भल्या मोठ्या घुंघटमध्येच झालेली आहेत. ज्या बाकीच्या स्त्रियांचे लग्न घुंघट न घेता झाले त्यांच्याबाबतीत पुष्कळ वेळेला मला असेही आढळून आले आहे की स्त्रियांचे लग्न घुंघटमध्ये झालेले नाही पण घरी, सासूसासऱ्यांना आवडत नाही म्हणून अर्धा चेहरा झाकेपर्यंत त्यांना घुंघट घ्यावा लागतो. काही ठिकाणी स्त्रीचे लग्न घुंघटमध्ये जरी झालेले असले तरी पुष्कळ वर्षांनंतर समाजसुधारकांच्या शिकवणुकीमुळे स्त्रीला घुंघट सोडून देण्याचे स्वातंत्र्य मिळालेले आहे. अशी कुटुंबे अर्थातच फार मर्यादित प्रमाणात आहेत.

साधारणपणे ज्या स्त्रियांचे वय ५० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असेल, म्हणजेच त्यांचे लग्न स्वातंत्र्यपूर्व काळात झालेले असेल तर त्यांचे लग्न घुंघटपद्धतीनेच झालेले आढळते. लहान वयातच लागलेली लग्ने व हातभर घुंघट घेऊन काम करण्याच्या पद्धतीने तिला अतिशय त्रास सहन करावा लागे. पण त्या बुरख्याआड ओठ घट्ट शिवून आसवे पुसणारी स्त्री काहीच सांगण्याचे नाकारते. जे आहे तसे स्वीकारावे ह्याशिवाय तिला दुसरा पर्यायच नसतो.

त्या छोट्या वयात त्यांचा लग्नाचा वेषही पारंपारिक पद्धतीचाच असे. १० ते १२ मीटर घेराचा घागरा, चोळी व ओढणी व ओढणीचा हातभर घुंघट. १२ ते १४ वर्षे वयाच्या मुलींना तो सारा वेष सांभाळून काम करावे लागे. त्याचबरोबर जे पारंपारिक दागिने तिच्या अंगावर असायचे त्यामुळे तिची अवस्था बेड्यांनी जखडलेल्या जनावरांप्रमाणे होत असे. पायात मोठाले चांदीचे कडे, हातात गोखरू (सोन्याचे मोठे कडे), कमरेला कमरपट्टा, बाजूबंद, डोक्यावर "बोर" (बिंदीचा एक प्रकार), हे दागिने तिला सहसा रोज घालावे लागत. अशा प्रकारचे दागिने व अशा प्रकारचा बोजड वेष आज रोजच्या जीवनातून नाहीसा झालेला आहे. त्याची जागा आता फक्त फॅशन म्हणून लग्नापुरतीच राहिलेली आहे. पण त्या पाठीमागची स्त्रीची सुंदर सजवलेली, नटवलेली बाहुलीची प्रतिमा पुसली गेली नाही. पूर्वीची पत्नी ही "सोळा शृंगार" करून पतीसमोर जात असे. आजही तिने तसाच शृंगार करून पतीचे मन रिझवावे ही कल्पना बदललेली नाही. फक्त शृंगाराच्या वस्तूंमध्ये बदल झालेला आहे. चांदीच्या पायातील जड कड्यांची जागा नाजुक चेनने घेतली आहे तर हातातही नाजुक बारीक सोन्याच्या बांगड्यांनी घेतली आहे. कालमानाप्रमाणे तिच्या पारंपारिक दागिन्यात बदल झाला आहे, पण तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदललेला नाही. तिची शृंगार फुलविण्याची प्रतिमा आजही कायम आहे. तिचे नवऱ्याशी फक्त तेच नाते सर्व समाजाला संमत आहे. ती माणूस नसून मुख्यत: मादी आहे हा समाजाचा दृष्टिकोण आजही सर्वत्र आढळतो.

महाराष्ट्रातील माहेश्वरी स्त्रियांचे सौभाग्यलेणे म्हणजे पायातील चेन, गळ्यातील मंगळसूत्र, नाकात मोरणी व पायात जोडवी. ह्या दागिन्यांना सौभाग्यवती स्त्रीच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. ज्याप्रमाणे सौभाग्यवती स्त्रीच्या कपाळावरील कुंकवाला जेवढे महत्त्वाचे स्थान आहे त्याचप्रमाणे तिच्या जीवनात काळ्या मण्यांच्या मंगळसूत्रालाही तेवढेच महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. काळ्या मण्यांचे मंगळसूत्र हे सौभाग्यलेणे म्हणून मारवाडी संस्कृतीचे प्रतिक नव्हते. पण महाराष्ट्रातील संस्कृतीशी माहेश्वरी स्त्री अशी काही एकरूप झाली आहे की, तिच्याही जीवनात त्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. माहेश्वरी स्त्रीच्या मनात मंगळसूत्राविषयीची आत्मीयता व

तीव्र भावना महाराष्ट्रातील सवाष्ण स्त्री इतकीच आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक प्रगत वातावरणामुळे माहेश्वरी समाजातील घुंघटपद्धती मोठ्या प्रमाणात कमी होत चालली आहे. पूर्ण चेहरा झाकून जाईल असा घुंघट आता जवळजवळ मोठ्या शहरातून नाहीसा झाला आहे. त्याऐवजी अर्धा चेहरा झाकणारा घुंघट किंवा डोक्यावरील पूर्ण केस झाकले जातील असा, डोक्यावरून पदर घेण्याची प्रथा सगळीकडे आढळते. घरातील सर्व मोठ्या माणसांच्या समोर डोक्यावरून पदर घेणे म्हणजे नम्रतेचे प्रतिक समजले जाते. मोठ्यांचा " मान " राखणारी ती प्रथा आहे असे समजले जाते. लग्नानंतर इतर कोणताही पोशाख न वापरता अशाच प्रकारची साडी नेसून तिने घरातील सर्व काम करावे ही कुटुंबियांची व समाजाची अपेक्षा असते. ह्या पाठीमागे स्त्री ही आपल्या मालकीची वस्तू आहे व त्यामुळे तिच्या संदर्भात जे जे काही सुंदर ते ते दुसऱ्यांच्या नजरेपासून लपवून ठेवावे व तिचे रक्षण करावे ही भावना आढळते.

लग्न ठरविताना इतर साऱ्या बारीक सारीक गोष्टींचा विचार केल्यानंतर सर्वात महत्त्वाची बाब ठरते ती हुंड्याबद्दलची. लग्नात दिल्या जाणाऱ्या देण्या-घेण्यासंबंधीची. कन्यादानाला पूर्णत्व देण्यासाठी विविध वस्तू, पैसा वरदक्षिणा म्हणून दिल्या जातात. अशावेळी तीन प्रकार आढळतात. एका प्रकारात लग्नाच्या वेळी ठराविक पैसा, सोने इत्यादी मागून, बोलून ठरविले जाते. ते वधुपक्षाला लग्नातील एक अट म्हणून सक्तीने पाळावे लागते. दुसऱ्या प्रकारात वरपक्षाकडून प्रत्यक्षपणे पैशाची, सोन्याची मागणी केली जात नाही. पण अप्रत्यक्षपणे तिसऱ्याच माणसामार्फत स्वत:च्या अपेक्षा व्यक्त केल्या जातात. तिसऱ्या प्रकारात वधुपिता सामाजिक रितीरिवाज, चालीरीती व आपली सामाजिक प्रतिष्ठा ह्यांना अनुसरून वरपक्षाला पैसे, सोने, आहेर देतो. म्हणूनच मुलीच्या लग्नात या ना त्या स्वरूपात ' देणे ' (हुंडा) हा प्रकार माहेश्वरी समाजात फार मोठ्या प्रमाणात आढळतो.

स्त्रीच्या लग्नात हुंड्याची बोलणी झाली होती की नाही, हे पाहिल्यास निम्म्याहून अधिक स्त्रियांच्या लग्नात लग्नाअगोदर हुंड्यासंबधी बोलणी होऊन हुंडा ठरला होता असे दिसते. अठ्ठावीस स्त्रियांनी ह्या बाबतीत काही सांगण्यास नकार दिला. देण्याघेण्याचे जे व्यवहार त्यांच्या लग्नात झाले ते त्यांना उघड करून सांगावेसे वाटले नाही. बाकीच्या स्त्रियांच्या लग्नात हुंड्यासंबंधी बोलणी करून हुंडा असा ठरला नव्हता, पण देणे-घेणे हे रीतीरिवाजाप्रमाणे मोठ्या प्रमाणात झालेच होते. तीन स्त्रियांच्या आईवडिलांनीच वरपक्षाकडून पैसे घेतले. त्यांनी आपल्या मुलींची लग्ने त्यांच्या लहान वयात केली. ते परिस्थितीने अत्यंत गरीब होते. त्यांच्या मानाने वरपक्षाकडची आर्थिक परिस्थिती बरी होती. नवऱ्या मुलास मुलगी मिळत नव्हती व म्हणून एकाने दोन हजार रुपये घेऊन, तर बाकी दोघांनी पाच हजार रुपये घेऊन आपल्या मुलींची लग्ने

तक्ता क्रमांक १५ : लग्नात हुंडा ठरविला

| एकूण स्त्रिया | | होता | नव्हता | मुलीच्या आई वडिलांनीच घेतला | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | १२७ | १२७ | — | १६ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | १२९ | २३ | १ | ९ |
| विधवा- | ५६ | ७ | ४४ | २ | ३ |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | ८ | २ | — | — |
| परित्यक्ता- | २ | १ | १ | — | — |
| | ५०० | २७२ | १९७ | ३ | २८ |
| टक्केवारी शेकडा | | ५४.४ | ३९.४ | ०.६ | ५.६% |

लावून दिली. ह्या तिन्ही मुलींना त्यांच्या वयाच्या मानाने फार जास्त वय असलेल्या मुलांशी व बिजवराशी लग्न करावे लागले. स्वातंत्र्यपूर्व काळात अशा पद्धतीने राजस्थानात वराकडच्यांना वधुपक्षास पैसे देऊन काही वेळेला लग्न करावे लागत असे. कारण मुलींची संख्या बरीच कमी असे, व म्हणून मुलास मुलगी मिळत नसे. त्याच पद्धतीचा थोडाबहुत परिणाम ही जी तीन लग्ने स्वातंत्र्यपूर्व काळात लातूरमध्ये झाली त्यामध्ये दिसून येतो. नाइलाज म्हणून, व त्यावेळी काही कळतच नव्हते म्हणून मुलींनी अशा मुलांशी लग्ने केली. ज्या मुलीचे लग्न बिजवराशी लागले, त्या मुलीच्या लग्नाच्या वेळी वय होते १५ वर्षे, व तिच्या नवऱ्याचे वय होते ३२ वर्षे. दुसऱ्या दोन मुलींचे लग्नही वयाच्या १४-१५ व्या वर्षी झाले. पण एकीचा नवरा होता ४० वर्षे वयाचा, तर दुसरीचा होता ३५ वर्षे वयाचा. ह्याप्रमाणे शारदा विवाहाची पुनरावृत्ती जरी नसली तरी त्यातलाच हा प्रकार होता. अशी लग्ने मुलींवर जबरदस्तीने, त्यांच्या इच्छेविरुद्ध लादण्यात येत. पण त्याविरुद्ध काहीही बोलण्याचे साहस मुली करत नसत. माहेरी असलेल्या गरिबीमुळे त्या काहीही बोलत नसत. त्यामुळेच त्यांची अशी " किंमत " केली जात असे. गरिबीमुळे लाचार झालेले आईवडील, आपण काही चुकीचे करत आहोत असेही समजत नसत. एकदा का लग्न लागले म्हणजे त्या नवऱ्यांना त्या

मुली परमेश्वर मानून त्यांच्याबरोबर ईमानेइतबारे संसार करीत. त्यांना कितीही त्रास सहन करावा लागला तरी पतिव्रताधर्म प्रामाणिकपणे पाळत.

आज लग्नाच्या बाजारात हुंड्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. हुंडा न घेता होणारे लग्न क्वचितच आढळून येते. मुलाचे पालक आपल्या मुलाच्या शिक्षणाचा खर्च हुंड्याद्वारे वसूल करू इच्छितात. तर काही पालक आपल्या मुलासाठी सर्व सुखसोयी विनासायास पदरात पाडून घेतात. घरात फ्रीज, टी.व्ही., मिक्सर, स्कूटर, सोने, रोख पैसे, वॉशिंग मशीन, कॅमेरा, रेडिओ इत्यादी चैनीच्या वस्तू मुलीच्या बापाकडून मिळविणे म्हणजे मुलाचा हक्कच आहे असे समजले जाते. "त्याशिवाय का एवढा चांगला, शिकलेला, कमावणारा मुलगा मुलीला नवरा म्हणून मिळतो? त्याची किंमत तर त्यांनी मोजलीच पाहिजे" असा विचार सर्वसाधारणपणे केला जातो. लग्नाची गरज मुलालाही तितकीच असते, हे सोयीस्करपणे विसरले जाते. मुलीच्या वडिलांना अकारण चप्पल झिजवायला लावणे ह्यातच मोठेपण मानणारे महाभाग समाजात काही कमी नाहीत. मुलगी दुय्यम दर्जाची व त्यामुळेच तिचे पालकही दुय्यम दर्जाचे ही धारणा सर्व मुलांच्या पालकांत व मुलांमध्येही आढळून येते. म्हणूनच लग्नाच्या वेळी जावयाचे पाय धुणे हा विधी विवाहविधीत समाविष्ट केला गेला आहे. मुलाचा बाप होणे म्हणजे फार मोठे कर्तृत्व गाजवले असे त्यांना वाटते. मुलगा होणे म्हणजे आनंदाचा क्षण व त्याचे लग्न करणे म्हणजे आणखीच जास्त आनंद. घरात सून आणावयाची ती मुलासाठी बायको म्हणून नव्हे तर घरात सर्व काम करायला आणलेली मोलकरीण, एवढीच तिची किंमत बव्हंशी ठरविली जाते. नवरा मुलगाही आईबापाच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी (!) त्यांचे हुंड्याबाबतीत सर्व काही गप्प बसून ऐकून घेतो. बायकोसाठी काही माणुसकीची वागणूक दाखवावी असे त्याच्याही मनात येत नाही. म्हणूनच बाजारभावाप्रमाणे स्वत:ची किंमत ठरवून घेतो व त्यासाठी पालक म्हणतील त्या मुलीशी लग्न करून मोकळा होतो. स्वत:चे काही मत त्याला असेल असे वाटत नाही, अन् जर असलेच तर सोन्याच्या लखलखाटात ते सारे अंधुक होते-नष्ट होते. राहतो तो फक्त स्वत:चा स्वार्थ, स्वत:ची चैन, स्वत:ची सुखलालसा. काही अपवाद वगळले तर सर्वसाधारणपणे हीच मनोवृत्ती हुंडा घेण्यापाठीमागे आढळून येते. म्हणूनच ज्या स्त्रियांच्या लग्नात हुंडा ठरलेला होता त्यामध्ये कुणाला किती हुंडा द्यावा लागला हे पाहिल्यास वरील सर्व विचार प्रकर्षाने जाणवतात. ज्या २७२ स्त्रियांच्या लग्नात हुंडा ठरविला होता, त्यातील ३४ स्त्रियांच्या लग्नात २५ हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंत हुंडा दिला गेला म्हणजे जास्तीत जास्त १८६ स्त्रियांच्या लग्नात एक ते पंधरा हजार रुपयांपर्यंत हुंडा दिला गेला तर ४२ जणींच्या लग्नात १५ ते २५ हजार रुपयांपर्यंत हुंडा दिला होता. हे झाले लग्नात बोली करून ठरविलेल्या हुंड्यासंबंधी. पण त्या व्यतिरिक्तही

तक्ता क्रमांक १६ : वधुपक्षाने किती हुंडा दिला (आकडे हजारामध्ये आहेत)

| एकूण | | १-१० | १०-१५ | १५-२५ | २५-४० | ४०-१ लाख | माहित नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | १२७ | ३८ | ४४ | १७ | ९ | ९ | १० |
| विभक्त कुटुंबातील- | १२९ | ७४ | १९ | २० | ८ | ८ | — |
| विधवा- | ७ | ६ | १ | — | — | — | — |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | ८ | ४ | — | ४ | — | — | — |
| परित्यक्ता- | १ | — | — | १ | — | — | — |
| | २७२ | १२२ | ६४ | ४२ | १७ | १७ | १० |
| टक्केवारी शेकडा | | ४४.८५ | २३.५३ | १५.४४ | ६.२५ | ६.२५ | ३.६८ |

वधुपक्षास बराच खर्च करावा लागतो. मुलगा जितका जास्त शिकलेला तितकीच शिकलेली त्याला मुलगी हवी व हुंडाही जास्त हवा. डॉक्टर झालेल्या मुलाला डॉक्टरच मुलगी हवी असते व म्हणून लग्नात स्पर्धा वाढते. डॉक्टर होऊन मुलगी स्वतःच्या पायावर जरी उभी राहिली तरी देखील तिच्या पालकांना हुंडा मोजावा लागतो. ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. काही मुलींना त्याबद्दल वाईट हे नक्कीच वाटते. पण त्यांचाही काही इलाज चालत नाही. दुसरा काही मार्ग काढून दुसऱ्या रीतीने त्या विचारही करू शकत नाहीत. डॉक्टर झालेली मुलगी डॉक्टर सोडून दुसऱ्या कुणाशी लग्न करण्याचा विचारही करू शकत नाही, मग दुसऱ्याशी लग्न करणे दूरच राहिले. म्हणूनच आपल्या मुलींना डॉक्टर, इंजिनीयर मुलगा हवा असा पालकांचा व मुलींचाही जेव्हा अग्रहास दिसतो तेव्हा हुंड्याचे हे दुष्टचक्र वेगाने फिरतच राहते. ते थांबविण्याचा काही मार्ग शोधला जात नाही- तसा कुणी प्रामाणिक प्रयत्नही करत नाही.

माहेश्वरी समाजात मुलीच्या लग्नात देण्याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर आहे. हे देणे वधुपक्षाकडून एकतर्फीच असते. लग्नाचा हुंडा हा वेगळाच धरला जातो. पण त्या अगोदर लग्न ठरल्यापासून ते लग्न होईपर्यंत मुलींच्या पालकांना महत्त्वाच्या सणवारांना बराच खर्च करावा लागतो. लग्न ठरल्यानंतर माहेश्वरी समाजातील लग्नापूर्वीचा काळ हा कमीत कमी एक वर्षभराचा तरी असतो. म्हणून मग श्रावण महिन्यातील तीज

(तृतीया), दिवाळी, संक्रांत, होळी, गौर इत्यादी प्रमुख सणांच्या वेळी वरपक्षाकडे मिठाई, त्या त्या मोसमातील फळांच्या करंड्या, वराचे कपडे, सासूला कपडे, चांदीची काही भांडी, इतर दीर, नणंदा व जावा ह्यांना रोख पैसे इत्यादी पाठवावे ही प्रथा आहे. मग होळीच्या सणाला निरनिराळ्या थंड पेयांच्या बाटल्या व रंग खेळण्यासाठी चांदीची पिचकारी इत्यादी वस्तू पाठवल्या जातात. दिवाळी हा तर माहेश्वरी समाजातील सर्वात मोठा सण. मग त्यावेळी कपडे, फराळापासून फटाक्यापर्यंत सर्व काही पाठविले जाते. त्या प्रत्येक सणाचा कमीत कमी खर्च दोन हजार रुपये ते जास्तीत जास्त दहा हजार रुपयांपर्यंत जातो. समाजातील ह्या रुढी, हे रितीरिवाज मुलीचा गरीब बापही पाळतच असतो. कारण त्याला समाजातील प्रतिष्ठा टिकवायची असते. ह्या प्रतिष्ठेपायी तो कर्जबाजारी होतो. तरीही मुलीला देण्या-घेण्यावरून सासरी बोलणी खावी लागू नयेत ही त्याची प्रामाणिक इच्छा असते. स्वतःची प्रतिष्ठा तर राखावीच, शिवाय वरपक्षाकडची हौसमौज भागवावी, जेणेकरून आपली मुलगी सुखात राहील ही भावना त्या पाठीमागे असते. हा सर्व खर्च हुंड्याच्या बोलीत समाविष्ट नसतो. ज्यांनी हुंडा ठरविलेला नसतो, तेही हा खर्च सर्वसाधारणपणे करतातच. वरपक्षाकडील मंडळींना फक्त आपल्या सुनेसाठी काही उपहार म्हणजे एखादी साडी, मिठाई पाठवावी लागते. इतरांसाठी ते कधी पाठवत नाहीत कारण तशी प्रथा समाजात प्रचलित नाही.

ज्या स्त्रियांच्या लग्नात हुंडा ठरलेला असतो त्यांना तेवढ्या रकमेचे दागिने, इतर संसारोपयोगी वस्तू, चांदीची भांडी, रोख पैसे, वरपक्षाकडील मंडळींचे कपडे, इतर चैनीच्या वस्तू म्हणजे टी.व्ही., फ्रीज इत्यादी सर्व वरपक्षाच्या सूचनेनुसार दिल्या जातात. ह्या सर्व गोष्टींचा समावेश हुंड्यात होतो. पण लग्नाला येणारा बाकीचा खर्च वधुपक्षालाच करावा लागतो. वरातीच्या येण्या-जाण्याचा खर्च, लग्नाचा खर्च, जेवणाचा खर्च, वरातीत येणाऱ्या प्रत्येक माणसास उपाहार हा सर्व खर्च वधुपक्षास जास्तीचा म्हणून करावा लागतो. लग्नही थाटामाटात व्हावयास हवे. वरातीचा मान-मरातब व्यवस्थित व्हावयास हवा. लग्नाच्या जेवणात पाच मिठाया असायलाच हव्यात. वरातीला देण्यात येणाऱ्या उपहारात चांदीचे १० ग्रॅमचे नाणे किंवा चांदीचा पानसुपारीचा डबा किंवा स्टीलचे टिफीन इत्यादींपैकी एका वस्तूचा समावेश असायलाच हवा, अशा प्रकारची अपेक्षा वरपक्षाकडील मंडळींची असते. मुलीच्या लग्नात तिला येणारा आहेर, उपहार ह्यावरही वरपक्षाची मंडळी आपला अधिकार सांगतात. त्यावर मालकी सासरच्या माणसांचीच असते. वधुपक्षाचीही, मुलीच्या मालकीचे आपण काहीच ठेवून घ्यायचे नाही ही प्रवृत्ती सर्वसाधारणपणे आढळते. मुलीचे काहीही आपण ठेवून घेतले तर पाप लागते ही भावना आजही समाजात रुढ आहे. म्हणूनच माहेश्वरी समाजातील जुन्या पिढीचे लोक मुलीच्या सासरी जेवायचे तर दूरच, पण पाणीसुद्धा पित नसत.

आता ती पद्धत जरी रूढ नसली तरी जे जे म्हणून तिचे आहे ते ते तिला देऊन टाकायचे- वरपक्षाकडे पोहोचवून द्यायचे ही भावना सर्वत्र आढळते. पण त्यावर मुलीचा शेवटी काहीही हक्क नसतो. माहेश्वरी समाजात कुठल्याही समारंभाच्या वेळी वधुपक्षाकडील मंडळी वरपक्षाकडील मंडळींना आहेर करतात. पण वरपक्षाकडील मंडळी वधुपक्षाकडील मंडळींना कधीच आहेर करत नाहीत. त्याला सामाजिक मान्यता नाही. फक्त मुलीच्या लहान बहीण-भावंडांना काही उपहार बहीण देऊ शकते. म्हणूनच जे काही घ्यायचे ते मुलाच्याकडच्या मंडळींनीच. ह्यामुळे मुलीचे लग्न म्हणजे एक संकट अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण झालेली आढळते.

लग्नात हुंड्याची बोली न करताही सर्वसाधारणपणे लग्नात वधुपक्ष आपापल्या ऐपतीप्रमाणे व सामाजिक चालीरीतीप्रमाणे खूप खर्च करतो. हा खर्च पाच हजार रुपयांपासून एक लाख रुपयांपर्यंत सुद्धा असतो. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्यांची लग्ने झाली व ज्या स्त्रिया आज ६० वर्षे वयाच्या आहेत, त्यांच्या लग्नाच्या वेळी वरदक्षिणा म्हणून सोने, चांदी, गाई, कपडे वगैरे दिले जात असे. आपापल्या ऐपतीप्रमाणे ५० तोळे सोने व १०० तोळे चांदी यांपासून १०० तोळे सोने व २०० तोळे चांदी यापर्यंत वरदक्षिणा दिली जाई. ज्या ५६ विधवा आहेत त्यापैकी फक्त सात स्त्रियांच्या लग्नात हुंडा ठरला होता. पण बाकीच्या सर्व स्त्रियांच्या लग्नात वरीलप्रमाणे सोने, चांदी, गाई, कपडे इत्यादी मुलीला, मुलाला व वरपक्षाकडील नातेवाईकांना दिले जाई. त्यातल्या त्यात मुलाच्या आईचा, आजीचा, मोठ्या काकूचा, बहिणीचा मान फार मोठा असे. त्यांना प्रत्येक सणालाही उपहार दिला जाई. ह्यामुळे प्रत्येक मुलीच्या लग्नाचा खर्च एखाद्या श्रीमंत बापाला पेलवणारा होता व आहे. एखादा गरीब बाप हे सर्व सामाजिक रीतीरिवाज पाळू शकला नाही तर मुलीला बराच त्रास सोसावा लागतो. लग्नात छोट्या-मोठ्या वस्तू मिळाल्या नाहीत म्हणून घरात थोडीफार धुसफूस चालूच असते. माहेरच्या मंडळींचा उद्धार ह्या देण्यावरून बऱ्याच वेळेला होतो. पण त्याकडे दुर्लक्ष करून, गप्प बसून, खालच्या मानेने सर्व ऐकून घेऊन, घरातील सून सर्व काही सहन करत असते. आणि मग काही काळ जातो व हे सर्व तिच्या आपोआप अंगवळणी पडते.

लग्नाच्या अगोदर ज्याप्रमाणे सणवार पाठविले जातात त्याप्रमाणे लग्नानंतर पहिल्या वर्षीही तशाच पद्धतीने ते सणवार साजरे केले जातात. तीज सारखे सण तर लग्नानंतर नेहमीच ह्या पद्धतीने साजरे केले जातात. मुलीच्या पालकांना त्या सणानिमित्त तसाच खर्च करावा लागतो. जर योग्य तो मानमरातब झाला नाही तर सासरची मंडळी रुसण्याची-नाराज होण्याची भीती स्त्रीला सतत वाटत असते. त्यातल्या त्यात सासूच्या नाराजीची भीती तिला जास्त सतावत असते. एखादे वेळेस थोडीशी हलकी साडी सासूला दिली

गेली तर काही अपवाद वगळता त्यासाठी घरात आकांडतांडव झाले म्हणूनच समजावे. सुनेच्या माहेरून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीविषयी त्यांच्या अपेक्षा ठरलेल्या असतात. व त्या पूर्ण करणे सुनेच्या आईवडिलांना यथाशक्य करावेच लागते. अनेकदा मग ते पोटाला चिमटा घेऊनही हे सारे पार पाडतात.

माहेश्वरी समाजात दिवसेंदिवस लग्नाचे सर्व कार्यक्रम हे फार दिखाऊ पद्धतीने पाळले जात आहेत. लग्न ठरल्यानंतर सासरकडची मंडळी मुलीच्या माहेरी जाऊन तेथे त्या मुलीला 'साडी नेसवण्या'चा कार्यक्रम होतो. त्यावेळी २५-३० माणसे हल्ली जाऊ लागलेली आहेत. त्या सर्वांना मुलीच्या पालकांना परत आहेर करावा लागतो. ह्या आहेराचा खर्चही कमीत कमी दोन हजार रुपये व जास्तीत जास्त पाच हजार रुपयांपर्यंत येतो. मुलाच्या अगदी जवळच्या नातेवाईकांना जास्त किंमतीचा आहेर तर थोड्या लांबच्या नातेवाईकांना त्यापेक्षा थोड्या कमी किंमतीचा आहेर द्यायचा अशी पद्धत आहे. तो समारंभ साजरा होत असताना गावातील प्रतिष्ठित मंडळींनाही बोलावले जाते. मुलीच्या सासरकडच्या मंडळींनी तिच्यासाठी पाठविलेल्या वस्तू सर्वांना पहाण्यासाठी मांडून ठेवल्या जातात. त्यात मुलीला साडी, मेकपचे सामान, दागिने, बांगड्या, रुमाल, चप्पल इत्यादी वस्तूंचा समावेश असतो. त्या समारंभाचाही खर्च मुलीच्या पालकांना साधारणपणे कमीत कमी दोन ते तीन हजार रुपयेपर्यंत येतो. प्रत्येक समारंभाला ज्या स्त्रियांना बोलावले जाते, ज्या स्त्रिया तेथे उपस्थित होतात व प्रसंगानुरूप गाणी (लोकगीते- देवाची गाणी) गातात, त्या सर्वांनाही काही ना काही उपहार दिला जातो. मग तो उपहार एका नारळापासून एखाद्या स्टीलच्या भांड्यापर्यंत असतो. आपापल्या ऐपतीप्रमाणे लहान वाटीपासून पातेल्यापर्यंत स्टीलचे भांडे दिले जाते.

तशीच पद्धत जेव्हा साखरपुडा होतो तेव्हाही आढळते. 'टिळा' (तिलक) मुलाच्या घरी मुलीकडच्यांकडून पाठविला जातो. ह्यात रुखवताप्रमाणे मुलाचे कपडे, त्याच्या नातेवाईकांचे म्हणजे आई, बहीण, भावजय ह्यांचे कपडे, सोन्याची चेन, आंगठी, चांदीच्या वस्तू, टेपरेकॉर्डर, रेडिओ, निरनिराळ्या शोभेच्या वस्तू, पैशाच्या नोटांचे केलेले 'बंगले', इतर कलाकृती, मुलीने तयार केलेल्या निरनिराळ्या हस्तकौशल्याच्या वस्तू, इत्यादी पाठविले जाते. ह्या सर्व वस्तूही मांडवात मांडून ठेवल्या जातात व सर्वांना दाखविल्या जातात. जितका 'तिलक' जास्त पैशांचा तितकी त्या मुलाची जास्त किंमत, असे समजले जाते. संपूर्ण माहेश्वरी समाज ह्या बाह्य दिखाऊ वृत्तीमुळे पोखरला गेला आहे. सामाजिक प्रतिष्ठेचे हे दडपण होणाऱ्या प्रत्येक लग्नात वाढतच चालले आहे. श्रीमंतीचे हे प्रदर्शन गरीब बापाला कर्जात पूर्णपणे ढकलून देत आहे किंवा आपल्या साऱ्या आयुष्याची कमाई आईवडिलांना एका मुलीच्या लग्नात उधळून

टाकावी लागत आहे. पण त्याचे दुःख कोणालाच वाटत नाही. समाजात तीच प्रथा आहे हे गृहीत धरून असे समारंभ साजरे केले जातात. दोन-चार अपवाद सोडले तर हा श्रीमंतीचा देखावा समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचला आहे.

माहेश्वरी समाजाच्या लग्नातील कुठलाही कार्यक्रम गाण्याशिवाय कधीच पूर्ण होत नाही. लग्नाच्या अगोदर गणपतीस्थापनेचा (विनायकस्थापना) एक मोठा समारंभ लग्नात होतो. ह्यावेळी गावातील आपल्या ओळखीच्या सर्व महिलांना बोलाविले जाते. मुलीकडे मुलीला व मुलाकडे मुलाला हळद लावली जाते. तास-दोन तास गाणी गायली जातात. ती गाणी संपल्यानंतर आपापल्या ऐपतीप्रमाणे सर्व स्त्रियांना उपहार दिला जातो. त्या गाण्यात अगोदर देवी-देवतांची गीते होतात व मग लग्नाच्या वेळची काही शृंगारिक, काही विनोदी, काही उपरोधिक गाणी गायली जातात. देवी-देवतांच्या गीतात गणपती, मारुतीपासून निरनिराळ्या देवी-देवतांची आठवण व त्यांना नमन होते. त्याचबरोबर 'सती 'मातेची महती गाणारे गीत गायले जाते. सतीची चाल बंद होऊन आज बरीच वर्षे झाली पण त्या सतीमातेचे व 'सती 'धर्माचे महत्त्व आजही ह्या समाजातून जात नाही. प्रत्येक कुटुंबाच्या पूर्वेतिहासात एकतरी 'सती 'माता होऊन गेलेली असते. तिचे स्मरण अशावेळी आदराने केले जाते. महाराष्ट्रातील सामाजिक बदलामुळे 'सती 'धर्म पाळण्याचे स्वप्न (?) कुठलीही स्त्री पाहात नाही, पण तिचे माहात्म्य मात्र आजही तिच्या मनावर पूर्णपणे बिंबलेले आहे. आज येथे कुठली 'रूपकंवर' पैदा होताना दिसत नाही. पण सती मातेला वंदन करताना सर्वजणी दिसतात. तिला वंदन न करता कुठलाच समारंभ पार पाडला जात नाही. घरात मुलगा जन्माला आला तर गाणी गायली जातात. त्यातही ह्या गाण्यांचा समावेश असतो. अशा प्रकारे कुठलाही छोटा-मोठा समारंभ विधिपूर्वक करायचा असेल तर ही गाणी गायली जातात व समारंभाला आलेल्या सर्व महिलांना आपापल्या ऐपतीप्रमाणे उपहार दिला जातो. अशा रीतीने स्त्रीच्या मनाची पारंपारिक जडणघडण आजही तशीच आहे असे मला आढळून आले.

लग्नानंतरही देण्याघेण्याच्या अत्यंत निंद्य प्रथा ह्या समाजात चालू आहेत. लग्न होऊन जेव्हा सून घरात येते, त्यावेळी ती सर्वांना नमस्कार करते. नमस्कार केल्यानंतर तिला लग्नानंतर एकदाच वडिलधारी मंडळी काही ना काही उपहार देतात. पण तिने सुद्धा नमस्कार करताना 'रिकाम्या' हाताने नमस्कार करायचा नसतो, तर सासरकडील प्रत्येक वडिलधाऱ्या नातेवाईक स्त्रीला काही रुपये देऊन तिने नमस्कार करायचा असतो. म्हणजे लग्नानंतर प्रथमच जेव्हा ती स्वतःच्या सासूच्या पाया पडते तेव्हा तिने चांदीची एक वाटी सासूला देऊनच नमस्कार करायचा. मग चाकी चुलत सास्वा, नणंदा, मोठ्या जाऊबाई ह्यांना आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार १०१ रुपये किंवा ५१ रुपये इत्यादी देऊन नमस्कार करायचा. ते सारे रुपये तिने माहेरूनच आणायचे असतात. त्याच

बरोबर लग्नानंतर डोहाळजेवण असो, मुलगा किंवा मुलगी झाल्यानंतर प्रथम जेव्हा ती सासूच्या पाया पडते ती वेळ असो, केव्हाही तिने सासूला पैसे देऊनच पाया पडायचे असते. लग्नानंतर घरात कुठलाही व केव्हाही समारंभ असला म्हणजे कुठली पूजा असली किंवा सत्यनारायण असला आणि त्यावेळीही पूजेला सून बसली असेल तर त्यानंतर सर्वांना नमस्कार करताना पैसे देणे जरुरीचेच असते. एवढेच नव्हे तर ती जर एखाद्या लांब सुट्टीसाठी म्हणजे महिनाभरासाठी माहेरी राहायला गेली असेल तर परत आल्यावर माहेरून सासूला साडी आणेल किंवा पैसे देऊन त्यांच्या पाया पडेल. ही घृणास्पद प्रथा एखाददुसरा अपवाद सोडला तर सर्व माहेश्वरी समाजात आढळून येते. ह्या प्रथा पाळत असताना हल्ली नवीन लग्न झालेल्या स्त्रीच्या मनाला असंख्य यातना होतात, पण सामाजिक व कौटुंबिक दबावामुळे तिला त्या पाळाव्याच लागतात. त्यामुळेच मुलीच्या लग्नाच्या आधीपासून ते लग्नानंतर ती मरेपर्यंत मुलीच्या माहेरकडच्या मंडळींना सतत खर्च करावा लागतो. ह्या खर्चात थोडी फार जरी कसर राहिली तरी मुलीला अतोनात मानसिक त्रास सहन करावा लागतो. क्षणोक्षणी माहेरचा उद्धार होतो, पण तिला हे गप्प बसून ऐकावे लागते. तिला तशी सवयच लागलेली असते. ह्या विरोधात उभे राहण्याचा विचारही तिला सुचत नाही व तिला तसे साहसही नसते.

इतकेच कशाला, मुलीच्या सासरी कुणाचा मृत्यू झाला असेल तर त्याच्या तेराव्या दिवशी मुलीच्या माहेरच्या मंडळींना बराच खर्च करावा लागतो. मुलीला साडी व इतरांना रुपये असे द्यावे लागते. हा सर्व आहेर करण्यामागचा हेतू हा की त्या घरातील शोक त्यांनी पुरे करावा व नवे कपडे घालून नव्या जीवनाला सुरुवात करावी. पण त्या देण्याचे एवढे अवडंबर माजले आहे की, ती साडी किती रुपयांची दिली, आहेर कसा काय केला ह्याचीच चर्चा जास्त झालेली आढळते. एवढेच कशाला कुणाच्या घरी एखाद्या वृद्ध माणसाचा मृत्यू झाला तर त्यालाही एक सोहळ्याचे स्वरूप येते. त्या घरातील ज्या लग्न झालेल्या मुली असतात त्यांना त्या वेळीही साड्यांचा आहेर दिला जातो. एखादी स्त्री जर मृत्यू पावली तर तिला स्मशानात नेत असताना तिच्या अंगावर तिच्या माहेरच्या माणसांकडूनच साडी नेसवली जाते. देण्याचा हा अतिरेक घृणास्पद आहे.

आपल्या मुलीच्या अपत्याचे लग्न असेल तर तिच्या माहेरच्या नातेवाईकांना खूप खर्च करावा लागतो. त्यास 'माहेरा' असे म्हणतात. स्वतःची मुलगी, जावई, नवीन वर-वधू ह्या सर्वांना आहेर करायचा असतोच, पण त्याचबरोबर लग्नाला हजर असलेल्या मुलीच्या सासरच्या सर्व नातेवाईकांना ऐपतीप्रमाणे वस्तू किंवा पैशांचे वाटप करायची पद्धत ह्या समाजात आहे. त्यास 'बटवडा' असे म्हणतात. त्याचा खर्च पाच हजारापासून तीस-चाळीस हजार रुपयांपर्यंत येतो.

---

पूर्वीचे सणवार व इतर रीतीरिवाजांबरोबर आता प्रत्येकाचे वाढदिवस, प्रत्येकाचे लग्नाचे वाढदिवस व त्यांच्या मुलांचे वाढदिवस ह्या साऱ्यांची भर पडत चाललेली आहे. मुलीच्या माहेरच्या मंडळींना वेळोवेळी ह्यासाठी खर्च करावा लागतो, मग त्यांची ऐपत असो किंवा नसो. ह्या देण्यापायी बऱ्याच वेळेला रुसवे-फुगवे होत असतात. प्रत्येक वेळी मुलाच्या सासरकडून मनासारखे सर्व काही येईलच असे नाही व जरी आले तरी अपेक्षाचा हा राक्षस कधीच शांत होत नाही.

ह्या देण्याचा, ह्या दिखाऊ पद्धतींचा व श्रीमंती बडेजावाचा परिणाम त्या सुनेवर होतो. तिला सासर-माहेर ह्या दोघांच्या कात्रीत सापडून अतिशय बिकट अवस्थेत राहावे लागते. तिची मानसिक स्थिती ही सारखी एका प्रचंड दबावाखाली वावरणाऱ्या मनुष्याची असते. कुठे काही चुकले की उगाच वाद होईल-माहेरच्यांचा अपमान होईल ही तिला भीती असते. त्याचबरोबर सासरची मंडळी कुठे नाराज होतील हा विचारही तिला सारखा सतावत असतो. तेव्हा सर्व काही रीतसर व्हावे ह्यासाठी ती झटत असते; धास्तावलेल्या मनाने प्रयत्न करत राहून आपल्या संसाराचा रथ विनातक्रार ओढीत राहाते. तिच्यावर जास्त बोजा पडला तरी तिची तक्रार नसते. स्त्रीने जास्त जबाबदारी उचलायलाच हवी, हे ती जाणते. तिला कितीही सोसावे लागले तरी दोन घरांतला दुवा जोडून ठेवण्यासाठी ती धडपडत असते. त्या धडपडीत शेवटी ती एका, कधी सजीव तर कधी निर्जीव वस्तूसारखी वागविली जाते. तिला चिकटलेले वस्तुपण ती काढून फेकून द्यायला तडफडते आहे. पण अजून तरी ती त्यात यशस्वी झालेली नाही. ती शिल्लक रहाते, ती मूकपणे आक्रोशणारी एक वस्तू म्हणूनच.

म्हणूनच पाचशे माहेश्वरी महिलांच्या कुटुंबातील मुलामुलींची लग्ने लागली तेव्हा त्यांनी हुंडा घेतला व दिला, हे दृश्य सर्वसाधारणपणे आढळते. हुंडा न घेता लग्न करणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी असून दिवसेंदिवस मुलींच्या लग्नात 'देण्याचे' प्रमाण वाढतच आहे.

एकूण २९९ मुलींची लग्ने झाली त्यात फक्त ५४ मुलींच्या लग्नात हुंडा ठरवून दिला नव्हता, पण बाकी सारा खर्च त्यांनी ऐपतीप्रमाणे केलेलाच आहे. एकूण लग्न झालेल्या मुलींपैकी २४५ मुलींच्या (८१.९४ टक्के) लग्नात हुंडा ठरवून दिलेला आहे. त्याचे प्रमाण पाच हजारांपासून एक लाखापर्यंत आहे. ह्या हुंड्याच्या व्यतिरिक्त लग्नाचा खर्च, सासरच्या मंडळींना दिला जाणारा आहेराचा खर्च, हे सारे वाढतच चालले आहे. हे दृश्य पाहिले की, हुंड्याचा सैतान संपूर्ण समाजाचा नाश करूनच थांबणार आहे का हा प्रश्न माझ्या मनाला पडतो. कारण देण्याघेण्याच्या ज्या पद्धती ह्या समाजात प्रचलित आहेत त्यानुसार एखादा गरीब बाप कर्जाच्या डोंगराखाली दबून गेलेला दिसतो

तक्ता क्रमांक १७ : मुलींच्या लग्नात दिलेला हुंडा (आकडे हजारात)

| एकूण मुली | | सांगण्यास नकार | हुंडा दिला नाही | १-१० | ११-२० | २१-३० | ३१-४० | ४१-५० | ५० ते १ लाख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबांतील | १४९ | १९ | २३ | २६ | २७ | २३ | ६ | १५ | १० |
| विभक्त कुटुंबातील | ६१ | ४ | ४ | ११ | १३ | १५ | ८ | १ | ५ |
| विधवांच्या मुली | ८७ | ९ | २७ | २७ | ११ | ११ | २ | — | — |
| नोकरी-व्यवसाय करण्याऱ्या स्त्रिया | २ | — | — | १ | १ | — | — | — | — |
| | २९९ | ३२ | ५४ | ६५ | ५२ | ४९ | १६ | १६ | १५ |
| टक्केवारी शेकडा | | १०.७ | १८.०६ | २१.७४ | १७.३९ | १६.३९ | ५.३५ | ५.३५ | ५.०२ |

व त्याच्या मृत्यूनंतर त्याची मुले हे कर्ज फेडण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतात. तरीही हे चक्र थांबण्याचे कुठे चिन्ह दिसत नाही. कित्येक मुलींना त्यांच्या सासरी हुंड्यासाठी त्रास होतो. एखादी अपेक्षित वस्तू तिने माहेरून आणलेली नसेल तर तिला घालून-पाडून बोलले जाते. तिच्याशी प्रेमाने कोणी बोलत नाही व तिला प्रेमाने वागविलेही जात नाही. खाण्यापिण्याच्या छोट्या छोट्या गोष्टींवरून तिच्या माहेरची निंदा केली जाते. तिच्या माहेरच्या मंडळींचा अपमान केला जातो. कित्येक वेळेला तिला माहेरी पाठवणेच बंद केले जाते. अशा विविध प्रकारे तिचा प्रचंड मानसिक छळ होतो.

आपल्या मुलीच्या लग्नात किती हुंडा दिला हे सांगण्यास ३२ जणींनी नकार दिला. ह्या नकारामागे, मुलीला आपण किती दिले हे सांगायचे त्यांना टाळायचे होते. कायद्यानुसार आपण गुन्हेगार ठरू शकतो ह्याचीही जाणीव असू शकेल. आढळून असे येते की सोळा मुलींच्या लग्नात तीस ते चाळीस हजार रुपये हुंडा दिला, तितक्याच मुलींच्या लग्नात ४१ ते ५० हजार रुपये हुंडा दिला व पंधरा मुलींच्या लग्नात एक्कावन्न हजार ते एक लाख रुपयेपर्यंत हुंडा दिला आहे. म्हणजेच हुंडा देऊन लग्न लागणाऱ्या मुलींचे प्रमाण तर वाढलेच आहे पण त्याचबरोबर हुंड्याची रक्कमही दिवसेंदिवस वाढत जाऊन ती सामान्य माणसांच्या आवाक्याबाहेर जात आहे.

एक लाख रुपये हुंडा देऊन लग्नाचा बाकीचा आणखी खर्च करणाऱ्यांचे प्रमाणही

काही नगण्य नाही. मुलीला चांगला नवरा म्हणजे डॉक्टर, इंजिनियर, सी.ए. असा हुडकायचा म्हणजे जास्त हुंडा देणे आलेच. म्हणून जास्त हुंडा देऊन आपल्या मुलीला सुखी पाहाण्याचा प्रयत्न मुलीचे पालक करतात व हा लग्नाचा अवाढव्य खर्च एक सामाजिक प्रतिष्ठेचाच प्रश्न समजून त्या मार्गावर जातात. लग्न, डोहाळजेवण, नातवंडे, जावळ काढणे, इत्यादी सर्व गोष्टीत मग अनावश्यक खर्च करून स्वतःच्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतात. ज्यांची ऐपत आहे त्यांना ते पेलते. पण ज्यांची ऐपत नाही तेही ह्या मार्गावर जातात तेव्हा मन दुःखी झाल्याशिवाय रहात नाही. केवळ डॉक्टर किंवा इंजिनीयरच पैसे कमावून मुलीला सुख देईल ही चुकीची कल्पना समाजात रूढ झाली आहे.

माहेश्वरी समाजातील ज्या मुलांची लग्ने लागली त्यांचेही चित्र काही वेगळे नाही. हुंड्याची पद्धत, देण्याघेण्याविषयीचे सारे संकेत, रीतीरिवाज, पद्धती काटेकोरपणे पाळल्या गेलेल्या दिसतात. आपल्या मुलींना कुठल्याच प्रकारचा मानसिक छळ होऊ नये म्हणून, ऐपत नसतानाही मुलीचे पालक ह्या पद्धती पाळतात. आपल्या मुलीला वारसा हक्काने काही देण्याची पद्धत समाजांत कोठेच रुढ झालेली नाही. पण तिला काही तरी सतत देऊन समाधान मानणारे पालक सर्रास आढळतात. ह्या समाधानाबरोबर समाजात ज्या पद्धती मान्यता पावलेल्या आहेत त्या पाळण्याची नैतिक जबाबदारी पार पाडल्याचे समाधानही असते.

माहेश्वरी परिवारातील ज्या मुलांची लग्ने झाली त्यात किती हुंडा ठरवून घेतला ह्याचाही मी शोध घेतला. माहेश्वरी कुटुंबांतील २१५ मुलांची लग्ने झाली, त्यात ६५ मुलांच्या लग्नात हुंडा जरी ठरवून घेतला नाही तरी देणेघेणे रीतसर झालेच आहे. फक्त देण्याघेण्यासंबंधी मला हेच हवे, एवढेच हवे असे आग्रहाचे प्रतिपादन ह्या ठिकाणी झालेले नाही. कांही अपवाद वगळले तर मुलांच्या पालकांनी आपल्या इच्छा अप्रत्यक्षपणे प्रकट केलेल्या आहेत.

ज्या अठरा स्त्रियांनी काहीच सांगण्यास नकार दिला, त्या स्त्रियांच्या घरीही देणेघेणे रितीरिवाजाप्रमाणे झालेले आहे. पण ते सांगण्याचे मात्र त्यांनी टाळले. दोनशे पंधरा मुलांपैकी १५० मुलांच्या (६९.७६ टक्के) म्हणजे जवळ जवळ ७० टक्के मुलांच्या लग्नात हुंडा ठरवून घेतला गेला. मुलांच्या लग्नात ठरवून घेतलेली हुंड्याची रक्कम पाच हजारांपासून एक लाखापर्यंत आढळते. आपापल्या ऐपतीप्रमाणे व मुलाच्या योग्यतेप्रमाणे हुंड्याची रक्कम ठरवली जाते व मागितली जाते. म्हणून मुलांच्या लग्नातही हुंडा घेणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे व त्याचबरोबर हुंड्याची रक्कमही वाढत आहे.

अशा रीतीने हुंडाबंदी कायद्याचे उल्लंघन सहज व सर्रास केले जाते. त्याची भीतीही कोणास वाटत नाही किंवा त्याचे वैषम्यही कोणास वाटत नाही. प्रत्येक ठिकाणी

तक्ता क्रमांक २० : मुलांच्या लग्नात किती हुंडा घेतला. (आकडे हजारात)

| एकूण मुले | एकूण | घेतला नाही | सांगण्यास नकार | हुंडा घेतला | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १-१० | १०-२० | २०-३० | ३०-४० | ४०-५० | ५०-१०० |
| एकत्र कुटुंबातील | १३२ | २९ | १५ | २५ | २७ | १६ | ६ | ८ | ६ |
| विभक्त कुटुंबातील | ७ | ४ | — | १ | २ | १ | — | — | — |
| विधवांची मुले | ७६ | ३२ | ३ | २८ | १० | १ | २ | — | — |
| | २१५ | ६५ | १८ | ५४ | ३८ | १८ | ८ | ८ | ६ |
| टक्केवारी शेकडा | | ३०.२३ | ८.३७ | २५.१२ | १७.६८ | ८.३७ | ३.७२ | ३.७२ | २.७९ |

देणाराही चूप व घेणाराही चूप. येणाऱ्या सहजप्राप्त पैशाचे आकर्षण काही अपवाद वगळता सर्वांनाच वाटते. मुलीचा समाजातील दुय्यम दर्जा, तिला मिळणारी कमी प्रतीची वागणूक ह्यामुळे तिला सन्मानाने जगण्यासाठी चांगला, शिकलेला श्रीमंत नवरा मिळविण्यासाठी हुंडा दिला-घेतला तर त्याचे दुःख कुणालाच वाटत नाही. मुलीला देखील वाटत नाही. नवऱ्याचा मान तो बायकोचा सन्मान ह्या रिवाजामुळे मुलीची प्रतिष्ठा वाढविण्याचा हा एक मार्ग चोखाळला जातो. समाजात मुख्यत: पैशालाच मिळणाऱ्या प्रतिष्ठेचा हा एक परिणाम आहे. म्हणूनच जितका जास्त हुंडा एखाद्या मुलाच्या लग्नात आला तितकी त्याची प्रतिष्ठा वाढते. त्याचबरोबर जास्त हुंडा दिला जातो तो साधारणपणे जास्त पैसे असणाऱ्यांनाच. म्हणूनच लक्ष्मीच्या चकचकाटात आपली दृष्टी हरवून बसलेल्या समाजात हुंड्याचा राक्षस नाही वाढला तरच नवल !

●

## प्रकरण चौथे

# जीवन : दांपत्याचे व वैयक्तिक

वैवाहिक जीवनात स्त्री-पुरुषाचे पती-पत्नीचे नाते हे केवळ नरमादीचे असते का ? निसर्गाच्या कुशीत मुक्तपणे फिरणाऱ्या पाखरांचा आनंद स्त्री-पुरुषांच्या वाट्याला कधीच येत नाही. पण वर्तमानकालीन भारतीय जीवनात निकोप लैंगिक सुख स्त्री-पुरुषांना अनुभवायला मिळणे कठीण झाले आहे. भारतीय समाजमनात त्याचे एक विकृत स्वरूप आपणास पहावयास मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत दांपत्यजीवनाचा आनंद स्त्रीला पुरुषांच्या इच्छेनुसार, कुटुंब व समाज ह्यांच्या बंधनानुसार घेण्यास परवानगी असते. अलीकडे तर केवळ मुले जन्माला घालण्याचे साधन एवढीच किंमत तिला दिली जाते. पुरुषांचे मन रिझवणारी व त्यांच्या इच्छा व भूक यांच्या तालावर नाचणारी, अशीच स्त्रीची प्रतिमा आहे. माहेश्वरी स्त्रीची हीच प्रतिमा लातूरमधील अभ्यासात मला आढळून आली. ह्या प्रतिमेतून बाहेर पडणे तिला अजून तरी शक्य झालेले नाही. घराच्या बंदिस्त चौकटीत अडकलेली, निरनिराळ्या मानमर्यादेच्या बंधनाच्या ओझ्याखाली दबलेली ही स्त्री आपले दांपत्यजीवन मनमोकळेपणाने अनुभवूच शकत नाही. पडदासंस्कृतीच्या प्रभावाखाली असलेल्या वृद्ध पिढीने तरुण पिढीवर सामाजिक व कौटुंबिक बंधनांचा अंकुश असा जबरदस्त ठेवलेला आहे की त्या अनावश्यक बंधनातून मुक्त होऊन वावरणे स्त्रीला शक्यच होत नाही. त्या बंधनातून मुक्त होण्याचा प्रयत्न आज नवीन लग्न झालेल्या सुना काही प्रमाणात करताना दिसतात. पण तो प्रयत्न अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे व त्यास यशही तसेच मर्यादित आहे.

साठी ओलांडलेल्या स्त्रियांनी दांपत्यजीवनाचे जे अनुभव सांगितले ते अंगावर शहारे आणणारे आहेत. स्त्रीची किंमत काम करणाऱ्या, मुले उत्पादन करणाऱ्या एका मशीनपेक्षा जास्त नाही. घरातील १२-१४ वर्षांची सून सगळ्यांच्या आज्ञांचे पालन करणारी,

घागरा-घुंघट सांभाळत आडाचे पाणी आणण्यापासून ते धुराने डोळे चोळत स्वयंपाक करण्यापर्यंत सारे काम मुकाटपणे करणारी, घरासाठी राबणारी, सासूने परवानगी दिली तरच बरोबरीच्या मैत्रिणींबरोबर गाणे गाणारी, नवऱ्याचा सहवास फक्त रात्रीपुरता अनुभवणारी, पुष्कळ वेळेला पतीचे दर्शनही फक्त रात्री घेणारी, अशी ही स्त्री मुक्या गायीप्रमाणे सारे काही सहन करत असे. दिवसभरात नवऱ्याशी बोलणे तर दूरच, पण त्याच्याकडे पाहणेही गुन्हा असे. कधी झाल्याच तर चोरट्या गाठीभेटी. एकत्र कुटुंबात राहून अशा नियमांचे, शिस्तीचे पालन घरासाठी अतोनात काबाडकष्ट करणाऱ्या स्त्रीला करावेच लागे, तसे न केले तर तिला घरात सासूची बोलणी ऐकावी लागत व एक कौटुंबिक वादळ निर्माण होई. दिवसा कधी पतीशी संवाद साधायचा तर तो तिने धाकट्या नणंदेमार्फत किंवा दिरामार्फतच. रात्री फक्त काही तासांचे पतीचे साहचर्य तिला मिळे. मुले झाल्यावरही हे बंधन चालूच असे, आणि विशेष म्हणजे सर्व समाजाला हे संमत असे. त्यामुळे कोणीही ह्याविरुद्ध तक्रार करण्याचे साहस करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसे. निकोप लैंगिक सुख वैवाहिक जीवनाचा पाया आहे, तो अनुभवण्यासाठी पती-पत्नीचे मनोमीलनही विविध प्रसंगी एकमेकांच्या साहचर्याने व्हावे लागते, ह्याची जाणीव कुठेच कुणालाच होताना दिसत नाही. एका कोठडीतच कोंडून टाकणाऱ्या काही तासांच्या दांपत्यबंधनात घुसमटलेल्या अवस्थेतच तिचे सारे आयुष्य व्यतीत होत असे.

त्यामुळे असेच आयुष्य जगलेल्या साठीच्या आसपासच्या वृद्ध सास्वांची अपेक्षाही अशीच असे की माझ्या सुनेनेही तीच मान-मर्यादेची बंधने तंतोतंत पाळावीत. म्हणून आजही तेच जुनाट विचार, त्याच रूढी, प्रथा माहेश्वरी समाजात कमी-जास्त प्रमाणात आढळतात. त्यांची समाजनीतीची, कुटुंबनीतीची संकल्पनाच पूर्णपणे वेगळी आहे. स्वतःच्या स्वाभाविक इच्छांचा बळी देऊन मोठ्यांचा मानसन्मान स्त्री-पुरुषांना ठेवावा लागतो. आज स्त्रीला सर्वात उशिरा झोपून सर्वात लवकर, पहाटे चार वाजताच उठून कामाला जुंपावे लागत नसेल, पण आजही पती-पत्नीच्या नात्यासंबंधी एक अस्वाभाविक अशी भावना ह्या समाजात आढळते. घरातील सून सासू-सासऱ्यांसमोर आपल्या पतीशी सहसा बोलत नाही. अगदीच महत्वाचे, अनिवार्य काम असेल तर ती कधी सासूसमोर पतीशी बोलेल, पण सासऱ्यासमोर बोलण्याचे मात्र टाळेलच. इतके कशाला घरात कुणी परपुरुष आला तर त्याच्यासमोर ती चटकन् बाहेर येणार नाही. त्याच्याशी चटकन् बोलणारही नाही. सर्वसाधारणपणे ती आपल्या सासऱ्यांशी व मोठ्या दिरांशीही बोलणार नाही. त्यांच्याशी बोलण्याचे कधी काम पडलेच तर खाणाखुणांनी किंवा मान हलवून उत्तर देईल. हळुहळू ह्या परिस्थितीत जरी बदल होत असला तरी मूलतः तिला ह्या प्रथा पाळाव्याच लागतात. मग ती शिक्षित असो की निरक्षर. जेथे तिला

बोलण्यासंबंधी घरात अशी बंधने पाळावी लागतात तेथे आपल्या पतीशी ती मनमोकळेपणाने गप्पा मारणे असंभवच.

विवाहाअगोदरही प्रत्येक मुलीला मुलगी म्हणून अनेक बंधने पाळावी लागतात. ती म्हणजे संध्याकाळी ६ च्या आत मुलीने घरी यावे, तिने रात्री एकटे कुठे जाऊ नये, चारचौघात वागताना हळू बोलावे, मर्यादेने राहावे, व मोठ्याने बोलू किंवा हसू नये. हे सारे नियम मुलाला लागू नसतात. पण लग्न झाल्यानंतर ह्या शृंखला जास्त घट्ट होत रूतू लागतात. स्वतःचे स्वत्व गमावून अशा मान-मर्यादेचे पालन करणे आताशा स्त्रियांना नकोसे वाटते. पण कौटुंबिक शिस्त काटेकोरपणे ती पाळते व स्वतंत्रपणे विचार करून काही निर्णय घेण्याचे ती टाळते. ह्या साऱ्या प्रथा मोडून तिला स्वतःचा संसार मोडायचा नसतो. स्त्री-पुरुष ह्यांनी मोकळेपणाने बोलणे माहेश्वरी सामाजिक रीतीरिवाजात बसत नाही. ती सहसा परपुरुषाशी बोलत नाहीच पण तिच्या वयाहून मोठ्या असणाऱ्या सासरच्या पुरुष माणसांशी न बोलणे ही कौटुंबिक शिस्त तिला पाळावी लागते. तिच्या वयाहून लहान असणाऱ्या सासरच्या सर्व पुरुष नातेवाईकांशी ती बोलू शकते. सर्वसाधारणपणे सर्व कुटुंबात स्त्री-पुरुषांत मोकळ्या सहज स्वाभाविक संभाषणाने आनंद निर्माण होणे दुरापास्तच दिसते. एखाद्या ठिकाणी ते दिसले तरी तेथे सुनेचा सहभाग नगण्यच असतो. सून, बायको, भावजय, आई व सासू ह्या पाच भूमिकांची कसरत करता करता ती स्वतः कोण, स्वतःला काय हवे हेच विसरून

तक्ता क्रमांक १९ : माहेश्वरी स्त्री इतर पुरुष माणसासमोर पतीशी

| एकूण स्त्रिया | | कधी कधी बोलते | बोलते | आता बोलते पूर्वी बोलत नव्हते | बोलत नाही | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | — | ५५ | ९ | २०६ | — |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ३ | ५७ | ९ | ९२ | १ |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | — | ९ | १ | — | — |
| एकूण | ४४२ | ३ | १२१ | १९ | २९८ | १ |
| टक्केवारी शेकडा | | — | २७.३७ | ४.२९ | ६७.४२ | — |

जाते. ती स्वतःच्या आशा-आकांक्षा, छंद, आवडी-निवडी, आपले भूत-भविष्य, सारे काही सासरच्या घराच्या चौकटीत बंदिस्त करून टाकते. अशा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विविध बंधनांमुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास अभावानेच दिसतो. त्यामुळेच इतर पुरुष माणसांसमोर नवऱ्याशी न बोलणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जेव्हा मी पाहिले तेव्हा त्यांच्या ह्या बंदिस्त जीवनावरच प्रकाश पडला.

माहेश्वरी स्त्रीवर बोलण्याबाबतही अनेक सामाजिक बंधने आहेत. ज्या १२१ स्त्रिया इतर पुरुष माणसांसमोर पतीशी बोलतात त्याही त्यांच्यासमोर कामापुरतेच बोलतात. सगळ्यांसमोर पतीशी गप्पा मारणे हे दृश्य अपवादानेच आढळते. ज्या एकोणीस स्त्रिया आता पतीशी बोलतात, व पूर्वी बोलत नव्हत्या, त्या साधारणपणे चाळिशीच्या पुढच्या आहेत. त्या मध्यमवयीन असल्यामुळे त्यांच्यासाठी समाजाचे बंधन व कौटुंबिक शिस्तीची नियमावली थोडीफार शिथिल झालेली आहे. परपुरुषासमोर पतीशी २९८ स्त्रिया बोलतच नाहीत. ज्या ५६ विधवा आहेत त्याही आपल्या पतीशी परपुरुषासमोर कधीच बोलत नव्हत्या. ज्या दोन परित्यक्ता आहेत त्यांचीही स्थिती तीच होती. बहुतांशी माहेश्वरी स्त्रिया परपुरुषासमोर आपल्या पतीशी बोलतच नाहीत. मग त्याच्याशी गप्पा मारणे, चर्चा करणे इ. गोष्टी दूरच राहतात.

सारे जग २१ व्या शतकाकडे झेपावत आहे, प्रगत राष्ट्रातील स्त्रिया कर्तृत्वाचे एकेक क्षेत्र पादाक्रांत करीत अवकाशातही उड्डाण करत आहेत. पण लातूर येथील माहेश्वरी समाजातील स्त्री, स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण अनुभवणे तर दूरच राहिले, स्त्रीमुक्तीचे स्वप्नही पाहू शकत नाही. तिचे सारे विश्व सामाजिक बंधनात, मानमर्यादेच्या परंपरागत जुनाट कल्पनांत जागच्या जागी गोल गोल फिरत राहते. स्त्रियांची जगाच्या पातळीवर क्षितिजे विस्तारलेली दिसतात. पण लातूर येथील माहेश्वरी स्त्रीचे इवलेसे व्यक्तिमत्व अधिकाधिक संकोच पावत बिंदुवत होत आहे.

वरील प्रकारच्या बंधनामुळे पती-पत्नीचे नाते हे फक्त लैंगिक नात्यापुरते मर्यादित राहते. त्यांच्यात मित्र-मैत्रिणीचे संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. स्वतःच्या पतीस जाणून घेण्याची संधी तिला न मिळाल्यामुळे पतीच्या मनाचे विविध कंगोरे उलगडण्यास ती असमर्थ ठरते. त्याच्या मूलभूत खाण्यापिण्याच्या गरजांकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन त्याची रात्रीची भूक भागविणे ह्यापलीकडे त्या दोघांचा संबंध फार काळ येत नाही. ह्याचा परिणाम म्हणून कित्येक स्त्रिया मनातल्या मनात कुढत रहातात. तिच्या मानसिक ताणतणावासंबंधी पतीलाही काही माहिती मिळू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या दोघांच्या संबंधातील. एकमेकांना जाणून घेण्याची प्रक्रियाच सुरुवातीला खुंटते व ती फार उशिरा सुरू होते. मुख्यतः मुले झाल्यानंतर, काही वर्षे लोटल्यानंतर एकमेकांना जाणून घेण्याच्या जाणिवा तीव्रतेने उमटतात. त्या अगोदर आपापसातील संबंधांचा

एक सोपस्कार असतो. तन व मन, ही दोन्ही फुलविणारी जवळीक साधली जात नाही. स्त्रियांना आपल्या अधिकाराची, जीवनात जागृतीची जाणीव नसल्याकारणाने मुकाटपणे जे आपल्या पदरी येते ते त्या सहन करतात, व संसारगाडा व्यवस्थितपणे रेटून सुखी कुटुंब प्रस्थापित करण्याचा अविरत प्रयत्न करतात. माहेश्वरी कुटुंबाची सामाजिक ठेवण विनातक्रार कबूल करून त्याहून वेगळे जीवन जगण्याचे बंड त्या कधीच करत नाहीत. जे चालले आहे ते ठीक आहे व त्यात बदल करणे आपल्या हातात नाही हे तिला पक्के ठाऊक असते. घरात ताणतणावांचे वादळ उठू नये म्हणून व कुटुंबाच्या भल्यासाठी, कुटुंबातील मंडळींच्या मनःशांतीसाठी, आहे त्याच मार्गाने जाण्याचे ती पसंत करते. अशा बंधनांमुळे निकोप कामसुख तिला अनुभवता येत नाही. वडिलधाऱ्या मंडळींच्या अतिरिक्त बंधनामुळे, मानमर्यादेच्या चुकीच्या कल्पनांमुळे स्त्रीच्या मनाची कोंडी होत असलेली मला पाहावयास मिळाली. तिची अवस्था सोनेरी पिंजऱ्यात ठेवलेल्या गाणाऱ्या पक्षाप्रमाणे होते. ते पक्षी गातात पण त्यांचे गाणे मनावर ओरखडा काढते, मखमलीतल्या काट्यासारखे. शांता शेळके यांनी वर्णिल्याप्रमाणे—

"सोन्याची पाखरे मरून जातात,
अचानक, विनातक्रार,
पिंजऱ्याच्या शापातून मुक्त होतात,
तेव्हा इतर पाखरे आनंदाची आसवे ढाळतात,
प्रतिक्रिया व्यक्त करणे निग्रहाने टाळतात."

वर आपण पती-पत्नीच्या एकमेकांशी बोलण्यासंबंधी पाहिले. त्यांना एकत्र फिरावयासही जाता येत नाही. ह्याचे कारण पुनश्च घरातील बंधनच. वडिलधाऱ्या माणसांना पती-पत्नींनी असे फिरलेले आवडत नाही. म्हणून त्यांनी एकमेकांसोबत फिरायला जायचे नाही, व सिनेमालाही जायचे नाही. चारचौघांसमोर विवाहसंस्काराच्या वेळी एकमेकांचा हात धरून, प्रत्येक घटनेत एकमेकांना साथ देण्याची शपथ घेतलेले पती-पत्नी आपल्या शपथांना जागू शकत नाहीत. घरातील कुणाही माणसासमोर एकमेकांचा हात धरायची त्यांची काय बिशाद ? जर ही घरची मर्यादा त्यांनी सांभाळली नाही तर मग लोक काय म्हणतील, ही भीती सर्वांना वाटते. तुम्ही पती-पत्नी एकत्र फिरावयास जाता का ह्या प्रश्नांच्या उत्तरात मला त्यांच्यावर असलेल्या कौटुंबिक व सामाजिक बंधनाचीच जाणीव झाली.

४४२ स्त्रियांपैकी १५९ (३५.९७%) स्त्रिया ह्या पतीबरोबर एकत्र फिरावयास जातात. ह्या स्त्रिया साधारणपणे रोज फिरावयास कधीच जात नाहीत. पण पुष्कळ वेळेला पतीच्या मित्राकडे पतीबरोबर त्या जातात. त्यांच्या घरची मंडळी समजुतदार असल्याने

त्यांना तेवढी मोकळीक मिळते. त्यांच्या लहान मुलांना बऱ्याच वेळेला घरातील मोठी मंडळी सांभाळतात.

२१० स्त्रिया (४७.५१%) म्हणजेच जवळ जवळ निम्म्या स्त्रिया आपल्या पतीबरोबर बाहेर फिरावयास किंवा कोठेच, कधीच जात नाहीत. त्यात काही ४० ते ५० वयाच्या स्त्रिया आहेत. काही महिला जुन्या विचारांच्या कुटुंबातील आहेत. त्या ठिकाणी चुकून जरी पती-पत्नी बाहेर फिरावयास एकत्र गेले तरी घरात भांडणे होतात. काही अगदी नवीन लग्न झालेल्या सुना आहेत की ज्यांना त्यांची वडिलधारी मंडळी बाहेर पाठविण्याची परवानगी देत नाहीत. काही ठिकाणी असे आढळले की पतीलाच आपल्या पत्नीस सोबत घेऊन जाणे आवडत नाही. कारण पत्नीबरोबर फिरावयास जायचे म्हणजे त्याच्यावर काही बंधने पडतात. ती त्याला नकोशी असतात. आपल्या मित्रांबरोबर स्वैर भटकण्यात व गप्पा मारण्यात त्याला जास्त आनंद वाटतो. त्यात त्याला बायकोची लुडबूड आवडत नाही.

७१ स्त्रिया (१६.०६%) कधी तरी पतीबरोबर सिनेमाला रात्रीच्या वेळी, घरातले सारे काम आटोपल्यानंतर जातात. तेही एकत्र कुटुंब नसेल व मुले लहान असतील तर त्यांना ते जमत नाही व तसे जमवून आणण्याची पतीची इच्छाही असत नाही.

जेव्हा एकत्र कुटुंबातील स्त्रियांना मी प्रश्न विचारला की त्यांना पतीशी गप्पा मारण्याची मोकळीक मिळते का, तेव्हा मला जे उत्तर मिळाले ते त्यांची स्थिती कळण्यास पुरेसे बोलके आहे. एकत्र कुटुंबातील २७० स्त्रियांपैकी २१० महिलांना (म्हणजे ७७.७७%) पतीशी गप्पा मारण्यास वेळ मिळतो तो फक्त रात्री. त्याचे कारण म्हणजे दिवसभर पती आपल्या कामात असतो. दिवसा घरी इतर मोठी माणसे असल्यामुळे त्यांच्यासमोर गप्पा मारता येत नाहीत. खोलीत जाऊन पतीशी गप्पा मारणे शिष्टाचाराला धरून नसते. रात्रीच्या वेळीही दिवसभराच्या कामाने दोघे थकलेली असतात. त्यामुळे जुजबी संवाद होऊन संभाषण तेथेच थांबते. एकोणीस स्त्रिया तर पतीशी कधीच गप्पा मारत नाहीत. फक्त चाळीस स्त्रियांना पतीशी केव्हाही गप्पा मारण्याची मोकळीक आहे. त्याचे कारण त्यांचे थोडेसे वाढलेले वय. विभक्त कुटुंबातील महिला आपल्या पतीशी आपली व पतीची सोय पाहून केव्हाही बोलू शकतात. नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या दहा स्त्रियांपैकी नऊ स्त्रियांना गप्पा मारण्याची मोकळीक आहे तर एका स्त्रीला त्यासंबंधी बंधन आहे. वडिलधाऱ्या मंडळींच्या इच्छेला मान देऊन जुन्या परंपरावादी मान-मर्यादेच्या कल्पना राबविल्या गेल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचे मोकळे वारे स्त्रियांपर्यंत पोहोचणे माहेश्वरी महिलांना दुरापास्त झालेले आहे.

वरील चौकटीला अनुसरूनच स्त्रिया आपल्या पतीबरोबर जेवतात का हे जेव्हा मी जाणण्याचा प्रयत्न केला तेव्हा मिळालेल्या माहितीवर सामाजिक जडण-घडणीचा

तक्ता क्रमांक क्र. २० : पती-पत्नी बरोबर जेवतात का ?

| एकूण स्त्रिया | | होय | नाही | कधीकधी | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | ७० | १७२ | २७ | १ |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ९३ | ४४ | २४ | १ |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या- | १० | ८ | २ | — | — |
| | ४४२ | १७१ | २१८ | ५१ | २ |
| टक्केवारी शेकडा | | ३८.६९ | ४९.३२ | ११.५४ | ०.४५ |

व तेथील वातावरणाचाच परिणाम झालेला दिसतो. ज्या १७१ स्त्रिया पतीबरोबर बसून जेवतात, त्यात एकत्र कुटुंबातील ७० तर विभक्त कुटुंबातील ९३ स्त्रिया आहेत. एकत्र कुटुंबातीलही साधारणपणे मध्यमवयीन स्त्रिया जेवणात आपल्या पतीची साथ देतात. पण बाकी ठिकाणी एकत्र कुटुंबात सासू, सासरे, दीर, जावा अशी माणसे राहात असल्याकारणाने पती-पत्नी सहसा बरोबर बसून जेवत नाहीत. विभक्त कुटुंबात असे बंधन नसल्याकारणाने आपल्या सोयीनुसार व मर्जीनुसार पती-पत्नी बरोबर बसून जेवतात. ४४२ स्त्रियांपैकी एकूण २१८ म्हणजे जवळ जवळ निम्म्या स्त्रिया पतीबरोबर बसून कधीच जेवत नाहीत. त्या घरातील इतर स्त्रियांसोबत किंवा मुलांसोबत जेवतात. त्याची कारणे म्हणजे पती-पत्नी एकत्र बसून जेवणे शिष्टाचाराला धरून नसते. दुसरे पतीची जेवणाची वेळ व स्त्रीची कामाची वेळ ह्यात मेळ बसत नाही. विभक्त कुटुंबातील ४४ स्त्रियांना पतीबरोबर बसून जेवणे सोयीचे वाटत नाही. त्यातील काही स्त्रियांना ते सोयीचे वाटत नाही तर काही मध्यमवयीन स्त्रियांना पतीबरोबर बसून जेवण्यात शरम वाटते. एक्कावन्न स्त्रिया कधीतरी पतीबरोबर बसून जेवतात. त्या-त्यावेळी दोघांची सोय पाहूनच तो निर्णय घेतला जातो. कारण साधारणपणे माहेश्वरी समाजातील पुरुष स्वतंत्र व्यवसाय करत असल्याकारणाने त्याची जेवणाची एक ठराविक निश्चित अशी वेळ नसते. म्हणूनच पती-पत्नी बरोबर बसून जेवताहेत हे दृश्य सर्रास ह्या समाजात पाहायला मिळत नाही. पती-पत्नी एकत्र न जेवणे हा एक सामाजिक शिष्टाचार समजला जातो. पती-पत्नी एकमेकांबरोबर बसून जेवतात की नाही हा प्रश्न विचारण्यामागे उद्देश हाच होता की कुटुंबाचे जे काही एकत्र घालवण्याचे आनंदाचे क्षण असतात त्यात पती-पत्नीचा सहभाग कितपत असतो हे जाणणे. म्हणूनच त्यांच्या उत्तरात

त्यांच्या दैनंदिन जीवनात असणाऱ्या बंधनाचेच दर्शन घडते, व त्यांच्यावर लादण्यात आलेल्या या मर्यादामुळे कौटुंबिक साहचर्य बव्हंशी आढळत नाही. पती-पत्नीचे नाते हे विविध ठिकाणी, विविध प्रसंगांतून एकमेकांच्या साहचर्याने, खऱ्याखुऱ्या अर्थाने जोडीदार बनून घालवले तरच फुलते व त्यांचे दांपत्यजीवन सुखी, आनंदी होते. नाहीतर ती सुखाचा आभास निर्माण झालेली, असंतोषाच्या ज्वालामुखीवर उभी राहिलेली घरे बनतात. पण तरीही जेवणासारख्या रोजच्या घडणाऱ्या घटनेतही त्यांना एकमेकांची साथ देता येत नाही.

एकत्र कुटुंबात तर बव्हंशी पतीला वाढण्यास देखील सुनेला परवानगी नसते. त्यामुळे दोघात संवाद साधला न जाऊन एकमेकांच्या आवडी-निवडीही कित्येक वर्षे अज्ञात राहातात. विशेषतः स्त्रीच्या आवडी-निवडी जाणून त्या जपणे व त्यातून प्रेम-मनोमिलनाची वाट चोखाळणे, त्या हळुवार भावनांना जागृत करणे, ही प्रक्रिया क्वचितच सुरू झालेली दिसते. त्यांच्यात जे काही घडायचे ते फक्त रात्री. दिवसा एकमेकांचे दुरून दर्शन घेण्यातच त्यांना समाधान मानावे लागते. हव्याहव्याशा वाटणाऱ्या साहचर्याचे दृश्य स्वरूप दिवसा कुठेच जाणवत नाही. त्यामुळे कित्येक ठिकाणी मोकळ्या दांपत्यजीवनाचे अनुभव त्यांना न मिळता समाजात त्याचे एक विकृत स्वरूप आढळते.

स्वतःच्या कुटुंबाचा विस्तार किती असावा हे ठरविण्याचा अधिकारही स्त्रीला नसतो. तिला जर मुलगा झाला नसेल तर मुलगा होईपर्यंत कितीही मुली होवोत, घरात मुलींची भर पडतच रहाते. एकापाठोपाठ तीन-चार मुली जर जन्माला आल्या तर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्त्रीला मानसिक त्रास सहन करावा लागतो. मुलगा हा वंशाचा दिवा, आपणास आधार देणारा व मोक्षप्राप्ती मिळवून देणारा ही भावना समाजात दृढ झालेली आहे. त्यामुळेच स्त्रीच्या शारीरिक क्षमतेचा व भावनांचा विचार न करता तिच्या बाळंतपणांची संख्या वाढतच राहाते. स्वातंत्र्यपूर्वकाळी मुलगा होवो किंवा मुलगी होवो बाळंतपणाच्या संख्येवर मर्यादा नसे. काही काही वेळेला स्त्रीची बारा किंवा सोळा बाळंतपणेही होतात व त्याचा तिला अतोनात त्रास होतो. सात-आठ बाळंतपणे देखील तेव्हा normal मानली जात. कुटुंबनियोजनाची त्यावेळी पद्धतच नव्हती. त्यामुळे त्याचा विचारही केला जात नसे. बालमृत्यूचे प्रमाणही त्यावेळी जास्त होते. त्यामुळेही मुलांच्या जन्मावर बंदी घालण्यात आली नाही.

प्रत्येक बाळंतपणाच्या अगोदर गरोदरपणी स्त्रीची शारीरिक काळजी पती उघडपणे कधीच घेऊ शकत नाही. कारण ते शिष्टसंमत ठरत नाही. घरातील किंवा शेजारी राहणाऱ्या स्त्रिया ह्यासंबंधी जरुरीपुरती काळजी घेतात. पती म्हणून बायकोची जबाबदारी अशा नाजूक वेळी तो क्वचितच घेताना दिसतो. पतीने अशी काळजी घ्यावी हे

समाजात अपेक्षितही नाही. जर कुणी असे 'ज्यादा' लक्ष आपल्या पत्नीकडे दिले तर ते रीतीरिवाजापेक्षा वेगळे आहे म्हणून त्याची खिल्ली उडविली जाते.

सर्वसाधारणपणे आज ज्या साठीच्या पुढच्या स्त्रिया आहेत त्यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेलीच नाही. कारण त्यांच्या वेळी अशा पद्धतीचा विचार समाजात होतच नव्हता. मुले ही देवाची देणगी आहे, त्यांच्या जन्माला आपण आडकाठी आणू नये ही भावना सर्व कुटुंबांत अस्तित्वात होती. जितकी मुले होतील तितकी होऊ द्यावीत. जन्म देणारा (परमेश्वर) त्यांच्यासाठी दाणापाणी देईल हा ठाम विश्वास लोकांच्या मनामध्ये होता. त्यामुळे कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेच्या विरोधातच बव्हंशी स्त्रिया होत्या.

पण १९६०-६५ नंतर हळुहळू कुटुंबकल्याण कार्यक्रम लातूरच्या माहेश्वरी समाजात मान्य होऊ लागला व सर्वसाधारणपणे दोन किंवा तीन किंवा चार मुलांच्यावर मुले होऊ देणे कोणालाही नकोसे वाटू लागले. पण ज्या स्त्रीला फक्त मुली झालेल्या आहेत तेथे मात्र कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया न करता मुलासाठी वाट बघणे आजही चालू आहे. अशा वेळी गर्भजल परीक्षा करून लिंगनिदान केले जाते व मुलाचा गर्भ ठेवला जातो. यासंबंधी कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया किती जणींनी केली हे जाणण्याचा मी प्रयत्न केला.

**तक्ता क्रमांक २१ : कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली किंवा नाही? केली तर कुणी केली?**

| एकूण स्त्रिया | | केली नाही | पुरुषांनी केली | स्त्रियांनी केली | प्रखर विरोध |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील- | २७० | १५७ | ३ | ११० | — |
| विभक्त कुटुंबातील- | १६२ | ५८ | ४ | १०० | — |
| विधवा- | ५६ | ४९ | — | ६ | १ |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या- | १० | ६ | — | ४ | — |
| परित्यक्ता- | २ | १ | — | १ | |
| | ५०० | २७१ | ७ | २२१ | १ |
| टक्केवारी शेकडा | | ५४.२ | १.४० | ४४.२ | ०.२० |

पाचशे स्त्रियांपैकी २७१ स्त्रियांनी म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त स्त्रियांनी कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली नाही. त्याचे कारण म्हणजे काही स्त्रियांचे वय ५० च्या वर होते व त्यांना मुले झाली तेव्हा त्या शस्त्रक्रियेचा प्रसार झाला नव्हता. दुसरे कारण काही स्त्रिया नुकत्याच लग्न झालेल्या आहेत. कुणाला अजून मूल झालेले नाही. कुणाला एखादेच झालेले आहे. म्हणून त्यांनी त्या शस्त्रक्रियेसंबंधी विचारच केलेला नाही. एकूण स्त्रियांपैकी २२१ स्त्रियांनी ही शस्त्रक्रिया केलेली आहे व फक्त सात पुरुषांनी ही शस्त्रक्रिया केली आहे. स्त्रीनेच ही शस्त्रक्रिया करावी असे मत बहुतांशी सर्व स्त्रियांचे होते. त्याची कारणे त्यांनी खालीलप्रमाणे दिली :

(१) समाजात ही शस्त्रक्रिया बायकांनीच करायची सर्वसाधारण पद्धत आहे
(२) पुरुषांची केलेली शस्त्रक्रिया अयशस्वी होईल ही भीती असते.
(३) पतीने पत्नीचीच करावी असे सांगितले.
(४) सासूचा पुरुषांनी शस्त्रक्रिया करावी ह्यासाठी विरोध होता.
(५) पुरुषांनी ही शस्त्रक्रिया केली तर पुरुष 'अधू' होतो असा गैरसमज पुष्कळ जणींच्या मनामध्ये आहे.
(६) पुरुषाला कामासाठी बाहेर फिरायचे असते. स्त्रीला घरीच राहायचे असते. म्हणून ते सोयीस्कर असते. स्त्रीला जशी विश्रांती घरी मिळू शकते तशी पुरुषाला मिळत नाही.
(७) स्त्रीला जर काही त्रास झाला तर स्त्री सहन करू शकते. तिच्यात तशी क्षमता आहे. पण पुरुष असा त्रास सहन करू शकत नाही.
(८) एखादी पत्नी अकाली मृत्यू पावली व त्या पुरुषास दुसरे लग्न करावे लागले तर येणाऱ्या त्या पत्नीला मूल व्हावयास हवे, म्हणून पुरुषांची शस्त्रक्रिया करू नये.
(९) डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार स्त्रीच्या तब्येतीला शस्त्रक्रिया जास्त धोकादायक नाही म्हणून स्त्रीचीच करावी.
(१०) एका स्त्रीने अतिशय सूचकपणे, पण स्पष्ट असा प्रश्न विचारला की जर पुरुषाची शस्त्रक्रिया केली तर मग पत्नीने काय जन्मभर रडत बसायचे ? तिला सुचवायचे होते की पुरुषाची शस्त्रक्रिया केल्यामुळे तो बिनधास्त कसाही वागेल. त्याला कुठल्याच गोष्टीची भीती वाटणार नाही, व काही वैषम्यही वाटणार नाही. तेव्हा हा धोका स्त्रीने कशाला पत्करावा ?

या कारणावरून मला स्पष्टपणे जाणवले की, पुरुषांच्या तब्येतीला व अस्तित्वाला स्त्रिया खूप महत्त्व देतात व त्या त्यांना तसे जपतातही. स्वतःचे अस्तित्व दुय्यम दर्जाचे असे त्या गृहीत धरतात. म्हणून पुरुषास जास्तीत जास्त आराम व चांगले

जीवन मिळावे ह्यासाठी त्या धडपडत असतात. स्वतःचा मृत्यू झाला तर पुरुषास दुसरे लग्न करून मूल जन्माला घालावे लागणार. कारण पुरुष दुसरे लग्न करणार हे गृहीतच धरलेले आहे. पण स्त्रीचा पती मृत्यू पावला तर स्त्रीला दुसऱ्या लग्नाचा विचारही सुचत नाही, व त्यासाठी आपण शस्त्रक्रिया करू नये हे स्वाभाविकपणे तिला संमत होत नाही. ही पुरुषी वर्चस्व दर्शविणारी मनोवृत्ती माहेश्वरी समाजात स्पष्टपणे दिसते. पण त्या बदल्यात पुरुष मात्र अशा प्रकारे स्त्रीची काळजी घेताना दिसत नाही. ज्या सात पुरुषांची कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया झाली त्या पुरुषांनी आपल्या पत्नीची थोडी फार काळजी घेतलेली दिसते. पण बाकी सारे पुरुष ह्यासंबंधी विचार करण्यासही तयार नाहीत असे दिसले. ज्या स्त्रियांच्या पतींनी ही शस्त्रक्रिया केली त्या महिलांना शस्त्रक्रियेची खूप भीती वाटत होती व काहींची तब्येत अतिशय खराब होती. म्हणून त्या स्त्रियांनीही असेच उत्तर दिले की, जर स्त्रीची तब्येत खूपच खराब असेल तरच पुरुषांनी ही शस्त्रक्रिया करावी, अन्यथा ती स्त्रीनेच करावी.

माहेश्वरी समाजात साधारणपणे घरकामाची कौटुंबिक जबाबदारी पुरुष उचलत नाहीत. स्त्रियांची कामे ही घरातील व पुरुषांची कामे ही बाहेरची. कामाची ही लैंगिकतेवर आधारित विभागणी समाजात सर्वमान्य आहे. मुलांच्या मनावरही लहानपणापासून असेच संस्कार झालेले आहेत. त्यामुळे कुठलाही मुलगा किंवा पुरुष घरातील केरवारा करताना दिसणार नाही. स्त्रियांची म्हणून ही हलक्या प्रतीची जी कामे आहेत त्यांना पुरुषमंडळी अपवादानेच हात लावतील. मोऱ्या धुणे, घराची साफसफाई करणे, घरातील अस्ताव्यस्त सामान व्यवस्थित लावणे, ह्या कामात पुरुष कधीच लक्ष घालत नाहीत. ते त्यांचे क्षेत्र नाही, ही पारंपारिक समजूत आजही समाजात ठाम रुजलेली आहे. म्हणूनच घरकामात नवरा मदत करतो का असा प्रश्न उपस्थित केला. तेव्हा आढळून आले की, माहेश्वरी समाजात पुरुषांनी घरकामात मदत करणे अपेक्षितच नाही. एकूण ४४२ पतींपैकी १०४ (म्हणजे फक्त २३.५३%) पती घरकामात मदत करतात. ती मदत म्हणजे भाजी आणणे, कधी पाणी भरणे, आणि स्त्रीच्या चार दिवसांच्या सुट्टीत घरातील स्वयंपाकापासून थोडीबहुत जबाबदारी उचलणे. त्यातही कुठे कुणी शेजारीण येऊन स्वयंपाक करते. एकत्र कुटुंबात पुरुषांनी स्वयंपाक करण्याचा कधी प्रश्नच येत नाही. कारण स्वयंपाक करण्यासाठी तेथे कुणी ना कुणी हजर असतेच. म्हणूनच एकत्र कुटुंबातील पुरुषापेक्षा विभक्त कुटुंबातील पुरुषांना जास्त वेळेला घरकाम करावे लागते. तशी जबाबदारी ते टाळू शकत नाहीत. म्हणूनच मला हे सत्य नजरेस आले की एकत्र कुटुंबातील २७० पतींपैकी फक्त ५० पती घरकामात मदत करतात तर विभक्त कुटुंबातील १६२ जणांपैकी ५३ पुरुष घरकामात मदत करतात. काही पुरुष अपवादानेच स्त्रीला मदत करू इच्छितात. पण स्त्रियांच्या मनावरही हजारो वर्षांचे संस्कार असे

तक्ता क्रमांक २२ : पतीची घरकामात मदत

| एकूण स्त्रियांचे नवरे | | करतो | नाही | उत्तर नाही | कधी कधी अडचणीच्या वेळी |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील स्त्रियांचे | २७० | ५० | २०५ | १ | १४ |
| विभक्त कुटुंबातील स्त्रियांचे | १६२ | ५३ | १०८ | १ | — |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे | १० | १ | ६ | — | ३ |
| | ४४२ | १०४ | ३१९ | २ | १७ |
| टक्केवारी शेकडा | | २३.५३ | ७२.१७ | ०.४५ | ३.८५ |

बिंबलेले आहेत की त्यांनाही ते पटत नाही. पुरुषांनी घरकामात मदत करणे म्हणजे त्यांना शरमेचेच वाटते. अर्थात पुरुषांनी मदत करणे असे दृश्य माहेश्वरी समाजात दिसणे विरळच. एकूण पूर्ण समाजाची जडणघडणच अशी आहे की पुरुषांनी स्त्रियांच्या वाटणीचे घरकाम करून घराची जबाबदारी उचलावी असे कुणालाच वाटत नाही— म्हणूनच नोकरी-व्यवसाय करणाऱ्या दहा स्त्रियांच्या पतींपैकी एकच पती तिला घरात मदत करतो व बाकी सहा पुरुष कधीच घरकामाला हात लावत नाहीत. तीन पती कधीतरी अडचणीच्या वेळी घरकाम करतात. म्हणूनच स्त्रियांना घरकाम व नोकरी किंवा व्यवसाय सांभाळता सांभाळता तारेवरची कसरत करावी लागते. पण स्त्रीने असे केलेच पाहिजे ही अपेक्षा सर्वजण तिच्याकडून ठेवतात. एकूण सतरा पती कधी कधी, अडचणीच्या वेळी स्त्रियांना घरकामात मदत करतात. तर ३१९ पुरुष म्हणजे जवळ जवळ तीनचतुर्थांश पुरुष घरकामात जराही लक्ष घालत नाहीत. घरकामात लक्ष घालणे म्हणजे त्यांना कमीपणाचे वाटते. पुरुषी अहंकारामुळे त्याने स्त्रीचे तथाकथित कार्यक्षेत्र चूल व मूल, हे स्वतःसाठी वर्ज्य ठरविलेले आहे.

सर्वसाधारणपणे बाजारातून सामान आणणे हे पुरुषाचे काम समजले जाते. हे काम तरी पती करतो किंवा नाही हा प्रश्न मी स्त्रियांना विचारला तेव्हा, सर्वसाधारणपणे घरातील पुरुष घरासाठी लागणारे सामान स्त्रीला आणून देतात. एकूण ४४२ पुरुषांपैकी ३१३ पुरुष घरासाठी लागणारे सामान आणून देतात. त्या सामानात घरासाठी

### तक्ता क्रमांक २३ : नवरा बाजारातून सामान आणतो का?

| एकूण स्त्रियांचे नवरे | | आणतो | नाही | कधी कधी आणतो | विभक्त झाल्यावर | उत्तर नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील स्त्रियांचे नवरे | २७० | १६९ | १०० | — | — | १ |
| विभक्त कुटुंबातील स्त्रियांचे नवरे | १६२ | १४० | २० | — | १ | १ |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे नवरे | १० | ४ | ५ | १ | — | — |
| | ४४२ | ३१३ | १२५ | १ | १ | २ |
| टक्केवारी शेकडा | | ७०.८१ | २८.२८ | ०.२३ | ०.२३ | ०.४५ |

लागणारे धान्य, तेल, साखर, तूप व इतर जरुरीच्या सामानांचा समावेश आहे. फार छोट्या छोट्या वस्तू मात्र काही स्त्रियाच आणतात. भाजी वगैरे आणण्याचे काम काही वेळेला स्त्रीच करते. घरात सामान न आणणारे पुरुष हे १२५ आहेत. त्यांच्याकडे सारे सामान त्यांच्या दुकानातील अथवा घरातील नोकरच आणतात. सहसा स्त्रीला हे सामान आणण्यास बाहेर जावे लागत नाही. काही अपवाद वगळल्यास बाहेरची ही सारी जबाबदारी पुरुषवर्गच उचलतात. ह्यामागे सुद्धा स्त्रियांनी जास्त घराबाहेर पडू नये व मुख्य बाजारपेठेत जाऊ नये, कारण ते चांगल्या संस्काराचे लक्षण नाही, ही भावना आढळते. परपुरुषाच्या नजरेपासून स्त्रीने जपूनच राहावे, हा विचारही सर्वसाधारणपणे आढळतो. पण आता ह्यात बदल होत आहे. छोट्या मोठ्या बऱ्याचशा वस्तूंच्या खरेदीची जबाबदारी हल्ली स्त्रियांवर येऊन पडत आहे.

घर हे चार भिंतींनीच बनलेले नसते तर त्यात राहणाऱ्या माणसांमुळे त्याला घरपण येते. कुटुंबातील व्यक्तींचा एकमेकांशी प्रेमाचा संबंध घराला स्थिरता देतो. जोपर्यंत प्रेम, स्नेह व वात्सल्य अस्तित्वात आहे तोपर्यंत घराच्या स्थिरतेला कधी तडा जाणार नाही हे निश्चित. हे निर्व्याज, निष्पाप प्रेम मिळते ते मुख्यतः छोट्या मुलांच्या निर्मळ हसण्यात. त्यांच्या बोबड्या बोलात व त्यांच्या छोट्या छोट्या कृतीत. त्या मुलांना लहानाची मोठी करत असताना आईवडील दोघेही जर आनंद मिळवत असतील तर त्यासारखे दुसरे स्वर्गसुख नाही. पण माहेश्वरी समाजात अशा प्रकारचे साहचर्य फार कमी कुटुंबात आढळते. ज्या कुटुंबांत वडिलधारी माणसे होती त्या कुटुंबात जन्मणाऱ्या आपल्या अपत्यास मुलाने व सुनेने त्यांच्यादेखत उचलून प्रेमाने घ्यायचेदेखील नाही.

ही समाजात पद्धत होती. त्याचे नाव घेऊन त्याला आपल्या आई-वडिलांसमोर बोलवायचेही नाही व त्यास खेळवायचेही नाही, मग त्याच्या इतर प्रगतीसंबंधी बोलणे दूरच राहिले. मोठ्यांचा मान ठेवण्याचा हाही एक मार्ग त्यावेळी अस्तित्वात होता. स्वातंत्र्यपूर्व काळात विवाहित जोडप्यांना जी मुले झाली त्यांना ह्याच परिस्थितील सामोरे जावे लागले. पण हळुहळू ही परिस्थिती बदलू लागली आहे. लहान मुलांच्या आनंदात आता त्यांचे वडीलही सामील होताना दिसतात. पण तरीही त्यांच्यावर काही बंधने पडतातच. म्हणूनच मुले वाढविताना पतीची मदत झाली का हा प्रश्न जेव्हा मी विचारला तेव्हा, ज्या ४१६ स्त्रियांना मुले होती त्यातील १६९ स्त्रियांना

**तक्ता क्रमांक २४ : मुले वाढविताना नवऱ्याची मदत झाली का ?**

| एकूण स्त्रिया | | होय | नाही | थोडीफार | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील स्त्रियांना | २४९ | ८१ | १५२ | १५ | १ |
| विभक्त कुटुंबातील स्त्रियांना | १५७ | ८२ | ७५ | — | — |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना | १० | ६ | २ | २ | — |
| | ४१६ | १६९ | २२९ | १७ | १ |
| टक्केवारी शेकडा | | ४०.६२ | ५५.०५ | ४.०९ | ०.२४ |

म्हणजे निम्म्यापेक्षा कमी स्त्रियांना मुले वाढविताना अशी मदत झाली असे उत्तर मिळाले. ही मदत खालील स्वरूपाची होती :

(१) मुले रडायला लागली व पत्नी काही कामात असेल तर त्यांना उचलून घेणे व चुप करण्याचा प्रयत्न करणे.

(२) त्यांना कधीतरी फिरावयास नेणे.

(३) कधीतरी, अडचणीच्या वेळी त्यांना शाळेत पोचविणे.

पण सर्वसाधारणपणे मुलांची शी-शू काढण्यासाठी कुठल्याच पतीची मदत स्त्रीला मिळाली नाही. त्यांना दूध पाजणे, जेवू घालणे, स्नान घालणे, कपडे नेसवणे इत्यादी लहान मुलांची कामे आईच करताना दिसते. शाळेत जाणाऱ्या मुलांचा अभ्यास घेणे, त्यांच्या प्रगतीविषयी जाणून घेण्यासाठी नियमितपणे शाळेत जाणे, त्यांना गोष्टी वगैरे सांगून त्यांच्यात रममाण होणे, शाळेत पोचवणे व परत आणणे ही सारी कामेही आईनेच केलेली दिसतात. मुलांचे वडील कधीतरी अपवादाने हे काम करताना दिसतात.

मग कधी तरी रात्रीच्या वेळी मुले रडू लागली तर त्यांना घेऊन हिंडावयाचे व गप्प बसविण्याचा प्रयत्न करायचा हे काम काही वडील करतात. तेही त्यांना रोज करावे लागत नाही. अशा रीतीने मुले वाढविताना स्त्रीला पतीची मदत फार थोडी झालेली दिसते.

निम्म्यापेक्षा जास्त स्त्रियांना (२२९) आपल्या पतीची ह्या कामात काहीच मदत झालेली नाही. तिला जी मदत झाली ती घरातील इतर स्त्रियांचीच. पती जर आपल्या कामात व्यग्र असेल तर अशी मदत संभव नसते. व्यवसाय करणाऱ्या पुरुषांच्या कामाची वेळ ठराविक नसते. त्यामुळे पुष्कळ वेळेला त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळच मिळत नाही. एकत्र कुटुंबपद्धती असेल तर पतीवर मुलांची पूर्ण जबाबदारी पडत नाही व त्यामुळे पत्नीला त्याबाबतीत मदत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सतरा स्त्रियांना पतीची थोडीफार मदत झालेली आहे. ती मदत स्त्रीला अत्यंत गरज असेल तेव्हाच झालेली आहे.

पण मुलांच्या आजारपणात मात्र बहुतांश पतीची मदत स्त्रीला झालेली आहे. त्या मदतीचे स्वरूप म्हणजे मुलांना दवाखान्यात नेणे, त्यांच्यासाठी औषध आणणे, रात्री जागरण करावे लागले तर पत्नीसोबत तेही करणे, असे आहे.

एकूण ४१६ पतींपैकी २७७ (६६.५८%) पतींची मुलांच्या आजारपणात पत्नीला मदत झाली. पण ११९ (२८.६०%) पुरुषांची घरात बिलकुल मदत झाली नाही. एकोणीस पुरुषांनी थोडी फार मदत केली. मुलांच्या आजारपणातही ज्या पतींनी आपल्या पत्नीची मदत केली नाही त्याचे कारणही तेच, म्हणजे व्यवसायातील व्यग्रता, व एकत्र कुटुंबपद्धती; आणि त्याचबरोबर निष्काळजीपणामुळे मुलांसाठी वेळ न काढणे. मुलांची जबाबदारी आयांनीच पेलावी अशी पक्की धारणा ह्यामागे दिसते.

समाजाचे बारकाईने निरीक्षण केले तेव्हा मला असे आढळले की, समाजात सर्वसाधारणपणे बव्हंशी पुरुषांना पान-तंबाखूचे व्यसन तरी आहेच. पण घर व घरासाठी जगणारी स्त्री आपल्या घराची प्रतिष्ठा राखण्यासाठी पतीच्या वैगुण्यावर स्वाभाविकपणे पांघरूण घालते, व आपला पती निर्व्यसनी आहे असे सांगते. म्हणून बहुधा फक्त ४८ स्त्रियांनी आपल्या पतीला असलेल्या व्यसनासंबंधी माहिती दिली. पण बाकीच्या ३९२ स्त्रियांनी आपले पती निर्व्यसनी आहेत असेच उत्तर दिले. हल्ली निर्व्यसनी माणसे फार कमी दिसतात. त्यातल्या त्यात पुरुषमंडळी आपला रिकामा व सुट्टीचा वेळ घरी कधीच घालवत नाहीत. पैसे लावून पत्ते खेळण्यात त्यांचा बराचसा वेळ आपल्या मित्रांसोबत जातो. ज्या सात जणांना दारूचे व्यसन आहे त्यापायी त्या स्त्रियांचा संसार पार उध्वस्त झाला आहे. त्यांच्या दुःखी संसाराची कहाणी त्यांनी सांगितली. व स्वतः त्यासाठी काहीच करू शकत नाही, ही असहायताही त्यांनी प्रकट केली.

भांग खाणे, वेश्यागमन, सिगारेट इ. व्यसनासंबंधी त्रोटक माहिती मिळाली. समाजात असे व्यसनाधीन पुरुष आहेत, पण त्यासंबंधी कोणी मोकळेपणाने बोलू इच्छित नव्हत्या. त्यांच्याशी बोलताना मला जाणवले की पतीच्या अशा वागण्यामुळे त्या मनातल्या मनात दुःखी होत्या. पण त्या दुःखाला वाचा फोडणे त्यांना इष्ट वाटले नाही.

एकत्र कुटुंबात राहणाऱ्या स्त्रियांचा अनुभव मनुस्मृतीत सांगितल्याप्रमाणेच आहे. लहानपणी बापाने, मोठेपणी नवऱ्याने व म्हातारपणी मुलाने स्त्रीचे रक्षण करायचे असते, ही भारतीय परंपरा काटेकोरपणे पाळली जाते. प्रौढ स्त्रीलाही बाहेर कोठे जायचे असेल तर घरातल्या लोकांची परवानगी घेऊन जावे लागते. एकत्र कुटुंबातील २७० पैकी २६२ स्त्रियांना घरात विचारून बाहेर जावे लागते. त्यातील १६४ (६०.७४%) स्त्रियांना सासूला विचारून बाहेर जावे लागते, ६९ (२५.५५%) स्त्रियांना पतीला विचारून जावे लागते, बाकीच्या स्त्रियांना घरातील इतर वडिलधारी माणसांना म्हणजे सासरे, मोठे दीर, मोठी जाऊ इत्यादींपैकी कुणाला तरी विचारून जावे लागते. फक्त आठ स्त्रियांना घरात कुणालाही न विचारता स्वतःचा निर्णय स्वतः घेऊन बाहेर जाता येते.

अशा रीतीने माहेश्वरी समाजात स्त्रीचे कौटुंबिक जीवनातील स्थान हे दुय्यम दर्जाचे, व स्वतंत्र अधिकार नसलेले असते. घरातील सर्व कामे तिने करायची. पण घरातील महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी तिला काही विचारण्याची गरजच कुणाला वाटत नाही. तिच्या

**तक्ता क्रमांक २५ :**

**महत्त्वाच्या निर्णयाबाबत स्त्रीचे मत विचारात घेतले जाते का ?**

| एकूण स्त्रिया | | होय | नाही | कधी कधी | आता घेतले जाते, पूर्वी नाही | सांगण्यास नकार |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील | २७० | १५५ | ९५ | १५ | ५ | — |
| विभक्त कुटुंबातील | १६२ | १०२ | ४० | १८ | — | २ |
| नोकरी-व्यवसाय करणाऱ्या | १० | ८ | १ | १ | — | — |
| | ४४२ | २६५ | १३६ | ३४ | ५ | २ |
| टक्केवारी शेकडा | | ५९.९६ | ३०.७७ | ७.६९ | १.१३ | ०.४५ |

मुलांच्या शिक्षणासंबंधी असो किंवा घरातील आर्थिक व्यवहारासंबंधी असो, तिने 'दुनियादारी पाहिलेली' नाही, म्हणून महत्त्वाच्या निर्णयात तिचे मत विचारले जात नाही. तिच्या बुद्धीविषयी, व्यवहारज्ञानाविषयी कधीच विश्वास व्यक्त केला जात नाही. त्यामुळेच तिचे बँकेत कुठे खाते नाही व मुलींना जास्त प्रमाणात ती शिक्षण देऊ शकत नाही. पण महत्त्वाच्या निर्णयाबाबत तुमचे मत विचारात घेतले जाते का असा प्रश्न उपस्थित करता आढळले की २६५ स्त्रियांबरोबर घरातील महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी विचार विनिमय केला जातो. पण महत्त्वाचे प्रश्न कोणते हे जाणण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा मला असे आढळून आले की घरातील मुलामुलींच्या लग्नासंबंधी तिचे मत विचारले जाते. तेही मत जुजबी पद्धतीने विचारण्यात येते. कुठल्याही गोष्टीचा शेवटचा निर्णय स्त्रीला घेण्याचा कधीच अधिकार नाही. मुला-मुलींच्या लग्नातील हुंड्यासंबंधीचा निर्णय, देण्या-घेण्यासंबंधीचा सर्व व्यवहार स्त्रीचा पती किंवा सासरा पहातो, त्याचबरोबर काही घरगुती वस्तूंच्या खरेदीसाठी तिचे मत विचारण्यात येते. पण त्यावेळीही तिचे मत ग्राह्य धरले जाईलच अशी खात्री नसते. घरातील आर्थिक व्यवहारासंबंधी तर तिला बरेचदा माहितीही नसते. तिचे सर्वसाधारणपणे बँकेत खातेही नसते. ती बँकेचा व्यवहारही पाहात नाही. ह्याचाच अर्थ असा की, महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारासंबंधी कुठल्याच स्त्रीला मग ती शिक्षित असो की अशिक्षित, विचारण्यात येत नाही. तसेच मुलींना शिकविण्यासंबंधीचा निर्णय तिला स्वतंत्रपणे तर घेता येतच नाही; पण तिचे त्या संबंधात मतही विचारात घेतले जात नाही. सध्याच्या बदललेल्या परिस्थितीमुळे शिक्षणाचे महत्व आता पुष्कळ महिलांना वाटू लागले आहे. स्वतःच्या पायावर उभे करण्याइतपत मुलींना शिकवावे असे त्यांना वाटू लागले आहे. पण ह्या तिच्या विचाराचा मुलीला किती शिकवावे ह्याबाबत पुरुषांनी घेतलेल्या निर्णयावर काही परिणाम होत नाही.

एकूण ४४२ पैकी १३६ (३०.७७%) स्त्रियांना त्यांचे मत कधीच विचारले जात नाही, तर ३४ स्त्रियांना (७.६९%) कधी कधी त्यांचे मत विचारले जाते.

अशा प्रकारे ह्या विविध माहितीद्वारे माहेश्वरी स्त्रीच्या रोजच्या वैवाहिक जीवनाचे चित्र माझ्यासमोर उभे राहिले आणि त्यानुसार, तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचा आलेख मला फारसा उत्साहवर्धक वाटला नाही. स्त्रियांच्या मनात काही करून दाखविण्याचा खूप उत्साह आहे. तशी तीव्र इच्छाही आहे. पण ती पूर्ण करण्यासाठी पोषक वातावरण तिला मिळत नाही. चूल आणि मूल हेच सर्वसाधारणपणे तिच्या पदरी आलेले आहे. त्यातही निर्मितीचा आनंद नाही. घरातल्या सर्वांचे हवे-नको पाहून चोख व्यवस्था ठेवायची, येणाऱ्या पाहुण्यांचे योग्य आदरातिथ्य करायचे, ह्या नि अशा असंख्य कामांतून तिला स्वतःकडे पाहायला फुरसत कोठे आहे? आणि थोडीफार

असलीच तर त्यासाठी उत्साह टिकत नाही. म्हणूनच स्त्रियांचे छंद व ते जोपासण्यास त्यांना मिळणारी संधी हे जाणण्याचा जेव्हा मी प्रयत्न केला तेव्हा असे आढळले

**तक्ता क्रमांक २६ : तुम्ही एखादा छंद जोपासता का?**

| एकूण स्त्रिया | | जोपासते | छंदच नाही | जोपासता येत नाही |
|---|---|---|---|---|
| एकत्र कुटुंबातील | २७० | १४८ | ७२ | ५० |
| विभक्त कुटुंबातील | १६२ | १०५ | ५७ | — |
| नोकरी व्यवसाय करणाऱ्या | १० | ७ | १ | २ |
| | ४४२ | २६० | १३० | ५२ |
| टक्केवारी शेकडा | | ५८.८२ | २९.४२ | ११.७६ |

की, एकूण ४४२ पैकी १३० (२९.४२%) स्त्रियांना कुठला छंदच नाही. तर ५२ स्त्रियांना काही ना काही छंद होता, पण त्यांना तो कामाच्या व्यापामुळे आणि इतर वैयक्तिक कारणामुळे जोपासता येत नाही. २६० स्त्रियांना (५८.८२%) काही छंद आहेत व त्या ते जोपासतात. त्यात कुठले छंद आहेत हे जेव्हा मी त्यांना विचारले, तेव्हा असे आढळून आले की १३८ स्त्रियांना भरतकामाचा छंद आहे, व ६४ स्त्रिया विणकामाचा, ३९ स्त्रिया भजन म्हणण्याचा, ८२ स्त्रिया वाचनाचा, व ३२ स्त्रिया शिवणकामाचा असे छंद मुख्यत: जोपसतात. बाकी स्त्रिया गप्पा मारणे, पेंटिंग्ज, पिक्चर पाहणे, गायन, घरकाम, विविध मिठाया बनवून खाऊ घालणे, फुलझाडे लावणे, पोस्टाची तिकीटे व विविध नाणी गोळा करणे इत्यादी छंद जोपासतात. साधारणपणे पारंपारिक भरतकाम, विणकाम, शिवणकाम, हे छंद मुख्यत: जोपासले जातात व त्यांना सामाजिक मान्यताही आहे.

अशा रीतीने माहेश्वरी कुटुंबातील स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू तेजस्वीपणे चकाकताना दिसत नाहीत. घराचा उंबरठा ओलांडून आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडणाऱ्या स्त्रिया येथे फारशा आढळत नाहीत. त्यास ह्या समाजाची जडणघडणच कारणीभूत असते. घराची जबाबदारी पेलून आनंदाचे क्षण त्या घरातच हुडकून काढतात व समाधानाने जीवन व्यतीत करतात. पण आता अगदी अल्प प्रमाणात का होईना काही समाजसुधारक स्त्रिया ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करत आहेत. स्त्रीमध्ये

हळुहळू जाणिवा निर्माण होत आहेत. अनंत विश्वात नसले तरी लातूरसारख्या गावात स्वत:चे अस्तित्त्व शोधण्याची संधी तिला मिळत आहे. निरनिराळ्या सेवाभावी संस्थांच्या सभासद होऊन आपले भविष्य घडविण्याच्या प्रयत्नात माहेश्वरी स्त्री हळुहळू पावले टाकीत आहे. बुरख्याआडची भित्री, घाबरट, आत्मविश्वासहीन, कर्तृत्वहीन स्त्री, आता बुरखा झुगारून स्वत:स शोधण्याचा निश्चयाने प्रयत्न करीत आहे. तिला मिळालेल्या सामाजिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर तिचे हे हळुहळू टाकलेले पाऊलही फार महत्त्वाचे आहे. स्वत:च्या अनावश्यक शृंखलांना तोडून, गत दु:खाचे नि:श्वास विसरून व अपमानित जीवनाची कहाणी नजरेआड करून ती आज नवीन वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रयत्नच लाख मोलाचा आहे. हा होणारा सामाजिक बदलच पुढे येणाऱ्या सामाजिक क्रांतीची नांदी ठरेल अशी आशा करायला काहीच हरकत नाही, असे मला वाटते.

●

## प्रकरण पाचवे

# वैधव्य - एक शाप

भारतीय संस्कृतीप्रमाणेच माहेश्वरी समाजामध्ये विधवांना हीन दर्जा व सवाष्णीला फार मोठा मान आहे. हिंदुधर्मातील काही रुढींमुळे स्त्रीचे अस्तित्वच पतीशिवाय नाकारले गेले आहे. आपल्या समाजात पतीशिवाय स्त्रीला कोठेच स्थान नाही. कुंकवाचा धनी जिवंत असला की झाले- मग तो कसा का असेना. तो दारुड्या असला, व्यसनी असला, चोर असला तरी चालेल, पण त्याच्या पत्नीला सवाष्ण म्हणून वागविणार. पण तेच एखाद्या विधवा स्त्रीला तिरस्करणीय वागणूक देणार. सर्व धार्मिक कार्यातही सवाष्णीला महत्त्व देण्यात येते. तेथे कुठेही विधवांचे काम नाही. विधवेचे दर्शन झाले म्हणजे एक अपशकुन झाला हे समाजमानसात इतके घट्ट रुजले आहे की कुठल्याही शुभकार्यात तिला अग्रस्थान तर सोडाच पण प्रवेशच नाही. आणि संस्कृतीच्या विकृत स्वरूपामुळे मुख्यत: स्त्रियाच विधवेचे दर्शन टाळतात. तिची शुभकार्यातील उपस्थिती टाळतात. तिची अमंगल(?), अपवित्र (?) उपस्थिती त्या शुभकार्यास अशुद्ध बनवून टाकेल ही भीती सर्वांना वाटते. तिचा काहीही दोष नसताना पुरुषांनी लिहिलेल्या, पोथीपुराण प्रमाण मानणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्यावर केलेला हा अनाठायी अन्याय आजही जेव्हा समाजात तसाच आढळतो तेव्हा मनाला असंख्य यातना होतात. समाजात स्त्रीला एक न्याय व पुरुषाला एक न्याय दिला जातो. एखाद्या पुरुषाची पत्नी जर मृत झाली तर त्याचे समाजातील स्थान कधीच बदलत नाही. त्याच्यासंबंधी कुणीच अनुद्‌गार काढत नाही. कुठल्याही शुभकार्यात त्याचे दर्शन अवांछनीय ठरत नाही. पण पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्रीच्या समाजातील व कुटुंबातील स्थानात आमूलाग्र बदल होतो. पण तो अन्याय तिच्या इतका अंगवळणी पडला आहे की तो बदल घृणास्पद आहे हे तिलाही वाटत नाही. सतत माणूसकीहीन वागणूक मिळत गेल्यामुळे

त्यापेक्षा वेगळा काही विचार ती करू शकत नाही. विधवांची अशी शोचनीय स्थिती समाजचित्रातील एक काळाकुट्ट भाग चित्रित करते हे तीव्रतेने जाणवते.

लातूर येथे ज्या ५६ विधवा आहेत त्यांचे वयोमान आपण मागे (प्रकरण पहिले, तक्ता क्र. १ मध्ये) पाहिले आहे. त्यांना वैधव्य कितव्या वर्षी आले हे आता पाहू या.

**तक्ता क्रमांक २७ : स्त्रिया कितव्या वर्षी विधवा झाल्या?**

| वयोगट | १३-१८ | २०-३० | ३०-४० | ४१-५० | ५१-६० | ६१-७० | ७१-८० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण विधवा ५६ | ५ | १० | ९ | १३ | ८ | ७ | ४ |
| टक्केवारी शे. | ८.९३ | १७.८६ | १६.०७ | २३.२१ | १४.२९ | १२.५० | ७.१४ |

अतिशय लहान वयात विधवा झालेल्या ज्या पाच स्त्रिया आहेत त्यांची परिस्थिति अतिशय दु:खदायक आहे. लग्न म्हणजे काय हे कळायच्या आतच त्यांच्या कपाळावरचे कुंकू पुसले गेले. त्यातील एक होती १३ वर्षाची, एक होती १४ वर्षाची, एक होती १५ वर्षाची व दोन स्त्रिया होत्या १८ वर्षाच्या. आजचे त्यांचे वय आहे ८५ वर्षे, ५५ वर्षे व ७० वर्षे. आयुष्यात दांपत्यजीवनास त्यांनी सुरुवातही केलेली नव्हती व ते सुख, तिचा काही अपराध नसताना तिच्यापासून हिरावून घेण्यात आले. त्यानंतर ती पांढऱ्या कपाळाची व पांढऱ्या पायाची म्हणून हिणवली जाऊ लागली. असेच हीन दर्जाचे, काही ना काही कारणाने सतत हिणवले गेलेले आयुष्य त्यांनी काढले. थोडेथोडके नव्हे तर ७२ वर्षे, ४१ वर्षे व ६२ वर्षे. माहेश्वरी समाजात वयाच्या वीस वर्षापासून ते पन्नास वर्षापर्यंत विधवा होण्याचे प्रमाण जास्त म्हणजे बत्तीस (५७.१४%) आहे. त्या बत्तीस विधवांच्या तुलनेत म्हातारपणी, म्हणजे वयाच्या ६० ते ८० ह्या दरम्यान विधवा झालेल्या स्त्रिया अकराच आहेत.

तरुणपणी विधवा झालेल्या स्त्रियांनी स्वत:ही कधी पुनर्विवाहासंबंधी विचार केला नव्हता. कारण समाजात विधवा पुनर्विवाहाला बंदीच होती. सतीबंदी कायदा सुरू झाल्यामुळे स्त्रिया पतिनिधनानंतर सती जात नसत. परंतु प्राप्त झालेल्या वैधव्यामुळे त्यांना मरणाहून भयंकर यातना जिवंतपणीच सोसाव्या लागल्या. वैधव्यानंतर त्यांनी कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त तीन वर्षे घराबाहेर पडायचे नाही ही समाजात रूढ प्रथा होती व आहे. जवळच्या नातेवाईकाकडे जरी कुठले लग्नकार्य किंवा शुभकार्य

असले तरी तिने तेथे जायचे नाही हा प्रघात होता. इतके कशाला, तिने दोन तीन वर्षेपर्यंत घराबाहेर पडून मंदिरालासुद्धा जायचे नाही. घरातच चार भिंतीत स्वत:ला कोंडून घेऊन ते दु:ख उगाळत बसायचे व सारे आयुष्य त्या रीतीनेच घालवायचे. तिने कुठल्याही आनंदाच्या क्षणी फार आनंदी व्हायचे नाही. आणि जर ती विधवा तरुण असेल तर तिच्यावर असंख्य बंधने लादली जायची. तिच्या बोलण्यावर, वागण्यावर, हसण्यावर खूप बंधने होती. ही बंधने जर तिने पाळली नाहीत तर तिला समाजातील लोकांची बोलणी ऐकावी लागत, अनेक कुत्सित उद्‌गार तिच्या नशिबी येत.

तिच्या कपाळावरचे कुंकू पुसले गेले आहे, म्हणून तिने कुणा सवाष्णीला कुंकू लावायचे नाही. विधवेच्या हातून कुंकू लावून घेतल्याने त्यांचे सवाष्णपण जणू काही धोक्यात येईल ! कुणी शुभकार्यासाठी घराबाहेर पडत असेल, कुणी महत्त्वाच्या कामासाठी घराबाहेर जात असेल, किंवा दुसऱ्या गावी जात असेल तर तिने त्याच्या समोर यायचे नाही. ही रूढी आजही बहुतांश ठिकाणी आहे. जायचे ते फक्त सवाष्ण स्त्रीने. लग्नकार्यात पूजेची थाळी तिने पकडायची नाही. पूजेला लागणारे हळद, कुंकू, मेंदीसारखे सामान तिने पूजेच्या ताटात काढून ठेवायचेसुद्धा नाही. तिने रंगीबेरंगी कपडे न घालता पांढरेच कपडे घालायचे. मेंदीने हात लाल करण्याची तिला मुळीच परवानगी नसे. हे असे तिने फक्त एक-दोन वर्षांपुरते नव्हे तर संपूर्ण आयुष्यभर वागायचे. पतीच्या मृत्यूनंतर दोन-तीन वर्षांनंतर तिला प्रथम घराबाहेर पडण्यास मिळते ते मंदिरात जाण्यासाठी. त्यानंतरच ती हळुहळू इतर ठिकाणी जाण्यास सुरुवात करते. हे सारे नियम ती स्त्री तरूण असो की वृद्धा, काटेकोरपणे पाळले जातात.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर पुरुषाला मात्र कुठलेच सामाजिक बंधन नसते. पत्नीच्या मृत्यूनंतर तिसऱ्या दिवशी तिच्या अस्थी गोळा करण्यापर्यंत त्याचा शोक ! त्यानंतर त्याचे सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे सुरू होतात. त्याच्या दुसऱ्या लग्नाची बोलणीही सुरू होतात. पण कुटुंबातील मानमर्यादेची, रीतरीवाज पाळण्याची सारी जबाबदारी असते ती फक्त स्त्रीवर ! म्हणूनच विधवा पुनर्विवाहाचा विचारही ह्या समाजात पाप समजला जातो. कपाळकरंट्या स्त्रीने जन्मभर असेच रडत आयुष्य काढायचे. कारण काय तर तिच्या नशिबात तसेच लिहिले आहे. आपण काय करणार ? एका विधवा स्त्रीसाठी दुसरे कोण काय करणार ? जे आहे ते तिने विनातक्रार हरीभजन करीत जगले पाहिजे. तिने आपले मन घरकामात, मुलांना सांभाळण्यात, नातवंडांच्या बोबड्या बोलात व परमेश्वरभजनात रमविले पाहिजे. ज्या परमेश्वराने तिच्यापासून वैवाहिक सुख हिरावून घेतले, ते वैवाहिक जीवन माणुसकीच्या नात्याने पुनश्च तिला माणूस म्हणून जगण्यासाठी द्यावे हे कुणाच्याही मनात येत नाही. सारेच पुरुष-संस्कृतीचे वारस ! तिच्या शीलरक्षणाची, समाजाच्या नैतिक पातळीची जबाबदारी समर्थपणे पेलणारे !

तिने फक्त व्हावयाचे आई किंवा दाई. आई-दाई बनून स्वतःच्या डोळ्यातले अश्रू तिने सेवेच्या आदर्शात पुसून टाकायचे. त्यागाची मूर्ती बनून, आई व दाईची लावली गेलेली लेबले तिने सांभाळत-जपत आयुष्य कंठायचे. त्यात कुठे विसावा असलाच तर तिने तो हरिभजनात शोधायचा. तिच्या लैंगिक गरजेबाबत सारा समाज उदासीनच आहे.

विधवा झाल्याच्या संकटाबरोबर तिच्यावर असंख्य संकटांची मालिका कोसळते. तिचे ते दुःख अधिक क्लेशदायक होते ते माहेश्वरी समाजातील अत्यंत निंद्य अशा रूढीने व पद्धतीने. तिच्या जीवनात जे काही घडले त्यासाठी जणू तिलाच संपूर्ण जबाबदार धरले जाते व तिची होणारी अवहेलना प्रत्येक रीतीरिवाजातून प्रकट होते. विधवा झाल्याबरोबर तिची सारी सौभाग्याची वस्त्रे, दागिने म्हणजे बांगड्या, मंगळसूत्र, नाकातील मोरणी, पायातील जोडवे व चेन इत्यादी उतरवली जातातच पण त्याचबरोबर एकेचाळीस दिवस तिला एका खोलीत कोपऱ्यात बसवून ठेवण्याची जणू शिक्षा होते. तिने तेथेच बसून राहायचे, भला मोठा घुंघट काढायचा व भेटायला येणाऱ्या प्रत्येक स्त्री किंवा नातेवाईकासमोर मोठमोठ्याने रडायचे. तिने घरात सव्वा महिना कुठेही शिवायचे नाही. ती विधवा झाली म्हणजे अपवित्र व अशुद्ध झाली. म्हणून तिने प्यायच्या पाण्याला व स्वयंपाकाच्या ओट्याला स्पर्शही करायचा नाही. हिंदुधर्मातील संस्कारानुसार मृतकाचा बारावा दिवस केल्यानंतर तिला माहेरच्या माणसांनी एक साडी नेसवायची असते. ती साडी तिच्या हातात दिली जात नाही तर तिच्या अंगावर दुरून फेकली जाते. पुढे येणाऱ्या लाचार, मानहानीच्या जीवनाची ती जणू नांदी ठरते. एकेचाळिसाव्या दिवसानंतर कुठल्यातरी तीर्थस्थानास तिला नेले जाते व तिचे केस नवऱ्याच्या नावाला अर्पण केले जातात. आज ही पद्धत कमी प्रमाणात आढळते. पण ती पूर्णपणे नष्ट झालेली नाही. स्वातंत्र्यपूर्व काळातील लातूर येथील विधवांच्या जीवनात अशी पद्धत सर्रास पाळली जात असे. तिने जर तसे केस अर्पण केले तर तिला खूप पुण्य लागते व ती पूर्णपणे शुद्ध होते हा विचार सर्व स्त्री-पुरुषांच्या मनात घट्ट रुजविण्यात आलेला होता. आजही पतीच्या नावावर थोडेतरी केस अर्पण करावे हा अलिखित नियम आहे. त्याशिवाय ती शुद्ध झाली असे मानण्यात येत नाही. ह्या नि अशा असंख्य रुढींनी ही विधवा घेरली गेलेली आहे.

लातूर येथे ज्या ५६ विधवा आहेत त्यातील ४४ विधवा निरक्षर आहेत. बाकीच्याही थोडेसे वाचता येईल एवढेच शिकलेल्या आहेत. त्यामुळे शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या ह्या स्त्रियांना सामाजिक सुधारणेसंबंधी काही सांगितले तरी ते पटत नाही. त्यांचा बहुतांशी वेळ देवळात पोथीपुराणे ऐकण्यात जातो. त्यातील अतिरंजित कथा त्या ऐकतात व त्यावर पूर्ण विश्वास ठेवतात. पुरुषांनी लिहून ठेवलेली निरनिराळी व्रतवैकल्ये

करून आपल्याही जीवनात एखादा चमत्कार घडेल अशी अपेक्षा त्या ठेवतात. त्या कथा स्त्रियांच्या मनात हीनतेची भावनाच जास्त प्रमाणात निर्माण करतात. आपल्याच नशिबाला दोष देत जीवन जगणाऱ्या ह्या असहाय स्त्रियांच्या स्थितीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी त्यांचे नातेवाईक व समाज टपलेले असतात. म्हणूनच पतीच्या मृत्यूनंतर तिला पतीची मालमत्ता मिळाली का हा प्रश्न जेव्हा मी त्यांना विचारला तेव्हा वरील सत्यावर प्रकाश टाकणारीच उत्तरे मला मिळाली. पतीच्या मृत्यूनंतर २९ स्त्रियांना पतीच्या मालमत्तेतील काहीच मालमत्ता मिळाली नाही. २२ महिलांना थोडीफार मिळाली. एका स्त्रीने सांगण्यास नकार दिला व फक्त चार स्त्रियांना पतीची पूर्ण मालमत्ता मिळाली. ह्याचाच अर्थ असा की पतीनिधनानंतर त्याच्या मालमत्तेवर पत्नीचा अधिकार आहे हे व्यवहारात दिसत नाही. तिच्या अधिकाराचे तिला काहीच मिळत नाही व त्यामुळे ती आर्थिकदृष्ट्या परावलंबी बनून नाईलाजाने तिला लाचारीचे जीवन जगावे लागते.

ज्या चार स्त्रियांना पतीची पूर्ण मालमत्ता मिळाली ती त्यांनी आपल्या मुलाच्या नावावर करून टाकली. मुलगा म्हणजे सर्वस्व. त्याला सर्व मालमत्ता दिली तर काय बिघडले हा विचार त्यामागे आहे. पण त्यानंतर प्रत्येक गोष्टीसाठी मुलाकडे पैसे मागावे लागतात ह्या कटुसत्याला त्यांना सामोरे जावे लागते. त्यात कधी कधी धुसफुसही होते. पण त्याकडे दुर्लक्ष करून ती मुला-नातवंडांसमवेत समाधानाने जगण्याचा प्रयत्न करते. कारण त्याशिवाय तिच्यासमोर दुसरा पर्यायच नसतो.

अशारीतीने आर्थिक परावलंबी असल्याकारणाने एखाददुसरा अपवाद सोडल्यास प्रत्येक विधवा स्त्रीला दोन वेळच्या पोटभर जेवणाची चिंता आहे. ह्या मूलभूत गरजेपोटी ती आश्रितासारखी माहेरी किंवा सासरी आपले जीवन व्यतीत करत आहे. काही स्त्रिया स्वत: पापड किंवा मसाले तयार करून काही उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांच्या हलाखीचे दिवस संपत नाहीत. कित्येक वेळेला त्यांना आपल्या मुलाबाळासमवेत उपाशी पोटीच झोपावे लागते. अठराव्या वर्षीच विधवा झालेल्या सत्तर वर्षाच्या वृद्धेचा हाच अनुभव आहे. ती आधारासाठी माहेरी गेली पण तेथेही तिची अवस्था मोलकरणीसारखीच. सारे पैशाचे सोबती असतात हे तिला तीव्रतेने जाणवते. तिला माहेरीही काही अधिकार नसून दिवसभर राबावे लागते व त्या मोबदल्यात तिला दोन वेळचे जेवण मिळते. लग्नानंतर केवळ सहा वर्षात पतीसुखापासून वंचित राहिलेल्या वृद्धेला तीव्रतेने जाणवते की पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचे घरातील स्थान आमूलाग्र बदलते. तिला माहेरचा आधार जरी मिळाला तरी तिची अवस्था माहेरीही 'परायी' व सासरी तर दुसऱ्या घरून आलेली. म्हणूनच तिची अवस्था 'धोबीका कुत्ता न घरका न घाटका' अशी झालेली आहे. पोटाची खळगी भरण्याचा हा प्रश्न सर्वसाधारणपणे सर्व विधवांना सतावतो.

साठ वर्षाची एक वृद्धा मुलाकडून दुर्लक्षिली गेल्यामुळे आधार असूनही निराधार विधवेचे लाचार जीवन जगत आहे. तिच्या माहेरहून आलेली मालमत्ताही मुलाने व सुनेने लुबाडून घेतली व त्यामुळे ती आपल्याच घरात तिऱ्हाईतासारखे जीवन जगत आहे. तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तिचे सारे अधिकार हिरावून घेण्यात आले. स्वत:च्या मुलीच्या लग्नातही तिला कोणताच अधिकार मिळाला नाही.

बहुतांशी प्रत्येकीचे आयुष्य अंगावर शहारे आणणारे आहे. जगण्यासाठी प्रत्येकीला असंख्य अत्याचार सोसावे लागले व लागतात. अगदी कोवळ्या वयात वैधव्य आल्यामुळे त्यांना सामाजिक व कौटुंबिक अशा अनंत बंधनांसह माहेरी किंवा सासरी, परिस्थितीशी तडजोड करीत लाचारीचे व सत्वहीन जीवन जगावे लागले आहे. तिला घरकामाव्यतिरिक्त काही काम करून अर्थार्जन करण्याची परवानगीही सहसा मिळत नसे. कारण तो सासर-माहेरच्या प्रतिष्ठेचा प्रश्न समजला जाई. अशा ह्या साऱ्यांची कहाणी थोड्याफार फरकाने समानच आहे.

तेराव्या वर्षीच लग्न लागलेल्या ५५ वर्षे वयाच्या वृद्धेचा अनुभवही असाच आहे. एका वर्षातच वैधव्य प्राप्त झालेल्या स्त्रीला माहेरच्या गरिबीमुळे सासरीच राहावे लागले. त्या कारणाने तिच्या सासूने तिचा नानाप्रकारे अमानवी असा छळ केला. तिचा पती कमविण्यासाठी जिवंत नव्हता. मग तिला फुकटचे कशाला पोसायचे ? तिच्या वयाच्या मानाने तिला न झेपणारी घरातील सारी कामे तिने केली तरी सासू कधीच खूष होत नसे. विहिरीतून पाणी आणणे, घरी जात्यावर दळण दळणे, स्वयंपाक करणे, गुराढोरांचे सर्व पाहणे, भांडी-धुणी करणे ह्या तिच्या कामाचे मूल्य घरात कुणालाच वाटत नसे. तिला घरात सांभाळणे म्हणजे तिच्यावर उपकारच अशी भावना घरातील सर्व माणसांची असे. तिने चांगले खाऊ-पिऊ नये व चांगले दिसू नये त्यासाठीही सर्व मार्ग हाताळले जात. तिला भूक लागली तरी, सासूने जेवावयास वाढल्याशिवाय तिला दोन वेळेला जेवणही मिळत नसे. बाकी साऱ्या खाण्याच्या वस्तू कुलुपात ठेवल्या जात. तिला व तिच्याच बरोबरीच्या दुसऱ्या एका बालविधवेसही हीच वागणूक घरात मिळत असे. त्या 'कपाळकरंट्यांना' प्रेमाचे दोन शब्द तर ऐकायला मिळतच नसत, पण पोटभर खायलाही मिळत नसे. उरले सुरले खाऊन त्यांनी कसेबसे पोट भरावे किंवा अर्धपोटीच राहावे हीच त्यांच्याकडून अपेक्षा असे. घरात सणावाराला झालेले गोडधोड जेवण त्यांच्या नशिबी क्वचितच येई. "विधवांना कशाला हवे असले जिभेचे चोचले ?" हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा केला जाई. एवढ्यावरच हे सारे थांबले नाही. तिने जेव्हा काही मालमत्तेची, पतीच्या पश्चात वाटणीची मागणी केली तेव्हा तिला घराबाहेर हाकलून देण्यात आले. पदरी कुठले मूल नसलेली ती निराधार विधवा शेवटी माहेरी आधाराला आली व तेथे घरीच काबाडकष्ट करून जगू लागली. आजही तिला

दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. आज ती काही ना काही पापड वगैरेसारखा छोटा उद्योग करून पैसे मिळविण्याचा प्रयत्न करते. पण ते पुरेसे होत नाहीत. वैवाहिक सुख तर तिच्यापासून नियतीने हिरावून नेले. पुनर्विवाहाचा विचार कुणीही न केल्यामुळे ते तिला कधीच मिळाले नाही. मातृत्वाची इच्छा तृप्त व्हावी म्हणून तिने एक मुलगा दत्तक घेतला. पण नियतीने तोही तिच्यापासून लगेच हिरावून घेतला. अशाप्रकारे मानसिक, शारीरिक व आर्थिक हालअपेष्टात जगलेल्या आयुष्यात तिला आशेचा एक किरणही दिसलेला नाही.

तेराव्या वर्षी लग्न होऊन सहा महिन्यांतच विधवा झालेल्या पंचाहत्तर वर्षे वयाच्या निरक्षर विधवेची कहाणीही थोड्याफार फरकाने अशीच. माहेरी गरिबी असल्याकारणाने आयुष्यभर दीराच्या संसारात काबाडकष्ट करून, कुठल्याही अधिकारापासून वंचित राहिलेल्या ह्या विधवेस अनंत अत्याचार सहन करावे लागले आहेत. पण राहायला आसरा, जेवायला दोन वेळेला, हलक्या प्रतीचा का होईना पण नेसायला कपडा मिळत आहे हे काय कमी आहे का ? असा विचार करून ती तेथे राबते आहे. पहाटे चार वाजल्यापासून रात्री अकरा-बारापर्यंत घरकाम करत असताना तिला प्रेमाचा एक शब्दही कधी ऐकण्यास मिळाला नाही. ती त्या घरावर एक ओझे म्हणूनच समजली गेली.

चौसष्ट वर्षे वयाच्या विधवेला तर आपल्या मुलाच्या तोंडाकडेच पाहावे लागते. कारण मृत्यूपूर्वी पतीने स्वतःची सारी मालमत्ता मुलाच्या नावावर केली होती. तिच्या नावावर काहीच नसल्याकारणाने तिला वृद्धावस्थेतही स्वतंत्रपणे जगता येत नाही. कुणाच्या ना कुणाच्या कृपादृष्टीवरच तिला जगावे लागते.

असहाय्य विधवेला अडचणीत पाहून सारे नातेवाईकदेखील तिच्यावर अन्याय करताना दिसतात. अठ्ठावन्न वर्षे वयाच्या विधवेला पतीच्या मृत्यूनंतर साऱ्यांनी लुबाडले आहे. तिच्या मालमत्तेवर कब्जा करून तिला अतोनात सतावले आहे. दोन लहान मुलींना घेऊन कोर्टात दावा लढविण्यासाठी ती आर्थिक व मानसिक बळ कोठून आणणार ? घरच्या अशा गरीब परिस्थितीमुळे तिच्या प्राध्यापक झालेल्या मुलीने हुंड्यासाठी लग्नच करण्याचे नाकारले आहे. हुंडा घेतल्याशिवाय तिच्याशी लग्न करण्यास कोणीही तयार नसल्यामुळे तिचा संसार उभा राहू शकला नाही. ह्याची खंत या वृद्धेला आजही आहे.

घरच्या गरिबीमुळे मुलींना विकून (!) मुलाकडून पैसे घेणारे आईवडील पाहिले की स्त्रीची समाजात काय स्थिती आहे ह्याची कल्पना येते. आज ६५ वर्षे वय असलेल्या वृद्धेचे लग्न तिच्या १६ व्या वर्षी ४० वर्षे वयाच्या प्रौढ माणसाशी लावून तिच्या वडिलांनी ५००० रु. तर घेतलेच पण शिवाय तिच्या सासरचे दागिनेही लुबाडून घेतले. त्यानंतर तिला आधार दिला तो तिच्या सासऱ्यांनी व दीरांनी आणि आता

कर्ता झाल्यावर मुलाने.

पंचावन्न वर्षांच्या विधवेलाही अशाच निंद्य अनुभवातून जावे लागले. तिच्या वडिलांनीही ५००० रु. घेऊन तिचे लग्न एका बिजवराशी लावून दिले. माहेरी-सासरी दोन्हीकडे गरीबी, कर्त्या मुलांनीही तिच्याकडे पाठ फिरवलेली, अशा अवस्थेत ती हलाखीचे जीवन जगत आहे. विधवा झाल्यानंतर तिच्यावर घरात जी बंधने पडली त्याची आठवणही तिला आज नकोशी वाटते. विधवा झाली म्हणून तिला कोणाशी बोलायची बंदी होती, तिच्या हसण्यावर बंधने होती व तिला अर्थार्जनासाठी बाहेर पडायलाही परवानगी नव्हती. पण शेवटी पोटाची भूक शमविण्यासाठी तिने घरी पापडाचा उद्योग सुरू केला व कसेबसे दिवस काढले. पण तिच्या दुर्दैवाने तिची कर्ती मुले तिची जबाबदारी उचलत नाहीत व त्यामुळे तिच्या परिस्थितीत काहीच बदल घडून आलेला नाही.

लग्नानंतर तीनच वर्षांनी म्हणजे पंधराव्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या ५५ वर्षे वयाच्या वृद्धेचा अनुभवही असाच. लग्नानंतर २५ वर्षे सासरी राहताना एखाद्या कैद्यासारखी, घरात कोंडलेल्या अवस्थेत ती राहिली. कारण 'तरुण विधवेचे पाऊल वाकडे पडले तर काय करायचे?' हा प्रश्न घरातील मंडळींना पडला होता. अतोनात त्रास सहन करत तिने सासरी दिवस काढले. पण शेवटी असह्य झाल्यावर ती माहेरी, भावाकडे आधाराला आली. सासरच्या मिळकतीतून तिला काहीही न मिळता ती भावाकडे आश्रितासारखी राहाते. स्वत:चे काही मूलबाळ नसल्याकारणाने भावाच्या संसारात स्वत:चे मन रमविते. पण तिच्या मनाचा झालेला कोंडमारा ती विसरू शकत नाही.

त्रेपन्न वर्षांच्या, ३१ व्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या श्रीमंत कुटुंबातील विधवेचा प्रश्न वेगळाच आहे. पतीनेच मृत्युपत्र करून ठेवल्यामुळे पतीच्या मृत्यूनंतर तिला सारी मालमत्ता मिळाली. त्यामुळे पैशाचा काही प्रश्न नव्हता. पण मुलांवर प्रेम करणारे, त्यांना शिस्त लावणारे, मार्गदर्शन करणारे, असे कोणी नव्हते. पतीच्या मृत्यूच्या धक्क्यामुळे तिचे मन इतके सुन्न झाले होते की, तिला घराकडे, मुलाकडे पाहण्याचीही शुद्ध नव्हती. किंबहुना घर कर्तेपणाने चालवायचे असते ह्याची जाणीव नव्हती. त्यामुळे मुले व्यसनाधीन बनून गैरमार्गाला लागली. ते प्रश्न तिला जीवनात कायम दु:खी बनवत गेले. त्यातून तिला आधार वाटतो तो फक्त परमेश्वराचा.

पंधराव्या वर्षी ३० वर्षे वयाच्या बिजवराशी लग्न लागलेली साठ वर्षांची वृद्धा जेव्हा वयाच्या २७ व्या वर्षी, म्हणजे तरुणपणी विधवा झाली, तेव्हा जीवनात ठामपणे उभे राहण्यास तिला सतत संघर्ष करावा लागला आहे. एकट्या तरुण विधवेला, कोणीच आधार न देता तिला लुबाडतात हे तिने अनुभवले आहे. स्वत:च्या पतीच्या मालमत्तेतील

वाटा भांडून मिळवून तिने असंख्य संकटांना तोंड देत शेती करली आहे. सासरच्या मंडळींनी तिच्या शेतातील माल पळविणे, मालाची गाडी पळविणे इत्यादी अनेक प्रकारे तिला त्रास दिला. कारण माहेश्वरी समाजातील एक तरुण विधवा अशाप्रकारे स्वतंत्रपणे जगते हे कुणाला मान्य नव्हते. पण त्यातूनही तिने मार्ग काढला. साऱ्या आर्थिक, सामाजिक, व कौटुंबिक अडचणींवर मात करीत आपल्या भावाच्या आधाराने तिने आपल्या मुलांचा सांभाळ केला.

अशा ह्या साऱ्या शब्दचित्रांतून एक गोष्ट प्रखरपणे जाणवते की सून म्हणून आलेल्या पण अकाली विधवा झालेल्या या छोट्या मुलींचा विविध प्रकारे छळ होत असे. तो छळ करणारी प्रामुख्याने तिची सासूच असे. दुसरी गोष्ट स्पष्टपणे जाणवते की, विधवेला माणूस म्हणून जगण्याचाच अधिकार नाकारला गेला आहे. तिला आर्थिक स्वातंत्र्य तर नसेच पण असंख्य सामाजिक बंधनांत ती जखडून ठेवलेली असे. तिची अवस्था घरातील मूक जनावरापेक्षा वेगळी नसे. स्वतःच्या दुःखांना, अत्याचारांना वाचा फोडण्याचे साहस तिच्यात कधीच नव्हते. परावलंबी, आश्रित, लाचार व विचारहीन असे जीवन ती पुढे ढकलत असे. तिच्या लैंगिक गरजेसंबंधी तर कुठेच, कुणीच विचार केलेला नाही. निसर्गदत्त भावनांना दाबून टाकण्याचे संस्कार तिच्यावर सतत झाले आहेत. अशा रीतीने घराच्या चौकटीत बंदिस्त जीवन जगणारी, बाहेरच्या जगात पाऊल टाकण्यास घाबरणारी, पापभीरू, श्रद्धाळू व धार्मिक अशी ही विधवा वर्षानुवर्षे एक शापित जीवन जगते आहे, त्यागमूर्तीच्या वलयात, स्वतःच्या काहीही पाऊलखुणा न ठेवता जळून राख होते आहे.

●

## प्रकरण सहावे

# काही शब्दचित्रे

### एकत्र कुटुंबात राहाणाऱ्या स्त्रियांची काही शब्दचित्रे

माहेश्वरी समाजात देण्याघेण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्यामुळे देण्याघेण्याला एक सामाजिक प्रतिष्ठा मिळून त्यात काही वावगे आहे, असे कोणालाच वाटत नाही. लग्नाच्या वेळी सामाजिक प्रतिष्ठा जपण्यासाठी, आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी व वरपक्षाकडील मंडळींना जास्तीत जास्त पैसे देऊन खूष करण्यासाठी, लग्नात दिखाऊ खर्चदेखील खूप वाढलेला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की हुंड्याची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अपेक्षा ठेवणारे आणि त्याप्रमाणे खूष व नाराज होणाऱ्या महाभागांची संख्या वाढत आहे. अत्यंत हुशारीने जास्तीत जास्त हुंडा कसा मिळवावा याच्या योजना आखण्यात वरपक्ष तरबेज होत आहे व त्यामुळेच स्त्रियांवर हुंड्यासाठी होणाऱ्या अत्याचारात बेसुमार वाढ झाली आहे. म्हणूनच समाजात कित्येक कुटुंबे उध्वस्त होताना दिसतात किंवा असंतोषाच्या पायावर तशीच रडत-खडत चालत राहिलेली दिसतात. अशा सर्व परिस्थितीत सुनांचा छळ करणारी प्रामुख्याने असते तिची सासू, ती स्वतः सून असताना कधी काळी मिळालेल्या अमानवी वागणुकीची ही प्रतिक्रिया आहे, असेच दिसते.

पन्नास वर्षे वयाच्या, दुसरीपर्यंत शिक्षण झालेल्या स्त्रीला आपल्या मुलीचा संसार उध्वस्त झाल्याचे दुःख सहन करावे लागले. मुलीच्या लग्नात वीस हजार रुपये हुंडा देऊन तिचे लग्न चांगल्या थाटामाटात लावून दिले. चांगला शिकलेला जावई, पण लग्नाअगोदर जेव्हा मुलीला पाहायलाही आला नाही, तेव्हाच तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. पण सारे व्यवस्थित होईल या आशेवर लग्न लावले. पण लग्नानंतर

दोन-तीन महिन्यांच्या आतच जावयाने मुलीला माहेरी आणून सोडून दिले- कोणतेही कारण स्पष्टपणे न सांगता. त्यांना जास्त हुंडा देणारी, दुसरी सून मिळत आहे, असे ऐकले. त्यामुळे तिच्या मुलीला नांदवायची त्यांची तयारीच नाही. "तुमची मुलगी वाईट चालीची आहे" असे खोटे आरोप करून कोर्टात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. अजून घटस्फोट मिळाला नसला तरी तिच्या मुलीचे भावविश्व तर उध्वस्त झालेच आहे. या अनुभवामुळे मुलगी दुसरे लग्न करण्यासही तयार नाही. पती, सासू, सासरे यांच्या अशा वागण्यामुळे ती मुलगी वैवाहिक जीवनास कंटाळून गेली आहे. त्याचा परत अनुभव घेण्याची तिची इच्छा नाही.

तेवीस वर्षे वयाच्या पदवीधर तरुणीच्या लग्नात चांगला ऐशी हजार रु. हुंडा दिला गेला. मानपान, सणवार, सर्व व्यवस्थित झाले. हुंड्यासाठी तिचा प्रत्यक्ष छळ होत नाही- पण ती सासरी 'उपरीच'. कारण आजतागायत तिला खर्चासाठी पैसे माहेरूनच आणावे लागतात. सासरच्या घरात तिचाही काही अधिकार आहे, असे मानलेच जात नाही व सासरच्या माणसाकडून तिला कधीच एक पैसाही मिळत नाही. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे सर्व अधिकार चालतो तो वडिलधाऱ्या मंडळींचाच. आपल्या मुलांच्या शिक्षणासंबंधीही काही निर्णय घेण्याचा तिला अधिकार नाही.

अठ्ठावीस वर्षे वयाच्या, मॅट्रिक झालेल्या तरुणीच्या सासरीदेखील हीच तऱ्हा. सासर-माहेर श्रीमंत असून साठ हजार रुपये हुंडा दिला गेला. पण सासरी तिला एकही पैसा खर्चायला मिळत नाही की स्वतःच्या मुलांसंबंधी काही निर्णय घेता येत नाहीत. सारे काही वडिलधाऱ्या मंडळींच्या मर्जीवर अवलंबून असते. घरात तिची किंमत शून्य आहे. कुठे जायचे झाले तरी सासऱ्यांच्या परवानगीने जावे लागते. घरातील मोठी सून म्हणून कामाची सारी जबाबदारी तिने पेलायची, पण दुपारच्या झोपेचा-विश्रांतीचा मात्र तिला हक्क नाही. लग्न होऊन आलेली नवीन सून जर दुपारी थोडेफार झोपू लागली तर ती उपहासाचा व चेष्टेचा विषय बनते. धाकट्या सुनांसाठी ही परिस्थिती आता बदलली असली तरी तिच्या बाबतीत मात्र सगळ्यांचा दृष्टिकोण बदलला नाहीच.

सातवीपर्यंत शिकलेली, पंधराव्या वर्षी घुंघटमध्ये पाच हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली, सदोतीस वर्षे वयाची स्त्री. सासरी अत्यंत जुने वातावरण. कुठले निर्णयस्वातंत्र्य नाही की कसला मोकळेपणा नाही. स्त्री म्हणून पुष्कळ बंधनांतच तिला राहावे लागते. घरात सत्ता चालते ती सासऱ्यांचीच. त्यामुळे त्यांच्या विक्षिप्त कल्पनांनुसारच घराचा सारा कारभार चालतो. घरातल्या सुनेने लवकर पहाटे उठून सर्व पुरुष उठावयाच्या अगोदर सर्व काही आवरून घ्यायचे- या जुन्या जमान्यातील कल्पना आजही तिचे सासरे कवटाळून आहेत व म्हणूनच, तिच्या लग्नाला बावीस

वर्षे झाली तरीही तिच्या घरात बंद न्हाणीघर बांधण्यास त्यांनी तिला परवानगी दिली नाही. पतीबरोबर कुठे जाण्या-येण्यास तिला बंदी तर आहेच, पण घरात गॅसवर स्वयंपाक करायचा नाही, हे बंधनही तिला पाळावे लागते. अशा विविध गोष्टींमुळे व सासऱ्यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे घरात नेहमीच वादळे उठत असतात. पण एकुलता एक मुलगा व सून सासऱ्यांसमोर काही बोलू शकत नाही की त्यांना विरोध करीत नाही. त्यांच्याशी वादविवाद करण्याचे ही दोघे टाळतात, व आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतात.

तेवीस वर्षे वयाची, गोरी, सुंदर, कॉलेजची दोन वर्षे शिकलेली तरुणी. लग्नाअगोदर पतीस पाहाण्याची संधीही उपलब्ध न झालेल्या या तरुणीची व्यथाही घरातील वडिलधाऱ्या मंडळींच्या एकाधिकारशाहीने निर्माण झालेली आहे. आईवडिलांच्या इच्छेचा मान ठेवून लग्नापूर्वी पतीशी काहीही संवाद न साधता लग्न केले. लग्नानंतर घरातल्या मोठ्या सुनेची जबाबदारी सांभाळता सांभाळता व सासू-सासऱ्यांची इच्छापूर्ती करता करता ती स्वतःचे स्वत्वच विसरून गेली आहे. घरात कितीही श्रीमंती असली व नोकर-चाकर असले तरी सुनेने काम हे केलेच पाहिजे; ह्या कारणामुळे दिवसभरातून एखादा तासही रिकामा काढणे तिला मुश्किल होते. त्यात सर्वांच्याच खाण्या-पिण्याच्या, स्वच्छतेच्या अशा काही सवयी आहेत की तिचे घरकाम दिवसभर संपत नाही. तिला वाईट वाटते ते ह्याचे की मुलांकडे तिला जे लक्ष द्यावेसे वाटते, ते देखील ती देऊ शकत नाही. मुलांच्या मानसिक वाढीकडे दुर्लक्ष करून, त्यांना नोकरांच्या हाती तिला सोपवावे लागते. त्यात घरातले वातावरण सनातन रीतीरिवाजांचे. त्यामुळे दैनंदिन जीवनात वागताना कोठेच मोकळेपणा मिळत नाही. तिला महत्त्वाच्या गोष्टीत तर निर्णय-स्वातंत्र्य तर नाहीच, पण साधे मैत्रिणीकडेही जायचे झाल्यास खूपच बंधने पाळावी लागतात. या साऱ्या कोंडमाऱ्यास ती वाट करून देते ती रात्रीच्या वेळी काही लिखाण करून. पण ते लिखाण देखील तिच्या व तिच्या पतीपुरतेच मर्यादित असते. पतीला तिच्या स्थितीबद्दल सहानुभूती वाटते, पण तोही ही स्थिती बदलू शकत नाही. म्हातारपणी सासू-सासऱ्यांना सांभाळणे हे त्यांचे कर्तव्य असल्याकारणाने व वडिलधाऱ्या मंडळींच्या उपकाराच्या कर्जातून उतराई होण्यासाठी जीवनातल्या त्यांच्या कल्पना ती घरात राबवत असते. तिच्या दृष्टीने त्यातच कुटुंबाचे हित व समाधान असते. मग त्यासाठी तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा बळी द्यावा लागतो, याची तिला फार खंत नसते.

एकसष्ट वर्षे वयाची, दिसायला साधारण, निरक्षर, व अत्यंत भेदरलेली अशी वृद्धा. जुन्या व नव्या विचारांच्या संघर्षातून निर्माण झालेली तिची व्यथा. आज पस्तीस वर्षे पती जिवंत असूनही पतिसुखास पारखी झालेली स्त्री. निरक्षर व अत्यंत जुन्या वातावरणात वाढली असल्याकारणाने माहेश्वरी समाजातल्या परंपरागत घागरा-ओढणी,

चोर इत्यादी पेहरावाची तिला खूप आवड होती. पण पतीच्या मनात, लग्नानंतर लगेचच जरा सुधारणावादी विचार येऊ लागले. त्याने परंपरागत पोशाख करण्याची तिला मनाई केली. पण सुधारणेचे वारेही न लागलेल्या ह्या स्त्रीला या गोष्टीचे आकलनच झाले नाही, तिने स्वतःच्या आवडीनुसार आपला पारंपरिक वेषच परिधान केला. पण या दृश्य क्षुल्लक कारणाने चिडून जाऊन पतीने तिच्याशी सारे संबंध तोडून टाकले. स्वतःच्या विक्षिप्त स्वभावामुळे तो घरात निरनिराळे प्रश्न निर्माण करून ठेवतो. पण घरात त्याचीच एकाधिकारशाही चालते व त्याच्या विक्षिप्त कल्पना सर्वांना अंमलात आणाव्याच लागतात. घरात बंद बाथरूम नसणे, गॅसवर स्वयंपाक न करणे, अशा गोष्टीही घरात पैसा असूनदेखील त्यांना मानाव्याच लागतात. एकच गोष्ट न ऐकल्याचा परिणाम ती आजपर्यंत भोगते आहे. तेव्हा आणखी काहीही विपरीत न घडण्यासाठी ती गप्प बसून सारे ऐकत असते, सहन करीत असते, व आपल्या नातवंडात आपले मन रमविण्याचा प्रयत्न करते.

साक्षर असणाऱ्या, अत्यंत जुन्या वळणातील सासरी राहणाऱ्या प्रौढेची व्यथा वेगळीच आहे. भोळसर असणाऱ्या या स्त्रीस लग्नाअगोदर पतीने पसंत केलेले नव्हते. लग्न ठरविले गेले ते सासू-सासऱ्यांच्या इच्छेने. पण लग्नानंतर तिला मानसिक धक्का बसला व तिला मानसोपचार घेण्यासाठी रुग्णालयात दाखल करावे लागले. आताही ती थोडीफार असंगत व अर्धवटासारखी वागते. त्याचे कारण शेजाऱ्यांकडून कळले. ती स्वतः तर काही सांगण्याच्या मनःस्थितीत नव्हतीच. तिच्या पहिल्या बाळंतपणाच्या वेळी तिच्या पतीने दुसऱ्या स्त्रीशी संबंध ठेवल्यामुळे तिला मानसिक धक्का बसला. घरात वडिलधारी माणसे असतानाही स्वतःच्या घरात दुसऱ्या स्त्रीला आलेले पाहून तिला अतिशय दुःख झाले, व तिच्या मनाचे संतुलन बिघडले. तिला घरात अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळते, पोटच्या मुलांकडूनही ती अपमानित होते. भगवंताच्या नामस्मरणात स्वतःचे जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न ती करते.

पदवीधर, पंचवीस वर्षे वयाची तरुणी. लग्नापूर्वीही मुलगी म्हणून तिला बऱ्याच प्रश्नांना सामोरे जावे लागले. डॉक्टर होण्याचे स्वप्न तिला वडिलांच्या इच्छेखातर तिला सोडून द्यावे लागले. डॉक्टर होण्यात सात वर्षे घालविल्यानंतर माहेश्वरी समाजात तिचे लग्न वेळच्या वेळी कसे होईल, असा प्रश्न तिच्या वडिलांना पडला होता. सासरी तसे मोकळे वातावरण असले तरी एकत्र कुटुंबातील पुरुषप्रधान संस्कृतीच्या वळणामुळे तिला आपल्या बऱ्याच महत्त्वाकांक्षांना मुरड घालावी लागते. कुटुंबातील साऱ्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींची पूर्तता करण्यात स्वतःच्या व्यक्तिविकासास तिला वेळच मिळत नाही. एकत्र कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळींच्या विचारानेच काम करावे लागत असल्यामुळे, आधुनिक सुखसोयींचा वापर करून काम लवकर संपविण्याचीही परवानगी

तिला मिळत नाही. त्यामुळे तिच्या कर्तृत्वाला पुष्कळ बंधने पडतात, याची तिला खंत वाटते. तिला मुख्यतः या गोष्टीचे वाईट वाटते की महत्त्वाच्या निर्णयाबाबत तिचे मत विचारात घेतले जात नाहीच, पण स्वयंपाकघर ह्या तिच्या कार्यक्षेत्रात देखील तिच्या बुद्धीवर विश्वास ठेवला जात नाही.

चौसष्ट वर्षांची, जुन्या रीतीरिवाजाप्रमाणे लग्न झालेली वृद्धा. पती-पत्नी एकाच गावात-गल्लीत राहाणारे, पण लग्नाअगोदर एकमेकांकडे पाहण्याचीही चोरी होती. तसा कधी चुकून योग आलाच तर पालकांच्या शिव्या मिळण्याची भीती. पण लग्नानंतर पतीच्या सुधारणावादी मतांची अंमलजबावणी करीत, घुंघट-पद्धतीला विराम देत, माहेश्वरी समाजातील पहिली नगरसेविका होण्याचा मान मिळविणाऱ्या या स्त्रीला समाजातील कुत्सित, उपहासात्मक निंदानालस्तीला तोंड द्यावे लागले. परपुरुषांशी घुंघट न घेता मोकळेपणाने बोलणारी स्त्री म्हणजे गावातील इतर स्त्रियांच्या चर्चेचा विषय असे. पण पतीच्या पाठिंब्याने ते दिव्यही पार पडले. आपल्या मुला-मुलींचे लग्न घुंघट न घेता या परिसरात प्रथमच करणारे हे जोडपे. सारा गाव कुजक्या बोलण्याने त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न करीत होता. पण पतीच्या आधुनिक विचारात पावलोपावली सावलीसारखी साथ देणाऱ्या या स्त्रीने समाजसुधारणेचे महत्त्व जाणून पावले टाकली. त्यासाठी समाजाचा ओढवलेला रोषदेखील तिने खंबीरपणे सहन केला.

फक्त हुंड्यासाठी सुनेचा सारा छळ होत असे, असे नाही, तर सासू आणि सून ह्यांचे एक विचित्रच नाते समाजात निर्माण झालेले आढळते. या संबंधातील तेढ ही काही वेळेला अनाकलनीय असते. काहीही कारण नसताना सासूने केलेला अमानवी छळ आता पंचावन्न वर्षाची स्त्री आजही विसरू शकत नाही. घाण्याच्या बैलासारखे तिने कामाला जुंपून घ्यायचे, घरची सारी कामे हातानेच करायची, घरात गाई-म्हशींची उस्तवारी जरी ती करीत असली तरी तिचा त्यावर कोणताही अधिकार नाही-साध्या ताकावर देखील तिचा अधिकार नसे. जास्त असलेले ताक अनेक वेळेस जनावरांना पाजले जाई, पण दोन वेळच्या जेवणाशिवाय जास्त काही सुनेसाठी नसेच.

पंचवीस वर्षे वयाच्या तरुणीने स्वतःच्या पसंतीने माहेश्वरी समाजातील तरुणाशी प्रेमविवाह केला. पण तिच्या वडिलांना ते पसंत नव्हते. तिच्या सासऱ्यांचा सुरुवातीचा विरोध मावळला पण वडिलांचा विरोध मात्र अजूनही गेलेला नाही. आजही वडील तिच्या घरी येत नाहीत की तिच्याशी कुठलाही संबंध ठेवत नाहीत. तिच्या दिराच्या व तिच्या एका लहान मुलाच्या मृत्यूनंतरही ते तिला भेटायला आले नाहीत की तिच्या दुःखात तिचे सांत्वन करायला आले नाहीत. त्यामुळे आता तिचे माहेर तुटले आहे. आई कधी कधी येऊन भेटून जाते. पण वडिलांच्या इच्छेविरुद्ध लग्न केल्यामुळे हा मनस्ताप तिला सहन करावा लागतो. त्याचे तिला खूप वाईट वाटते. पण ती तरी

काय करणार ?

एकेचाळीस वर्षे वयाची, सुखवस्तू श्रीमंत घरातील पाचवी शिकलेली प्रौढा. तिच्या जीवनात कसलाच प्रश्न नाही. पण तिच्या मुलीचे जीवन सासरच्या छळापायी संपून गेले आहे. खूप हुंडा देऊन मुलीचे लग्न केले. पण लग्न झाल्यापासून तिला तिचा पती, सासू व दीर खूप त्रास द्यायचे. तिला मारहाणही करीत असत. ह्या त्रासाची थोडीफार कल्पना मुलीने माहेरी दिली होती. पण सासरी तडजोड करण्याचा सल्ला आई-वडिलांनी मुलींना दिला. सामाजिक प्रतिष्ठेपायी दिलेल्या सल्ल्याचा परिणाम मुलीने आत्महत्या करण्यात झाला. ही अपेक्षा मात्र कुणीच ठेवली नव्हती. पण आता आपली मुलगी तर गेली असा विचार करून जावयाविरुद्ध त्यांनी कोर्टात केसही केली नाही; मुलीच्या छोट्या मुलीस घरी आणून सांभाळले. तिकडे जावयाचे थोड्याच दिवसात दुसरे लग्नदेखील झाले.

एकेचाळीस वर्षे वयाच्या शिक्षिकेच्या मनाचा कोंडमारा हा वेगळाच. लग्नाअगोदरही ती शिक्षिकेची नोकरी करत होती. तिचा पतीही एका शाळेत मुख्याध्यापक होता. लग्नानंतर दीड वर्षे तिने नोकरी केली. पण नंतर खेडेगावात माहेश्वरी स्त्रीने नोकरी करावी हे घरच्या लोकांना पसंत नव्हते. पतीलाही ते पसंत पडेना. म्हणून शेवटी नोकरी सोडावी लागली. सुरुवातीच्या दिवसात तिला फक्त घरकामात वेळ घालविणे खूप जड जायचे. मनाचा खूप कोंडमारा व्हावयाचा. पण नंतर सर्व काही अंगवळणी पडले व आता तर पतीनेही नोकरी सोडून व्यवसाय सुरू केला आहे. अत्यंत जुन्या वातावरणात सासरी राहावे लागत असल्याकारणाने तिच्यावर घरात खूप बंधने पडतात. नकोशी वाटली तरी तिला ती पाळावी लागतात. घरात तिला कुठल्याच प्रकारचे निर्णय-स्वातंत्र्य नाही याची तिला खंत वाटते. धार्मिक पुस्तकांच्या वाचनात ती आपले मन रमविण्याचा प्रयत्न करते. मुलांना शिकविणारी, त्यांच्यावर संस्कार करणारी शिक्षिका धार्मिक व्रतवैकल्ये करून मनाच्या कोंडमाऱ्यास वाट करून देते.

वयाची चौपन्न वर्षे अत्यंत दबल्या मनाने व एका प्रचंड दडपणाखाली राहिलेल्या स्त्रीची व्यथा वेगळीच. अत्यंत जुन्या वातावरणात राहिल्यामुळे आपली ऐंशी वर्षांची सासू घरात आहे ह्या जाणिवेने पतीशी सर्वांसमक्ष बोलत नाही की त्याच्याबरोबर जेवायलाही बसत नाही. सामाजिक व कौटुंबिक दडपणामुळे स्वतःच्याच मुलांना खेळविण्याची अपुरी राहिलेली इच्छा नातवंडांना खेळवून पूर्ण करून घेते व स्वतःचे मनही रमवते. पण अशा बंधनाचे वैषम्य दुसऱ्या एका बावन्न वर्षे वयाच्या प्रौढेला वाटतच नाही. मानमर्यादेच्या थोड्या फार रुढी सुनांनी पाळल्याच पाहिजेत असे तिला वाटते व म्हणून आपल्या सुनांना सासऱ्याशी बोलण्याची परवानगी ती देत नाही.

वीस वर्षे वयाच्या मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या व एक लाख रुपये देऊन लग्न झालेल्या

तरुणीची व्यथा आहे एकाकीपणाची. पती आपल्या मित्रांसोबत गप्पा मारतो, त्यांच्याबरोबर बाहेर जातो आणि त्यामुळे हिला रोज रात्री उशीरापर्यंत त्याची वाट पाहावी लागते. दिवसभर घरात कामाचा खूप रगाडा असतो आणि जुने रीतीरिवाज काटेकोरपणे पाळले जात असल्याकारणाने तिचा पतीशी कुठलाच संवाद साधला जात नाही. या एकटेपणामुळे ती वैतागली आहे, पण मनाचा हा कोंडमारा व्यक्त करण्यास तिला कोठेच स्थान नाही.

पन्नास वर्षे वयाच्या स्त्रीला पती अंध असल्यामुळे स्वतःच्या लहान मुलांच्या पालनपोषणासाठी अनंत कष्ट उपसावे लागले. माहेरून येणारी मदत देखील अपुरी असल्याकारणाने तिला अर्थार्जनही करावे लागले. पण ते देखील माहेरच्या माणसांपासून चोरूनच. कारण तो त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. या अशा प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पनेपायी तिला व तिच्या मुलांना खूप उपासमार सहन करावी लागली व मनस्तापही सहन करावा लागला.

चोवीस वर्षे वयाच्या नववीपर्यंत शिकलेल्या तरुणीची आर्थिक परिस्थिती बेताची असूनही, तिचा पती तिला कसलेही काम करण्याची परवानगी देत नाही. उलट स्वतः मात्र पत्ते खेळण्यात पैसे गमावतो आणि या संबंधी ती काही देखील बोलू शकत नाही. एकवीस वर्षे वयाच्या मॅट्रिक झालेल्या तरुणीच्या माहेरी व सासरीदेखील श्रीमंती आहे. इच्छा असूनही तिला पुढचे शिक्षण घेता आले नाही. पण जेव्हा तिला साधा पेपरदेखील रोज दुसऱ्याकडून आणून वाचावा लागतो, तेव्हा तिला खूप वाईट वाटते. पण तिचा नाइलाज असतो. पतीच्या दारूच्या व्यसनाविरुद्ध ती काहीही बोलू शकत नाही. पण समाजकार्य करण्याच्या तिच्या इच्छेस मात्र तो मज्जाव करतो व तिला त्याचे म्हणणे मुकाट्याने ऐकावे लागते. अशा ह्या गुदमरणाऱ्या वातावरणात ती परिस्थितीशी तडजोड करून रहाते.

स्त्री म्हणून विविध प्रकारचा मानसिक व शारीरिक छळ सुनेला सहन करावा लागतो. अनेकदा सासरच्या माणसांमुळे स्त्रीचे माहेर तुटते. पतीच्या व नणंदेच्या छळास वैतागलेली एक स्त्री कोणाकडेही तक्रार करू शकत नाही, तर दुसऱ्या एका स्त्रीला घरी अत्यंत गरिबी असूनदेखील तीन मुली व एका मुलानंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेता येत नाही. सासूला व पतीला आणखी एक मुलगा हवा असतो, व म्हणून सासरची मंडळी तिला शस्त्रक्रियेस परवानगी देत नाहीत. तिसऱ्या एका तरुण नवविवाहितेला पतीबरोबर फिरायला जाण्याची हौस, पण घरच्या बंधनामुळे ती हा आनंद मिळवू शकत नाही. चौथीच्या पतीने नोकरी सोडलेली व सुरू केलेला नवीन व्यवसाय अजून व्यवस्थित चालत नाही व त्यामुळे आधीच असलेला गरिबीचा प्रश्न अधिक बिकट झालेला. पण त्यासाठी तिलाच जबाबदार धरून सासू-सासरे तिलाच बोल लावतात.

बावीस व चोवीस वर्षे वयाच्या दुसऱ्या दोन स्त्रियांची लग्ने लाख-लाखभर हुंडा देऊन झाली. पुढे शिकण्याची त्यांची इच्छा तर अपूरी राहिलीच शिवाय घरात कसलेच शैक्षणिक वातावरण नसल्याकारणाने त्यांना कांहीदेखील वाचायला मिळत नाही. या उपासमारीचे त्यांना खूप वाईट वाटते.

भोळसट स्त्रीशी फक्त पैशासाठी लग्न करणारे व नंतर तिच्याशी अमानवी व्यवहार करणारे पुरुषही येथे आहेत. आजारपणात तिची कसलीही काळजी न घेता तिच्या माहेरच्या माणसांवर सारी- अगदी आर्थिक सुद्धा-जबाबदारी टाकून निर्धास्त असणारे पतिराजही येथे आहेत. अंधश्रद्धेचा पगडा पुष्कळ स्त्रियांच्या मनावर मोठ्या प्रमाणात आढळतो. त्यामुळे मुलांच्या आजारपणात त्यांच्यावर वैद्यकीय उपचारांकडे दुर्लक्ष करून मांत्रिकाकडून इलाज करून गंडे-दोरे घालणाऱ्या स्त्रिया काही कमी नाहीत. तर दुसरीकडे अतिश्रीमंत घरातील सुनांना घराबाहेर पडण्यावरही असंख्य बंधने असल्याचे चित्र आपणास दिसते, मग त्या सुनांना हा कोंडमारा, हे एकाकी जीवन कितीही असह्य वाटत असले तरीही.

"मुलीच्या लग्नात चाळीस हजार रुपये हुंडा देण्यात काय बिघडले ?" असा प्रश्न विचारून हुंडापद्धतीचे समर्थन करणारी स्त्रीही भेटते. "पुरुषांना कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करायला लावून त्यांना 'मोकळे रान' देऊन स्त्रियांनी स्वत: फाशी घ्यावी काय ?" असा प्रश्न विचारणारी स्त्रीही दिसते. पुरुषांच्या अनेक व्यसनावर पांघरूण घालून पतिव्रताधर्माचे पालन करणाऱ्या व पतीच्या विरोधात काहीही न बोलणाऱ्या स्त्रियाही आढळल्या. आपली व्यथा प्रकट करण्यात आपल्या संसारसुखाला तडा जाण्याची भीती त्यांना वाटत असावी, व त्यामुळेच कदाचित न बोलण्याचा सोपा मार्ग त्यांनी पत्करला असावा.

मन विषण्ण करणाऱ्या अनेकानेक व्यथांबरोबरच काही दिलासा देणारी, आशेची किरणे दाखविणारी पावलेदेखील काही स्त्रियांनी उचललेली दिसतात. काळाची पावले ओळखून अत्यंत जुन्या विचारसरणीच्या कुटुंबातील अकाली विधवा झालेल्या मुलीचा पुनर्विवाह तिच्या सासऱ्यांनीच पुढाकार घेऊन केला तेव्हा त्या मुलीच्या आईने आपले जुने विचार बाजूला ठेवून या विवाहास संमती दिली. तसेच घुंघटमध्ये लग्न झालेली आणि गांधीवादी सासऱ्यावर गाढ श्रद्धा असणारी स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीही भेटते. स्वातंत्र्यचळवळीतील राष्ट्रीय प्रेमाचे सारे विचार तिला समजायचेही नाहीत; पण तिने सूतकताई नेमाने केली व पुत्रजन्माचा आनंद सासऱ्यांच्या इच्छेनुसार ३०-४० गरीब बायकांना चरखा देऊन साजरा केला.

एकत्र कुटुंबात राहाणाऱ्या काही स्त्रियांची अशी ही शब्दचित्रे. यात एक रंग गडद होऊन स्पष्टपणे समोर येतो तो म्हणजे त्यांच्या घरात, त्यांच्या जीवनात जे काही

चांगले-वाईट घडते ते कुटुंब प्रमुखांच्या एकाधिकारशाहीनेच. घरात संपूर्ण सत्ता असते ती एखाद्या पुरुष कुटुंबप्रमुखाची. देण्याघेण्यावरून व इतर अनेक कारणांवरून छळ होतो तो सुनांचा व तोही बहुतांशी सासूकडूनच. त्याचबरोबर असेही दिसते की जेथे आर्थिक सुबत्ता अधिक तेथे पैशाची अपेक्षाही अधिक.

### विभक्त कुटुंबात रहाणाऱ्या स्त्रियांची काही शब्दचित्रे

अठ्ठावन्न वर्षे वयाच्या निरक्षर स्त्रीला दत्तक घेतलेल्या मुलानेच खूप त्रास दिला. जुगार व दारूच्या व्यसनापायी त्याने कुटुंबाची सर्व मालमत्ता गमावली, व आईवडिलांना वाऱ्यावर सोडून दिले. त्यांचा सांभाळ केला तो त्यांच्या मोलकरणीच्या मुलाने व त्यामुळेच जे राहते घर शिल्लक राहिले होते ते त्यांनी या सांभाळ करणाऱ्या मुलाच्या नावाने केले. पण दत्तक घेतलेला मुलगा या घरासाठी भांडतो आहे. तरीदेखील त्याला कपर्दिकही न देण्याचा त्यांचा निर्धार आहे.

तीस वर्षे वयाची निरक्षर, चौदाव्या वर्षीच लग्न झालेली तरुणी. गरिबीमुळे कमी भांडवलाचा भाजी विकण्याचा व्यवसाय दोघे पती-पत्नी मिळून करतात व संसार कसाबसा चालवितात. पण तिच्या नातेवाईकांना तिच्या या व्यवसायाची लाज वाटते व कोणीही तिच्याकडे येत-जात नाहीत. प्रामाणिकपणे व कष्ट करून घर चालविणाऱ्यास समाजात प्रतिष्ठा नसते, तर फक्त पैशाला प्रतिष्ठा मिळते, याची तिला खंत वाटते. पतीच्या व्यवसायात त्याच्या खांद्याला खांदा लावून ती काम करत असली तरीही तिला कुठलाही महत्त्वाचा निर्णय घेण्याचा अधिकार नाही. तिच्या या जबाबदारीमुळे घरातील सर्व काम तिची मुलगी पाहते व त्यासाठी तिचे शिक्षण सातवीपर्यंतच होऊ शकले. इच्छा असूनही यासंबंधी तिला काहीच करता येत नाही.

बत्तीस वर्षे वयाच्या नववीपर्यंत शिकलेल्या तरुणीने घरच्या आर्थिक हलाखीमुळे स्वतः घरोघर जाऊन काही वस्तू, साड्या इत्यादी विकून सन्मानाने जगण्याचा मार्ग शोधून काढला. पण समाजात तिला अनेकदा कुजकी बोलणी ऐकावी लागतात. " स्त्रियांची कमाई, ती घराला कितपत पुरणार ? कितीही केले तरी पुरुषांच्या कमाईची सर त्याला कशी येणार ? " अशी उपहासात्मक बोलणीही तिला ऐकावी लागतात. काही अपवादात्मक स्त्रिया तिला प्रोत्साहनही देतात. पण सर्वसाधारणपणे एक स्त्री म्हणून स्वतंत्र व्यवसाय करताना समाजात उपहासाचीच प्रतिक्रिया तिच्या वाट्यास येते. शिवाय पैशाचे पाठबळ नसल्यामुळे ती आपला व्यवसाय वाढवूही शकत नाही, याची तिला खंत वाटते.

बावीस वर्षे वयाच्या आठवीपर्यंत शिकलेल्या तरुणीच्या माहेरी अत्यंत गरिबी असल्यामुळे तिचे लग्न हुंडा न देताच झाले. सासरीदेखील परिस्थिती बेताचीच आहे.

पण तरीही तिच्या पतीचे दारूचे व्यसन काही सुटत नाही. घरखर्चासाठी मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशात घर चालविणे अवघड झालेले असले तरी मूक राहाण्या व्यतिरिक्त ही काहीच करू शकत नाही. मुले लहान असल्यामुळे ती स्वतःही काही धडपड करू शकत नाही. त्यातल्या त्यात एक गोष्टीचे समाधान तिला आहे की तिचा पती दारू पिऊनही तिला कधी मारहाण करीत नाही!

मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या बावीस वर्षे वयाच्या अशाच एका स्त्रीस सतत आर्थिक अडचणीस तोंड द्यावे लागते. तिच्या पतीस पगार अत्यंत कमी, त्यामुळे घर चालविता चालविता तिच्या नाकीनऊ येतात. पण तरीही तीन अपत्यांनंतरही कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रियेस तिच्या पतीचा विरोध आहे. कारण त्याला आणखी एक मुलगा हवा आहे. तिला ते पटत नाही. पण पतीचे ऐकावेच लागते. पूर्वी ती एकत्र कुटुंबात दीर-सासू-सासरे यांच्याबरोबर राहात असे. पण रोज उठून भांडणे होऊ लागली म्हणून ते वेगळे राहू लागले. दिराने तिच्या थोबाडीत मारण्यापर्यंत भांडण विकोपाला जाऊनही पती काहीच बोलत नसे. आता वेगळे झाल्यानंतरही दिराच्या जेवण्याखाण्याची सारी व्यवस्था तिलाच करावी लागते. त्यासाठी एका पैशाची मदत तो त्यांना करीत नाही. यामुळे तिला खूपच त्रास सहन करावा लागतो, पण तिचे पतीपुढे काहीच चालत नाही.

तेहतीस वर्षे वयाच्या, दहावीपर्यंत शिकलेल्या तरुणीला सासरी व माहेरी असलेल्या गरिबीमुळे खूप त्रास सहन करावा लागला. पण तरीही सासू-सासरे व पती ह्यांनी पाच मुलींनंतरदेखील मुलगा झाल्याशिवाय कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया तिला करू दिली नाही. घरातील रोजच्या भांडणाला कंटाळून ती विभक्त राहिली. तरीही सासूच्या सांगण्यावरून तिचा पती अजूनही तिला मारहाण करतो. पण आता मोठ्या मुलीस बरीच समज आली असून तिनेच आपल्या वडिलांना बजावले की "आजीच्या खोट्या-नाट्या तक्रारींवरून तुम्ही आईला मारायचे नाही." त्यामुळे हल्ली बऱ्याच वेळा तिचा मार वाचतो. मुलींच्या मदतीने आता तिला थोडे चांगले दिवस येऊ लागले आहेत.

तीस वर्षे वयाच्या, मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या, व पाच अपत्ये असलेल्या स्त्रीच्या शिक्षक पतिराजांच्या जीवनात दुसऱ्या एका स्त्रीने प्रवेश केला व त्यामुळे हिचे सारे आयुष्यच त्रासदायक झाले. ह्या मानसिक त्रासातून ती थोडीशी सावरली आहे, पतीच्या आश्वासनामुळे. पण या घटनेमुळे तिचा शिक्षणावरचा विश्वासच उडाला आहे.

सत्तावीस वर्षे वयाच्या तरुणीवरही 'एकतरी मुलगा हवाच' हा घरच्या लोकांचा व स्वतःच्या मनाचाही पगडा आहे. त्यामुळे चार मुलींनंतर एक मुलगा झाल्यावरच तिची कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया होऊ शकली. माहेरच्या माणसांनी मानापमानाच्या

काही क्षुल्लक चुका केल्यामुळे तिच्या रागीट पतीने तिचे माहेरी जाणेच पूर्णपणे बंद करून टाकले. लग्न झाल्याबरोबर माहेरच्या माणसांची झालेली ही ताटातूट तिला खूप मनस्ताप देऊन गेली. वयोमानाप्रमाणे आता दोघांचीही समज वाढली आहे, व त्यामुळे पूर्वीची असलेली बंदी आता कमी झाली आहे व वातावरण बरेच निवळले आहे.

घरची अत्यंत गरिबी, शिवाय पाच अपत्ये; तरीही चाळीस वर्षे वयाच्या स्त्रीला कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करण्यास पतीने व सासरच्या माणसांनी परवानगी दिली नाही. आता दोन मुलींच्या लग्नात, कर्ज काढून दहा व वीस हजार रुपये हुंडा देण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नव्हता. आज तिची भयंकर आर्थिक ओढाताण होते. पण तरीही मुलींना शिकवून स्वतःच्या पायावर उभे करणे तिला व तिच्या पतीलाही पटत नाही.

अठ्ठेचाळीस वर्षे वयाची, चौथीपर्यंत शिकलेली, सतराव्या वर्षी घुंघटमध्ये तिच्या पसंतीशिवाय लग्न लागलेली प्रौढा. आई-वडिलांच्या अकाली मृत्यूमुळे तिचा सांभाळ तिच्या बहिणीनेच केला होता. तिचे लग्न सत्तावीस वर्षे वयाच्या एका बिजवराशी, काहीही हुंडा न देता करून देण्यात आले. पतीची पहिली पत्नी व त्याची चारही मुले सासूच्या छळामुळे मृत्यू पावली होती. सासू असा छळ करीत असे हे त्या प्रौढेला माहीत होते. त्यामुळे तिने सुरुवातीपासून थोडे खंबीरपणे राहायचे ठरवले. पण तरीही सासूचा सासुरवास काही कमी झाला नाही. पतीने व सासूने तिला नानाप्रकारे छळले. तिला तीन-तीन दिवस उपाशी ठेवण्यात येई व बाकी सगळेजण जेवून घेत. गरोदरपणीही कित्येक वेळेस तिला खायला अन्न दिले जायचे नाही. शेवटी तिने घरातून पीठ घेतले व वेगळी चूल मांडून स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. घरातील सर्व जण तिच्यावर रागावले. एक वर्षभर पती तिच्याशी बोललाही नाही व तिच्याकडे जेवलाही नाही. पण तिने निक्षून सांगितले की ती एकत्र राहणार नाही. तेव्हा शेवटी पत्नी-मुलांसहित वेगळे राहण्यास तो कबूल झाला. घरी तशी गरिबीच. पतीच्या तुटपुंज्या पगारात सहा मुलांचे पालनपोषण व घर चालविणे तिला खूपच अवघड जाई. पण पतीने तिची कधीच काळजी घेतली नाही. शेवटी पतीचा विरोध असतानाही तिने सहा अपत्यांनंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली. घरात नेहमीच आर्थिक अडचण राहात असल्यामुळे तिला कसल्याच निर्णयात सहभागी केले जात नाही व पैसेही दिले जात नाहीत. आता मुले मोठी होऊन कमावू लागली आहेत. तेव्हा तिला थोडे चांगले दिवस आले आहेत. तिच्या हृदयाची शस्त्रक्रिया झालेली असून, आधीपेक्षा बरे दिवस येऊनही ती खूप निराश झाली आहे. आपण जगात असून नसल्यासारखेच आहोत, असे तिला वाटते. आताशा तिचे मन कशातच लागत नाही.

अडतीस वर्षांची थोडेसे शारीरिक व्यंग असलेली प्रौढा. तिचे लग्न एका गरीब मुलाशी खूप पैसे देऊन केले. पण लग्नानंतर काही वर्षांनंतर ती मनोरुग्ण झाली. तिला

मानसिक धक्का बसून ती बरीच असंबद्ध बडबडत असते आणि फक्त स्वतःत गुरफटून शून्यात पाहात बसते. पण तिच्यावर इलाज होतो तो मांत्रिकाचा. एखाद्या मनोवैज्ञानिक डॉक्टरकडे तिला नेले जात नाही. त्यामुळे तिच्या मानसिक अवस्थेत काही फरक पडलेला नाही.

पस्तीस वर्षे वयाची, मॅट्रिक शिकलेली सुंदर प्रौढा. तिच्या माहेरची आर्थिक स्थिती चांगली होती म्हणून अकरा हजार रुपये हुंडा देऊन तिचे लग्न करण्यात आले. लग्नानंतरही सणवार वगैरे व्यवस्थित पाठवले. सासरची परिस्थिती साधारण होती. तिचे लग्न झाले त्यावेळी तिचा पती दुसऱ्या गावी शिकत होता. पण दोन वर्षांनंतर सासूने छळायला सुरुवात केली. तिचा पती अजून कमावत नव्हता व त्यामुळे प्रत्येक वेळी काही झाले की, 'खायचे तेवढे कळते' म्हणून तिचा अपमान करण्यात येई. पण जेव्हा सभ्यतेची पायरी ओलांडून सासूने शिव्या द्यावयास सुरुवात केली तेव्हा ती माहेरी निघून गेली. नंतर मात्र सासू-सासऱ्यांच्या विनंतीनंतर तिच्या वडिलांनी तिला परत पाठवले. जेव्हा सासूने तिच्या जेवणात काही तरी मिसळून खाण्यास दिलेले तिने पाहिले तेव्हा मात्र तिने वडिलांच्या मदतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. पतीचा प्रथम थोडा विरोध होता. पण जेव्हा सत्य परिस्थिती त्यास समजली तेव्हा तोही विभक्त होण्यास कबूल झाला. पण तिच्या सासूने तिच्या माहेरहून आलेली कुठलीही वस्तू तिला दिली नाही. फक्त एकवेळ जेवणापुरते सामान तिला देण्यात आले. त्यावेळीही शेवटी तिच्या वडिलांनी तिला प्राथमिक मदत केली. आर्थिक अडचणीत दिवस जरी काढावे लागले तरी तिला आता मानसिक शांती मिळाली आहे.

पंचेचाळीस वर्षे वयाची, चौथी शिकलेली, चाळीस हजार रुपये हुंडा देऊन जुन्या पद्धतीने लग्न लागलेली स्त्री. घरात सध्या आर्थिक अडचणीचे दिवस आहेत. कधी कधी दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत पडते. ती घरी बसून थोडे काम करते, घराला हातभार लावते. पण जास्त काम करून पैसे मिळविण्याची पतीची परवानगी तिला नाही. कारण घराबाहेर पडून, काही काम करून स्त्रीने पैसे मिळविणे हे त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या आड येते.

बत्तीस वर्षे वयाची, उच्च पदवीधर असून स्वतःची पसंती न पाहता, हुंडा न ठरविता लग्न लागलेली तरुणी. तिच्या घरी अत्यंत जुने वातावरण आहे. तिला घराबाहेर पडून, आपल्या शिक्षणाचा काही उपयोग होईल असे काही करावेसे वाटते. तिला तशी शिकविण्यासाठी बोलावणीही येतात. पण सासरा व पती यांना ते पसंत नव्हते. म्हणून तिला त्यांना नकार द्यावा लागला. आता घरीच बसून राहण्याची इतकी सवय लागली आहे की पती-मुलातच ती सारा वेळ घालविते आणि मनासारखे काही करू

न शकल्याची खंतदेखील कमी होत चालली आहे.

छत्तीस वर्षे वयाची, लग्नानंतर शिक्षण पूर्ण करून उच्च पदवीधर झालेली प्रौढा. पतीने प्राध्यापकाची नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय सुरू केला आहे. घरात तशी आर्थिक सुबत्ता नाही. तरीही, तिचा पती पैसे लावून पत्ते खेळतो हे तिच्या सुसंस्कारित मनाला पटायचे नाही. त्यामुळे पती-पत्नीत खूप वेळा भांडणे व्हायची व तिला अतिशय मनस्ताप होत असे. आता पतीची सवयही थोडी कमी झाली आहे व तिलाही त्याच्या ह्या स्वभावाची सवय झाली आहे.

अठ्ठेचाळीस वर्षे वयाच्या प्रौढेने मुलाची वाट पाहून शेवटी पाच मुलींनंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली आहे. आता तिला तिच्या मुलींच्या लग्नाचा प्रश्न भेडसावतो आहे. कारण हुंड्याशिवाय मुलींची लग्ने जमणे फार अवघड आहे, व तिच्याजवळ हुंडा देण्यासाठी पैसा नाही. तिच्या एका मुलीच्या मनावर परिणाम झाला व ती मनोरूग्ण झाली. तेव्हा कोणीतरी सल्ला दिला की, 'हिचे लग्न करून टाका. म्हणजे मग ही सुधारेल'. म्हणून तिचे एका बिजवराशी लग्न लावून दिले-पण तिच्या तब्येतीत काही फरक न पडता तिला उलट, जास्त त्रास व्हावयास लागला. शेवटी जावयाने तिला माहेरी आणून सोडले व सासूच्या परवानगीने दुसरे लग्न केले. काही वर्षांनंतर मुलीची तब्येत थोडी सुधारली आहे. पण आता तिचे काय करायचे हा प्रश्न तिला पडला आहे. तिला स्वतःच्या पायावर उभे करावे तर तिला काही काम झेपेल का अशी शंका तिच्या मनात येते. बाकीच्या सर्व मुलींचीही अजून लग्ने व्हावयाची आहेत. त्यामुळे तिच्यासमोर फार मोठा प्रश्न आहे.

तीस वर्षे वयाची, चौथी शिकलेली, अकरा हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली तरुणी. तिच्या पतीचे शिक्षणही कमीच झालेले. त्यामुळे इतर भावंडांनी त्याला फसवले व शेतीच्या इस्टेटीतला काहीच अधिकार त्यांना दिला नाही. एकत्र कुटुंबात राहात असताना तर तिचे व मुलांचे फार हाल झाले. तिला व मुलांना पोटभर खायलाही मिळत नसे. काम मात्र दिवसभर करावे लागे. त्या त्रासामुळे व हातात काही पैसा नसल्यामुळे तिची आठ वर्षांची मुलगी आजारपणात औषधाविना मरण पावली. पण तरीही इतर दीर व जावांना त्याचे काहीच वाटत नाही. "आम्ही कुठपर्यंत त्यांना पोसणार व औषधपाण्याला पैसे देणार ?" असे त्यांचे म्हणणे आहे. पण ते सर्व शेतातील मालातला हिस्सादेखील तिला देत नाहीत. तिच्या पतीची तेथे शेतमजुरापेक्षा जास्त किंमत नाही व पती कमी शिकलेला असल्याकारणाने त्याला स्वतःच्या हक्काविषयी काही कळतही नाही. तो जास्त शिकलेला असता तर कमीत कमी दुसरीकडे कोठे नोकरी करून पोट भरले असते व अशी हलाखीची परिस्थिती आली नसती असे तिला वाटते.

अठ्ठावीस वर्षे वयाची, मॅट्रिक झालेली, अठराव्या वर्षी पन्नास हजार रुपये हुंडा देऊन लग्न लावून दिलेली तरुणी. तिच्या लग्नाच्या वेळी सासरी व माहेरी, दोन्हीकडे श्रीमंती होती. तिचा पती श्रीमंताघरचा, लाडावलेला व लग्नापूर्वीपासूनच सर्व वाईट व्यसने असलेला मुलगा होता. लग्नानंतरही तो सुधारला नाही व त्याचे सारे खापर या तरुणीवर ठेवण्यात आले. तो काही कामधंदाही करत नसे. मात्र त्याचे पैसे उडविणे चालूच राहिले. त्याचाही सारा दोष तिचाच समजला जाई व त्यामुळे तिची सासू व नणंद, दोघीही तिच्याशी अत्यंत क्रूरपणे वागत होत्या. तिच्याबरोबर बोलताना शिव्यांशिवाय तर त्या बोलतच नसत. तिला लागणाऱ्या रोजच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूही तिला माहेरून आणाव्या लागत. तिचे हे हाल इतके विकोपाला गेले की, शेवटी एक दिवस सासू, सासरा व नणंद ह्यांनी मिळून तिला मुलांसहित घराबाहेर काढले. तिला व तिच्या वडिलांना त्याचा खूप मनस्ताप झाला. तरीही वडिलांनी तिला दुसरे घर करून दिले. सासू-सासऱ्यांनी मात्र तिचे सत्तर तोळे दागिने व माहेरहून आलेले काहीही सामान तिला दिले नाही. सर्व काही तिला परत एकदा वडिलांकडून घ्यावे लागले. आता पतीदेखील थोडी जबाबदारी समजून कमावत आहे. पण त्याचा रागीट स्वभाव अजूनही बदलला नाही. सारख्या छळामुळे तिचे डोळे रडून रडून अधू झाले आहेत. पण सासरच्या मंडळींनी तिला पांढऱ्या पायाची म्हणूनच अपमानित केले. तिच्या लग्नानंतर तिच्या नणंदेचा पती मृत्यू पावला व त्याचा दोषही तिलाच लावण्यात आला. मरण येत नाही म्हणून मुलांसाठी जगायचे एवढाच मार्ग तिच्यापुढे आहे. सर्व अनुभवांमुळे ती अतिशय निराश झाली आहे.

पस्तीस वर्षे वयाच्या निरक्षर स्त्रीस विभक्त राहूनही सासरच्या मंडळींचा त्रास सहन करावा लागतो. तिच्या तापट स्वभावाच्या पतीला तिची जाऊ तिच्यासंबंधी काहीही खोटेनाटे सांगत राहाते. पैशासंबंधी किंवा तिच्या घराबाहेर पडण्यासंबंधी काहीही गैर सांगितले जाते व दर दोन-चार दिवसांनी तिला पतीकडून मार मिळत राहातो. पण यासंबंधात त्याला काही बोलण्याची किंवा सांगण्याची सोय नाही. मुलगा झाल्यानंतर त्याचे मारण्याचे प्रमाण थोडे कमी झाले असले तरी ते पूर्णपणे बंद मात्र झाले नाही.

सासूने रोज उठून सुनेशी काहीतरी निमित्त काढून भांडण करायचे, खूप राग आला की तिला माहेरी पाठवून द्यायचे, व काही दिवसांनी मनात आले तर तिला परत आणायचे, हा प्रकार देखील पुष्कळ ठिकाणी आढळतो. असाच त्रास एकोणतीस वर्षे वयाच्या, मॅट्रिक झालेल्या तरुणीस सोसावा लागला. शेवटी इतर नातेवाईकांच्या सल्ल्यानुसार तिला वेगळे घर करून देण्यात आले. पण माहेरून आणलेले काहीही सामान तिला दिले गेले नाही. तिचा पती सुरुवातीपासूनच या सर्व प्रकाराकडे तटस्थपणे व निर्विकार राहून पाहातो. विभक्त राहिल्यानंतरही पती-पत्नी यांच्या दरम्यान सामंजस्य

वाढले नाही, पण किमान सासूबरोबर होणारी रोजची भांडणे व त्यातून होणारा मनस्ताप तरी कमी झाला.

चव्वेचाळीस वर्षे वयाच्या एका प्रौढेच्या लग्नाच्या वेळी, पतीच्या खंबीर भूमिकेमुळे हुंडा न देता तिचे लग्न झाले. पण एकत्र कुटुंबात असताना तिच्याकडे कोणी आले तर स्वतःच्या मनाने त्यांना एखादा कप चहा पाजण्याचे स्वातंत्र्यही तिला नव्हते. एकत्र कुटुंबातील कामाच्या पद्धतीमुळे तिच्या मुलीस देखील तिच्या वाटणीचे बरेच काम करावे लागले, व त्यामुळे तिच्या शिक्षणाचे अतोनात नुकसान झाले. त्याचे दुःख तिला नेहमीच वाटते. विभक्त राहिल्याने दीरासोबत होणारी रोजची भांडणे मिटून तिला मनःशांती लाभली आहे.

सव्वीस वर्षे वयाच्या, आठवीपर्यंत शिकलेल्या, बेताचीच आर्थिक स्थिती असलेल्या स्त्रीचा पती असेल-नसेल ते पत्त्यात घालवून बसतो. त्याच्या या सवयीमुळे तो रोज रात्री उशिरा घरी येतो, व त्याचा तिला खूप मानसिक त्रास होतो. पंचेचाळीस वर्षे वयाच्या प्रौढेलाही असाच त्रास तिच्या पतीकडून होतो, पण त्यासंबंधी ती काहीच करू शकत नाही.

चाळीस वर्षे वयाच्या, सहावीपर्यंत शिकलेल्या प्रौढेने लग्नानंतर मूलबाळ न झाल्याकारणाने वैद्यकीय तपासणी न करताच आपल्या पतीचे दुसरे लग्न लावून दिले, व तेदेखील स्वतःच्या धाकट्या बहिणीशीच! कारण तिला त्यांच्या घराण्यासाठी वंशज हवा होता. पण त्यानंतर दोघींनाही मुले झाली. तिचा पती दोघींकडे येत-जात असतो, तरीही केवळ अज्ञानामुळे तिने हे संकट स्वतःसाठी ओढवून घेतले.

चाळीस वर्षे वयाच्या एका प्रौढेस जास्त शिकलेली सून नकोच आहे. कारण मग ती सून तिच्या मुलाच्या डोक्यावर मिऱ्या वाटेल, असे तिला वाटते. तर दुसरीकडे पतीने दारूच्या व्यसनात सर्व मालमत्ता बुडवून टाकल्यानंतर चाळीस वर्षाच्या एका प्रौढेने आपल्या मुलांची सर्व जबाबदारी झटकून दिली असून आता ती सर्वांशी सारखी भांडत राहाते, व त्यांना शिव्याशाप देत राहाते. हा त्रास वाचावा म्हणून या मुलांचे मोठे काकाच त्यांचे संगोपन करतात. माणुसकीचा असा झरादेखील कोठेकोठे आढळतो.

पस्तीस वर्षे वयाच्या स्त्रीला सहा मुलीच झाल्याकारणाने तिचा पती तिला रोज मारहाण करतो व तिलाच या मुलींच्या जन्मासाठी जबाबदार धरतो. त्याच्या क्रूर छळास वैतागून तिने त्याची परवानगी न घेता कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया करून घेतली तर तिचा पती रागावून एक महिनाभर घरी आलाच नाही. शेवटी इतर नातेवाईकांनी त्याची समजूत घातली व त्याला घरी आणले. मात्र त्यानंतर त्याच्या मारझोडीचे प्रमाण वाढलेच आहे. बायको सुंदर असली तरी तिला घरात जनावरापेक्षा जास्त किंमत नसते, असे तिला वाटते.

परंतु एकोणचाळीस वर्षे वयाच्या दुसऱ्या एका स्त्रीचा अनुभव मात्र वेगळाच आहे. अत्यंत आजारी असलेल्या या प्रौढेच्या विविध अशा आठ शस्त्रक्रिया झाल्या. ब्रेनट्युमर, पाइल्स, अपेंडिक्स इत्यादी. त्यावेळी तिच्या पतीची, माहेर-सासरच्या मंडळीची खूप मदत झाली. साऱ्यांनी तिच्या आजारपणात न रागावता तिला मदत केली आणि तिला व तिच्या संसाराला सांभाळून घेतले.

## परित्यक्ता व इतर कमावत्या स्त्रियांची शब्दचित्रे

पतीशिवाय स्त्रीचे अस्तित्व नाकारण्याकडेच भारतीय समाजाचा रोख आहे. तिच्या जीवनात त्याच्याशिवाय निर्माण होणारी पोकळी ही कधीही भरून न येण्यासारखी असते. पण त्याचे अवास्तव स्तोम माजवून परित्यक्ता स्त्रीचे जिणे अर्थहीन बनविले जाते. स्वतःचे कुटुंब व समाज ह्या दोहोंकडून ती अपमानित होते. तिचा दोष नसतानाही सासरी नांदविण्यात आले नाही ह्यात तिलाच दोषी धरले जाते व तिच्या दुःखाला अंत नसतो. माहेश्वरी समाजातील परित्यक्तांची कहाणी काही वेगळी नाही. त्यांनी माझ्याजवळ आपले दुःख व्यक्त करून मन मोकळे केले. पण त्यांच्या मनात खोल अशी ठसठस जाणवतच होती. लातूरमधील दोन्ही परित्यक्ता स्त्रियांची परिस्थिती वेगळी होती. पण भोगाव्या लागणाऱ्या दुःखाचा पीळ सारखाच होता. चार इयत्ता शाळेत गेलेल्या बत्तीस वर्षे वयाच्या स्त्रीच्या जीवनातला सारा आनंद संपलेला आहे. जिवंत आहे म्हणून निष्क्रीय जीवन जगायचे-दिशाहीन रस्त्यावरून जायचे व तेच ते तेच ते अपमानास्पद बोल समाजाकडून ऐकायचे हे तिचे जीवन बनले आहे. लग्न घुंघटमध्ये झाल्याकारणाने लग्नाअगोदर एकमेकांना पाहण्याचे सौभाग्य तिला लाभले नाही. मग एक-दुसऱ्याविषयी जाणून घेणे दूरच राहिले. तिच्या माहेरची परिस्थिती साधारण जरी होती तरी लग्नातले सारे रीतीरिवाज व्यवस्थितपणे पार पाडले गेले. लग्नानंतर तीन वर्षे ती खूप आनंदात होती. पण अचानक पतीच्या डोक्यावर परिणाम होऊन तो वेड्यासारखा वागू लागला. काही कामधंदा करून पैसे कमावणे बंद झाले आणि हिच्या आयुष्याचे धिंडवडे सुरू झाले. ती एका मुलाची आई होती. एकत्र कुटुंबात पतीच्या कमाईविना जगणे तिला फार अवघड झाले. तिला कुणाची सहानुभूती मिळाली नाही की चार प्रेमाचे शब्द ऐकायला मिळाले नाहीत. स्वतः काही उद्योग करून स्वावलंबी बनण्याची हिंमतही तिच्यात नव्हती व घरातून तशी परवानगीही नव्हती. पतीला मानसोपचार करण्याऐवजी त्याला घरातील इतरांकडून मारहाण सुरू झाली. तिला व तिच्या मुलाला फुकट (?) पोसणे घरच्या मंडळींना नकोसे झाले. घरातील काहीही हिस्सा तिच्या पतीला किंवा तिला स्वतःला मिळाला नाही. फक्त 'खायला भार' असणाऱ्या स्त्रीला 'माहेरी निघून जा' असे सांगण्यात आले. रोजच्या रोज तिला

विविध प्रकारे छळण्यात येई. 'वेड्याची बायको' म्हणून तिला अतिशय अपमानास्पद वागणूक मिळे. पुष्कळ वेळेला ते सारे सोडून दूर कुठे तरी निघून जावे असे तिला वाटे. पण तिला तसा कुणाचाच आधार नव्हता. तशाच परिस्थितीत तिने सासरी सहा वर्षे काढली. तिच्या पतीस तिच्या त्रासाची काहीच फिकीर नव्हती. तिला त्याने फक्त आपली हक्काची भोगदासी बनविले व आणखीन एक मूल तिच्या पदरात पडले. तिला ह्या जबरदस्तीचा खूप वीट येई. पण आपले दात व आपलेच ओठ. कुणाला सांगणार त्यासंबंधी! माहेरही श्रीमंत नव्हते. त्यामुळे तिला आधाराचा प्रकाशकिरण कुठेच दिसत नव्हता. पण शेवटी परिस्थिती इतकी चिघळली की तिला आपल्या माहेरी, भावाकडे आश्रयास यावे लागले. पण पतीने त्यानंतर तिची व तिच्या मुलांची जबाबदारी कधीच उचलली नाही. आयते बसून खायला सोकावलेल्या पतीस स्वत:चा बायकोवरचा अधिकार तेवढा कळत होता. येनकेन प्रकारेण खोटे नाटे बोलून लोकांना फसवून पैसे उकळण्याचे तेवढे त्याला कळत होते. त्यामुळे त्याला शहाणा म्हणावे की वेडा, हेच तिला कळेनासे झाले. विविध प्रकारे त्याला समजावण्यात आले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. पण त्यावर मानसोपचार करणे त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेआड येत होते. काही काळ-वेळ न पाहता माहेरी येऊन स्वसुखासाठी पत्नीची मागणी करण्यात त्यास काहीच वाटत नाही. एक मूल आणखी पदरी पडल्यावर शेवटी तिने कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली. आपली पत्नी म्हणजे आपल्या मालकीची वस्तू अशीच त्याची धारणा झालेली आहे. पण मुलांसाठी सारे दु:ख विसरून ती घरकामात व परमेश्वर भजनात मन रमविते. माहेरीही काही काम करून स्वत:च्या पायावर उभे राहणे भावाला पटत नाही. त्यामुळे घरातच जितके काम करता येईल ते करायचे व आला दिवस ढकलायचा. भावानंतर पुढे काय हा प्रश्न तिला भेडसावत असतो. पण त्याचे उत्तर ती देऊ शकत नाही. निर्विकारपणे व काही करण्याची जीवनातली उमेद संपलेली असल्याकारणाने ती स्वत:चे जीवन एकाकीपणे कसेतरी जगत आहे. मुलांच्या भविष्यासाठी ती आज कष्ट उपसते आहे. तोच तिला आशेचा किरण वाटतो. आपल्या मुलीला खूप शिकवून स्वत:च्या पायावर उभे करण्याची तिची तीव्र इच्छा आहे. निदान आपल्या मुलीवर आपल्यासारखे आश्रिताचे जिणे जगण्याची वेळ येऊ नये असे तिला कळकळीने वाटते. पण "जमेल का ते मला?" अशी शंका तिच्या आत्मविश्वासहीन जीवनात निर्माण होते व साशंक मनाने ती भविष्याला सामोरी जाते.

एकोणीस वर्षाची पदवीधर मुलगी. तिचे लग्न एका शिक्षित सुंदर मुलाशी झाले. दोघांची पसंती एकमेकांना विचारण्यातच आली नाही. कारण तिचा पती लग्नाअगोदर तिला पाहायला आला नव्हता. तेव्हाच तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. शिकलेला

असूनही मुलगा आपल्या भावी पत्नीला न पाहताच लग्नाला तयार होतो ह्यात काहीतरी विपरीत घडते आहे असे तिला वाटले. पण 'माझे आईवडील जे करतील तेच योग्य व ठीक आहे' असे उत्तर त्याच्याकडून तिच्या माहेरच्या मंडळींना आले. लग्नात वीस हजार रुपये हुंडा देऊन व वर सर्व देणीघेणी व्यवस्थित देऊन तिचे लग्न लागले. पण लग्नानंतर तिचा पती तिच्याशी अतिशय रूक्षपणे व अलिप्तपणे वागायचा. तिच्या सासूने अपवादात्मक दोन वेळा सोडले तर त्याचा तिच्याशी संबंधच येऊ दिला नाही. पण आज ना उद्या हे बदलेल ह्या आशेवर ती जगत राहिली. आज तिला एका घटस्फोटितेचे जीवन जगावे लागते आहे. तिचे लग्न झाल्यापासून तिच्या सासू-सासऱ्याने, अगदी प्रथमपासून ठरविल्याप्रमाणे, तिला त्रास द्यायला सुरुवात केली. ती शिकलेली म्हणून घरात जुळवून घेत नाही, अशा तक्रारीचे पत्र लग्नानंतर पंधराच दिवसांनी त्यांनी तिच्या माहेरी पाठविले. त्यांनी तिला माहेरी घेऊन जावे अशी सूचनाही केली. तिच्याकडून जबरदस्तीने एका कागदावर लिहून घेतले, "मी स्वखुशीने माहेरी जात आहे." पण प्रत्यक्षात तिची इच्छा नसताना प्रत्येक वेळी तिला माहेरी आणून सोडले जाई. काही दिवस माहेरी राहिल्यानंतर 'मुलीने सासरीच राहणे करो योग्य' ह्या विचाराने ती सासरच्या मंडळींची वाट पाहून परत सासरी जाई. पण सासरी गेल्यावर तिचा विविध प्रकारे छळ होई. हुंड्याच्या रकमेवर सासू तिला टोचून बोले; तिला व तिच्या पतीला एकांतात बोलूही देत नसे. सारखी त्यांच्या पाळतीवर राहात असे. तरीही एकदा संधी साधून तिने पतीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे उत्तर ठरलेले, "माझे आईवडील जसे सांगतील तसे कर. बाकी मला काही विचारायचे नाही. सांगायचे नाही." त्याचा आपल्या पत्नीशी जणू काही संबंध नव्हता.

सासू-सासऱ्यांनी काही दिवसांनी तिचा अतोनात छळ सुरू केला. तिने कंटाळून, त्या छळास वैतागून घर सोडून जावे ही त्यांची कल्पना होती. पण तिला वाटायचे सासू-सासरे हे किती दिवसांचे ? थोड्या दिवसांत हे सारे काही बदलून जाईल. पण सासूने तिच्या हातचे पाणी पिणे बंद केले, तिला स्वयंपाक करू देणे बंद केले. तिने स्वयंपाक व पाणी ह्यास शिवायचे नाही, असा नियम बनविला. त्याचे कारण विचारले असता सांगितले की, "सासऱ्यांच्या अंगात देव येतो. त्याने सांगितले आहे की सुनेला पाण्याला व स्वयंपाकाला शिवू द्यायचे नाही." त्यानंतर तिचे अतोनात हाल झाले. पाण्याविना तिला तासनतास व्याकुळ व्हावे लागे. तिची उपासमारही सुरू झाली. पतीकडून मारहाणही सुरू झाली. पिण्यासाठी लागणारे पाणीसुद्धा तिला वरून घातले जाई व पाणी घालताना ते तांब्या भरून सांडेल असे हेतुपुरस्सरपणे केले जाई. सांडलेले पाणी पुसत असताना तिला नाना शिव्या सासूकडून दिल्या जात असत. प्रत्येक वेळी जेवताना तिच्या माहेरचा उद्धार केला जात असे. इतका त्रास होऊनही

ती जेव्हा माहेरी जात नाही हे दिसले तेव्हा पतीने तिला खोटेच सांगितले की, 'चल, आपण वेगळे राहू या. मी एक खोली शोधतो, तोपर्यंत तू माहेरी जाऊन राहा.' तिला माहेरी सोडण्यात आले व लगेच थोड्या दिवसांत तिच्या हातात घटस्फोटाची नोटीस पडली. घटस्फोटासाठी त्यांनी कारणे अशी दिली होती, "सुनेने विहिरीत पडून जीव देण्याचा प्रयत्न केला आहे. व पेटलेल्या स्टोव्हमध्ये रॉकेल भरून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे." अशी खोटी कारणे दाखवून त्यांना घटस्फोट मिळालासुद्धा. पण तिने हायकोर्टात अपील दाखल केले आहे.

तिच्या मोठ्या दिरास व जावेसही तिच्या सासूने अतोनात छळले होते व म्हणूनच त्यांनी आपल्या धाकट्या भावास खूप समजाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचाही वाईट अर्थ काढून, वाईट चालीची म्हणून तिची बदनामी करण्यात आली. सासरकडच्या इतर सर्व नातेवाईकांची तिला सहानुभूती होती. त्यांनी कोर्ट केसचा निकाल लागेपर्यंत तिला स्वावलंबी बनविले. आणि त्यामुळेच एके ठिकाणी नोकरी करून ती स्वत:च्या पायावर उभी राहू शकली. घरच्या व बाहेरच्या अनंत अडचणींना तोंड देत ती स्त्रियांच्या वसतिगृहात राहू लागली. तिची चूक नसताना तिला हे भोगावे लागले व त्यामुळे त्यात निश्चितपणे बदल होईल असे तिला वाटे. पण अजून तरी हे घडलेले नाही. शेवटी सासरकडून "पंचवीस हजार रुपये आम्ही देतो व हे प्रकरण मिटव" असा सांगावा आला. पण तिला अजूनही घटस्फोट नको आहे. आज ती स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभी आहे व त्यामुळे ती पोटगीही मागणार नाही. दुसऱ्या लग्नाचा तर ती विचारच करू इच्छित नाही. कारण एका लग्नानंतर आयुष्याची अशी परवड झाल्यावर वैवाहिक आयुष्यासंबंधी तिला कसलेच प्रेम वाटत नाही. एक विवाहिता असूनही तिला वैवाहिक जीवनातला आनंद कधी मिळू शकला नसला तरीही आयुष्याशी खंबीरपणे सामना देण्याचा तिने निर्धार केला आहे.

माहेश्वरी मुलाबरोबर आंतरजातीय प्रेमविवाह करणाऱ्या, विभक्त राहात असलेल्या पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्रीय ब्राह्मण शिक्षिकेचा प्रश्न हा वेगळाच आहे. या लग्नाला तिच्या सासरकडच्या मंडळींचा प्रखर विरोध होता. सासऱ्यांनी मुलाचे लग्न दुसरीकडेच ठरविले. कारण स्वत:च्या मुलावर त्यांना बाप म्हणून हक्क गाजवायचा होता. पण तिचा पती शब्दाचा पक्का होता आणि घरच्या दडपणाला बळी पडला नाही. लग्नानंतर तिच्या सासरकडच्या मंडळींनी त्यांच्याशी सारे संबंध तोडले. त्यांना तिच्या आईची थोडीफार मदत झाली. पण संसार थाटताना त्यांना बाकी कुणीच मदत केली नाही. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देऊन आता त्यांचे आयुष्य खूप सुखी झाले आहे. पण लग्नानंतर जेव्हा सासरकडून आठ महिने तिच्याकडे कुणी आलेच नाही तेव्हा तिला खूप वाईट वाटले. नंतर सासऱ्यांच्या आजारपणाच्या निमित्ताने हळुहळू सर्वजण तिच्याकडे यायला

लागले व आता सर्वांचा विरोधही संपला आहे. पण छोट्याशा खेडेगावी असलेल्या सासरी तिला माहेश्वरी समाजातील खूप जुने रीतीरिवाज पाळावे लागतात व तिला ते खूप जड जाते. शेवटी त्याचीही हळुहळू तिला सवय झाली आहे. पण माहेश्वरी समाजातील सोवळे-ओवळे सांभाळून नोकरी करणे अशक्यच झाले असते तिला, असे मात्र वाटते. ती विभक्त राहाते म्हणूनच तिला नोकरी करून घर व मुले दोन्ही सांभाळता येतात. अन्यथा तिला नोकरीच सोडावी लागली असती. पतीच्या समजुतदारपणाच्या सहकार्यानेच आजपर्यंतचे आयुष्य ती सुखासमाधानात जगू शकली. आता ती सासऱ्यांशीही मनमोकळेपणाने बोलते. पण सासरी असणाऱ्या इतर सुना सासऱ्याबरोबर बोलत नाहीत व सासरेही त्यांच्याशी रीतीरिवाज सांभाळून मोकळेपणाने वागत नाहीत. माहेश्वरी समाजातील मुलींच्या लग्नात जे देणे-घेणे होते त्याचे प्रमाण अतिशय जास्त आहे असे तिला वाटते व त्याचे तिला आश्चर्यही वाटते. मुलीच्या लग्नाला कितीही वर्षे झाली तरीही माहेरहून येताना प्रत्येक वेळी चार साड्या व मुलांना कपडे आणणे जरुरीचेच समजले जाते. त्यामुळेच माहेश्वरी समाज कधी सुधारणार हा प्रश्न तिला पडला आहे.

डॉक्टर असलेली व एका डॉक्टरची पत्नी असलेली स्त्री. तिचा हुंड्यासंबंधीचा अनुभव हा वेगळाच. तिच्या माहेरची परिस्थिती साधारण होती. पण माहेश्वरी समाजात सुनेच्या माहेरहून काही आणले किंवा नाही, ह्यावर तिची प्रतिष्ठा ठरते. त्यामुळे तिच्या सासऱ्यांनी तिला स्वत:कडचे पैसे दिले व कपडे इ. खरेदी करून ' हे माहेरहून आणले आहे ' असे सांगण्यास सांगितले. जगात असे सासरे विरळाच. पण सामाजिक प्रतिष्ठेला तेही बळी पडलेच.

एक डॉक्टर म्हणून समाजाचा तिला वेगळाच अनुभव आला आहे. तिच्याकडे कुमारी मातांचा गर्भ पाडण्याकरिता खूप केसेस येतात. त्यांच्याशी मानवतेच्या दृष्टिकोणातून संबंध प्रस्थापित करणे तिला जरुरीचे वाटते. पण कितीही, कसेही विचारले तरी तिला पूर्ण माहिती मिळू शकत नाही. तिला जी थोडीफार माहिती मिळते त्यावरून तिने काही निष्कर्ष काढले आहेत. लग्न झालेली, अनुभवी पुरुष माणसेच ह्या कुमारिकांना मोहात पाडतात. अत्यंत जवळच्या नातेवाईकांकडून अशा मुलींची फसवणूक होते. मात्र मुलींचे पालक आपलेच दात व आपलेच ओठ म्हणून गप्प बसतात. कुठे तक्रार केली तर आपल्या मुलीचीच अब्रू जाईल ह्या भीतीने ते त्याविरुद्ध काहीही करत नाहीत. म्हणून डॉक्टरकडे जायचे व आपले काम संपवून निघून जायचे ही समाजाची रीत झाली आहे. दिवसेंदिवस हा प्रश्न फार गंभीर होत आहे. पण ह्याकडे मोकळ्या चिकित्सकाच्या दृष्टिकोणातून पाहून काहीतरी मार्ग काढायचा प्रयत्न कोणीही करत नाही. नीतिमूल्यावर आधारित अशा समाजव्यवस्थेचे एक चित्र सर्वांपुढे उभे करण्याचा

प्रयत्न सारे जण करत असतात. त्यातले रंग किती खोटे आहेत हे जरी त्यांना कळत असले तरी त्यातील कटू सत्य सांगण्याचे धैर्य कुणातच नसते. डॉक्टर म्हणून तिला ह्या गोष्टीचे खूप वाईट वाटते. पण तिचा काहीच इलाज चालत नाही.

डॉक्टर असूनदेखील तिच्या लग्नात हुंडा ठरवून द्यावा लागला याचे दुःख दुसऱ्या एका डॉक्टर स्त्रीस नेहमीच वाटते. डॉक्टर असलेल्या पतीस चालतीबोलती हुंडी पत्नीच्या रूपाने मिळत असतानाही हुंड्याच्या विरोधात बोलण्याचे त्याने साहस केले नाही. मुलीनेही आईवडिलांनी ठरवून दिलेल्या मुलाशी लग्न करताना स्वत:ही हुंड्याच्या विरोधात उभे राहण्याचे टाळले. आई वडिलांचा दबाव, चांगला डॉक्टर पती मिळण्याची आशा, स्वत:ही ह्या प्रश्नासंबधी गंभीरपणे विचार करून काही कृती करण्याची अनास्था व सामाजिक दडपण ह्या साऱ्या गोष्टींचा परिणाम त्यांचे लग्न थाटामाटात हुंडा देऊन करण्यात झाले. लग्नातील देण्याघेण्याचे सारे रीतिरिवाज व्यवस्थित पाळल्यामुळे पुढे कधी रुसण्या-फुगण्याचा प्रश्न आला नाही. कमावती स्त्री म्हणून तिला घरात मानाचे स्थान मिळाले आहे. पण पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य मात्र तिला नाही. घरातील सर्व आर्थिक निर्णय व मुलांच्या संगोपनासंबंधीचेही सारे निर्णय घरातील इतर वडिलधारी व कुटुंबप्रमुख घेतात. त्या निर्णयप्रक्रियेत तिचे स्थान नगण्य आहे. तिच्या घरातील असलेल्या अशा ह्या दुय्यम स्थानामुळे तिला खूप वाईट वाटते. पण त्यासंबंधी जास्त विचार न करता कुटुंबात तडजोड करून जीवन जगण्याचे तिच्या इतक्या अंगवळणी पडले आहे की त्याबद्दल आताशा तिला खेदही वाटत नाही. आयुष्य कटकटीविना सुखकर बनविण्याचा मार्ग अवलंबिताना, तिला आपल्या विचारांना तिलांजली द्यावी लागली आहे.

कित्येक वेळेला डॉक्टरच्या श्रमांचे चीज जेव्हा समाज करत नाही तेव्हा तिला वाईट वाटते. एखाद्या गरोदर बाईची सोडवणूक तिच्याबरोबर रात्र रात्र जागून ती करते व तिचे स्वाभाविक बाळंतपण झाल्यावर तिला खूप समाधान मिळते. पण ''Delivery normal'' तर झाली आहे. मग एवढे पैसे कशासाठी द्यायचे ? थोडे कमी करा ना'' असे उद्गार लोकांकडून जेव्हा तिला ऐकायला येतात तेव्हा तिला त्याचे वाईट वाटते. पण पैसाधिष्ठित समाजाची दुसऱ्यांच्या श्रमाचे योग्य मोल न करणारी प्रवृत्ती ही सर्वत्रच आढळते.

डॉक्टर असलेली आंतरजातीय विवाह करणारी छत्तीस वर्षे वयाची स्त्री. पती माहेश्वरी व ती स्वत: ओबीसी. यामुळे त्यांच्या लग्नास घरचा प्रखर विरोध झाला. घरातून लग्नाला कोणीही उपस्थित राहिले नाही. मित्रपरिवाराच्या मदतीवरच त्यांचा संसार उभा राहिला. जुळ्या मुलींना सांभाळताना तिला पतीची जी मदत झाली त्यामुळेच ती आपला व्यवसाय व घर सांभाळू शकली. आता सासरकडच्या मंडळींचा रागही

ओसरलेला आहे. डॉक्टरी पेशा असल्यामुळे हा फरक थोडा लवकर होऊ शकतो असे तिला जाणवले. माहेश्वरी समाजात पाळण्यात येणारे सोवळेओवळे ती पाळत नाही पण तिला समाजात तिच्या जातीवरून कधी त्रास झाला नाही. ज्यांच्यासोबत ती उठत-बसत होती ती सर्वच सुशिक्षित होती. म्हणून तिला कोणी 'खालच्या जातीतील' म्हणून हिणविले नाही. शिक्षणामुळेच तिची परिस्थिती सुधारली असे तिला निश्चितपणे वाटते. आज ती खंबीरपणे स्वतःच्या पायावर उभी आहे म्हणून तिला घरात व घराबाहेर प्रतिष्ठा आहे. त्यामुळेच जीवनातील कुठलाही निर्णय पती-पत्नी परस्परसहकार्याने घेतात.

प्राथमिक व माध्यमिक शाळांत शिकविणाऱ्या शिक्षिकांचे प्रश्न वेगळेच आहेत. डॉक्टर म्हणून जो मानसन्मान एखाद्या स्त्रीला घरात व घराबाहेर मिळतो तो एखाद्या शिक्षिकेला नाही हे एक कटू सत्य आहे. स्त्रियांना आर्थिक गरजेपोटी नोकरी करावी लागते. परंतु तरीही त्यांनी कमावलेल्या पैशांची किंमत घरातील इतर व्यक्तींना अपवादानेच जाणवते.

लग्नाअगोदर नोकरीस सुरुवात केलेली तीस वर्षे वयाची शिक्षिका. पण कमावती म्हणून घरातील तिच्या स्थानात काहीही बदल झालेला नाही. घरासाठी जो पैसा ती खर्च करते त्याचेही महत्त्व कुणाला वाटत नाही. तिचे लग्न बऱ्याच उशिरा, म्हणजे तिच्या वयाच्या २५ व्या वर्षी झाले. तिच्या माहेरची आर्थिक परिस्थिती अतिशय साधारण होती. पण तरीही हुंडा देऊन तिचे लग्न लावण्यात आले. लग्नाअगोदर पती-पत्नींचा कुठल्याच गोष्टीवर संवाद झाला नाही. नाईलाजास्तव तिने त्याच्याशी लग्न केले. पण लग्नानंतर मात्र तिला सासरी अतोनात त्रास होऊ लागला. तिची लग्न झालेली पण माहेरीच नवरा व मुलांबाळासह येऊन राहिलेली नणंद, सासू व सासरे ह्या सर्वांनी मिळून तिला सासरी छळायला सुरुवात केली. तिला दोन वेळेस पोटभर खायला न देता उपाशी ठेवण्यात येई. घरातील सर्व खाण्याच्या वस्तू कुलुपात ठेवण्यात येत. पण तिचा पती ह्याकडे दुर्लक्ष करीत असे. तिच्या लग्नाअगोदर दोन मोठ्या जावासुद्धा अशा त्रासाला कंटाळून माहेरी निघून गेल्या होत्या. शेवटी, तिनेही नोकरी न सोडता माहेरी राहण्याचा निर्णय घेतला. पण माहेरी राहून नोकरी करणाऱ्या या स्त्रीला आपला सारा पैसा सासरी पाठवावा लागे. तिचा खर्च तिच्या माहेरच्या मंडळींनीच करावा अशी सूचनावजा आज्ञा तिला करण्यात आली होती. एक वर्षभर तिने आपला पगार सासरी पाठवला. पण नवऱ्याचे 'सासरी ये' म्हणून पत्र आले नाही, की 'तू येऊ नकोस' म्हणूनही पत्र नाही. तीच सुट्टीत छोट्याशा खेडेगावी असणाऱ्या सासरी जात असे. पण त्यावेळीही 'तू का आलीस' असेही पती विचारेना किंवा सुट्टी संपल्यावर 'तू का चाललीस' असेही बोलेना. त्याच्या मनात काय आहे हे तिला कळेना. पण शेवटी जेव्हा तिच्या पदरात मुले पडली तेव्हा तिने आपले पैसे पतीकडे

न पाठविण्याचा निर्णय घेतला. माहेरी राहून, नोकरी करून आपल्या मुलांना वाढवायचे तिने ठरविले. पण त्याचे सोयर-सुतक पतीला वाटले नाही. मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्याने कधी उचलली नाही. तिला एक पैशाचीही मदत न करता फक्त आईवडील जसे सांगतील तसेच वागायचे असे त्याने ठरविलेले दिसत होते. तिला व मुलांना भेटायलाही तो कधी तिच्या माहेरी आला नाही. मुलांची सर्व जबाबदारी उचलून हिनेच सुट्ट्यांत त्यांना घेऊन सासरी जायचे! हे आजपर्यंत चालूच आहे. बरे, तेथे सासरी गेल्यावर तिला तेथील सर्व जुने रीतीरिवाज पाळावेच लागतात. त्यामुळे तिला तेथे जावेसेही वाटत नाही. भला मोठा घुंघट काढून तिला सासरी वावरावे लागते. तिचा जीव त्यात गुदमरून गेल्यासारखा होतो. पण तरीही तिला हे सारे करावेच लागते. तिच्या विचाराचा व भावनांचा कधीच विचार केला जात नाही.

लग्नानंतर पतीच्या प्रोत्साहनामुळे उच्च शिक्षण पूर्ण करून पीएच.डी.चा अभ्यास करणारी व शिक्षिकेची नोकरी करणारी स्त्री आज समाधानाने जीवन जगत आहे. पण हे सारे मिळवायला तिला खूप प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. म्हाताऱ्या आईवडिलांना दुसरा कोणाचाच आधार नसल्याने स्वत: त्यांच्याजवळ राहून त्यांना आधार देण्याचे धाडस तिने केले आहे. पतीही दुसऱ्या गावी शिक्षक आहे. दोघांनी एके ठिकाणी नोकरी मिळविण्याचा खूप प्रयत्न केला, पण तसा योग जुळून आला नाही. आता तिने तो नाद सोडून दिला आहे. तिचे लग्न झाल्यानंतर छोट्याशा खेड्यात असणाऱ्या तिच्या सासरी सुनेवर खूप बंधने होती व अजूनही आहेत. भला मोठा घुंघट काढून कुठल्याही पुरुषांशी न बोलता स्त्रीने वागावे हे तिला आजही पाळावे लागते. पण सुट्ट्यांपुरती ती बंधने पाळण्याची तडजोड ती आपल्या जीवनात करत आलेली आहे. त्यातून ती प्रथम शिक्षणासाठी माहेरी राहिली व नंतर आता नोकरीनिमित्त माहेरी राहते, हे सासरी कुणालाच पसंत नव्हते. कित्येक वेळेला पतीला घरातून जाण्याची आज्ञा होई. कारण 'त्याला आयत्या भाकऱ्या घालण्याची आमची तयारी नाही' असे सांगण्यात येई. पण पतीस ते घर सोडून कधी जावे लागले नाही व तिनेही आपल्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. पण सासरी तिच्यावर एक प्रकारचा बहिष्कारच घालण्यात येई. तिला कुठलेही काम करू द्यायचे नाही व मग ती काम करत नाही म्हणून तिला रागे भरायचे. असे बरीच वर्षे चालले होते. नोकरी करत असतानाही प्रथम तिला असाच अनुभव आला होता. तिच्या शिक्षणामुळे तिच्या आईवडिलांनाही समाजातील लोकांची खूप बोलणी ऐकावी लागली. "शिक्षणाच्या नावाखाली मुलीला सासरी नांदायचे नाही" असे निष्कर्ष काढून सारीजण तिला बोलत असत. तिच्यातच काही दोष आहे असे गृहीत धरून तिच्याकडे कुत्सित नजरेनेच पाहिले जाई. पण आईवडिलांनी व तिने हे सारे निमूटपणे सहन केले. आता परिस्थिती बऱ्याच प्रमाणात

बदलली आहे. शिक्षणाने स्वावलंबी बनल्यानंतर तिचा आत्मविश्वासही वाढला आहे. तिला आता घरातही आपल्या मुलांसाठी काही निर्णय घेण्याचा अधिकार मिळाला आहे. ह्या साऱ्या बदललेल्या परिस्थितीत ती आता समाधानी आहे व हे समाधान शेवटपर्यंत राहावे असेच तिला वाटते.

नोकरी करणाऱ्या शिक्षिकेकडे आजही घरात पूर्णपणे सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. तिने नोकरी करून सारा पैसा घरी तर आणावा- घरच्या वडील मंडळींकडे किंवा पतीकडे द्यावा ही सर्वांची अपेक्षा असते व त्याचबरोबर तिने घरचे कामही बरोबरीने करावे अशी घरातील इतर मंडळींची अपेक्षा असते. मुले, पती, घरातील इतर माणसे व नोकरी ह्यात ती अशी गुरफटून जाते की स्वत:लाही ती ओळखू शकत नाही. तिला आपले व्यक्तिमत्त्व हरवल्यासारखे वाटते. एकत्र कुटुंबातील इतर बायकांच्या लेखी, नोकरी करणारी स्त्री म्हणजे घरातील काम कमी करणारी, घरकामाची जबाबदारी टाळणारी अशीच तिची प्रतिमा तयार झालेली असते. नोकरी करणारा पुरुष व नोकरी करणारी शिक्षिका ह्याकडे पाहण्याचा घरातील मंडळींचा व समाजाचा दृष्टिकोण अतिशय भिन्न असतो. नोकरीव्यतिरिक्त स्त्रीला सर्व वेळ घरासाठी द्यावा लागतो. त्याचे तिला वैषम्य वाटत नाही, पण घरकामासाठी दिलेल्या वेळेची किंमत एकत्र कुटुंबातील इतर माणसांना सहसा जाणवत नाही. पुरुषांची कमाई ही घर चालविते व त्यामुळे तो कुटुंबप्रमुख म्हणूनच गणला जातो. पण कितीही केले तरी स्त्रीला हे स्थान सहसा मिळू शकत नाही. हाच अनुभव एका शिक्षिकेला आला. घरात होणाऱ्या कुरबुरींचा मानसिक दबाव तिच्यावर सतत पडत राही, त्यामुळे तिचे मन सतत धास्तावलेले असायचे. एकत्र कुटुंबामुळे मुलांना घरपण, प्रेम सतत मिळत जाते. पण सततच्या Tension मुळे तिचे घरपण हरवून जाते. स्वत:चा आनंद, अपमान सारे काही विसरून सगळ्यांची मने सांभाळताना तिला तारेवरची कसरत करत सतत वावरावे लागते. कमावत्या पुरुषाला मिळणारा मान तर सोडाच पण आपल्या सहकाऱ्यांना घरी बोलाविण्याचा अधिकारही तिला मिळत नाही. तो हट्टाने मिळविण्याचा प्रयत्न तिने केला तर घरातील भांडणे आणखीनच वाढतात व त्यामुळे ते सारे नकोसे होते. त्यापेक्षा जे आहे तेच चांगले असे समजून जीवन शांतपणे व्यतीत करण्याचा प्रयत्न ती करते.

अत्यंत गरिबीतून दिवस काढलेल्या, लग्न झाल्यापासून हातात पापड लाटण्यासाठी पोळपाट लाटणे घेतलेल्या साठ वर्षे वयाच्या वृद्धेला आर्थिक स्थैर्य तर कधीच लाभले नाही. पण जे आहे ते निमूटपणे सोसायचे एवढेच तिला माहीत होते. अत्यंत गरिबी अनुभवल्यामुळे स्वत: कमावत असूनही तिला कधी स्वत:चा पैसा स्वत:कडे ठेवता आला नाही, व स्वत:बद्दल विश्वासही वाटला नाही. आज मात्र म्हातारपणी जेव्हा

तिची मुलगी आपल्या मुलांसह तिच्याकडे राहते व तिला आधार देते हे पाहून तिला जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते व स्वत:ला मुलगा नसल्याचे दु:खही मग तिला जाणवत नाही.

काही स्त्रिया स्वत:च्या हिमतीने सारी स्थिती निभावून नेतात. त्यातीलच पंचेचाळीस वर्षांची एक निरक्षर स्त्री. अत्यंत जुन्या पद्धतीने तिचे लग्न झाले असले तरीही पतीचा भोळसर स्वभाव तिने लगेच हेरला. स्वत: स्वयंपाक करण्याचे काम करून घर चालविण्याची जबाबदारी तिने समर्थपणे उचलली. घरात गरिबी असूनही पाच अपत्यांनंतरही तिने कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली नाही. चार मुलींनंतर झालेला मुलगा आता तिला कामात मदत करतो. आपल्या मुलींना तिने जुजबीच शिकविले आहे. स्वत:वर घर चालविण्याची जबाबदारी येऊनदेखील मुलींच्या शिक्षणाबाबतचे आपले मत तिने बदलले नाही.

## हुंड्यासाठी, देण्या-घेण्यासाठी होणारा छळ सोसणाऱ्या स्त्रियांची काही शब्दचित्रे

### एकत्र कुटुंबातील स्त्रिया

माहेश्वरी समाजात कुटुंब गरीब असो की श्रीमंत, स्त्री निरक्षर असो की पदवीधर किंवा उच्चशिक्षित, हुंड्यासाठी, देण्या-घेण्यासाठी स्त्रीचा छळ होताना साधारणपणे दिसतो. एकोणीस वर्षे वयाच्या तरुणीला तिचे लग्न दहा हजार रुपये हुंडा देऊन झाले असतानाही सासूकडून होणाऱ्या छळास पतीच्या साक्षीने तोंड द्यावेच लागते. एकत्र कुटुंब टिकावे म्हणून प्रत्यक्ष दिसत असणाऱ्या छळाकडे तिचा पती डोळेझाक करतो.

अठ्ठावीस वर्षे वयाच्या तरुणीच्या लग्नात एक लाख रुपये हुंडा देऊनही देण्या-घेण्यासंबंधी तिच्या सासरची मंडळी तिच्यावर नाराजच असतात. माहेरहून इतका पैसा येत असूनही तिला पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य नाही. घरातील सारे निर्णय सासू-सासरेच घेत असल्यामुळे कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया तिची इच्छा असूनही ती करू शकली नाही. घर अत्यंत जुन्या वळणाचे असल्यामुळे पतीच्या सहवासासंबंधीही तिला खूप बंधने पाळावी लागतात. तिच्या माहेरहून प्रत्येक सणावाराला पुष्कळ काही येत असूनही तिला माहेरच्या माणसांसाठी साधा चहाचा एक कप करण्याचाही अधिकार नाही ह्याचे तिला दु:ख वाटते.

एकवीस वर्षे वयाच्या तरुणीस लग्नात माहेरची ऐपत नसताना २५००० रु. हुंडा दिला. पण तरीही तिच्या सासरची हाव संपली नाही. सासरच्या माणसांनी तिला

माहेरी पाठवणे बंद केले व माहेरचा पदोपदी उद्धार केला. असा मानसिक व शारीरिक छळ तिला सतत सहन करावा लागतो.

वीस वर्षे वयाच्या मॅट्रिक झालेल्या तरुणीसही एक लाख रु. हुंडा देण्यात आला पण तरीही सासरची नाराजी संपली नाही व त्यामुळे तिचे माहेर तुटले. सासरच्या वाढत्या अपेक्षा जेव्हा तिला मुलगा झाला तेव्हा पूर्ण झाल्या व माहेरच्यांशी पुन्हा संबंध प्रस्थापित झाले.

बावीस वर्षे वयाच्या मॅट्रिक झालेल्या स्वत:च्या पद्धतीने इंजिनीअर मुलाशी लग्न करणाऱ्या तरुणीसही देण्याघेण्यासाठी जाळून मारण्यापर्यंत छळ सहन करावा लागला. शेजारपाजाऱ्यांनी तिचा जीव वाचविला. नाही तर तीही एक हुंडाबळी झाली असती. पण आजही तिचा पती तिला घरातील सर्व माणसांदेखत मारहाण करतो व सारेजण गप्प बसून पाहात असतात. तिची अवस्था घरात एखाद्या कैद्यासारखी करून टाकली आहे.

माहेर-सासरची परिस्थिती चांगली असलेल्या सत्तावीस वर्षे वयाच्या तरुणीचीही व्यथा देण्या-घेण्यामुळेच निर्माण झाली आहे. तिच्या लग्नात सोळा हजार रु. हुंडा दिला. त्यानंतर सारे सणवार व्यवस्थित पाठवले व आजपर्यंत तिच्या मुलांच्या कपड्यांचा खर्चही माहेरच्या माणसांनीच केला. पण तरीही सासरी समाधान नाही. तिला नानाप्रकारे बदनाम करून तिचा मानसिक छळ केला जातो. एकत्र कुटुंबात थोडेफार असे चालायचेच, म्हणून पतीही साऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो व म्हणूनच तिला तो सारा छळ मुकाटपणे सहन करावा लागतो.

पदवीधर तरुणीच्या एका उच्चशिक्षित मुलाशी लागलेल्या लग्नात सत्तर हजार रुपये हुंडा दिला. पण, तरीही सासूची 'काही हौस-मौज झाली नाही' म्हणून सतत तक्रार असते. पण तरीही एकुलता एक मुलगा व सून असल्यामुळे 'त्यांना म्हातारपणी दुसरे कोण सांभाळणार ?' हा विचार करून ती तेथेच प्रचंड मानसिक दबावाखाली वावरत असते.

सत्तावीस वर्षे वयाच्या मॅट्रिक झालेल्या तरुणीच्या विवाहात २० हजार रुपये हुंडा व वर मानपान इत्यादी सर्व करून दिले. पण तरीही देण्याघेण्यासाठी तिचा छळ होतो तो प्रामुख्याने सासूकडूनच. तिच्या पतीने, ती माहेरी गेली असताना तिला एकदाच २०० रु. खर्चायला दिले तर घरात भांडणे झाली. स्त्री माहेरी गेली की तिचा सारा खर्च माहेरच्यांनी करायला हवा असा साधारणपणे अलिखित नियम आहे. म्हणूनच कमावत्या मुलानींही आपल्या बायको-मुलांसाठी काहीही करायचे नाही अशी अपेक्षा आईवडील ठेवतात. त्यामुळे सुनेला काही अधिकार मिळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

एकतीस वर्षे वयाच्या तरुणीच्या विवाहात तिच्या आईने घरी अत्यंत गरिबी असताना, स्वतः शिलाईकाम करून अकरा हजार रुपये हुंडा दिला. कारण तिचे वडील घराची काहीही जबाबदारी न उचलता बायकोकडे न राहाता स्वतःच्या आईकडेच राहातात. हे सर्व दिसत असूनही त्या तरुणीच्या सासूची विविध वस्तूंसाठी करण्यात येणारी फर्माइश संपली नाही. पती ह्या सर्वांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे तिला हा त्रास निमूटपणे सहन करावा लागतो. दुसऱ्या एका, चोवीस वर्षे वयाच्या पदवीधर तरुणीच्या माहेरच्या माणसांना तिच्या सासरकडच्या अप्रत्यक्षपणे प्रकट केलेल्या मागण्या पुरविताना खूप त्रास झाला आहे.

सव्वीस वर्षे वयाच्या मॅट्रिक झालेल्या तरुणीच्या लग्नात देण्यात आलेला सारा हुंडा तिच्या सासरच्या इतर नातेवाईकांनी हडप केला व तिला तिचा पती, सासू, सासरे व मुले ह्यांच्यासह घराबाहेर हाकलून दिले. सासूचा स्वभावही इतका विक्षिप्त आहे की साध्या साध्या गोष्टीवरून घरात भांडण होते व सुनेला शिव्या देत विहिरीत पडून जीव देण्याची धमकी सासू देते. पण सासूला दुसरा कुणीच आधार नसल्यामुळे आणि सासूच्या अशा भांडखोर स्वभावामुळे सासराही दुसऱ्याच गावी नोकरी करतो व त्यामुळे त्या स्त्रीला खूप मनस्ताप सहन करावा लागतो. त्या मनस्तापामुळे वेड लागेल की काय असे तिला वाटते.

पंचवीस वर्षे वयाच्या पदवीधर तरुणीचीही अशीच कहाणी. तिचा पती बेकार असल्यामुळे तिला, तिच्या पतीला व मुलाला पोसणाऱ्या सासू-सासऱ्यांकडून तिला खूप मानहानी सहन करावी लागते. काही न कमावता आयते बसून खाण्यात सुनेचाच दोष गृहित धरला जातो. तिला स्वतः काही करून पैसे कमावण्याची जिद्द आहे, पण घरच्या प्रतिष्ठेपायी तिला तशी परवानगी मिळत नाही. घरातील रोजच्या भांडणामुळे तिने स्वतः जाळून घेण्याचा प्रयत्न केला व तिच्या पतीनेही वैतागून तिला जाळण्याचा प्रयत्न केला. पण शेजारपाजाऱ्यांनी तिचा जीव वाचविला. पण रोज होणाऱ्या ह्या कटकटीपायी तिला विहिरीत जीव द्यावासा वाटतो.

साठ वर्षे वयाच्या स्त्रीच्या दोन मुलींना देण्याघेण्यासाठीच सासरी खूप त्रास होतो. त्यासाठी त्यांना मारहाणही होते. पण तिने त्यांना माहेरी आधार न देता तशाही परिस्थितीत सासरीच राहाण्याचा सल्ला दिला आहे. तेच योग्य आहे असे तिला वाटते. म्हणून त्यांचा शेवट काही जरी झाला तरी आपला विचार बदलण्याची तिची तयारी नाही. दुसऱ्या एका पस्तीस वर्षे वयाच्या प्रौढेस लग्नात बारा हजार रुपये हुंडा दिला असतानाही देण्याघेण्यावरून आजही घरात एकसारखे अपमानित व्हावे लागते तर बिजवराशी लग्न लागलेल्या दुसऱ्या एका प्रौढेस माहेरची अत्यंत गरिबी असतानाही देण्याघेण्यावरून सासूची बोलणी चुकली नाहीत.

## विभक्त कुटुंबातील स्त्रिया

विभक्त कुटुंबातील स्त्रियांचीही काही फार वेगळी परिस्थिती नाही. लग्न झाल्याबरोबर एकत्र कुटुंबात राहात असताना देण्याघेण्यासाठी त्यांचा प्रामुख्याने सासूने छळ केलेला दिसतो. एकतीस वर्षे वयाच्या स्त्रीचा सासूने ह्याच कारणासाठी छळ केला व माहेरहून आलेले स्त्रीधन न देता तिला घराबाहेर हाकलून दिले. त्यावेळी पतीला नोकरी नसल्यामुळे तिचे खूप हाल झाले. पण शेवटी पतीस नोकरी लागल्यानंतर ती आर्थिकदृष्ट्या स्थिर झाली. पण पतीच्या रागीट व विक्षिप्त स्वभावाचा आजही तिला खूप त्रास होतो. छोट्याशा कारणावरून तो तिला शिव्या देऊन मारहाणही करतो. पण ते सारे निमूटपणे सहन करण्याशिवाय तिला दुसरा पर्याय दिसत नाही.

सत्तावीस वर्षे वयाच्या तरुणीचाही लग्न झाल्याबरोबर एकत्र कुटुंबात राहात असताना खूप छळ झाला. लग्नात पाच हजार रु. हुंडा दिला असतानाही हुंड्यासाठी तिला उपाशी ठेवण्यापासून ते मारहाण करण्यापर्यंत अनेक प्रकारे छळ करण्यात आला. आता विभक्त झाल्यानंतर तिचा त्रास कमी झाला आहे व तिला मानसिक समाधानही आहे. बत्तीस वर्षे वयाच्या, अकरावी शिकलेल्या, माहेरी व सासरी खूप गरिबी असलेल्या तरुणीचे लग्न पाच हजार रु. हुंडा देऊन झाले. पण लग्नानंतर एकत्र कुटुंबात असताना देण्याघेण्यासाठी तिच्या पतीच्या सहाय्याने सासूने तिचा अतोनात छळ केला. शेवटी सासूने त्यांना काहीही न देता घराबाहेर काढले. विभक्त झाल्यावरही तिच्या पतीला दोन्ही घरांचा आर्थिक भार सांभाळावा लागे. त्यामुळे त्याच्या तुटपुंज्या पगारात दोन्ही घरांचा खर्च भागविणे तिला खूप जड जाई. पण नंतर पतीला प्रमोशन मिळाले व सारे काही व्यवस्थित झाले. आज तिच्या सासू-सासऱ्यांचा सांभाळही त्यांना स्वतःजवळ ठेवून तीच करते, कारण तिचे दुसरे दीर त्यांना सांभाळायला तयार नाहीत.

बेचाळीस वर्षे वयाची, पाचवी शिकलेली, सतराव्या वर्षी तिची पसंती न विचारता घुंघटमध्ये, पाच हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली प्रौढा. लग्नानंतर सात वर्षेपर्यंत ती आपल्या दीर, जावा, सासू, इत्यादींसोबत एकत्र राहात होती. पण ती गरीबाघरची व तिचा पती सामान्य बुद्धीचा म्हणून मग घरात तिचा खूप छळ होई. तिच्या आईने शिलाईकाम करून तिला पोसले होते व तिचे लग्न लावले होते. पण तिच्या इतर जावा अत्यंत श्रीमंत घरच्या. त्यांच्या घरून खूप काही सामान येत असे. त्यामुळे तिला खूप त्रास सहन करावा लागला. गरिबाघरची मुलगी म्हणून तिची तब्येत चांगली असो किंवा नसो तिला एकटीलाच घरातील सर्व म्हणजे स्वयंपाक, भांडी, धुणे, पाणी आणणे इत्यादी काम करावे लागे. तिला कोणीही मदत करत नसे. तिच्या आजारपणात तिच्यासाठी औषधही आणले जायचे नाही. म्हणून मग तिचा पती तिला माहेरी नेऊन

सोडे. आईची ऐपत नसताना आईने सहा बाळंतपणे व मुलीच्या आजाराचा सारा खर्च केला. ह्यामुळे वैतागून शेवटी ती विभक्त राहू लागली. तिची आर्थिक अडचण काही दूर झाली नाही. पण तिला कमीत कमी मानसिक शांतता तरी मिळाली आहे. आर्थिक मदत करण्यासाठी शिलाईकाम करून पैसे कमवावेत असे तिला वाटते. पण सामाजिक प्रतिष्ठेपायी पतीचा त्यास विरोध आहे व पतीचा निर्णय तिला ऐकावाच लागतो.

पंचवीस वर्षे वयाची, पंचवीस हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली तरुणी. पंचवीस हजार रुपये हुंडा दिला होता तरी सासरी लग्नानंतर सुरुवातीला देण्याघेण्यासंबंधी त्रास झालाच. लग्नानंतर पाच वर्षेपर्यंत ती एकत्र कुटुंबात सासू, सासरे, दीर ह्यांच्यासोबत राहात होती. त्या एकत्र कुटुंबपद्धतीमुळे पतीला कुटुंबाची कधी जबाबदारी उचलावी वाटली नाही. पती चांगला शिकलेला असल्याकारणाने त्याच्या व्यवसायात त्याला खूप पैसा मिळत होता. पण तो सर्व पैसा पत्ते, दारू ह्यात घालवीत असे. स्वतःच्या कमाईचे अतिशय थोडे पैसे तो घरी देत असे. वाईट सवयीमुळे कधी कधी तो घरीही चार-चार दिवस येत नसे. त्यामुळे तिचे, सासऱ्याचे व पतीचे खूप भांडण होई. पतीत काही बदल होताना दिसेना, तेव्हा तिने दुसऱ्या ठिकाणी नोकरी करण्याचा आग्रह धरला व शेवटी घरच्यांचा विरोध न जुमानता तिने कमी पैसे मिळणारी नोकरी करण्याचा निर्णय घेतला व पतीचे सारे व्यसन सुटले. तिच्या घरी आता पैसा जरी कमी येत असला तरी विभक्त राहून तिला मानसिक शांती मिळाली आहे. घरास हातभार लावावा म्हणून तीही काही ना काही व्यवसाय करून पैसा कमावते. ह्या सर्व कारणांमुळे पती-पत्नीत बराच समजुतदारपणा आला आहे.

एकेचाळीस वर्षे वयाच्या प्रौढेला मूलबाळ नसल्यामुळे तिने दिराच्या मुलीला दत्तक घेतले. मुलीच्या लग्नात पन्नास हजार रु. पर्यंतचे सामान तिच्या सासरी दिले. पण देण्या-घेण्यावरून तिच्या सासूने तिचा छळ केला. त्याचा शेवट मुलीच्या, जळून संशयास्पदरित्या मृत्यूत झाला. कोर्टातून सारी सासरकडची मंडळी निर्दोष सुटली. पोटचे पोर नव्हते पण दत्तक घेतलेल्या मुलीच्या बाबतीत हे असे घडले. म्हणून त्या दुःखाने तिला काही सुचतच नाही.

चव्वेचाळीस वर्षे वयाची, निरक्षर, पाच हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली प्रौढा. तिच्या लग्नाच्या वेळी सासर-माहेरची, दोन्हीकडची परिस्थिती साधारण होती. पण तरीही तिला देण्या-घेण्यावरून सासरे खूप बोलायचे. त्यांच्या जोडीला सासू, दीर व पतीही खूप त्रास देत. तिचे दीर व पती तिला मारहाणही करीत. घरात शेती, दुधदुभते होते तरीही तिच्या मुलांना सासूची मर्जी असेल तरच पाणी मिसळून दूध मिळायचे. तिची मोठी मुलगी ह्या छळापायी औषधाविना मेली. त्या दुःखाच्या भरात

तिने त्रासून उंदराचे औषध पिऊन जीव देण्याचा प्रयत्न केला. त्यातून ती बचावली. पण परिस्थितीत काहीही फरक झाला नाही. पण शेवटी सर्वात धाकट्या जावेने साहस करून सासूची चूक दाखविण्यास सुरुवात केली. पण तरीही चालू राहिलेल्या छळास कंटाळून तिने मुलांसह वेगळे घर केले. तिचा पतीही खूप नाराज झाला. पण आता आठ-दहा दिवसांनी का असेना तो तिच्याकडे येतो. तिला घरून शेतीचा काही माल न मिळता घरखर्चासाठी काही ठराविक पण तुटपुंजी रक्कम मिळते. त्यात घर चालविताना तिला खूप त्रास होतो. तिचा पती दुसरे काहीच सामान आणून देत नाही. पण तरीही मिळालेल्या मानसिक शांतीमुळे ती तसेच वेगळे राहणे पसंत करते.

पंचवीस वर्षे वयाची, सातवी शिकलेली, तिची पसंती न विचारता वीस हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेली तरुणी. तिची व्यथाही हीच. एकत्र कुटुंबात राहात असताना माहेरहून येणाऱ्या प्रत्येक वस्तूविषयी सासू-सासरे नाराज असत. कारण त्या वस्तू फार हलक्या प्रतीच्या आहेत असे त्यांचे म्हणणे असे. देण्याघेण्यासंबंधी तिला सासरी खूप त्रास सहन करावा लागला. त्यामुळे तिची सासू तिच्यावर इतकी नाराज असे की स्वयंपाक करताना तिला सारे सामान मोजून दिले जाई व सर्वजण जेवल्यानंतर उरलेसुरले खाण्यास तिला दिले जाई. सर्वांच्या अगोदर तिने जेवायचे नाही व सर्वांचे जेवण झाले की चांगल्या वस्तू म्हणजे तूप, शेंगदाणे, वगैरे सर्व सासू कुलुपात ठेवून देत असे. एवढ्यावरच न थांबता काम करण्यावरून तिची बदनामी करण्यास सासूने सुरुवात केली. ती गरोदर असताना सासूने मुलाला सांगायचे की, " सुनेला आज अमुक खावेसे वाटते. तू घेऊन ये. " तिच्या पतीने ती वस्तू घरात आणली की सासूने व नणंदेने ते सारे खाऊन टाकायचे. पण तिला त्यातले काहीच मिळायचे नाही. सुरुवातीला पतीचाही ह्या गोष्टींवर विश्वास बसत नसे. त्यामुळे सासूच्या सांगण्यावरून तो तिला अनेकदा मारहाण करी. शेवटी पतीला सासूचा खोटेपणा कळून आला व तिचा मार थांबला. पण त्यावर सर्व काही थांबले नाही. सासूने मुलाला सांगितले की, " सून इतकी वाईट आहे की आता मला तिच्या हातचे पाणीही प्यायचे नाही व भाकरीही खायची नाही. " असे म्हणून सुनेला घरात अस्पृश्यासारखे वागविण्यास सुरुवात केली व शेवटी त्यांना वेगळे राहण्याचा आदेश दिला. पती-पत्नी तेथेंच, वाड्यातल्या एका खोलीत वेगळे राहावयास लागले. पण एकत्र असणाऱ्या व्यवसायातून त्यांना त्यांचा काहीही हिस्सा देण्यात आला नाही. रोजच्या खर्चासाठी त्यांना सासूकडे पैसे मागावे लागतात. त्यामुळे तिचा छळ आणखीनच वाढला. तिला वाड्यातही अस्पृश्यासारखे वागविण्यास सुरुवात झाली. वाड्यातल्या पाणी साठविण्याच्या हौदातून बाकी सर्वांना पाणी घ्यायची परवानगी होती. पण त्या हौदास तिने हातही लावायचा नाही असा हुकूम सासूने काढला. एकदा तिला पाण्याची गरज भासली तेव्हा तिच्या

पतीने त्यातील पाणी तिला दिले तर सासूने त्याच्याशीही खूप भांडण केले.

एकत्र असणारा व्यवसाय पतीस आता करूही देत नाहीत. दुकानावर बसू देत नाहीत. तिच्या माहेरून आलेले पैसे व सामानही देत नाहीत की त्यांना त्यांच्या हक्काची व्यवसायातील वाटणीही देत नाहीत. उलट पतीवर असा आरोप ठेवला जातो की दुकानातील माल गुपचुप तो आपल्या पत्नीस आणून देतो. तिची सगळीकडूनच कोंडी झाली आहे. तिच्या मोठ्या जावेचा असाच क्रूररीत्या छळ होऊन ती संशयास्पदरीत्या मृत्यू पावलेली आहे. त्यामुळे तिला काय करावे हे सुचेनासे झाले आहे. तिने माहेरीच आपल्या आईवडिलांकडे पैशाची मदत मागितली आहे की त्या मदतीने पती दुसरा व्यवसाय सुरू करू शकेल. सगळे स्थिरस्थावर होईपर्यंत तिला माहेरी जाऊन रहाण्याचा सल्ला पती देतो. पण तिला सासूच्या स्वभावाचा भरवसा वाटत नाही. एखादेवेळेस स्वतःच्या मुलाला देखील ती काही करेल अशी त्या तरुणीला भीती वाटते. म्हणून कितीही अडचणी आल्या तरी ती पतीला सोडून जाण्यास तयार नाही. तिची दोन्ही अपत्ये लहान असल्याकारणाने ती स्वतः काही काम करून कमावू शकत नाही. पण पती-पत्नीच्या सहकार्याने हेही दिवस जातील अशी आशा तिला वाटते.

अठ्ठेचाळीस वर्षाची अत्यंत जुन्या पद्धतीने रहाणारी प्रौढा. पैशासाठी आपल्या मुलाचे वैवाहिक आयुष्य तिने उध्वस्त केले आहे. मुलाच्या लग्नात खूप हुंडा घेऊन त्याचे एका मनोरूग्ण स्त्रीशी लग्न लावून दिले. लग्नानंतर सुनेचे कोणाशीच पटेना. त्याची प्रतिक्रिया सुनेच्या माहेरी निघून जाण्यावर झाली. सुनेला सासू नांदविण्यास आणतही नाही, तिला घटस्फोटही देत नाही किंवा तिला मुलाच्या गावी वेगळे घर करूनही देत नाही, त्यामुळे मुलाच्या जीवनात फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण मुलास स्वतः काही निर्णय घेता येत नाही.

तीस वर्षे वयाची चौथी शिकलेली, पंधरा तोळे सोने व तीन हजार रुपये हुंडा देऊन लग्न लागलेल्या तरुणीची व्यथाही पैशांच्या देण्या-घेण्यावरूनच निर्माण झाली. तिच्या लग्नाच्या वेळी माहेरची परिस्थिती अतिसाधारण तर सासरची चांगली होती. लग्नात वडिलांनी त्यांना झेपेल तसे सर्व काही दिले. पण तरीही लग्नात वडिलांनी दिलेले आहेराचे कपडे सासरच्या लोकांना आवडले नाहीत, म्हणून सर्वजण रागावले व सर्व वऱ्हाड परत गेले. फक्त तिचा पती तिच्याबरोबर राहिला. सासरी आल्यावर त्यामुळे तिला त्यासंबंधी खूप त्रास झाला. तिच्या माहेरच्या गरिबीचा सतत उद्धार होई. तीन वर्षे तिने हे सारे कसेबसे सहन केले. पण शेवटी फक्त नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर पडून विभक्त रहाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. स्वतःचे दागिने मोडून एक किराणा दुकान घातले. पती-पत्नी दोघे मिळून तो व्यवसाय पहातात. आर्थिकदृष्ट्या

त्यांना खूप फायदा जरी होत नसला तरी स्वतंत्रपणे ते स्वतःच्या पायावर उभे आहेत व म्हणून त्यांना मानसिक समाधान आहे.

अशा रीतीने एकूण ५०० स्त्रियांपैकी २५ ते ३० स्त्रियांनी स्वतःचा देण्याघेण्यासाठी होणारा छळ उघडपणे सांगितला. बाकीच्या स्त्रियांच्या जीवनात कदाचित त्यासंबंधी धुसफुस चालू असेल पण ती उघडपणे सांगण्याचे त्यांना साहस नसेल किंवा ती धुसफुस त्यांना सुसह्य तरी वाटत असेल. हा छळ करणारा प्रमुख घटक दृश्य स्वरूपात सासू आहे. छळ होणाऱ्या स्त्रियांच्या वयोगटाकडे जर बारकाईने पाहिले तर असे दिसते की लग्न होऊन घरात आलेल्या नवीन सुनांचा छळ प्रामुख्याने देण्याघेण्यासाठी होतो. त्याचे कारण असेही असू शकेल की बहुतांशी एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात असल्याकारणाने लग्न झाल्याबरोबर सुनेचा प्रवेश एकत्र कुटुंबातच होतो. त्यामुळे तेथे तिचा छळ होताना दिसतो. स्वतःच्या घरात नवीन सुनेने प्रवेश केल्यामुळे सासूच्या 'घर' ह्या मर्यादित अधिकारक्षेत्राला धक्का पोचण्याचा संभव जास्त असतो. लहानपणापासून तारुण्यापर्यंत स्वतःचा मुलगा हेच बहुतांशी आपले विश्व मानणाऱ्या सासूला आपल्या मुलावरचा अधिकार संपण्याची एक भीती मनात निर्माण होते. त्याचप्रमाणे ह्या सास्वांचे शिक्षण साधारणपणे पहिली ते चौथी असे आढळते. त्यामानाने त्यांच्या सुना त्यांच्यापेक्षा जास्त शिकलेल्या असतात. त्यामुळे सासूच्या मनात एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो व त्याचा परिणाम ती आपले सुनेवरचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात होतो. त्यासाठी सुनेच्या प्रत्येक हालचाली व कामांकडे ती टीकात्मक दृष्टिकोणातून पहाते व तिच्यात दोष हुडकण्याचाच प्रयत्न करते. आपणही कधी काळी सुनेच्या भांबावलेल्या अवस्थेतून गेलो आहोत ह्याचा तिला विसर पडतो. स्वतःला मिळालेल्या अयोग्य वागणुकीची प्रतिक्रिया तिच्या सुनेसंबंधी तीव्र टीकात्मक वागणुकीत होते. मानसिकदृष्ट्या आपल्या भवितव्याविषयी चिंतीत रहाणारी सासू मग आपल्या सुनेचा विविध प्रकारे छळ करताना दिसते. त्याचबरोबर माहेश्वरी समाजात लग्ने लवकर झाल्याकारणाने सासू झालेल्या स्त्रीचे वय साधारणपणे चाळीस ते पंचेचाळीस असे दिसते. त्या वयातील तिच्या शरीरात होणारा बदल तिच्या मनावरही परिणाम करून जातो. सुनेकडून येणाऱ्या पैशासंबंधीच्या अपेक्षा त्या कुटुंबप्रमुखाच्या सल्ल्यानुसारच सर्वसाधारणपणे उच्चारल्या जातात. पण त्याचे दृश्य स्वरूप सासूकडूनच दिसते. ह्या साऱ्याचा परिणाम असा होतो की छळ होणाऱ्या सुनांना साधारणपणे गृहस्वामिनीची वागणूक मिळणे असंभवच असते. स्वतःच्या गृहस्वामिनीपदावर आलेली गदा सासू मानसिकदृष्ट्या पेलू शकत नाही. म्हणून सुनेची भूमिका ही घरात काम करणाऱ्या हक्काच्या मोलकरणीसारखी व घराण्याला वंशज देणाऱ्या मादीची असते. त्यापेक्षा जास्त सन्मानाने तिला साधारणतः वागवले जात नाही.

प्रकरण क्र. तीनमध्ये माहेश्वरी समाजातील देण्या-घेण्याच्या रीतीरिवाजांचे जे बारकाईने विवेचन केलेले आहे त्यावरून हे स्पष्ट दिसते की प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या वधुपक्षाकडून काही मागण्याची पद्धत दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या स्त्रियांनी प्रकटपणे तो छळ व्यक्त केला त्याचीच नोंद घेण्यात आली. पण बाकी स्त्रियांच्या घरात त्यासंबंधी धुसफुस नसेलच असे नाही. साधारणपणे सासूकडून होणाऱ्या छळाचा उल्लेख करताना सुनांनी मन मोकळे केले. पण स्वतःच्या पतीने केलेल्या अत्याचारासंबंधी, काही अपवाद वगळले तर, स्त्रिया गप्प राहिलेल्या दिसतात. त्याचे कारण 'पती हा परमेश्वर' असे मानणाऱ्या संस्कृतीचा पगडा तिच्यावर प्रचंड आहे. दुसरे असेही असेल की घरात दिवसभर सासू-सूनाच एकत्र रहात असल्याकारणाने त्यांच्यात मतभेद प्रकटपणे झालेले दिसतात. 'सासू' ह्या प्राण्यासंबंधी पारंपारिक दुष्टपणाचा चिकटलेला अर्थही त्यातून अभिप्रेत होतो.

सर्वसाधारणपणे असे दिसले की एकत्र कुटुंबपद्धतीत परंपरेने पालकांची अधिकारशाही चालत आलेली आहे. वडिलधाऱ्यांच्या आज्ञा, मग त्या अयोग्य का असेना, काहीही प्रश्न न विचारता पाळण्यात याव्यात ही परंपरा समाजात आढळते. सुनेचा स्त्री म्हणून जो कोंडमारा होताना दिसतो तो ह्या दोन पिढ्यांतील विचारांच्या फरकामुळे. नवीन व्यक्तिस्वातंत्र्याची व त्यातल्या त्यात स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व फुलविण्याची विचारसरणी घरातील वडिलधारी समजू शकत नाहीत व म्हणून तरुण पिढीचे मनोगतदेखील ही मंडळी ओळखू शकत नाहीत. स्त्रीला मूलतः दुय्यम दर्जाची मानण्यात आली असल्याकारणाने सुनांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची, स्वतंत्र विचारांची दखल अपवादानेच घेतली जाते. घरात जुन्या रीतीरिवाजांचा पगडा खूप असल्यामुळे वडिलधाऱ्या मंडळींच्या मानापमानाच्या कल्पना ह्या सध्याच्या युगात कालबाह्य जरी असल्या तरी त्या सोडण्याचे प्रयोजन त्यांना वाटत नाही. म्हणूनच तरुण विवाहित मुलगा-सून (पती-पत्नींना) ह्यांना आनंददायी, योग्य खेळीमेळीच्या, मोकळ्या सहजीवनास मुकावे लागते. समाजाचा लैंगिक सुखाकडे पाहण्याचा दृष्टिकोन एकांगी असल्याकारणाने तरुण जोडप्यांना निकोप कामजीवन अनुभवता येत नाही. म्हणून नवीन पत्नीला जाणून घेण्याची प्रक्रिया बऱ्याच वेळेला फार उशिरा सुरू होते. त्यामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक ताण-तणावांचे प्रतिसाद सुनांच्या जीवनात उमटताना दिसतात.

अशा रीतीने एक स्त्री म्हणून माहेश्वरी समाजातील स्त्रीचे हे चित्र फार उत्साहवर्धक जरी नसले तरी त्यात बदल होण्याची चिन्हे दिसण्यास सुरुवात झाली आहे. जसजसा शिक्षणाचा प्रसार वाढेल, जसजशा स्त्रिया जास्त प्रमाणात शिक्षित होऊन अर्थार्जन करण्याकडे वळतील, जसजशी स्त्रीच्या अर्थार्जनाची कुटुंबालाही गरज भासेल, जसजशी स्त्री स्वावलंबी बनून स्वाभिमानाने जगेल, आताच्या शिक्षित सुना पुढे जाऊन सासऱ्या

होतील, त्यांच्या विचारांची कक्षा सभोवतालच्या वातावरणाने, व प्रसारमाध्यमाद्वारा रुंदावत जाईल, शिक्षणाच्या संस्काराने जसजसे घरकामालाही मानाचे स्थान मिळेल, तसतसे 'स्त्री'कडे फक्त एक मादी, एक उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता समाज तिला सन्मानाने वागवेल. सुसंस्कारित, उदार दृष्टिकोणवादी तरुण-तरुणी आत्मविश्वासाने जेव्हा स्वतःच्या बाहुंवर व विचारांवर विश्वास ठेवून आपला जोडीदार निवडतील तेव्हा ह्या देण्या-घेण्याच्या संबंधी रुढीप्रिय असणाऱ्या ह्या समाजास नवीन दिशा मिळेल व स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्रपणे 'माणूस' म्हणून जगू शकेल, अशी अपेक्षा बाळगायला काहीच हरकत नसावी.

●

# प्रश्नावलीचा नमुना

**भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी**

८२०/२, शिवाजी नगर, पुणे ४११००४

लातूर शहरातील राजस्थानी स्त्री जीवनाची (माहेश्वरी-समाज) पाहणी

## विभक्त कुटुंबातील स्त्रियांसंबंधी माहिती

वैयक्तिक माहिती-

(१) नाव (२) वय

(३) शिक्षण (४) नोकरी

(५) पत्ता

(६) पतीची माहिती-

(अ) पतीचे नाव (ब) वय

(क) शिक्षण (ड) कोणत्या प्रकारची नोकरी/व्यवसाय

(७) एकत्र/विभक्त कुटुंबपद्धती

(८) कौटुंबिक माहिती-

कुटुंबातील सदस्य............वय..............शिक्षण........... व्यवसाय...........

(अ) सासू

(ब) सासरे

(क) दीर

(ड) जाऊ

(इ) नणंद

(९) एकत्र कुटुंब असावे की विभक्त कुटुंब असावे वाटते ?

कारणे—

(१०) तुम्ही विभक्त का झालात ? त्याचे फायदे-तोटे तुम्हाला कोणते जाणवतात ? तुम्ही विभक्त झाल्याबद्दल कुटुंबीय, समाज यांची प्रतिक्रिया काय झाली ? विभक्त होताना विरोध सहन करावा लागला कां ? लग्नानंतर किती वर्षांनी विभक्त झालात ? त्यामुळे तुमच्या पती-पत्नी नात्यावर काय परिणाम झाला ?

(११) लग्न कितव्या वर्षी ठरले ?

(१२) लग्नाला किती वर्षे झाली ?

(१३) लग्न कसे ठरले ? पसंती विचारली होती कां ?

(१४) सासरची आर्थिक परिस्थिती माहेरच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा चांगली होती का वाईट होती ? लग्नात देणे-घेणे काय ठरले ? त्यासंबंधी लग्न ठरल्यानंतर पहिल्या वर्षभरात काय अनुभव आले ?

(१५) मुलगे किती ?... वय.... शिक्षण.... व्यवसाय

(१६) मुली किती ?... वय.... शिक्षण.... व्यवसाय...

(१७) कुटुंबनियोजन झाले आहे का ? नसल्यास का नाही ?

(अ) शस्त्रक्रिया झाली असल्यास कोणाची झाली ?

(ब) कुटुंबनियोजनाकरता शस्त्रक्रिया करावयाची झाल्यास कोणाची करावी ? पुरुषाची/स्त्रीची ? का ?

(१८) तुमच्या मुलांपैकी किती मुलांची व मुलींची लग्ने झाली ?

(अ) मुलांच्या लग्नात हुंडा घेतला होता का ? किती ?

(ब) मुलींची लग्ने कोणत्या वयात झाली ? हुंडा दिला होता का ? किती ?

(क) मुलगा अगर मुलीचा पुनर्विवाह झाला असल्यास त्या संबंधीची माहिती—

(१९) तुम्ही इतर पुरुषमाणसांसमोर नवऱ्याशी बोलता का ?

(२०) (अ) नवरा घरात किती वेळ असतो ?

(ब) नवरा रात्री किती वाजेपर्यंत घरी येतो ?

(क) काही व्यसन आहे का ? पत्ते/जुगार/दारू/ बाई

(ड) नवरा-बायको एकत्र फिरावयास जाता का ?

(इ) नवरा-बायको बरोबर जेवता का ?

(२१) (अ) नवरा घरात सामान आणतो/नाही

(आ) घरकामात मदत करतो/नाही. मदत करत असल्यास कोणत्या प्रकारची ?

(अि) मुले वाढवताना नवऱ्याची मदत झाली/नाही. असल्यास कोणत्या प्रकारची ?

(अी) मुलांच्या आजारपणात मदत झाली/नाही झाली. असल्यास कोणत्या प्रकारची ?

(२२) घरखर्च आणि वैयक्तिक खर्चाकरता—

(अ) पैसे रोजच्या रोज मागून घ्यावे लागतात/नाही.

(ब) थोडे पैसे देऊन ठेवले असल्यास हिशोब द्यावा लागतो/नाही

(२३) बँकेत तुमचे स्वतःचे खाते आहे काय ?

(अ) असल्यास त्यात कोणते पैसे जमा होतात ? माहेरहून मिळालेले/नवऱ्याने दिलेले.

(ब) नवऱ्याने दिलेले पैसे बँकेत असल्यास, हिशोब द्यावा लागतो/नाही.

(क) घरातील आर्थिक व्यवहारासंबंधी तुमचे मत विचारात घेतले जाते का ? हो/नाही.

(२४) स्वतः काही व्यवसाय अगर नोकरी करता का ? करते/करण्याची इच्छा होती पण कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे अशक्य आहे/लग्नाआधी करत होते पण-

(अ) पतीला आवडत नाही म्हणून सोडली.

(आ) पतीच्या धंद्यात मदत करण्यासाठी म्हणून सोडली.

(२५) रिकामा वेळ कसा घालवता ?

(२६) घरातील महत्त्वाच्या निर्णयाबाबत तुमचे मत विचारात घेतले जाते का ? (उदा. मुलीचे शिक्षण, लग्न इत्यादी)

(२७) कोणते छंद आहेत ? ते जोपासता का ?

(२८) वाचन करता का? काय वाचता?
(२९) शिक्षणाचे महत्त्व तुम्हाला कितपत वाटते? शिक्षणाने स्त्रीची परिस्थिती सुधारली आहे, असे तुम्हास वाटते का?
(३०) अन्य विशेष माहिती–

## एकत्र कुटुंबातील स्त्रियांसंबंधी माहिती : जादा प्रश्न

(१) सासू-सासऱ्यांसमोर नवऱ्याशी बोलता का?
(२) सासऱ्यांशी बोलता का? बोलताना तोंडावर घुंघट असतो का?

## विधवा स्त्रियासंबंधी माहिती : जादा प्रश्न

(१) तुमचा नवरा तुमच्या वयाच्या कितव्या वर्षी वारला?
(२) पुनर्विवाहासंबंधी विचार व इच्छा होती/नाही.
(अ) पुनर्विवाह झाला नसल्यास त्यामागील कारणे—
(ब) पुनर्विवाह झाला असल्यास कुटुंबीय, समाज यांचा त्रास सहन करावा लागला का? कोणत्या स्वरूपाचा?
(३) नवऱ्याच्या मृत्यूनंतर कोठे राहात आहात? माहेरी/स्वतंत्र/सासरी.
तिथे राहण्याचे फायदे/तोटे अगर परिणाम कोणता जाणवतो?
(४) जेथे राहता, तिथल्या कुटुंबातील सदस्यांची माहिती.
(५) विभक्त कुटुंब पद्धती आहे की एकत्र कुटुंब पद्धती? त्या दोन्हींपैकी कोणती असावी असे वाटते? कारणे—
(६) नवरा गेल्यानंतर उदरनिर्वाह कसा करता?
(७) नवऱ्याची मालमत्ता तुम्हाला मिळाली/नाही/थोडी मिळाली.
(अ) मिळाली नसल्यास का मिळाली नाही? कारणे—
(ब) मिळाली असल्यास—मिळताना काही अडचणी आल्या का?
(क) नवऱ्याची मालमत्ता मिळाली असून ती खर्च करण्याचे स्वातंत्र्य घरात आहे का?
(ड) स्वत: कमवत असल्यास आलेला पैसा खर्च करण्याचा अधिकार आहे का? नसल्यास का नाही?
(८) स्वत: नोकरी किंवा व्यवसाय करताना घरातून आणि समाजातून विरोध झाला/नाही.
झाला असल्यास कोणत्या प्रकारचा? त्याचे अनुभव.
(९) नोकरी-व्यवसाय पती जिवंत असताना करत होता का? की पती निधनानंतर नोकरी-व्यवसाय सुरू केला? त्यामुळे घरातील, कुटुंबातील स्थानात काही बदल झाला का?
(१०) पती निधन पावल्यानंतर घरातील व समाजातील तुमच्या स्थानात काही बदल झाले का? झाले असल्यास कोणते?
(११) तुमच्या मुली काय शिकतात? त्यांना कुठपर्यंत शिकवायची तुमची इच्छा आहे? त्यांच्या शिक्षणासंबंधी निर्णय कोण घेतो?

## नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांसंबंधी माहिती : जादा प्रश्न

(१) तुम्ही कमावता म्हणून तुमच्या घरातील स्थानात बदल झाला का ? झाल्यास कोणता ?

## घटस्फोटिता किंवा परित्यक्ता स्त्रियांसंबंधी माहिती : जादा प्रश्न

(१) (अ) पतीने सोडून दिल्यानंतर/घटस्फोट दिल्यानंतर कोठे राहता ? माहेरी/स्वतंत्र.

(२) (ब) जेथे राहता तेथील कुटुंबातील सदस्यांची माहिती.

(२) (अ) सासरी एकत्र कुटुंब होते की विभक्त ?

(ब) काय असावे असे वाटायचे ? कारणे-

(३) घटस्फोट लग्नानंतर किती वर्षांनी दिला/घेतला ? त्यामागील कारणे-

(४) घटस्फोटिता/परित्यक्ता झाल्यावर पुनर्विवाहाची इच्छा होती/नव्हती.

(अ) इच्छा असताना पुनर्विवाह झाला नाही. कारणे...

(ब) पुनर्विवाह झाला आहे.

(५) घटस्फोटिता/परित्यक्ता झाल्यावर पोटगी मिळाली/नाही.

(अ) मिळत असल्यास पुरेशी आहे/नाही.

(ब) मिळत असल्यास आलेल्या अडचणी.

(क) पोटगीचे पैसे खर्च करण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला आहे/नाही.

(ड) मिळत नसल्यास कारणे.

(६) उदरनिर्वाह कसा करता ?
नोकरी/व्यवसाय/परावलंबी.

(७) (अ) स्वत: नोकरी व्यवसाय करीत असल्यास ती करताना घरातून आणि समाजातून विरोध झाला/नाही.

(ब) झाला असल्यास कोणत्या प्रकारचा ? त्याचे अनुभव.

(८) घटस्फोटिता/परित्यक्ता झाल्यावर कुटुंबियांकडून, समाजाकडून कशी वागणूक मिळाली ?

## संदर्भ सूची :

पं. जोशी, महादेव शास्त्री
भारतीय संस्कृती कोश खंड-७ वा
पुणे : भा.सं. कोश मंडळ, १९७२
(पृ. ३६१-३६२)

**The Girl Child in Rajasthan**

Dept. of Women and Children
Govt. of Rajasthan, Jaipur 1991

**Rajasthan**
**An Analysis of the Situation of Children and Women 1991**
United Nation's Children's Fund
New Delhi 1991.

REFBK-0026974



**प्रा. चंद्रकला भार्गव**

शिक्षित, श्रीमंत, सुंदर अशा मंजुश्री सारडाचा संशयास्पदरीत्या मृत्यू झाला. सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या उठावाचा, निषेधाचा न्यायपद्धतीवर काहीही परिणाम झाला नाही. सर्वोच्च न्यायालयात शरद सारडा निर्दोष सुटला. इतकेच नव्हे, तर काही दिवसांनंतर त्याचे एका गरीब मुलीशी लग्न लागले व तो भारत सोडून अमेरिकेत स्थायिकही झाला. समाज, न्यायपद्धती त्याचे कांहीही वाकडे करू शकली नाही. श्रीमंत, सुंदर व सुशिक्षित असणाऱ्या मंजुश्रीच्या जीवनात जे प्रश्न निर्माण झाले, तसेच प्रश्न माहेश्वरी समाजातील इतर मुलींच्या जीवनात आहेत का ? या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न पाचशे माहेश्वरी महिलांच्या मुलाखती घेऊन करण्यात आला. या सर्वेक्षणावर आधारित निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न.